# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०३/२००७.** **दिनांक ३१.०३.२००७**
**स्थळ - शिर्डी कार्यालय** **वेळ- दुपारी २.३० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस-वशी-०४-४८७८-२००७, दि. २३ मार्च, २००७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ३१ मार्च, २००७ रोजी दुपारी २.३० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१. | मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष | ०२. | मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष |
| ०३. | मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील | ०४. | मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग |
| ०५. | मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव | ०६. | मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे |
| ०७. | मा.श्री.रमाकांत गणेश कर्णिक | ०८. | मा.कॅप्टन सुरेश वासुदेवा |
| ०९. | मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर | १०. | मा.श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पाण्ड्ये |
| ११. | मा.डॉ.पी.एल.तिवारी | १२. | मा.श्री.सुमित्रा कैलास कोते. |

मा.श्री.भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.श्रीमती रिम्पल लोहिया, मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी दूरध्वनीद्वारे तसेच मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्री समि खतिब यांनी पत्र व फॅक्सव्दारे कळविले त्याची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१ दि.१७.०२.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. २४८.** दि.१७.०२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेत असतांना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१) निर्णय क्र.११५(१४) मध्ये शेवटचा परिच्छेद**

"यावर सविस्तर चर्चा होऊन,उपरोक्त चारही कोटेशनसादरकर्त्यांना पुनश्च उपसमितीचे सभेपुढे समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात येऊन,अंतिम निर्णय घेण्यात यावा, असें ठरलें."

**याऐवजी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन,भक्तनिवासस्थान विभागासाठी बेडशीट व उशीकव्हर खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन फेर निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें."

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग )

**०२) निर्णय क्र.२१३ मध्ये-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीरामनवमी उत्सव-२००७ करीता पालखी मार्गावर श्रीसाईभक्तांना पिण्याचे पाण्याची लाईट नसल्यामुळे गैरसोय होऊ नये याकरीता एक जनरेटर कोटेशन्स मागवून मा.कार्यकारी अधिकारी यांनी निम्नतम दराने खरेदी करावे असे ठरले."

**याऐवजी**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री रामनवमी उत्सव-२००७ करीता पालखी मार्गावर श्रीसाईभक्तांना पिण्याचे पाण्याची लाईट नसल्यामुळे गैरसोय होऊ नये याकरीता एक जनरेटर कोटेशन्स मागवून मा.कार्यकारी अधिकारी यांनी निम्नतम दराने खरेदीस व येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली." (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**०३) निर्णय क्र.२३२ मध्ये-**

परिचारिका (बी.एस्सी) या पदावर कु.नजमा एम.सय्यद या बी.एस्सी नर्सिंग (ॲपिअर) असल्याने सदर परिक्षेत उत्तीर्ण झालेनंतर त्यांना नेमणूक देण्यात यावी. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**०४) निर्णय क्र. २४४ मध्ये शेवटचा परिच्छेद-**

" तसेच संस्थानमार्फत स्टेज ग्रीन रुम व कनात इत्यादीसाठी रुपये २०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

**याऐवजी**

" तसेच संस्थानमार्फत स्टेज ग्रीन रुम व कनात इत्यादीसाठी रुपये २०,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले". (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**०५) निर्णय क्र. २४५ मध्ये शेवटचा परिच्छेद-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट व दत्त धर्मिक एवंम परमार्थीक ट्रस्ट, इंदोर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने अक्षय तृतीयाचे मुहर्तावर ३०१ सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात यावे. या विवाह सोहळ्यासाठी मागील वर्षाप्रमाणे याही वधु-वरांचा पोशाख,मंडप,स्टेज,विद्युत रोषणाई, वाजंत्री इ. खर्च श्री साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डी यांचेमार्फत व मनीमंगळसुत्र, भांडी, प्रसिध्दीसाठी बोर्ड, बॅनर्स, दुरदर्शन/केबल जाहीरात, भोजन व्यवस्था, कलाकर व बॅण्ड पथकासह उर्वरित आवश्यक तो खर्च श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत करण्यात यावा."

**<u>याऐवजी</u>**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट व दत्त धर्मिक एवंम परमार्थीक ट्रस्ट, इंदोर व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे संयुक्त विद्यमाने अक्षय तृतीयाचे मुहर्तावर ३०१ सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयाचे आयोजन करण्यात यावे. या विवाह सोहळ्यासाठी मागील वर्षाप्रमाणे याही वधु-वरांचा पोशाख,मंडप,स्टेज,विद्युत रोषणाई, वाजंत्री इ. खर्च श्री साई सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट,शिर्डी यांचेमार्फत व मनीमंगळसुत्र, भांडी, प्रसिध्दीसाठी बोर्ड, बॅनर्स, दुरदर्शन/केबल जाहीरात, भोजन व्यवस्था, कलाकर व बॅण्ड पथकासह उर्वरित आवश्यक तो खर्च श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेमार्फत करण्यात यावा. तसेच, सामुदायिक विवाह सोहळयासाठी वधु-वरांच्या वयाचा अधिकृत दाखला घेतल्यावरच नाव नोंदणी करावी असे ठरले. "

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५/जनसंपर्क अधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं.०२ दिनांक १६.०३.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या प्रसादालय उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र. २४९.** व्यवस्थापन समितीचे दि.१६.०३.२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तीतील खालील निर्णयांना पुष्टी देण्यात आली.

**<u>०१)नवीन प्रसादालयाकरीता किचन इक्वीपमेंट व अलाईड सिस्टीम यंत्रणा खरेदीकामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे-</u>**

नवीन प्रसादालयासाठी काही भारतीय व काही परदेशी बनावटीची मशीनरी, उपकरणे खरेदी करण्यासाठी अंदाजे रु.३,७५,२१,०००/- व फर्निचरसाठी अंदाजे रु.२,२४,३७,०००/- एवढा खर्च येईल असे अंदाजपत्रक श्री संजीव देशमुख , किचन सल्लागार यांनी दिलेले आहे.

सदरचा प्रस्ताव दि.६/१/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे विचारार्थ सादर केला होता. सदर विषयाबाबत सभेत चर्चा होउन निर्णय क्र.२४ नुसार संस्थानचे वेळोवेळी होणारे उत्सवात तसेच इतर वेळी प्रसादालयात तयार करण्यात येणारे पदार्थ इ. चा सखोल विचार करुन प्रसादालयासाठी आवश्यक असलेली मशीनरी, उपकरणे तसेच इतर यंत्रणा खरेदी करणेबाबतचा निर्णय घेण्याकामी व्यवस्थापन समिती सदस्या मा.श्रीमती उर्मीला जाधव, मा.श्री सुरेश वाबळे, मा.श्री पांडुरंग अभंग, मा.श्रीमती रिम्पल लोहीया यांची उपसमीती स्थापन करण्यात आलेली आहे.

त्यानुसार किचन इक्वीपमेंटस् व अलाईड सिस्टीम खरेदीकामी मोहरबंद निवीदा विक्री व भरलेल्या निवीदा सादर करणेकामी दि. १८ व १९/०२/०७ तसेच २३/०२/०७ रोजी वृत्तपत्रात जाहीरात देण्यात आलेली होती. कोरे निवीदा फॉर्म विक्रीचा कालावधी १९/०२/०७ ते २८/०२/०७ व भरलेल्या निवीदा शिर्डी /मुंबई कार्यालयास सादर करण्याची मुदत ०५/०३/०७ अखेर अशी देण्यात आली होती.

वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहीरातीनूसार खालील निवीदाधारकांनी मुंबई व शिर्डी कार्यालयातून निविदाफॉर्म खरेदी केलेले आहेत.

**<u>मुंबई कार्यालयाकडून विक्री झालेल्या निवीदांचा तपशील.</u>**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | राईट इक्वीपमेंटस् प्रा.लि., मुंबई |
| ०२ | रुसेल एअरफ्लो सिस्टीम प्रा.लि., मुंबई |
| ०३ | क्लासिक इंजिनिअर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स , मुंबई |
| ०४ | कॉम्पेटी टुल्स प्रा.लि., ठाणे |
| ०५ | गजानन इक्वीपमेंटस् कंपनी , मुंबई |
| ०६ | निलकमल क्रेटस ॲण्ड बिनस् प्रा.लि., मुंबई |
| ०७ | स्टॅकवेल मार्केटिंग सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई |

| | |
|---|---|
| ०८ | एल.एल.इक्वीपमेंटस् ॲण्ड मशिनरी प्रा.लि., मुंबई |
| ०९ | सोमचंद जेठालाल ॲण्ड कंपनी , दादर |
| १० | कास्केम मेटल्स प्रा.लि., कोलकत्ता |
| ११ | ट्रिडेंट इंजिनिअर्स, कोईमतूर |
| १२ | केबीसी सिस्टीमस् , पुणे |
| १३ | वॅंग प्रोफेशनल्स, नवी दिल्ली. |
| १४ | सिगमॅक्स हायटेक प्रा.लि., मुंबई |
| १५ | क्लास प्रोडक्ट प्रा.लि. , नवी दिल्ली |
| १६ | अल्फा टेक इंडस्ट्रीज , पुणे |
| १७ | संदीप हैबाती / न्यु मंगल मेटल वर्क्स , गोवा |
| १८ | रविंद्र इक्वीपमेंटस् कार्पोरेशन , नवी दिल्ली |
| १९ | मे.कुमार इक्वीमेंटस् (इंडीया) , नवी दिल्ली |
| २० | अंबा एंटरप्रायजेस , मुंबई |
| २१ | रिनॅक इंडीया लि. , भांडूप मुंबई |
| २२ | सेल्सीअर रेफ्रीजरेशन प्रा.लि., मुंबई |
| २३ | ए.वाय.ए इंजिनिअर्स , मुंबई |
| २४ | इरोटेक कार्पोरेशन , मुंबई |
| २५ | सिटीझन स्केल (इं) प्रा.लि., मुंबई |

**शिर्डी कार्यालयाकडून विक्री झालेल्या निवीदांचा तपशील.**

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | विघ्नेश्वर एअर कंडीशनींग प्रा.लि. , नाशिक |
| ०२ | मॅक्सीथर्म वर्क्स , औरंगाबाद |
| ०३ | त्रिभूना कार्पोरेशन , नागपूर |
| ०४ | कोनार्क इंजिनिअरींग , नाशिक |
| ०५ | साई इंजिनिअरींग , नाशिक |
| ०६ | श्रेयस एन्टरप्राईजेस , अ.नगर |
| ०७ | जय नवनाथ इंजिनिअरींग , कोल्हापूर |
| ०८ | न्यु इंडीया मेटल्स , शिनोला कोल्हापूर |
| ०९ | विशाल इंजिनीअरींग , मोजीनंद , हिमाचलप्रदेश |

वरीलप्रमाणे एकूण २५+९=३४ कोऱ्या निवीदाची विक्री झालेली आहे. त्यापैकी खालीलप्रमाणे मोहरबंद निवीदा निर्धारीत वेळेत दि. ०५/०३/०७ अखेर जमा झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | सिटीझन स्केल (इं) प्रा.लि., मुंबई |
| ०२ | मे.गजानन कॅन्टीन इक्वीपमेंट कंपनी , मुंबई |
| ०३ | मे.कॉम्पेटी टुल्स प्रा.लि. , ठाणे |
| ०४ | मे.कांचन व्हॅसली प्रा.लि. , कोलकत्ता |
| ०५ | मे.केबीसी सिस्टीमस् , पुणे |
| ०६ | मे. वॅंग प्रोफेशनल्स , नवी दिल्ली |
| ०७ | मे. रुसेल एअरफ्लो सिस्टीमस् प्रा.लि., मुंबई |
| ०८ | मे. अल्फा टेक इंडस्ट्रीज , पुणे |
| ०९ | मे. अंबा एन्टरप्रायजेस , मुंबई |

| | |
|---|---|
| १० | मे. राइट इक्वीपमेंटस् प्रा.लि., मुंबई |
| ११ | मे. सेल्सीअस रेफ्रीजरेशन प्रा.लि. मुंबई |
| १२ | मे. एल.एल. इक्वीपमेंटस् , मुंबई |
| १३ | मे. ए.वाय.ए इंजिनीअर्स , मुंबई |
| १४ | जय नवनाथ इंजिनीअरींग वर्क्स , कोल्हापूर |
| १५ | मॅक्सीथर्म वर्क्स , औरंगाबाद |
| १६ | श्रेयस एन्टरप्राईजेस , अहमदनगर |
| १७ | मंगल मेटल वर्क्स , बेळगांव |
| १८ | निलकमल क्रेटस् ॲण्ड बिन्स प्रा.लि., मुंबई |
| १९ | स्टॅकवेल मार्केटिंग सर्व्हीस प्रा.लि. , मुंबई |

निर्धारीत तारखेनंतर दिनांक ०९/०३/२००७ रोजी , शिर्डी कार्यालयात बाय हॅण्ड प्राप्त झालेली निवीदा.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | विघ्नेश्वर एअर कंडीशनींग प्रा.लि., नाशिक |

उपरोक्तप्रमाणे १ ते १९ मोहरबंद निवीदा निर्धारीत तारीख व वेळेत आलेल्या असून १ निवीदा निर्धारीत तारीख संपलेनंतर चार दिवस उशिरा प्राप्त झालेली निविदा आजचे सभेतउपस्थित निविदासादकर्त्यांचे समक्ष उघडण्यात आल्या.

यानंतर उपस्थित निविदासादकर्त्यांना वैयक्तीक बोलाविण्यात येऊन त्यांनी देऊ केलेल्या दरात सुट देणार किंवा कसे याबाबत विचारणा केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

## (A) Imported Eqiupment-

| Name of equipment | मे.एल.एल. इक्वीपमेंटस्, मुंबई | मे. राइट इक्वीपमेंटस् प्रा.लि., मुंबई | मे.कांचन व्हॅसली प्रा.लि. , कोलकत्ता | मे. वॅग प्रोफेशनल्स , नवी दिल्ली |
|---|---|---|---|---|
| **(01) Conveyr dish Washer**<br>Capacity 3200 Plates (12x12 in S.S.) per hour<br>02 Nos | 2269620.00x2 =<br>4539240.00 inclusive 12.5% Vat &10% Discount | 2807850.00x2=<br>5615700.00 | ----- | 2872735.00x2=<br>5745470.00<br>flight type<br>480395.00<br>Conveyor Dish Washer |
| **(02) Vegetable Processor**<br>Capacity 2400 kg per hour<br>02 Nos | ---- | 710800x2=<br>1421600.00 | 873161.00x2=<br>1746322.00 | 178347.00x2=<br>356694.00<br>Withour Blade<br>324337.00x2=<br>648674.00 With Blade |
| **(03) Onion Peller**<br>Capacity 30 kg per 3 minutes 02 Nos | ---- | 430650.00x2 =<br>861300.00 | 734195.00x2 =<br>1468390.00 | 123041.00x2=<br>246082.00<br>Without Abrasive plate<br>141197.00x2=<br>282394.00<br>With Abrasive plate |
| **(04) Garlic Peeler**<br>Capacity 05 kg per 3 minutes 01 Nos | ---- | 303000.00 | 541819.00 | --- |
| **(05)Tiling Type Vegetable Washer**<br>Capacity 70 kg per 3 to 5 minutes 01 Nos. | --- | 819500.00 | 1468109.00 | 841959.00 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **(06) Tiling Type Grain Washer**<br>Capacity 70 kg per 3 to 5 minutes 02 Nos. | --- | 819500.00x2=<br>1639000.00 | 1468109.00x2=<br>2936218.00 | 841959.00x2=<br>1683918.00 |
| **(07) Batter Mxer/Homigeniser**<br>Capacity 500 Liters 02 Nos | --- | 440000.00x2=<br>880000.00 | 787851.00x2=<br>1575702.00 | 258004.00x2=<br>516008.00 |

निविदासादरकर्त्यांशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे सुट देऊ केली आहे.

(०१) मे.एल.एल. इक्वीपमेंटस्, मुंबई यांनी फक्त Conveyr dish Washer मशिनसाठी देऊ केलेल्या दरात १०% सुट देऊ केली.

(०२) मे. राइट इक्वीपमेंटस् प्रा.लि., मुंबई यांनी कोणत्याही प्रकारची सुट देऊ केली नाही.

(०३) मे.कांचन व्हॅसली प्रा.लि., कोलकत्ता हे चर्चा/वाटाघाटीसाठी अनुपस्थित होते.

(०४) मे. वँग प्रोफेशनल्स, नवी दिल्ली यांनी Conveyr dish Washer वर २% व इतर मशिनरीवर ३% सुट देऊ केली.

उपरोक्त मशिनरी परदेशी बनावटीची असल्याने सदरहू मशिनरी संस्थानने आयात केल्यास किंमत कमी होईल किंवा कसे याबाबत निविदासादरकर्त्यांना विचारणा केली असता किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात तफावत पडेल असे त्यांनी सभेस सांगितले.

यावर सविस्तर चर्चा होऊन निविदासादरकर्त्यांनी दरात सुट दिल्यानंतर येणारी किंमत व संस्थानने मशिनरी थेट परदेशातून मागणी केल्यास येणारी किंमत याबाबत ईमेलद्वारे कळवावे असे ठरले. त्यांनी देऊ केलेल्या किंमतीबाबत तक्ता तयार करुन तो उपसमितीचे पूढील सभेपूढे सादर करावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

## (B) ALLIED SYSTEMS

| Name of equipment | **विघ्नेश्वर एअर कंडीशनींग प्रा.लि., नाशिक** | **मे.केबीसी सिस्टीमस्, पुणे** | **मे.ए.वाय.ए इंजिनीअर्स, मुंबई** | **मे.सेल्सीअस रेफ्रीजरेशन प्रा.लि. मुंबई** | **मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद** | **मे. अंबा एन्टरप्रायजेस , मुंबई** |
|---|---|---|---|---|---|---|
| 01) E.O.T CRANE Capicity 02 ton 02 Nos | --- | --- | --- | --- | --- | --- |
| 02)BOILER (NON IBR) WITH ACCESSORIES Capicity steam generation of 850 kg per hour –01nos | --- | --- | ----- | --- | 21,80.300.00<br>Total cost No .other Taxes | 8,62,250.00<br>1,07,781.25<br>(12.50 % Vat<br>= 9,70,031.25 |
| 03).COLD ROOM(FOR DRY FRUITS) External room size 4.70x 5.80x2.7m-01Nos | 1101000.00<br>123000.00 Insta Charges<br>137625.000<br>VAT 12.50 %<br>15055.20 ServiceCharge<br>1376680.20 | 260547.00<br>287495.00<br>68505.25 Vat 12.50 %<br>35458.00 Civil Work<br>40292.00 Labour Charge<br>4931.75 Service Tax<br>5998.00 Packing & For.<br>20000.00 Transport<br>723227.00<br>--------------------<br>1782144.00 For both together | ----- | 244000.00<br>133000.00<br>47125.00 Vat 12.50<br>42125.00 Insta<br>5140.80 Service Tax<br>471265180 | ---- | --- |
| 04)COLD ROOM(FOR VEGITABLES) External room size 6.30x 7.8x2.7m-01Nos | --- | 369778.00<br>437398.00<br>807176.00<br>100897 Vat 12.5 %<br>55000.00 Civil | ---- | 375000.00<br>66500.00<br>128500.00<br>71250.00 Vat 12.5%<br>641250.00 | ---- | ---- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | Work<br>60000.00 Labour Charge<br>71344.00 Service Tax<br>8500.00 Packing<br>20000.00 Transport<br>1058917.00 | | 60000.00 Installation<br>7344.00 Service Tax<br>708594.00 | | |
| 05)REVERSE OSMOSIS SYSTEM Capacity : 200 Ltr R.o Water per hour 1 Nos | ---- | ----- | ------ | ----- | 1565000.00 Total Cost No other taxes | ---- |
| 06) HIGH PRESSURE WATER JET MACHINE | ---- | ----- | 24750.00x4<br>99000.00 No other Taxes | ---- | ---- | ----- |
| 07)LADOO POLYTHENE BAGS PACKING MACHINE<br>Capacity: 40 Packets per minutes | ---- | ----- | ----- | ----- | ----- | ----- |

**उपरोक्त निविदासादरकर्त्यांपैकी मे.ए.वाय.ए इंजिनीअर्स, मुंबई , मे.मॅक्सीथर्म वर्क्स, औरंगाबाद व मे. अंबा एन्टरप्रायजेस, मुंबई या निविदासादरकर्त्यांनी प्रत्येकी एकाच अलाईड सिस्टम व इंडीयन इक्वीपमेंटचा दर दिलेला असल्याने त्यांचे दरांची तुलना करणे अशक्य असल्याने त्यांना एकत्रित बोलावुन त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत विचारणा करुन त्यांना लेखी स्वरुपात बंद पाकिटात दर देण्याबाबत सांगण्यात आले. तसेच ज्या अलाईड सिस्टम व इंडियन इक्विपमेंटसकरिता प्रति आयटेमसाठी एकच दरपत्रक आल्याने दराची तुलना होऊ शकत नसल्याने त्या सिस्टमसाठी गुजराथ,नवी दिल्ली, कर्नाटक या राज्यातील तसेच महाराष्ट्रातील नाशिक, मुंबई, पुणे, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद, अहमदनगर या ठिकाणाचे वर्तमानपत्रात जाहिरात देऊन फेर निविदा मागविण्यात याव्यात असें ठरलें व आलेल्या निविदांसोबत आजच्या निविदासादरकर्त्यांनी सादर केलेली सुधारित दराची बंद पाकिटे उघडण्यात येऊन, निर्णय घ्यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

तसेच कोल्डरुम (ड्राय फ्रुट करिता) व कोल्डरुम (व्हीजीटेबलकरिता) मे.विघ्नेश्वर एअर कंडिशनिंग प्रा.लि.,नाशिक, मे.के.बी.सी.सिस्टम्स,पुणे व मे.सेल्सीयस रेफ्रिजरेशन,मुंबई यांचेशी चर्चा केली असता त्यांनी निविदेत देऊ केलेल्या मुळ रकमेवर खालीलप्रमाणे सूट देऊ केली.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | कोल्डरुम,ड्राय फ्रुट व व्हीजीटेबल करिता देऊ केलेली एकत्रित किंमत | बेसिक रकमेवर देऊ केलेली सुट रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | मे.विघ्नेश्वर एअर कंडिशनिंग प्रा.लि.,नाशिक, | १३,७६,६८०.२० | २ % |
| ०२ | मे.के.बी.सी.सिस्टम्स,पुणे | १७,८२,१४४.०० | २ % |
| ०३ | मे.सेल्सीयस रेफ्रिजरेशन,मुंबई | ११,७९,८५९.८० | ५ % |

**मे.सेल्सीयस, रेफ्रिजरेशन, मुंबई यांचे दर निम्नतम आहेत मात्र त्यामध्ये सिव्हील काम काम संस्थानचे स्कोपमध्ये राहील असे नमूद केलेले आहे. त्यामूळे दरांची तूलना होऊ शकत नाही. सदर काम मे.सेल्सीयस,रेफ्रिजरेशन,मुंबई हे करणार किंवा कसे याबाबत त्यांना विचारणा करावी. सिव्हील काम करणार असल्यास त्याकामी खर्च कळविण्यास सांगावे व त्यांचेकडून सिव्हील कामाची खर्चाची रक्कम आल्यानंतर पुढील उपसमिती सभेमध्ये दराचे तुलनात्मक बाबींवर विचार करुन निर्णय घ्यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**०२) <u>नवीन प्रसादालयात लिफ्ट बसविणे बाबत</u>**

नविन प्रसादालय इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर असुन सदरील इमारतीस तळमजला व पहिला मजला असे एकूण दोन मजले आहेत. पहिल्या मजल्यावर व्ही.आय.पी हॅाल तसेच किचन असल्याने सदर किचनकरिता तळ माळा ते पहिला माळा अशी सर्व्हीस लिफ्ट व व्ही.आय.पी करीता पॅसेंजर लिफ्ट अश्या एकूण दोन लिफ्ट बसविण्याचे ठरविलेले आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

**अ)पॅसेंजर लिफ्ट-**

| अ.क्र. | तपशील | क्षमता / परिमाण |
|---|---|---|
| ०१) | वजन वहन क्षमता | ८८४ किलो. |
| ०२) | वेग | १ मी / सेकंद |
| ०३) | केबिन साईज | २००० x ११०० x २३०० |
| ०४) | हॉईस्टवे | २५०० x १८०० |
| ०५) | कार एन्टरन्स | ९०० x २०० |
| ०६) | हॉईस्टवे एन्टरन्स् | ९०० x २००० |
| ०७) | अंदाजे किंमत<br>+ एक्साईज ड्युटी १६.३२ %<br>+सर्व्हिस टॅक्स १२.२४ % ( २० % वर)<br>एकुण | रु. १३,९६,०००.००<br>रु.२,२७,८२७.००<br>रु.०,३९,७५१.००<br>रु.१६,६३,५७८.०० |

**ब)माल वाहतूक लिफ्ट :-**

| अ.क्र. | तपशील | क्षमता / परिमाण |
|---|---|---|
| ०१) | वजन वहन क्षमता | ३००० किलो. |
| ०२) | वेग | १ मी / सेकंद |
| ०३) | केबिन साईज | २००० x ३००० x २००० |
| ०४) | हॉईस्टवे | २९०० x ३४०० |
| ०५) | कार एन्टरन्स | १८०० x २००० |
| ०६) | हॉईस्टवे एन्टरन्स् | १८०० x २००० |
| ०७) | अंदाजे किंमत<br>+ एक्साईज ड्युटी १६.३२ %<br>+सर्व्हिस टॅक्स १२.२४ % ( २० % वर)<br>एकुण | रु. १७,१८,०००.००<br>रु.२,८०,३७८.००<br>रु.०,४८,९२०.००<br>रु.२०,४७,२९८.०० |

या इमारतीचे आर्किटेक्ट मा.शक्ती परमार,मुंबई यांनी सदर लिफ्टचे इस्टीमेंट पाठविलेले असुन ३००० किलो वजन वहन क्षमतेच्या सर्व्हीस लिफ्टसाठी रु.२०,४७,२९८.०० व ८८४ किलो वजन वहन क्षमतेच्या पॅसेंजर लिफ्टसाठी रु.१६,६३,५७८.०० असे दोन्ही लिफ्ट मिळून रु. ३७,१०,८७६.०० इतका अपेक्षित खर्च असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालयासाठी ३००० किलो वजन वहन क्षमतेचे सर्व्हीस लिफ्ट व ८८४ किलो वजन वहन क्षमतेचे पॅसेजर लिफ्ट खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात यावी याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३७,१०,८७६.०० चे खर्चास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**०३) मे.आय.व्ही.आर.सी.एल. इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि.हैद्राबाद यांचे नवीन प्रसादालयाचे इलेक्ट्रीक कामाचे रनिंग बीलाची रक्कम आदा करणे बाबत**

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४-०३-२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या मिटींगमध्ये नविन प्रसादालयाचे इलेक्ट्रीकल कामाबाबत विचारविनिमय होऊन नविन प्रसादालय प्रकल्पाच्या इमारतीसाठी नेमण्यात आलेले आर्किटेक्ट, मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांचेकडून आलेल्या इलेक्ट्रीकल कामाच्या इस्टिमेटची तांत्रिक पडताळणी सार्वजनिक बांधकाम, विद्युत विभाग यांचेकडून करुन घेऊन या कामासाठी त्यांची तांत्रिक मान्यता प्राप्त करण्यात यावी व त्यानुसार निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले होते. त्यानुसार इलेक्ट्रीकल कामाचे अंदाजपत्रकाचे मान्यतेबाबत अनुक्रमे (०१)मा.कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम (विद्युत)विभाग, नाशिक, यानंतर (०२) मा.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग,औरंगाबाद व शेवटी (०३) मा.मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, मुंबई यांचेकडून पडताळणी करुन घेण्याची पद्धत असल्याने प्रथम नविन प्रसादालयाच्या इलेक्ट्रीकल कामाचे इस्टिमेट मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (विद्युत) विभाग, नाशिक यांचेकडे मान्यतेसाठी व पडताळणीसाठी सादर करण्यात आले होते.

या दरम्यान मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांना जा.नं. एसएसएस/वशी-बांधकाम/५९२१/२००६ दिनांक ०३-०५-२००६ अन्वये इमारतीच्या सिव्हील कामाचा कार्यादेश देण्यात येऊन त्यानुसार त्यांनी काम चालू केले होते. परंतू नविन प्रसादालय इलेक्ट्रीकल कामाचे इस्टिमेटच्या मान्यतेची कार्यवाही चालू असल्याने तोपर्यंत इलेक्ट्रिकलचे टेंडर काढलेले नव्हते, व त्यामुळे इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर नेमलेला नव्हता. म्हणून मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबादच्या चालू असलेल्या कामामध्ये स्लॅबमधील टाकावयाच्या इलेक्ट्रिकलच्या

पी.व्ही.सी.पाईपबाबत प्रश्न निर्माण झाला होता व त्यामुळे मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि, हैद्राबाद यांचे स्लॅबचे काम थांबलेले होते.

शिर्डी येथे दिनांक २१-०८-२००६ रोजी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्र.जाधव यांचे समवेत नविन प्रसादालयाच्या चालू असलेल्या कामाच्या प्रगती आढाव्यासाठी झालेल्या मिटींगमध्ये नविन प्रसादालय इलेक्ट्रीकल इस्टिमेटची तांत्रिक पडताळणीची कार्यवाही प्रक्रीया चालू असल्याने व त्यामुळे इलेक्ट्रिकल कामाचे टेंडर काढण्यास वेळ लागणार असल्याने या कालावधीत मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांचे काम थांबू नये म्हणून मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांनी इलेक्ट्रिकल कामाचे टेंडर फायनल होईपर्यंत चालू असलेल्या कामातील स्लॅबमध्ये पी.व्ही.सी.पाईप टाकणेचे ठरले, यास अनुसरुन मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस् , मुंबई यांनी मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांचे दर पडताळून त्यांचे दिनांक १२-०९-२००६ चे फॅक्स अन्वये दर मंजूर केलेले होते व याबाबत मे.टाटा कन्सल्टंसी सर्व्हीसेस यांना मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांना पत्र क्र.TCE-४९३८A-०४-०५९ अन्वये पाईप टाकणेविषयी कळविलेले होते. त्यानुसार मे.आयव्हिआरसीएल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,हैद्राबाद यांनी स्लॅबमध्ये पाईप टाकलेले आहे. व या स्लॅबमध्ये टाकलेल्या पी.व्ही.सी.पाईपचे १ ले रनिंग बील त्यांनी सादर केलेले आहे. सदरचे बील मे.शक्ती परमार ॲण्ड असोसिएटस्, मुंबई यांनी चेक करुन त्यांचे पत्र क्र.१२७ /२००७ दिनांक ०६-०२-२०७ अन्वये बीलाची रक्कम रुपये १,६२,४३६.८० आदा करावी म्हणून लेखी कळविलेले आहे. यानंतर हे बीलाप्रमाणे काम प्रत्यक्ष चेक करुन ते रुपये १,४५,७६३.२२ इतक्या रकमेचे झालेले आहे. तरी सदरहू बिल आदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख/विद्युत विभागप्रमुख)

**०४)श्रीसाईभक्तांच्या इच्छेप्रमाणे संपूर्ण दिवसाचा एकत्रित आकार घेऊन भक्तांना प्रसादालयात मोफत प्रसाद भोजन देण्याची योजना सुरु करणे बाबत.**

संस्थानच्या प्रसादालयामध्ये मोठ्या व्यक्तीसाठी रुपये ५/- व लहान मुलांसाठी रुपये २/- याप्रमाणे दर आकारुन सवलतीच्या दरात प्रसाद भोजन दिले जाते. सध्या प्रसादालयामध्ये सरासरी दैनंदिन २०,००० व्यक्तीं प्रसाद भोजनाचा लाभ घेत आहेत. बऱ्याच श्रीसाईभक्तांनी अशी इच्छा व्यक्त केली आहे की, त्यांच्या पूर्वजनांच्या स्मृती प्रित्यर्थ, वाढ दिवसानिमित्त अगर इतर कारणांस्तव प्रसादालयामध्ये दिवसभर श्रीसाईभक्तांकडून प्रसाद भोजनानिमित्त संस्थानला मिळणारी संपूर्ण रक्कम, ते स्वतः रोख अगर धनादेशाने आगाऊ भरुन सदर दिवशी संस्थानच्या प्रसादालयात प्रसादरुपी भोजन घेणाऱ्या सर्व श्रीसाईभक्तांकडून कोणताही आकार न घेता, त्यांना मोफत प्रसादरुपी भोजन पुरविण्यात यावे.

उपरोक्त श्रीसाईभक्तांनी व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणे प्रसादालयामध्ये मोफत भोजन देण्याची योजना सदर श्रीसाईभक्तांकडून त्या दिवसाचा संपूर्ण आकार रुपये ५/- प्रमाणे सरासरी २०,००० व्यक्तींसाठी एकूण आकार रुपये १,००,०००/- अशी आगाऊ रक्कम स्वीकारुन त्या विशिष्ठ दिवसासाठी प्रसादालयामध्ये प्रसाद भोजन घेणाऱ्या श्रीसाईभक्तांकडून कोणताही आकार न घेता त्यांना मोफत प्रसाद देण्याची व्यवस्था करता येईल. त्याचप्रमाणे भविष्यात प्रसाद भोजन घेणाऱ्यांची संख्या वाढल्यास अगर प्रसाद भोजन कुपनाचा दर वाढल्यास त्याप्रमाणे त्या दिवसाचा प्रसाद कुपन दर व सरासरी भोजन घेणाऱ्या व्यक्ती याप्रमाणे एकूण रक्कम देण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या श्रीसाईभक्ताकडून आगाऊ रक्कम जमा करुन, मोफत भोजनाची व्यवस्था करता येईल.

वर नमूद केल्याप्रमाणे श्रीसाईभक्तांनी विशिष्ठ दिवसासाठी प्रसादालयात एकूण भोजन घेणाऱ्या संपूर्ण व्यक्तींची पूर्ण आकार आगाऊ कार्यालयामध्ये स्वीकारुन प्रसादालयामध्ये त्यादिवशी प्रसाद घेणाऱ्या भक्तांना मोफत प्रसादरुपी भोजन देण्याची योजना सुरु करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,साईभक्तांनी विशिष्ट दिवसांसाठी प्रसादालयात मोफत प्रसाद भोजन देण्याची इच्छा व्यक्त केल्यास त्या दिवसाच्या तिकीटाची आगाऊ रक्कम भरुन घेऊन व्यवस्था करण्यात यावी. तसेच वाढदिवस, मुंज इत्यादी दिवशी साईभक्त प्रसादालयात मोफत प्रसाद भोजन देण्याची इच्छा प्रदर्शित करतात अशा कार्यक्रमांची योजना तयार करण्यात येऊन, अंतिम निर्णयार्थ प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग/मुख्य लेखाधिकारी)

**०५) कॅश काऊंटींग हॉलमध्ये सुरक्षा जाळी बसविणेसाठी लागणारे मटेरिअल खरेदी बाबत**

दक्षिणापेटी मोजणी दर आठवडयातुन एक वेळ किंवा आवश्यकतेनुसार दोन वेळेस घेतली जाते. प्रत्येक काऊंटींगसाठी साधारणतः १०० ते १२५ कामगार बोलविले जातात. मात्र सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून दक्षिणा पेटी मोजणी हॉलचे उत्तर बाजूस फक्त स्टीलचे बार बसविले असून त्यातून देवाण-घेवाण होवू शकते.

भविष्यात काही अनुचित प्रकार होवू नये. यासाठी मोजणी हॉलचे उत्तर बाजूस योग्य स्टेनलेस स्टीलची जाळी बसविणेकामी लेखाशाखा विभागाने डि.पी.क्र.७६४७ दिनांक ०१-०२-२००७ अन्वये कळविले आहे. परंतू त्यासाठी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागाकडील वर्कशॉपमध्ये उपलब्ध नसल्याने खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एस.एस.अँगल,<br>साईज- ३५ x ३५ x ५ एम.एम. | ४० किलो. | रु. २८०.००<br>(प्रति किलो) | रु. ११,२००.०० |
| ०२) | स्टेनलेस स्टील फ्लॅट पट्टी,<br>साईज- २५ x ३ एम.एम. | २५ किलो. | रु. २८०.००<br>(प्रति किलो) | रु. ०७,०००.०० |
| ०३) | स्टेनलेस स्टील पंचिंग जाळी,<br>साईज-८` x ४` x १.६ एम.एम. (जाड) | ६४ स्क्वेअर फूट. | रु. ४४०.००<br>(प्रति स्क्वे.फूट) | रु. २८,१६०.०० |
| ०४) | वेल्डींग मटेरीअल | | | रु. ०२,०००.०० |
| ०५) | लेबर व ओव्हरहेड चार्जेस + टॅक्सेस २५% | | | रु. १२,०९०.०० |
| | | | एकुण रक्कम :- | रु. ६०,४५०.०० |

उपरोक्तप्रमाणे कॅश काऊंटींग हॉलमध्ये उत्तर बाजूस योग्य स्टेनलेस स्टीलची सुरक्षा जाळी बसविणेकामी मटेरीअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६०,४५०.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०६) <u>एनर्जी सेव्हींग्जसाठी एनसेव्ह/पॉवरविन सेव्हर खरेदी कारणेकामी प्राप्त झालेली कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.</u>**

एनर्जी सेव्हींग्जसाठी एनसेव्ह/पॉवरविन सेव्हर खरेदी करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ५,००,०००.०० इतक्या खर्चाचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७-०२-२००७ चे झालेल्या सभेत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. हा प्रस्ताव या सभेत मान्य करण्यात आला असून एनर्जी सेव्हींग्जसाठी एनसेव्ह/पॉवरविन सेव्हर खरेदी करणेकामी कोटेशन मागवावेत असा निर्णय झालेला आहे. त्यानुसार विद्युत विभाग जा.नं.एसएसएस / विद्युत / ३३७१ / २००७ दिनांक ०३-०३-२००७ अन्वये कोटेशन्स मागविण्यात आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे एकुण ०४ कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | मे.पॉवरविन एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., पुणे |
| ०२. | मे.पॉवर केअर सिस्टिम्स, पुणे. |
| ०३. | मे.मायक्रोवर्ल्ड, मुंबई |
| ०४. | मे.सद्‌गुरु इलेक्ट्रॉनिक्स, पुणे. |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्यांचे नांव | कोटेशन्समधील दर रुपये |
|---|---|---|
| ०१. | मे.पॉवरविन एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., पुणे | ५,००,०००.०० |
| ०२. | मे.पॉवर केअर सिस्टिम्स, पुणे. | ६,६९,७५०.०० |
| ०३. | मे.मायक्रोवर्ल्ड, मुंबई | ७,४७,८८७.०० |
| ०४. | मे.सद्‌गुरु इलेक्ट्रॉनिक्स, पुणे. | ७,१४,४००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.पॉवरविन एनर्जी सोलुशन्स प्रा.लि., पुणे यांचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०७)<u>शहाळे-नारळ फळाची विक्री करणेसाठी स्टॉल तयार करणेसाठी लागणारे मटेरिअल खरेदी बाबत</u>**

श्री साईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटल कॅम्पसमध्ये शहाळे - नारळ फळाची विक्री चालू केलेली आहे. रोपे विक्रीसाठी तयार केलेल्या स्टॉलसारखे दोन स्टॉल त्वरीत तयार करुन मिळणेकामी बगीचा विभागाने दिनांक ०२-०२-२००७ चे डि.पी.नुसार मागणी केली आहे. परंतू त्यासाठी आवश्यक असणारे मटेरीअल विद्युत विभागाकडील वर्कशॉपमध्ये उपलब्ध नसल्याने खालीलप्रमाणे मटेरीअल खरेदी करावे लागणार आहे.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर (अंदाजे) | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१) | एम.एस.अँगल,<br>साईज- ४० x ४० x ५ एम.एम. | ८०० किलो. | रु. ३०.००<br>(प्रति किलो) | रु. २४,०००.०० |
| ०२) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज- ५० x ५ एम.एम. | १०० किलो. | रु. ३०.००<br>(प्रति किलो) | रु. ०३,०००.०० |
| ०३) | एम.एस.फ्लॅट पट्टी,<br>साईज- २५ x ५ एम.एम. | ०५० किलो. | रु. ३०.००<br>(प्रति किलो) | रु. ०१,५००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०४) | एम.एस.स्क्वेअर जाळी,<br>साईज-५० x ५० x५ एम.एम.(३`रूंदीची ) | १०० र.फूट. | रु. ५०.००<br>(प्रति र.फूट) | रु. ०५,०००.०० |
| ०५) | एम.एस.राऊंड पाईप,<br>साईज- १`` हेवी | २०० फूट. | रु. ३६.०० (प्रति फूट) | रू. ०७,२००.०० |
| ०६) | एम.एस.राऊंड पाईप,<br>साईज- ३/४`` हेवी | ०४० फूट. | रु. ३६.०० (प्रति फूट) | रू. ०१,४४०.०० |
| ०७) | जी.आय.राऊंड पाईप,<br>साईज- १.१/२`` C क्लास. | ०८० फूट. | रु. ५०.०० (प्रति फूट) | रू. ०४,०००.०० |
| ०८) | बिजागरी,<br>साईज- ४`` बट हेवी. | ००६ नग. | रु. २०.०० (प्रति नग) | रू. ००,१२०.०० |
| ०९) | स्टेनलेस स्टील ऑलड्रॉप,<br>साईज- १२`` | ००२ नग. | रु. ७०.०० (प्रति नग) | रू. ००,१४०.०० |
| १०) | वेल्डींग मटेरीअल | | | रु. ०२,०००.०० |
| ११) | लेबर व ओव्हरहेड चार्जेस + टॅक्सेस २५% | | | रु. १२,१००.०० |
| | | | | रु. ६०,५००.०० |

उपरोक्तप्रमाणे शहाळे नारळ फळाची विक्रीकरीता स्टॉल तयार करणेसाठी मटेरीअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६०,५००.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**०८) नवीन प्रसादालयाकरीता किचन इक्वीपमेंट व अलाईड सिस्टीम खरेदीसाठी मागविण्यात आलेल्या टेंडर्सची विक्री व स्विकारणेस मुदतवाढ देणे बाबत.**

नवीन प्रसादालयाकरीता किचन इक्वीपमेंट व अलाईड सिस्टम खरेदीकामी दिनांक १८.०२.२००७ व दिनांक १९.०२.२००७ रोजी इंडियन एक्सप्रेस, मुंबई आवृत्ती लोकमत, मुंबई, पुढारी कोल्हापूर या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्या जाहिरातीमध्ये कोटेशन टेंडरफॉर्म विक्रीचा कालावधी दिनांक १९.०२.२००७ ते दिनांक २३.०२.२००७ अखेर व टेंडर्स स्विकारणेची मुदत दिनांक ०३.०३.२००७ रोजी सायंकाळी ५.०० पर्यन्त अशी देण्यात आलेली होती. तसेच सदर मोहरबंद टेंडर्स शिर्डी कार्यालयात स्विकारणेत येतील असे प्रसिध्दीस देण्यात आलेले होते. सदर जाहिरात मा.सौ.उर्मिला प्र.जाधव यांचे सल्ल्यानुसार व उपस्थितीत देण्यात आलेली होती.

किचन इक्विपमेंटस व अलाईड सिस्टमची खरेदी मोठ्या रकमेची असून निविदा घेऊन भरण्यासाठी दूर अंतरावरील कंपन्या/एजन्सीज येण्याची शक्यता असल्याने त्यांना जास्तीत जास्त कालावधी मिळावा म्हणून दिनांक २२.२.२००७ रोजी विश्वस्त मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव, यांनी टेंडर फॉर्म विक्रीची मुदत दिनांक २३.२.२००७ ऐवजी दिनंक २८.२.२००७ व स्वीकारणेची मुदत दिनांक ३.३.२००७ ऐवजी दिनांक ५.३.२००७ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ठेवावी व मोहदबंद टेंडर संस्थानचे शिर्डी व मुंबई कार्यालयात दोन ठिकाणी स्वीकारणेत यावेत. याकामी वृत्तपत्रात फेरदुरुस्तीची जाहिरात प्रसिद्धीस द्यावी असे दूरध्वनीवरून सांगितले होते.

त्यानुसार वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली असून नविन बदलेल्या तारखेप्रमाणे टेंडर फॉर्म विक्री व स्वीकारणेचे तारखेत केलेल्या बदलाचे कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**०९)एल.पी.गॅस पुरवठ्याकरीता भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.कंपनीला पर्यायी गॅस कंपनी पुरवठादार म्हणून नियुक्त करणे बाबत.**

प्रसादालयातील प्रसाद भोजन , मोतीचूर लाडू व अन्नपाकीटे बनविणेकामी गेल्या १९-२० वर्षापासून भारत पेट्रोलियम कार्पो. लि. यांचेकडून नियमीत बल्क गॅस पुरवठा होत आहे. सुरुवातीस गॅसचे किंमतीनूसार भारत पेट्रोलियम कार्पो. लि. यांचेकडे खालीलप्रमाणे अनामत रक्कम संस्थानने ठेवलेली आहे.

| अ.नं. | तपशिल | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१. | D.D. No. २२०५८९/५६ दि. १५/११/१९८८ | रु. ५०,०००/- |
| ०२. | D.D. No. ००२६३२ दि. ०९/११/१९९१ | रु. २५,०००/- |
| ०३. | D.D. No. ००४९७१ दि. २८/१०/१९९२ | रु. २५,०००/- |
| | एकूण रुपये | रु १,००,०००/- |

सन १९८८ ते २००५ पर्यंत बल्क गॅस पुरवठयामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण आलेली नाही. मात्र गेल्या वर्षभरामध्ये गॅस पुरवठयामध्ये भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांचेकडून अडचणी येत होत्या. त्याबाबतची कारणे विचारली असता सुरुवातीस सिन्नर व अहमदनगर कार्यालयाकडून सांगण्यात येत होते की पुरवठा करण्यात आलेल्या गॅस टँकरची रक्कम आल्याशिवाय पुढील गॅसचा टँकर भरून दिला जाणार नाही. मात्र पूर्वीच्या गॅस टँकरच्या रकमेचा डी.डी. लवकर निघण्यास संस्थानकडून अडचणी येत होत्या म्हणून वरीलप्रमाणे रु. १,००,०००/- व अधिक रु. ४,००,०००/-

अशी एकूण रु. ५,००,०००/- अनामत रक्कम भारत पेट्रोलियम कार्पो. लि. यांचेकडे ठेवणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घेण्यात आली होती. व मान्यतेनूसार रु. ४,००,०००/- डी.डी काढण्यात आलेला आहे. मात्र वैधानिक लेखापरिक्षक यांचे सुचनेनूसार पूर्वीच्या रु. १,००,०००/- अनामत रकमेचा दाखला भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांचेकडून मागवून घ्यावा. संस्थान दफ्तरी ठेवावा. त्याकामी लेखाशाखेकडे भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांना पत्र देणेत आलेले आहे. परंतू त्यांचेकडून अनामत रकमेचा दाखला न मिळाल्यामुळे र. ४,००,०००/- चा डी.डी. भारत पेट्रोलियम कार्पो.लि. कडे सुपूर्द केलेला नाही. मात्र पूर्वी पुरविलेल्या गॅसच्या रकमेचा डी.डी. वेळेत काढण्यासाठी कटाक्षाने काळजी घेउन डी.डी. पोहच करण्याची व्यवस्था करण्यास सुरुवात केली तर सिन्नर / अ.नगर येथील अधिका-यांकडून सांगण्यात आले की - संस्थानसाठी उरण येथून गॅसचा पुरवठा करता येणार नाही. उरणचा गॅस फक्त इंडस्ट्रीसाठी वापरला जातो. स्वंयपाकासाठी नाही. त्यामुळे संस्थानसाठी मुंबई येथून गॅस घ्यावा लागेल. मुंबई येथून गॅस पुरवठयाबाबत संस्थानचे गॅस ट्रान्सपोर्टर यांचेशी चर्चा केली असता उरण व मुंबईचे गॅस प्रतीमध्ये फरक आहे. मुंबईचा गॅस काजळी पकडतो व कमी प्रेशरने चालतो. त्याचे तुलनेत उरण गॅस चांगला आहे. याशिवाय मुंबईमध्ये जुने गॅस टँकर जात नाही. माझेकडे सर्व जुनेच टँकर आहेत. असे गॅस ट्रान्सपोर्टर यांनी सांगितले.

श्री रामदासजी रुपारेल व्दारा , भारत ट्रान्सपोर्ट कं.,पुणे हे गेल्या १९-२० वर्षापासून संस्थानसाठी लागणा-या गॅसची वहातुक विनामुल्य , श्री साईबाबांची सेवा म्हणून करीत आहे. संस्थानचे देणगीदारापैकी भारत ट्रान्सपोर्ट कं., पुणे यांचे फार मोठे संस्थानसाठी योगदान आहे. त्यांचे दरमहाचे अंदाजे मुल्य ५० ते ६० हजारापर्यंत आहे.

जर उरण येथील गॅस बंद झाल्यास व मुंबई येथून आणावा लागल्यास कदाचित दुसरा ट्रान्सपोर्टर निवडावा लागेल व त्याचा दरमहा सुमारे ५० ते ६० हजाराचा खर्च वाढणार आहे. सदर खर्च केवळ भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांचे असहकार्यामुळे होणार आहे. मात्र दि. ०५/०३/०७ रोजी श्री देवदास , सिनीअर सेल्स मॅनेजर यांचेशी उरण येथून गॅस भरुन देणेबाबत चर्चा केली असता प्रथम त्यांनी पुणे येथून गॅस टँकर भरुन देतो असे सांगितले मात्र उरण व पुणे येथील गॅसचे दरामध्ये साधारणतः रु. १,०००/- पेक्षा जास्त प्रतिटन फरक आहे. म्हणजे एका टँकरमागे १२,०००/- पेक्षा जास्त खर्च वाढणार आहे. १ महिण्यामध्ये ३५ ते ३६ हजार रु. खर्च वाढणार आहे. संस्थानचे नुकसान होईल त्यामुळे पुणे येथून गॅस आम्ही स्विकारु शकत नाही . आपण उरण येथून गॅस दिला पाहिजे अशी विनंती केली व नाईलाजाने आम्हास पर्यायी व्यवस्था करावी लागेल असे सांगितले असता श्री देवदास यांनी सांगितले की - मी माझे वरिष्ठांशी चर्चा करुन कळवितो असे सांगितले. त्यानूसार दि. ६/३/२००७ रोजी श्री देवदास , अ.नगर यांचेशी संपर्क साधला असता त्यांचेकडून सांगण्यात आले की ठिक आहे सध्या तरी उरण येथून गॅस टँकर भरुन देण्यात येईल. जर यापुढे भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांनी पुन्हा सहकार्य करण्याचे बंद केले तर संस्थानला पर्यायी गॅस पुरवठादाराची नियुक्ती करणे गरजेचे आहे.

भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांचे सिन्नर / अहमदनगर / उरण गॅस फिलींग स्टेशन येथील अधिकारी यांचे असहकाराच्या भुमिकेमुळे आपणास अन्य पेट्रोलियम कंपन्या संस्थानला बल्क गॅस पुरवठा करण्यास तयार आहे काय ? याबाबत माहीती घेणे गरजेचे असल्याने दि. ०३/०३/२००७ रोजी श्री.व्ही.एन. गर्ग , चिफ फायनान्स मॅनेजर इंडीयन ऑईल कार्पो.लि., मुंबई हे श्रीं चे दर्शनानिमित्त आले असता प्रसादालयात प्रसाद भोजन घेणेकरीता आले होते. त्यांचेशी उपरोक्तप्रमाणे गॅस पुरवठातील अडचणीबाबत चर्चा केली व इंडीयन ऑईल कार्पो.लि. ही कंपनी संस्थानला बल्क गॅस पुरवठा करील काय ? याबाबत विचारले असता त्यांनी बल्क गॅस पुरवठयाबाबत होकार दिला. मात्र त्याकामी कंपनीशी पत्रव्यवहार करावा. त्याकामी प्रथमतः श्री व्ही.के.रॉय , सिनीयर एरिया सेल्स मॅनेजर , पुणे यांचेशी मी प्रथम संपर्क करतो. नंतर संस्थानमार्फत संपर्क करावा. त्यानूसार दि. ५/३/२००७ रोजी श्री व्ही.के. रॉय, सिनीयर एरिया सेल्स मॅनेजर यांचेशी दुरध्वनीवर संपर्क केला व श्री व्ही.एन.गर्ग, चिफ फायनान्स मॅनेजर यांचा संदर्भ देउन चर्चा केली, चर्चेअंती त्यांनी सांगितले की - प्रथमतः संस्थानचा प्रस्ताव आमचेकडे पाठवा. सदर प्रस्तावावर बल्क गॅस पुरवठा करणेबाबत कार्यवाही करता येईल. सदर बाब भारत पेट्रोलियम कार्पो.लि. या पुरवठादार कंपनीस पर्याय म्हणून ठेवता येईल. दरमहा ३ टँकर पैकी एक किंवा दोन टँकर इंडियन ऑईल कार्पो .लि. यांचेकडून घेता येईल.अथवा भारत पेट्रोलियम कार्पो.लि. यांनी सहकार्य न केल्यास संपूर्ण बल्क गॅस इंडीयन ऑईल कार्पो .लि. यांचेकडून घेता येईल. याकामी श्री खर्डे पाटील व्दारा मे.समृध्दी इंडेन , राहाता यांचेही सहकार्य घेता येईल.

मे.समृध्दी इंडेन, राहाता यांनी संदर्भीय पत्रान्वये दिलेला प्रस्ताव सुध्दा फायदेशीर आहे. मात्र प्रसादालया मार्फत चालणारे प्रसाद भोजन, मोतीचूर लाडू व अन्नपाकीटे बनविणेचे काम मोठया स्वरुपातील आहे. त्याकामी लागणारा गॅस सर्रास मॅनिफोल्डद्वारे एकत्रित करुन पाईप लाईन मधून वापरणे हे मेन्टनन्स्चे काम वाढविणारी बाब आहे. त्याचे तुलनेत बल्क गॅस साठवण टाकीद्वारे वापरणे हे कमी मेन्टनन्स्चे आहे. मात्र ब-याच वेळा बल्क गॅस प्लॅन्टचे मेन्टनन्स्चे काम, बल्क गॅस

पुरवठयामध्ये अनियमीतपणा यामुळे दैनंदिन कामामध्ये येणा-या अडचणीचेवेळी किंवा ब-याच वेळा गर्दीचे प्रमाणानुसार साईभक्तांना देण्यात येणारी वाढीव सुविधा देतेवेळी सिलेंडर्स मॅनीफोल्डचा उपयोग होउ शकेल. बल्क गॅस यंत्रणेला पर्याय म्हणून मे. समृध्दी इंण्डेन राहाता यांनी सुचविलेली पध्दत वापरता येईल. त्याकामी येणारा खर्च मे.समृध्दी इंण्डेन, राहाता हे करणार आहे. त्यामुळे संस्थानला कोणताही खर्च लागणार नाही. मात्र मे.समृध्दी इंण्डेन, राहाता यांनी दिलेल्या दि.०६/०३/२००७ च्या प्रस्तावानुसार अ.नं.२ बाबत संपुर्ण सहकार्य त्यांना करावे लागेल.

प्रसादालयाचे दैनंदिन कामामध्ये अडचणी येउ नये. तसेच साईभक्तांना सेवा पुरवितांना विलंब होऊ नये, तसेच साईभक्तांना मोठया प्रमाणात गर्दीचे काळात वाढीव सुविधा उपलब्ध करुन देणेकामी अडचणी येऊ नये.यासाठी खालीलप्रमाणे प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

०१) भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि. यांना पर्याय म्हणून इंडियन ऑईल कार्पोरेशन लि. यांचेकडून बल्क गॅसचा पुरवठा घेणे तसेच त्याकामी कंपनीचे नियमानुसार अनामत रक्कम मागितल्यास अनामत रक्कम ठेवावी.

०२) आणीबाणीचे काळात अगर साईभक्तांना वाढीव व्यवस्था पुरविणेकामी मॅनिफोल्डद्वारे गॅस पुरवठा चालू ठेवणेकामी मे.समृध्दी इंण्डेन, राहाता यांचेकडून १८० सिलेंडरची दोन मॅनीफोल्ड यंत्रणा उभारणी करावी. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

## १०) <u>नवीन प्रसादालय विभागासाठी कुंड्यांसाठी रोपे खरेदी करणे बाबत</u>

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निणर्यान्वये श्री क्षेत्र येथे भेट देणा-या हजारो साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनसायास व विना विलंब मिळावी या दृष्टीने अंदाजे ५५०० भक्त एकाच वेळेस प्रसाद भोजन घेवू शकतील असे अदयावत प्रसादालय इमारतीचे बांधकाम सध्या प्रगतीपथावर असून काही महिण्यात हे काम पूर्ण होईल.

सध्या सुरु असलेल्या या सुसज्ज इमारतीला शोभेसे असे लॅन्डस्केपींग करणे व शोभेची झ ाडे लावणे प्रस्तावीत आहे. प्रसादालय संदर्भामध्ये झालेल्या बैठकित मा.विश्वस्त श्रीमती.उर्मिला प्र.जाधव यांनी प्रसादालय इमारत पुर्णत्वास येई पर्यत शोभेची झाडे कुंडयामध्ये वाढवून नंतर त्याचे प्रसादालय परिसरामध्ये रोपन करणेबाबत सूचविलेले आहे.कुंडयामध्ये झाडे वाढविल्यामुळे प्रसादालय इमारत सुरु करणेपुर्वी त्यांचे रोपन केल्यास साईभक्तांना सुंदर नैसगिक वातावरणात प्रसाद घेतल्याचा वेगळाच आंनद मिळणार आहे.

कोल्हापूर व राजमंढरी या ठिकाणाहून समक्ष पाहून एक्सोटीक प्रकारची रोपे खरेदी करता येतील.रोपे खरेदी करणेकामी अंदाजे रु.१०००००/-(रु एक लाख) मात्र खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालय इमारतीची लॅण्ड स्केपिंग करण्याचे ठरलेले आहे. याकामी लॅण्ड स्केप आर्किटेक्टची नियुक्ती करण्यात आलेली आहे. नवीन प्रसादालय इमारतीस साजेशे असे झाडे लावणेकामी लॅण्ड स्केप आर्किटेक्टचा सल्ला घेण्यात यावा अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-बगीचा विभागप्रमुख)

## ११)<u>श्री रामनवमी उत्सव-२००७ करीता मंडप टाकणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे</u>

श्रीक्षेत्र शि र्डी येथै श्री रामनवमी उत्सव-२००७ सोमवार दिनांक २६.०३.२००७ ते बुधवार दिनांक २८.०३.२००७ अखेर तिन दिवस साजरा होणार आहे.

या उत्सवात तसेच उन्हाळयात टाकावयाचे मंडप यासाठी जा.नं.एसएसएस-वशी-५-२९००९-२००७ दि.२६.०२.२००७ अन्वये २० मंडप डेकोरेटर्स यांना कोटेशन्स पाठविण्याबाबत कळविण्यात आले होते. याकामी प्राप्त झालेले कोटेशन्स दिनांक १३.३.२००७ रोजी कोटेशन्सधारकाचे उपस्थितीत मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडण्यात आले. कोटेशन्सधारकांनी देऊ केलेले दर हे बाजारभावापेक्षा अवास्तव असल्याने हजर असलेल्या कोटेशन्सधारकांना फेर कोटेशन्स देणेबाबत सांगण्यात आले. त्यांनी देऊ केलेले मंडपाचे फेर कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन कोटेशन्ससादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | मंडप कोटेशन्ससादरकर्त्याचं नाव | तपशिल | कोटेशन्समध्ये देऊ केलेले दर रुपये | वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री राजेंद्र बाबुराव शेजूळ<br>शुभम टेन्ट हाऊस,निमगांव खैरी ता.श्रीरामपूर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | २,४८,०५९.००<br>५,९४,५९८.००<br>--- | १,६०,०००.००<br>२,७५,०००.००<br>--- |
| ०२ | झुरळे टेन्ट मंडप डेकोरेशन<br>प्रो.रामेश्वर निवृत्ती झुरळे,<br>निमगांव खैरी ता.श्रीरामपूर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | २,१७,००८.००<br>६,०४,६२२.००<br>--- | ----<br>३,५०,०००.००<br>--- |
| ०३. | श्री कृष्णा ज्ञानदेव राऊत, | कापडी मंडप | २,५७,६९७.०० | १,६०,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | श्रीकृष्णा टेन्ट हाऊस,,निमगांव खैरी ता.श्रीरामपूर | शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | ७,२८,४४३.००<br>--- | ४,५०,०००.००<br>---- |
| ०४. | काळे बंधू टेन्ट हाऊस<br>निमगांव खैरी ता.श्रीरामपूर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | १,८९,८८२.००<br>५,४६,३७५.००<br>--- | १,६०,०००.००<br>४,५०,०००.००<br>--- |
| ०५. | सावता मंडप डेकोरेटर्स<br>प्रो.प्रा.श्री एकनाथ भि.गाडेकर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | २,०३,४०३.००<br>८,४९,९९९.००<br>१,५०,०००.०० | १,२५,०००.००<br>३,५०,०००.००<br>१,२५,०००.०० |
| ०६. | श्री संजय विश्वनाथ तरस<br>अनिल टेन्ट हाऊस,राहाता जि.अहमदनगर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | २,५७,६९७.००<br>७,०३,३२५.००<br>--- | २,००,०००.००<br>३,४०,०००.००<br>--- |
| ०७. | श्री शेख मेहबूब इमाम<br>रोशन मंडप, मु.संक्रांपूर ता.राहूरी जि.अ.नगर | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | ---<br>२,५०,१९४.००<br>--- | ---<br>२,५०,१९४.०० |
| ०८ | श्री बी.एस.कातूरे मंडप फर्निचर्स डेकोरेटर्स,पुणे | कापडी मंडप<br>शामियाना मंडप<br>उन्हाळी मंडप | १,८५,८१३.००<br>---<br>--- | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तक्त्यातील कापडी मंडपासाठी सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता,शुभम टेन्ट हाऊस,निमगांव खैरी व काळे बंधू टेन्ट होऊस,निमगांव खैरी यांचे दर निम्नतम आहेत परंतू त्यांचे कापडाचा दर्जा चांगला नसल्याने पूर्वीचे काम केलेले ठेकेदार श्री बी.एस.कातूरे मंडप फर्निचर्स डेकोरेटर्स,पुणे यांचे दर स्विकारणेत यावेत तसेच शामियाना मंडपासाठी श्री शेख मेहबूब इमाम रोशन मंडप, मु.संक्रांपूर ता.राहूरी जि.अ.नगर यांचे निम्नतम दर स्विकारणेत यावेत. उन्हाळी मंडपासाठी सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता,यांचे एकच कोटेशन्स प्राप्त झालेले असल्याने उन्हाळी मंडप टाकणेकामी फेर कोटेशन्स मागविण्यात यावेत अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**<u>१२) श्री.सुधीर झालानी, जाईंट सेक्रेटरी,अखिल भारतीय खंडेलवाल महासभा, अहमदनगर यांचे पत्राबाबत.</u>**

श्री.सुधीर झालानी, जॉईट सेक्रेटरी, अखिल भारतीय खंडेलवाल महासभा,अहमदनगर यांनी दि.२७.१.२००७ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे दि.२८.४.२००७ ते दि.२९.४.२००७ अखेर दोन दिवस संस्थानचे शैक्षणिक संकुलाचे मैदानावर अखिल भारतीय खंडेलवाल महासभा आयोजित करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली होती. यावर मुख्याध्यापिका, कन्या विद्या मंदीर यांनी सदर कालावधीत संस्थान मार्फत टेम्पल समिट आयोजित करण्यात आलेले असून, त्यासाठी शैक्षणिक संकुलाचे पटांगणाचा वापर होणार असल्याने परवानगी देता येणार नाही असे कळविले आहे.

त्यामुळे त्यांना भक्तनिवासस्थान येथील पटांगण देणेबाबत दूरध्वनीवर तसेच आजचे सभेत श्री.सुधीर झालानी, जॉईंट सेक्रेटरी, अखिल भारतीय खंडेलवाल महासभा,अहमदनगर यांचेशी चर्चा केली असता ती त्यांनी मान्य केलेली आहे.

तरी अखिल भारतीय खंडेलवाल महासभेसाठी दि.२८.४.२००७ ते दि.२९.४.२००७ अखेर भक्तनिवासस्थान मैदान, निवास, भोजन व विद्युत पुरवठा नियमानुसार भाडे आकारुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**<u>१३) नविन प्रसादालय गॅस प्लॅन्ट उभारणीकामी नेमलेले सल्लागार मे. सफेस क्वालिटी मॅनेजमेंट, मुंबई यांना सिव्हील इलेक्ट्रीकल व मेकॅनिकल कामाची निविदेमध्ये प्रत्यक्ष क्वांटीटी,टेक्नीकल स्पेसीफिकेशन,डिझाईन, ड्रॉईंग इत्यादी गोष्टी नमूद करणेसाठी व वेळोवेळी सर्व कामाची तपासणी करणेकामी वाढीव फी आदा करणे बाबत.</u>**

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६/०१/२००७ चे सभेतील निर्णय क्र.१५ नुसार नविन प्रसादालयासाठी गॅस प्लॅन्ट उभारणीकामी सल्लागार म्हणून सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांचेकडे कोरा टेंडर फॉर्म बनविणेकामी पाठपुरावा केला असता त्यांनी त्याकामी कोरा टेंडर फॉर्म बनवून दिलेला आहे.मात्र त्यामध्ये सिव्हील, इलेक्ट्रीकल, व मेकॅनिकल कामाचे तपशीलवार वर्णन, त्याकामी लागणारे साहित्य (विट, दगड, खडी, सिमेंट, वाळू, इलेक्ट्रीकल कामाचे केबल, वायरींग, कंपनी) नमूद केलेले नाही. त्यामुळे निविदाधारकाला निविदा भरतांना क्वांटिटी नमूद नसल्यामुळे दरपत्रक लिहिता येणार नव्हते. म्हणून विचारणा केली असता सदर काम माझे अखत्यारीत येत नाही. मी माझे टेंडरमध्ये खालीलप्रमाणे काम नमूद केलेले आहे.

| | |
|---|---|
| 1. Plans Appraisal – Civil & Mechanical | 1. Soil consolidation |
| 2. Material indentification, stamp transfer, WPS/WPQ/PQR. Check test as reqd. | 2. Foundation & support RCC/PCC pouring-sampling |
| 3. Dished ends profile, thickness, DPT | 3. Tank installations, anchouring hydrotest |

| | |
|---|---|
| check | |
| 4. Shell setup L/s, C/s | 4. Cathodic Protection |
| 5. Nozzles set up, bought out material TC.Review | 5. Mounding, tunneling check |
| 6. Witness lab testing of production test coupon. | 6. P&I, Review of radiographs, hydrotest |
| 7. Radiography, DP Test, Dimensions | 7. Pneumatic test of complete system, total site check per approved drgs & T/Cs. |
| 8. SR Records, Hydrotest | 8. Issue of Rule 33 Safety Certificate. |
| 9. Issue of Control Certificate for storage vessels. | |

उर्वरीत सिव्हील , इलेक्ट्रीकल व मेकॅनिकल कामासाठी वेगळी एजन्सी नेमावी लागेल असे सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि.मुंबई यांनी कळविलेले आहे.

नविन प्रसादालयाचे गॅस प्लॅन्ट उभारणीचे काम भक्कम, दर्जेदार, सुरक्षिततेच्या नियमानूसार व एक्सप्लोझीव्हचे नियमानुसार होणेकामी सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांनी कळविले प्रमाणे त्या-त्या क्षेत्रातला तज्ञ व अनुभवी एजन्सीची नियुक्ती गरजेचे आहे. जर त्याकामी आपण जाहीरात देणे कोटेशन मागविणेचे ठरविले तर त्यामध्ये वेळ जाईल व गॅस प्लॅन्ट उभारणीचे कामास विलंब होईल तसे होऊ नये म्हणून सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांनाच त्या-त्या क्षेत्रातली तज्ञ व अनुभवी एजन्सी शोधण्यास सांगणे योग्य ठरेल.

त्याचप्रमाणे दुसरी महत्वाची बाब अशी की, आपण ज्यावेळी नविन प्रसादालयाचे गॅस प्लॅन्ट उभारणीकामी एक्सप्लोझीव्ह विभागाचे मान्यता प्राप्त ७ एजन्सींना दरपत्रक पाठविणेस कळविलेले होते. त्यापैकी केंप्रो इन्सपेक्शन प्रा.लि. मुंबई यांचे एकच दरपत्रक मुदतीमध्ये आले होते. मात्र संस्थान नियमाप्रमाणे कमीत कमी ३ दरपत्रक असणे गरजेचे असल्यामुळे दरपत्रक सादर करण्याची मुदत जरी संपलेली असली तर उपरोक्त ७ एजन्सींना दुरध्वनीद्वारे संपर्क करुन दरपत्रक पाठविणेबाबत कळविलेले होते. त्यानंतर आणखी दोन एजन्सींनी १) मे.टाटा कन्सल्टींग इंजिनीअर्स, मुंबई २) सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांनी दरपत्रक पाठविले होते. सदर दरपत्रक मा.व्यवस्थापन समिती दि.२५/११/०६ चे सभेमध्ये उघडणेत आलेले असुन चर्चा व वाटाघाटीसाठी खालील दोन एजन्सींचे प्रतिनीधी हजर होते.

०१.मे.टाटा कन्सल्टींग इंजिनीअर्स, मुंबई .

०२.सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई.

मात्र दरपत्रक उघडून तुलनात्मक तक्ता बनविणे पर्यंत सभेची वेळ संपल्याने चर्चा व वाटाघाटी झाल्या नाहीत. त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.६/१/२००७ चे सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी वरील तीनही एजन्सींना उपस्थीत रहाणेबाबत कळविलेले होते. परंतु त्यापैकी फक्त सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि.मुंबई या एकच एजन्सी चे प्रतिनीधी उपस्थीत होते. त्यानी सल्लागार म्हणून एकूण रु.१,५३,०००/- + १० व्हिजीट पेक्षा जास्त व्हिजीट कराव्या लागल्या तर रु.५,०००/- प्रति दिवस वेगळा चार्ज दयावा लागेल अशी फी कळविलेली होती. तर मे.टाटा कन्सल्टींग इंजिनीअर्स, मुंबई यांनी एकूण १४,१०,०००/- एवढी फी कळविलेली होती. मात्र चर्चा / वाटाघाटीनंतर सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांनी एकूण फी रु.९६,४००/- घेण्यात येईल असे मान्य केलेले होते.

इतर एजन्सीपेक्षा सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि.मुंबई यांनी एकूण फी कमी कळविलेली होती. तसेच इतर एजन्सींनी पाहिजे त्या प्रमाणात प्रतिसाद दिलेला नाही. त्यामुळे सिव्हील, इलेक्ट्रीकल, व मेकॅनिकल कामाचे अंदाजपत्रक, क्वांटीटी , टेक्नीकल स्पेसीफिकेशन, डिझाईन, ड्रॉईंग इ. तयार करुन त्यासाठी सुपरव्हीजन करणेकामी वेगळी फी देउन काम करुन घेणे क्रमप्राप्त आहे व त्यासाठी सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांचेमार्फतच एजन्सीची निवड करुन घेणे गरजेचे असल्यामुळे त्यांना त्याकामी चौकशी करुन इकडे कळविणेस सांगण्यात आले होते. त्यानूसार सफेस क्वालीटी मॅनेजमेंट प्रा.लि. मुंबई यांनी दिनांक १६/३/२००७ पत्रान्वये उपरोक्तकामी जादा खर्चाची रक्कम कळविलेली आहे. तरी सदर जादा रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानुसार | रु.९६,४००/- |
| २) | वाढीव कामाची कळविलेली रक्कम | रु.८१,०००/- |
| | | एकूण रु.= १,७७,४००/- |

तरी वरीलप्रमाणे सिव्हील,इलेक्ट्रीक, व मेकॅनिकल कामाचे अंदाजपत्रक व कन्सलटन्सीची वाढीव रक्कम रु.८१,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, नवीन प्रसादालयाचे गॅस प्लॅन्ट उभारणीचे कामाची निकड लक्षात घेता गॅस प्लॅन्ट उभारणीकामी सिव्हील, इलेक्ट्रीकल व मेकॅनिकल कामाचे गुणवत्तेसाठी सफेस

क्वालिटी मॅनेजमेंट यांचे देखरेखीखाली अन्य एजन्सीकडून काम करुन घेण्यासाठी रु.८१,०००/- चे जादा खर्चास मान्यता देण्यात यावी अशी अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**विषय नं.०३ व्यवस्थापन समितीचे दि.०६.०१.२००७रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तावर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.२५०.** दिनांक ०६.०१.२००७रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्तावर करण्यात आलेल्या व होत असलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद येऊन निर्णय क्र.२४ मध्ये-प्रसादालयासाठी मशिनरी उपकरणे तसेच इतर यंत्रणा खरेदी करणेबाबतचा निर्णय घेणेकामी नियुक्त केलेल्या उपसमितीत मा.सौ.सुमित्रा कैलास कोते यांचे नावाचा समावेश करण्यात यावा असें, ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक-प्रसादालय)

**विषय नं.०४ नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता फेब्रुवारी ,२००७.**

**(ब) माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(ड) माहे फेब्रुवारी,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(इ) माहे फेब्रुवारी,२००७ मध्ये श्री साईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.२५१**(A) माहे फेब्रुवारी,२००७ मधील जमा रुपये १४४,५९५,१५३.६० व खर्च रुपये १२६,८१५,५९५.९८ चा तक्ता, माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/-चे मर्यादेत केलेल्या खर्च रुपये २,७१,५७८.०० खर्चाचा तक्ता, दिनांक ७ मार्च,२००७ अखेरीस रुपये २,५२६,८०३,०८६.०० गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे फेब्रुवारी,२००७ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या एकूण रुपये ३६,५०२,१५८.७७ देणगीचा तक्ता, माहे फेब्रुवारी,२००७ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तुचा रुपये १,४३,५७२.०० चा अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०२. माहे फेब्रुवारी, २००७ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. २५१ (B)** माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदान रुपये ७२,२४,३५३.०० चा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०३. साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २५१ (C)** माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये साईनाथ रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता अंतररुग्ण रुपये १४,३८८.०० व बाह्य रुग्ण रुपये ५८,०१८.०० थॅलसेमिया व हिमोफेलिया रुपये २९,८५०.०० ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०४. श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये माहे जानेवारी/फेब्रुवारी ,२००७ देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीबाबत.**

**निर्णय क्र. २५१ (D)** माहे जानेवारी व फेब्रुवारी, २००७ मध्ये श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या रुपये ११,०८,४३२.०० व ९,९३,२८६.०० सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, मान्यता देण्यात आली.

**०५. माहे जानेवारी/फेब्रुवारी,२००७ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २५१ (E)** माहे जानेवारी, २००७ व फेब्रुवारी,२००७ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या अनुक्रमे २७,७०७ व २६३९२ कर्मचाऱ्यांच्या/कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन मान्यता देण्यात आली.

**०६. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. २५१ (F)** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता त्याच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पूरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात आली. जुने प्रसादालय येथील रंगकाम व दुरुस्तचे काम करणे अंतीम बील अदा करणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०७. पाणी तपासणी अहवाल.**

**निर्णय क्र. २५१ (G)** माहे फेब्रुवारी, २००७ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे.एनव्हायरो लॅब, नाशिक यांचेकडे तपासणीसाठी

पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५ मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा सुरु करणेकरीता नवीन बसेस खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे**

**निर्णय क्र.२५२.** श्रीसाईबाबांचे दर्शनाकरीता देश विदेशातून दररोज लाखोंच्या संख्येने साईभक्त शिरडीत दाखल होत असतात. शिर्डीत येणाऱ्या साईभक्तांचे सुविधाकरीता श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेतर्फे अल्पदरात प्रसाद भोजनाची सोय करण्यात आलेली आहे. परंतु साईभक्तांच्या वाढत्या गर्दीमुळे सध्याचे प्रसादालय अपुरे पडत असल्याकरणाने शिर्डी पोलिस स्टेशनचे मागील बाजूस संस्थानचे जागेत नवीन प्रसादालयाचे काम चालू आहे.

नवीन प्रसादालयाचे काम येत्या तीन महिन्यात पुर्ण होणार आहे. भक्तांसाठी छत व सावली असलेला पादचारीमार्ग तयार करणेस तांत्रिक अडचणीमुळे बराच कालावधी लागणार असल्याने तसेच मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय अंतर जास्त असल्याकारणाने साईभक्तांचे सुविधाकरीता प्रसादालयाचे काम पुर्ण झाले नंतर मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय मोफत बससेवा सुरू करावयाची असलेने प्रसादालय विभाग प्रमुख यांनी चार बसेसची मागणी केलेली आहे.

मंदिर परिसर ते नवीन प्रसादालय बससेवा सुरू करणे करीता उपलब्ध बसेस अपुरी पडणार असलेने नवीन चार (४) बसेस खरेदीचा विषय दि.०१/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेपुढे पुढील निर्णया करीता सादर करण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन अशोक लेलॅण्ड कंपनीच्या अधिकृत डिलरकडून कोटेशन बोलावून खरेदी करण्यात याव्यात असे ठरले तसेच या कामी अंदाजे रू.६० लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

दि.०१/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानुसार वाहन विभाग जा.क्रं. ४०८०/दि.१२/०३/२००७ ने अशोक लेलॅण्ड कंपनीच्या खालील प्रमाणे अधिकृत डिलरकडून दि.२०/०३/२००७ अखेर पोहोचतील अशा प्रकारे कोटेशन बोलाविण्यात आलेली आहे.

०१. ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि., औरंगाबाद.
०२. ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि., पुणे
०३. सोनल ॲटोमोबाईल्स, अहमदनगर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत उघडणेत आले असता त्यांनी खालीप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| ०१ | ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि., औरंगाबाद. | ९,६५,८१८.०० |
| ०२ | ॲटोमोटीव्ह मॅन्युफॅक्चरर्स, प्रा.लि., पुणे | ९,६९,८१८.०० |
| ०३ | सोनल ॲटोमोबाईल्स, अहमदनगर. | ९,७२,८१८.०० |

वरील सर्व निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष बोलविण्यात येऊन, लोअर फ्लोअरच्या (Lower floor) बसेसचे सुधारित दर देणेबाबत सांगण्यात आले. तसेच विश्वस्त मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी पुणे येथे जाऊन समक्ष पहाणी करुन अभिप्राय द्यावा असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.०६ सन२००७-२००८ करीता उपहारगृह चालविणेकामी आलेल्या निविदा उघडून निविदासादरकर्त्याशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२५३.** धर्मशाळा येथील उपहारगृह कंत्राटी पद्धतीने चालविणेकामी व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.२.२००७ चे सभेतील निर्णय क्र.५३ अन्वये वर्तमानपत्रात जाहीरात देऊन दिनांक १३.३.२००७ अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | श्री.मेदा वीरु पाकक्षया,म्हाळोबानगर,शिर्डी |
| ०२ | श्री.साईराज कॉन्ट्रॅक्टर्स,एन.व्ही गोविंदराज,शिर्डी |
| ०३ | श्री.डी.रविंद्र, कुक्कटपल्ली,हैद्राबाद |
| ०४ | श्रीमती इंदीरा जयवंराव मुठे,श्रीरामपूर |
| ०५ | श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप.सोसा.,लि.,शिर्डी |
| ०६ | शिवालया केटरर्स,प्रो.श्री.शंकर शेट्टी, ठाणे |
| ०७ | श्री.अंबिका अन्नपूर्णेश्वरी केटरर्स,बांद्रा,मुंबई |
| ०८ | हॉटेल सरोज,प्रो.सौ.लिला शेट्टी,बांद्रा,मुंबई |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन, निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, चर्चा/वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर प्रती माह रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर प्रती माह रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.मेदा वीरु पाकक्षया,म्हाळोबानगर,शिर्डी | ६७,०००.०० | ७०,०००.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | श्री.साईराज कॉन्ट्रॅक्टर्स,एन.व्ही गोविंदराज,शिर्डी | ७२,०००.०० | ७६,०००.०० |
| ०३ | श्री.डी.रविंद्र, कुक्कटपल्ली,हैद्राबाद | ४५,९९९.०० | ६३,०००,०० |
| ०४ | श्रीमती इंदीरा जयवंराव मुठे,श्रीरामपूर | ७५,०००.०० | ७५,०००.०० |
| ०५ | श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रे.को.ऑप.सोसा.,लि., शिर्डी | ३६,०००.०० | ३६,०००.०० |
| ०६ | शिवालया केटरर्स,प्रो.श्री.शंकर शेट्टी, ठाणे | ५२,०००.०० | ५५,०००.०० |
| ०७ | श्री.अंबिका अन्नपूर्णेश्वरी केटरर्स,बांद्रा,मुंबई | ६५,०००.०० | ६५,५००.०० |
| ०८ | हॉटेल सरोज,प्रो.सौ.लिला शेट्टी,बांद्रा,मुंबई | ४१,०००.०० | ४४,०००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, अ.नं.२ चे ठेकेदार श्री.साईराज कॉन्ट्रॅक्टर्स,एन.व्ही गोविंदराज,शिर्डी यांची उच्चतम दराची निविदा स्वीकारुन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-धर्मशाळा विभागप्रमुख)

**विषय नं.०७ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकरीता संगणक व प्रिंटर खरेदीकामी आलेल्या निविदा उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२५४.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१६.०७.२००६ निर्णय क्र.४३३ नुसार औद्येगिक प्रशिक्षण संस्थेकरीता एमएससीआयटी व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विदयापिठ, नाशिक यांचेकडील निरनिराळे पाच संगणक अभ्यासक्रम चालविणेसाठी आवश्यक असलेले संगणक, प्रिंटर व इतर साहित्य खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.१३,८५,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.१६-१८.०२.२००७ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.१९.०२.२००७ ते दि.२८.०२. २००७ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.०१.०३.२००६ अशी निविदा स्विकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली आहे. निविदेसोबत बयाणा रक्कम रु.१०,०००/- चा डि.डि. तसेच दुकान/ऑफीस नोंदणी दाखला, आयकर नोदणी, पॅन कार्ड आदी कागदपत्राची मागणी केलेली आहे.

मुदतीअंती प्राप्त झालेल्या खालीलप्रमाणे निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| Description | Computer set | | | Printer Hp-Laserjet | Printer Dot Matrix | Printer Laser | Hub for net working | UPS offline/ 500 VA | | Speaker with box 400 W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Quantity | 30 Set | | | 05 Nos. | 04 Nos. | 01 Nos. | 02 Nos. | 01 Nos. | | 08 Nos. |
| Company | IBM | HCL | HP | HP | Epson | Wipro | D-Link | Champion | APC | Artist |
| | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| Samarth Ent., Yeola | 41155 | --- | --- | 15250 | 36500 | 16850 | 6350 | 1950 | --- | 550 |
| A.R. Trader, Nasik | 27200 | --- | --- | 12600 | 32000 | --- | 5250 | --- | 2050 | 325 |
| Swadarshan, Nasik | 27450 | 24120 | 28010 | 12500 | 32450 | 7150 | 4950 | --- | 2350 | 400 |
| Microstop Nasik | 35750 | 28990 | --- | 13700 | 36500 | 7100 | --- | 2400 | --- | --- |
| jayshree, Nasik | 33200 | 29900 | 34000 | 12490 | 33200 | --- | 4850 | 1700 | 2350 | 315 |
| Sayali Comp., Nasik | 38900 | --- | 33500 | 13400 | 32500 | 6950 | 5450 | 2400 | --- | 325 |
| Allied Dig., Mumbai | 37950 | --- | --- | 14160 | 38200 | 20650 | --- | --- | 3250 | 500 |
| Solartech, Panvel | 34800 | 32300 | 38800 | 12600 | 33150 | 5750 | 5500 | --- | 2100 | 450 |

उपस्थित सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित सभागृहात बोलावून त्यांना देऊ केलेल्या दरात आणखी काही सूट देणार किंवा कसे, याबाबत लेखी पत्र देणेबाबत सांगण्यात आले. त्यानुसार निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| Description | Computer set | | | Printer Hp-Laserjet | Printer Dot Matrix | Printer Laser | Hub for net working | UPS offline/ 500 VA | | Speaker with box 400 W |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Quantity | 30 Set | | | 05 Nos. | 04 Nos. | 01 Nos. | 02 Nos. | 01 Nos. | | 08 Nos. |
| Company | IBM | HCL | HP | HP | Epson | Wipro | D-Link | Champion | APC | Artist |
| | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| Samarth Ent., Yeola | | | | | | | | | | |
| **tender rate** | 41155 | --- | --- | 15250 | 36500 | 16850 | 6350 | 1950 | --- | 550 |
| **revised rate** | 39920.35 | --- | --- | 14792.25 | 35405 | --- | 6159.50 | 1891.50 | --- | 533.50 |
| A.R. Trader, Nasik | | | | | | | | | | |
| **tender rate** | 27200 | --- | --- | 12600 | 32000 | --- | 5250 | --- | 2050 | 325 |
| **revised rate** | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- | --- |
| Swadarshan, Nasik | | | | | | | | | | |
| **tender rate** | 27450 | 24120 | 28010 | 12500 | 32450 | 7150 | 4950 | --- | 2350 | 400 |
| **revised rate** | **26225** | **23620** | 27510 | **12200** | 32000 | 6925 | 4875 | --- | 2350 | 385 |
| Microstop, Nasik | | | | | | | | | | |
| **tender rate** | 35750 | 28990 | --- | 13700 | 36500 | 7100 | --- | 2400 | --- | --- |
| **revised rate** | 33000 | 24000 | --- | 12250 | **31790** | 6750 | **4850** | **1700** | --- | **305** |
| jayshree, Nasik | | | | | | | | | | |
| **tender rate** | 33200 | 29900 | 34000 | 12490 | 33200 | --- | 4850 | 1700 | 2350 | 315 |
| **revised rate** | 33750 | 28750 | 34000 | 12450 | 33000 | --- | 4850 | 1700 | --- | 315 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sayali Comp., Nasik<br>**tender rate**<br>**revised rate** | 38900<br>--- | ---<br>--- | 33500<br>--- | 13400<br>--- | 32500<br>--- | 6950<br>--- | 5450<br>--- | 2400<br>--- | ---<br>--- | 325<br>--- |
| Allied Dig., Mumbai<br>**tender rate**<br>**revised rate** | 37950<br>36800 | ---<br>--- | ---<br>--- | 14160<br>13800 | 38200<br>35500 | 20650<br>20000 | ---<br>--- | ---<br>--- | 3250<br>2800 | 500<br>475 |
| Solartech, Panvel<br>**tender rate**<br>**revised rate** | 34800<br>34633.33 | 32300<br>32133.33 | 38800<br>38650 | 12600<br>12600 | 33150<br>33150 | 5750<br>**5750** | 5500<br>5500 | ---<br>--- | 2100<br>2100 | 450<br>450 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी देऊ केलेले निम्नतम दर स्वीकारण्यात येऊन देणगी मिळालेले संगणक व इतर साहित्य वगळून उर्वरित संगणक व प्रिंटर पुरवठा आदेश देण्यात यावा संगणक खरेदीसाठी आय.टी.आय प्राचार्य यांचा अभिप्राय घेण्यात यावा असे ठरले.

मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेनुसार १ नग सेंट्रल युपीएस खरेदीस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता मिळालेली होती. मात्र सेंट्रल युपीएस बंद पडल्यास सर्व युनिट बंद पडणार असल्याने संबंधित निविदाधारकांनी आयटीआयकडे युपीएस बाबत विचारणा केलेली असून त्यांना प्रत्येक संगणकास एक युपीएस याप्रमाणे ३० नग युपीएस हवे असल्याचे सांगण्यात आलेले होते. प्राप्त दरपत्रके हे सेंट्रल यूपीएसचे आलेले नसून लहान यूपीएसचे आलेले आहे तसेच ३० नगाचा खर्चही १ लाखपेक्षा कमी आहे. सबब उपरोक्त निविदाधारकाने वाटाघाटीत देऊ केलेल्या निम्नतम दराने ३० नग यूपीएस खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.०८ रुग्णालयासाठी ए.सी. खरेदीकामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.२५५.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२३.०९.२००६ मधील निर्णय क्र.८२० नुसार माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुममध्ये एक व दूरध्वनी यंत्रणा कक्षामध्ये एक असे दोन वॉल माउंटेड व्होल्टास कंपनीचे २.० टन क्षमता असलेले एअर कंडीशनर्स खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.७०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/ खरेदी-विद्युत/ २३५/२००७ दि.०६.०१.२००७ अन्वये दि.१३.०१.२००७ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली आहे.

तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ मधील निर्णय क्र.८७५ नुसार श्री साईबाबा रुग्णालयामधील डेन्टल विभाग, एक्स रे विभागासाठी ०५ नग व साईनाथ रुग्णालयातील ऑपरेशन थिएटर, एक्स रे विभाग व आयसीसीयु विभागासाठी आवश्यक असणारे ०६ नग असे एकुण ११ नग वॉल माउंटेड व्होल्टास कंपनीचे २.० टन क्षमता असलेले एअर कंडीशनर्स खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.३,३०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-विदयुत/२००४/२००७ दि.०७.०२.२००७ अन्वये दि.१४.०२.२००७ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली आहे.

त्यानुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ.नं. कोटेशनधारकाचे नांव व गांव**

०१. ज्योती इलेक्ट्रॉनिक्स, राहुरी
०२. धुत एअरकंडीशनींग कंपनी, औरंगाबाद
०३. लकी रेफ्रिजरेशन, नाशिक
०४. जी.एस.ट्रेडींग कंपनी, औरंगाबाद

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशनसादरकर्त्यांपैकी क्र.२ चे मे.धुत एअरकंडीशनींग कंपनी, औरंगाबाद यांनी मागणीप्रमाणे २ टन क्षमता असलेल्या एसीचा दर दिलेला नसल्याने त्यांना चर्चेसाठी आमंत्रित करणेत आलेले नाही. उर्वरीत दरधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | ज्योती इलेक्ट्रॉनिक्स,राहुरी | ३१,२००.०० +१,५००/- फिटींग चार्जेस | ३१,२००.०० फिटींग चार्जेस सह |
| ०२ | लकी रेफ्रिजरेशन, नाशिक | ३२,५००/- फिटींग चार्जेस सह | ३१,०००.०० फिटींग चार्जेस सह |
| ०३ | जी.एस.ट्रेडिंग कं.,औरंगाबाद | ३२,०००/-फिटींग चार्जेस सह | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.लकी रेफ्रिजरेशन,नाशिक यांचे निम्नतम दराचे कोटेशन स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं.०९ श्रीसाईबाबा रुग्णालयासाठी टी.व्ही खरेदीकामी कोटेशन्सधारकांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे**

**निर्णय क्र.२५६.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ मधील निर्णय क्र.९१० नुसार श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व डिलक्स व ए.सी.रुममध्ये दाखल होणाऱ्या रुग्णांचे करमणुकीसाठी आवश्यक असणारे २१ इंची, सोनी कंपनीचे फ्लॅट टि.व्ही.-१७ नग खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२,१०,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-रुग्णालय/२००३/२००७ दि.०७.०२.२००७ अन्वये दि.१४.०२.२००७ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार खालीलप्रमाणे कोटेशन प्राप्त झाले आहेत-

**अ.नं. कोटेशनधारकाचे नांव व गांव**

०१. अमित एंटरप्राईजेस, श्रीरामपूर
०२. जयंत कमर्शिअल कार्पोरेशन, जळगांव
०३. सानिया ड्रिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद
०४. लाड इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक
०५. एच.जोशी ब्रदर्स सेल्स प्रा.लिमीटेड, नाशिक
०६. अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर

उपरोक्तप्रमाणे कोटेशनसादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. त्यानुसार खालीलप्रमाणे अमित एंटरप्राईजेस, श्रीरामपूर व अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर उपस्थित होते.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | अमित एंटरप्राईजेस, श्रीरामपूर | ११,०००.०० | उपस्थित |
| ०२ | जयंत कमर्शिअल कार्पोरेशन, जळगांव | ११,१२५.०० | फॅक्सव्दारे पत्र |
| ०३ | सानिया ड्रिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद | ११,५००.०० | अनुपस्थित |
| ०४ | लाड इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक | १०,९९०.०० | अनुपस्थित |
| ०५ | एच.जोशी ब्रदर्स सेल्स प्रा.लिमीटेड, नाशिक | १०,२७०,०० | अनुपस्थित |
| ०६ | अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | ११,४५०.०० | उपस्थित |

उपरोक्त अमित एंटरप्राईजेस, श्रीरामपूर व अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर या दोघांना सभागृहात एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात काही सुट देणार किंवा कसे, याबाबत लेखी देणेबाबत सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | अमित एंटरप्राईजेस, श्रीरामपूर | ११,०००.०० | १०,०००.०० |
| ०२ | जयंत कमर्शिअल कार्पोरेशन, जळगांव | ११,१२५.०० | १०,२००.०० |
| ०३ | सानिया ड्रिस्ट्रीब्युटर्स, औरंगाबाद | ११,५००.०० | अनुपस्थित |
| ०४ | लाड इलेक्ट्रॉनिक्स, नाशिक | १०,९९०.०० | अनुपस्थित |
| ०५ | एच.जोशी ब्रदर्स सेल्स प्रा.लिमीटेड, नाशिक | १०,२७०,०० | अनुपस्थित |
| ०६ | अनिल इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर | ११,४५०.०० | १०,३२१.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.अमित एंटरप्रायजेस, श्रीरामपूर यांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.२.२००७ चे सभेतील निर्णय क्र.१५९ नुसार सिक्युरिटी सिस्टमसाठी १३ संच फ्लॅट टी.व्ही.संच कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली असल्याने सिक्युरिटी सिस्टमचे टी.व्हीसाठी ही उपरोक्त पुरवठाधारकास न्युनतम दराने पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**विषय नं.१० श्रीसाईभक्तांना संस्थानचे वेबसाईटवर विविध सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी आलैल्या निविदा उघडून. चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.२५७.** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९२९ नुसार संस्थानच्या www.shrisaibabasansthan.org या अधिकृत वेबसाईटवर श्रीसाईभक्तांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी नामांकित कंपन्यांकडून प्रस्ताव मागविण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करण्यात येवून, दिनांक १५ जानेवारी, २००७ अखेर प्रस्ताव मागविणेत आले होते. त्यानुसार एकूण ०८ प्रस्ताव प्राप्त झालेले होते.

संस्थानचे वेबसाईटवरील कामकाजाचे स्वरुपातबाबत चर्चा करण्यासाठी व करावयाच्या कामांबाबत निश्‍चितता स्पष्ट करणेसाठी, तसेच संस्थान व्यवस्थापनामार्फत काही आवश्यक सुचना-मार्गदर्शन देणेसाठी या प्रस्तावधारकांची Conceptual मिटींग दिनांक २२ जानेवारी, २००७ रोजी घेण्यात आली होती. या मिटींगमध्ये सर्व प्रस्तावधारकांशी चर्चा करुन, त्यांनी सादर केलेली पात्रतेविषयीची कागदपत्रे तपासण्यात आली. त्यानंतर सदर मिटींगसाठी उपस्थित असलेल्या सर्व प्रस्तावधारकांना तांत्रिक निविदा (Technical Bid) भरणेबाबत सांगण्यात आले होते. सर्व प्रस्तावधारकांची तांत्रिक बाबींबाबत चर्चा करणेसाठी त्यांची बैठक दिनांक ०५ फेब्रुवारी, २००७ रोजी सकाळी ११.०० वाजता शिर्डी येथे साईनिवास अतिथीगृहात मिटींग कक्षात मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीसाठी एकूण ०६ निविदाधारकांचे प्रतिनिधी हजर होते.

उपरोक्त निविदाधारकांच्या प्रतिनिधींनी संस्थान वेबसाईटसाठी डिझाईन केलेले Sample WebPages चे डेमो दाखविण्यात आले. त्याचबरोबर त्यांनी सादर केलेली तांत्रिक बाबींची पूर्तता करणारी कागदपत्रे तपासण्यांत आली.

वर निर्देशीत केल्याप्रमाणे तांत्रिक बैठकीसाठी एकुण ०६ निविदाधाकांचे प्रतिनिधी हजर होते. त्यापैकी एकूण चार पात्र निविदाधारकांना व्यावसायिक (Commercial) निविदा दिनांक २१ फेब्रुवारी, २००७ रोजी सायंकाळी ०५ वाजेपर्यन्त सिलबंद पाकिटात सादर करण्यांस सांगण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी २१ फेब्रुवारी, २००७ अखेर सिलंबद निविदा सादर केलेल्या आहेत. त्यांची नावे पुढील प्रमाणेः-

अ. नं. निविदाधारकाचे नांव व गांव
01. WEIKFIELD MNEMONIX INFONETWORKS, PVT.LTD. PUNE
02. SEEINFOBIZ PVT. LTD., MUMBAI
03. GREY WORLDWIDE (INDIA) PVT. LTD., MUMBAI
04. HOSTIN SERVICES PVT. LTD., PUNE

उपरोक्त निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आल असता, त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| S.No. | Name of the Company | Bid Price Rs. | Negotiated Price Rs. |
|---|---|---|---|
| 01 | WEIKFIELD MNEMONIX INFONET-WORKS, PVT.LTD. PUNE | 20,00,000.00 | 14,00,000.00 |
| 02 | SEEINFOBIZ PVT. LTD., MUMBAI | 39,53,542.00 | 15,00,000.00 अधिक कर |
| 03 | GREY WORLDWIDE (INDIA) PVT. LTD., MUMBAI | 57,50,000.00 | 47,00,000.00 |
| 04 | HOSTIN SERVICES PVT. LTD., PUNE | 30,63,000.00 | 18,30,000.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन,वेबसाईडचे नुतनीकरण करणेकामी उपरोक्त अ.नं.०१ चे निविदासादरकर्ते WEIKFIELD MNEMONIX INFONET- WORKS, PVT.LTD. PUNE यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-आय.टी विभाग प्रमुख)

**विषय नं.११ मे.एल. ॲण्ड टी.कंपनीच्या मल्टीपॅरा मॉनिटरच्या अपग्रेडेशनबाबत कोटेशन उघडून चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र. २५८.** श्रीसाईनाथ हॉस्पिटलमधील आय.सी.यु व ऑपरेशन थिएटर विभागात असलेल्या मे.एल ॲण्ड टी कंपनीच एकूण तीन नग ल्युनार मल्टीपॅरा मॉनिटरच्या अपग्रेडेशन बाबत मा.उपसमितीचे दिनांक ११.१.२००७ चे सभेत मे.एल.ॲण्ड टी कंपनीच्या विविध डिलर्सकडून कोटेशन मागविण्यास व त्यासाठी येणाऱ्या एकूण रुपये ३,२०,६२५.०० च्या खर्चास मान्यता घेण्यात आली आहे. त्यानुसार मे.एल.ॲण्ड टी कंपनीच्या खालीलप्रमाणे एकूण सहा विविध डिलर्सकडून दिनांक १०.२.२००७ अखेर कोटेशन्स मागविण्यात आले असून त्यापैकी पाच डिलर्सकडून कोटेशन्स प्राप्त झाले आहेत ते खालीलप्रमाणे-

**01)** M/S Adroit Medical systems & services, Pune
**02)** M/S E-care systems Pune
**03)** M/S Micronics instruments Co.Nasik
**04)** M/S Medisoft Systems Bhandup (W) Mumbai
**05)** M/S Criticare Medi-aid Systems, Mumbai

तरी वरीलप्रमाणे ल्युयनार मल्टीपॅरा मॉनीटरच्या अपग्रेडेशन बाबत मागविण्यात आलेले कोटेशन्स उघडून निर्णय होणेस विनंती

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या कोटेशन्स आजचे सभेत उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता, चर्चा/वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नाव | कोटेशनमधील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| 01 | M/S Adroit Medical systems & services, Pune | 1,06,875.00 | **1,06,666.66** |
| 02 | M/S E-care systems Pune | 1,29,375.00 | 1,22,708.33 |
| 03 | M/S Micronics instruments Co.Nasik | 1,18,125.00 | 1,15,171.60 |
| 04 | M/S Medisoft Systems Bhandup (W) Mumbai | 1,30,000.00 | 1,23,666.66 |
| 05 | M/S Criticare Medi-aid Systems, Mumbai | 1,26,000.00 | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, M/S Adroit Medical systems & services, Pune यांचे निम्नतम दराचे कोटेशन स्वीकारणेत येऊन, त्यांना अपग्रेडेशनचा आदेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक)

**विषय नं.१२ चौकशी व निवासस्थान विभागकरिता सतरंजी खरेदीबाबत आलेले कोटेशन्सवर चर्चा/ वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२५९.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२५.११.२००६ मधील निर्णय क्र.९६४ नुसार संस्थानचे शिबीर, सत्संग, सप्ताह व इतर उत्सव काळात भक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होत असते. अशावेळी संस्थानकडील उपलब्ध असलेल्या सतरंज्या या अपुऱ्या पडतात. गर्दीचे वेळी भक्तांचे तात्पुरते निवासासाठी मंडपात तसेच शिबीर सत्संगकाळासाठी आवश्यक असणाऱ्या १५ बाय २० फुट साईजच्या ५० नग सतरंज्या खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.२,००,०००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/खरेदी-चौकशी/२६०७/२००७ दि.२०.०२.२००७ अन्वये दि.२६.०२.२००७ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. त्यानुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | विठ्ठल श्रीपती गोरे, पुणे |
| ०२ | एम.बी. ट्रेडीग कंपनी, नाशिकरोड |
| ०३ | अमित डाईंग, मुंबई |
| ०४ | सचिन हॅण्डलुम प्रॉडक्टस, हथ्रस (युपी) |
| ०५ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर |
| ०६ | बाबुभाई कलेक्शन, नाशिक |

उपरोक्तपैकी मे.एम.बी. ट्रेडीग कंपनी, नाशिकरोड यांनी मागणीप्रमाणे साईजचे दर दिलेले नसल्याने अ.नं.०२ वगळता उर्वरीत सर्व कोटेशनधारकांना आजचे सभेपुढे चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत आलेले आहे.

उर्वरित निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/ वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव | प्रकार/वर्णन | मुळ दर | चर्चा/ वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|---|
| ०१ | विठ्ठल श्रीपती गोरे, पुणे | भवानी ब्रॅण्ड-प्लेन (संस्थान नावासह) | रु.३३००/- | अनुपस्थित |
| | | भवानी ब्रॅण्ड-स्पेशल (संस्थान नावासह) | रु.३९००/- | अनुपस्थित |
| | | डिलेव्हरी- | ९० दिवस | |
| ०२ | अमित डाईंग, मुंबई | कमल टेक्सटाईल्स नावासाठी रु.२/-प्र.श. | रु.३४०५/- | अनुपस्थित |
| | | इस्टर्न कारपेट नावासाठी रु.२/-प्र.श. | रु.३६४३.२० | अनुपस्थित |
| ०३ | सचिन हॅण्डलुम प्रॉडक्टस, हथ्रस (युपी) | इस्टर्न कारपेट नावासाठी रु.१/-प्र.श. | रु.३७००/- | अनुपस्थित |
| | | कमल टेक्सटाईल्स नावासाठी रु.१/-प्र.श. | रु.३४५०/- | अनुपस्थित |
| ०४ | सारडा इंटेरीअर, अहमदनगर | भवानी ब्रॅण्ड-कमल नावासाठी रु.१/-प्र.श. | रु.३२२५/- | ३२२५/- |
| | | भवानी ब्रॅण्ड-इस्टर्न नावासाठी रु.१/-प्र.श. | रु.३४५०/- | ३३४६.५० |
| ०५ | बाबुभाई कलेक्शन, नाशिक | बेस्ट क्वॉलिटी | रु.३४९५/- | ३४२५.१० |

उपरोक्त सारडा इंटेरीअर, अहमदनगर यांचे भवानी ब्रॅण्ड-इस्टर्न या ब्रॅंडची सतरंजी मा.विश्वस्तांनी पसंत केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सारडा इंटेरीअर, अहमदनगर यांचे भवानी ब्रॅण्ड-इस्टर्न ही सतरंजी त्यांनी देऊ केलेल्या दरात खरेदी करण्यात याव्यात असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.१३ श्रीसाईभक्तांना वेबसाईटवर ऑनलाईन डोनेशन व इतर सुविधा देणेसाठी पेमेंट गेटवे उपलब्ध करणे बाबत.**

**निर्णय क्र.२६०** श्रीसाईभक्तांना शिर्डी येथे आल्यानंतर देणगी देण्याची व्यवस्था सुलभ होणेसाठी मंदिर परिसरात ५ संगणकीकृत काऊंटर्सव्दारे सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या काऊंटर्सवर सरासरी एकूण दैनंदिन ३,५०० पावत्यां होत आहेत. त्याचप्रमाणे भक्तांना स्टेट बँकेच्या व आंध्र बँकेच्या ATM वरही ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याशिवाय श्री साईभक्त संस्थानला दैनंदिन सरासरी १,५०० मनिऑर्डरव्दारे देणगी पाठवत आहेत. तसेच पोष्टाने चेक/डी.डी. व्दारेही सरासरी दैनंदिन ३०० पर्यंत देणगी येत आहे. श्री साईभक्तांनी पोष्टाव्दारे अगर मनिऑर्डरव्दारे पाठविलेल्या देणगीस संस्थानमध्ये येण्यास वेळ लागतो. शिवाय त्यांच्या पत्त्यावर संस्थानकडून पोष्टाने पावती व उदी-प्रसाद पाठविला जातो. यामध्ये भक्तांना व संस्थानला पोष्टाचा खर्च सोसावा लागून, शिवाय पावती उदी-प्रसाद उशिरा मिळत असल्याने, त्यांची नाराजी व्यक्त होत आहे.

अनेक श्री साईभक्तांनी संस्थानला विनंती केली आहे की, देणगी देण्याची ऑन लाईन सुविधा संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर सुरु करावी, जेणेकरुन जगातील सर्व साईभक्त त्यांच्या ठिकाणाहून ऑन लाईन देणगी संस्थानला पाठवून, त्याची प्रिंट पावती तेथेच घेता येईल व संस्थानला त्वरीत देणगी उपलब्ध होईल. संस्थानने सध्या वेबसाईटचे नुतनीकरणाचे काम हाती घेतले आहे. या नुतनीकरणात ऑन लाईन देणगीसोबत बहुतेक इतर सेवांही भक्तांना पुरविण्याचा मानस आहे. हे सर्व करण्यासाठी संस्थानच्या अधिकृत

वेबसाईटवर सुरक्षित व बहुतेक सर्व डिबीट/क्रेडीट कार्डव्दारे देणगी देता येईल अशा पेमेंट गेटवेची आवश्यकता आहे. पेमेंट गेटवेची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी (अ) राष्ट्रीयकृत बँकांपैंकी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडौदा, युनियन बँक ऑफ इंडिया व आंध्र बँक यांना पत्रे पाठविली होती. (ब) खाजगी क्षेत्रातील बँकांपैंकी आय.सी.आय.सी.आय बँक व सिटी बँक या बँकांना कळविले होते (क) खाजगी पेमेंट गेटवेपैकी सी.सी. एव्हन्यु व बिलडेक्स यांनाही त्यांचे दर कळविण्याबाबत विनंती केली होती. यापैकी कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेने त्यांचा स्वतःचा पेमेंट गेटवे नसल्याने त्यांनी त्यांचे दर कळविले नाहीत. बँक ऑफ बडौदाच्या मुंबई कार्यालयामध्ये पेमेंट गेटवेसाठी त्यांच्या उच्च अधिकाऱ्यांशी समक्ष मा. कार्यकारी अधिकारी सो., मुख्य लेखाधिकारी व आय.टी. विभाग प्रमुख यांनी चर्चा केली असता सध्या पेमेंट गेटवे उपलब्ध नसून तो भविष्यात उपलब्ध करुन देण्यात येईल एवढेच सांगण्यात आले. इतर बँकाकडून व खाजगी कंपन्यांकडून पेमेंट गेटवेसाठी मिळालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **बँकाचे/कंपनीचे नांव** | **सेटअप फी (एकदा)** | **वार्षिक फी** | सेवा प्रकार | **दर रक्कम** (कर अधिक) |
|---|---|---|---|---|---|
| १. | CC Avenue,Mumbai | १२,५००/- | २,४००/- | Master Card/Visa<br>Amex/Diners<br>Net Banking | २.५%<br>३.५%<br>४% |
| २. | BillDesk, Mumbai | ३५,०००/- | -- | Master Card/Visa<br>Net Banking | २%<br>२% |
| ३. | City Bank, Mumbai | १,००,०००/- | -- | Master Card/Visa<br>Net Banking | १.८%<br>१.८% |
| ४. | I.C.I.C.I. Bank | ५०,०००/- | -- | Master Card/Visa<br>Net Banking | १.७५%<br>१.७५% |

(वरील टक्केवारीवर नियमाप्रमाणे येणारे कर अधिक द्यावे लागणार आहेत. )

वरील तक्यात दर्शविल्याप्रमाणे संस्थानच्या वेबसाईटवर श्री साईभक्तांना पुरविण्यात येणारी सेवा व ई-डोनेशनसाठी आवश्यक असणारे पेमेंट गेटवेबाबतचे न्युनतम दर संस्थानला प्राप्त झालेले आहेत. या दरांचा तुलनात्मक तक्त्यानुसार आय.सी.आय.सी.आय. बँकेचे दर सर्वात कमी आहेत. शिवाय त्यांची ग्राहकांना मिळणारी सेवाही चांगली व उच्च प्रतीची असल्याने संस्थानच्या वेबसाईटसाठी आय.सी.आय.सी.आय. बँकेचा पेमेंट गेटवे घेणे योग्य वाटत आहे. त्यांच्या पेमेंट गेटवेची सुरक्षितताही चांगली व पारदर्शी आहे. संस्थान अधिनियम २००४ प्रमाणे राष्ट्रीयकृत बँकांव्यतिरीक्त इतर बँकांमध्ये संस्थानला पैसे ठेवण्यास परवानगी नसल्याने आय.सी.आय.सी.आय. बँक स्वतःकडे पैसे न ठेवता, जमा झालेली संपूर्ण रक्कम दुसऱ्या दिवशी लगेच संस्थानच्या दिलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यावर जमा करणार आहे. त्यासाठी त्यांना काही आकार द्यावा लागणार आहे अगर आय.सी.आय.सी.आय. बँक संस्थानचे नावाने प्रत्येक दिवशी जमा झालेल्या पैशाचे चेकही देण्यास तयार आहे. परंतु प्रत्येक दिवशी चेक स्विकारण्यापेक्षा जमा झालेली संपूर्ण रक्कम संस्थानच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या बचत खात्यामध्ये प्रतिदिनी ट्रान्सफर करणे हे संस्थानच्या हिताचे असल्याने त्यासाठी आय.सी.आय.सी.आय. बँकेस द्यावा लागणारा स्वतंत्र आकार देण्यास हरकत वाटत नाही. पेमेंट गेटवेव्दारे जमा होणारी दैनंदिन रक्कम आय.सी.आय.सी.आय. बँकेमार्फत संस्थानच्या राष्ट्रीयकृत बँकेत जमा होणार असल्याने संस्थानचे नावे मुंबई येथे किंवा संस्थानच्या सोईच्या ठिकाणी स्वतंत्र बचत खाते उघडावे लागणार आहे.

उपरोक्त विवेचनानुसार संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर श्री साईभक्तांकडून ई-डोनेशन व इतर सेवांसाठीची रक्कम आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या पेमेंट गेटवेव्दारे स्विकारण्यास, त्यांचे वर दर्शविलेल्या तक्त्यामध्ये देय असणारे शुल्क व सेवा आकार १.७५% अधिक कर इ. त्यांना देण्यास व जमा झालेली रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत संस्थानचे स्वतंत्र बचत खाते उघडून जमा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. आजचे सभेत खालीलप्रमाणे कंपन्या/ बँक प्रतिनिधी चर्चा/ वाटाघाटीसाठी उपस्थित होते.

| Sr. No. | Bank/ Company name |
|---|---|
| 01 | CC Avenue, Mumbai |
| 02 | BillDesk, Mumbai |
| 03 | City Bank, Mumbai |
| 04 | I.C.I.C.I. Bank |

उपरोक्त बँक/ कंपनींच्या प्रतिनिधींशी समक्ष चर्चा/वाटाघाटी केल्या असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| Sr. no. | Bank/ Company name | set up fee | | Annual fee | | Service | Rate (+ Taxes) | Negotiated rate |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | tender rate | Negotiated rate | tender rate | Negotiated rate | | | |
| 01 | CC Avenue, Mumbai | 12500 | 12500 | 2400 | 2400 | Master card/ Visa<br>Amex/ Diners<br>Net Banking | 2.5 %<br>3.5%<br>4% | 2.5 %<br>3.5%<br>3.5% |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 02 | BillDesk, Mumbai | 35000 | 35000 | --- | --- | Master card/ Visa Net Banking | 2 %<br>2 % | 1.8 %<br>1.8% |
| 03 | City Bank, Mumbai | 100000 | 100000 | --- | --- | Master card/ Visa Net Banking | 1.8 %<br>1.8% | Absent |
| 04 | I.C.I.C.I. Bank | 50000 | 25000 | --- | --- | Master card/ Visa Net Banking | 1.75 %<br>1.75 % | 1.70 %<br>1.70 % |

यावर सविस्तर चर्चा होऊन, न्युनतम दर असणाऱ्या आय.सी.आय.सी बँकेने देऊ केलेल्या सुविधा स्वीकारणेत याव्यात असे सर्वानुमते ठरले. जमा होणारी दैनंदिन रक्कम राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र बचत खाते उघडून जमा करण्यात यावी. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१४ श्रीसाईभक्तांना मोबाईल फोनवर संस्थानला देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करणे बाबत.**

**निर्णय क्र.२६१.** श्री साईभक्तांना शिर्डी येथे आल्यानंतर देणगी देण्याची व्यवस्था सुलभ होणेसाठी मंदिर परिसरात ५ संगणकीकृत काऊंटर्सव्दारे सेवा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या काऊंटर्सवर सरासरी एकूण दैनंदिन ३,५०० पावत्यां होत आहेत. त्याचप्रमाणे भक्तांना स्टेट बँकेच्या व आंध्र बँकेच्या ATM वरही ऑन लाईन देणगी देण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. याशिवाय श्री साईभक्त संस्थानला दैनंदिन सरासरी १,५०० मनिऑर्डरव्दारे देणगी पाठवत आहेत. तसेच पोष्ठाने चेक/डी.डी. व्दारेही सरासरी दैनंदिन ३०० पर्यंत देणगी येत आहे. श्री साईभक्तांनी पोष्ठाव्दारे अगर मनिऑर्डरव्दारे पाठविलेल्या देणगीस संस्थानमध्ये येण्यास वेळ लागतो. शिवाय त्यांच्या पत्त्यावर संस्थानकडून पोष्ठाने पावती व उदी-प्रसाद पाठविला जातो. यामध्ये भक्तांना व संस्थानला पोष्ठाचा नाहक खर्च सोसावा लागतो. सध्याच्या आधुनिक युगामध्ये मोबाईल फोन दिवसेंदिवस अधिक लोकप्रिय होत आहे. मोबाईल फोनच्या विविध कंपन्या त्यांच्या ग्राहकांना मोबाईल फोनवर विविध सुविधा उपलब्ध करुन देत आहेत. श्री साईभक्तांना संस्थानला त्यांचे इच्छेप्रमाणे मोबाईल फोनव्दारे देणगी पाठविण्याची त्वरीत सोय उपलब्ध करुन देणे शक्य आहे. अशाप्रकारे मोबाईल फोनवर सुविधा उपलब्ध व्हावी, अशी साईभक्तांचीही सतत मागणी होत आहे.

मोबाईल फोनवर देणगी देण्याची सुविधा श्री साईभक्तांना उपलब्ध होणेसाठी सर्वसोईयुक्त व सुरक्षिततेच्यादृष्टीने योग्य असा प्रस्ताव Theme Infracom Pvt. Ltd., Bangalore यांचेकडून संस्थानला प्राप्त झाला आहे. या प्रस्तावातील ठळक बाबी पुढीलप्रमाणे आहेत.

(१) Theme Infracom Pvt. Ltd. संस्थानला या प्रस्तावापोटी करार करतांना परत न करण्याची फी रुपये १ लाख देणार आहे.

(२) मोबाईल फोनवर स्विकारण्यात येणारी देणगी संस्थानमध्ये ठेवलेल्या स्वतंत्र सर्व्हरवर पावती नंबर, मोंबाईल नंबर व रक्कम अशा स्वरुपात ऑन लाईन दिसण्याची सुविधा Theme Infracom Pvt. Ltd. करणार आहे. यासाठी लागणारे सर्व्हर सदर कंपनी संस्थानला पुरविणार आहे. संस्थानने यासाठी फक्त जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे.

(३) मोबाईल देणगी सुविधा पुरविण्याचा करार कमीत कमी तीन वर्षाचा असावा.

(४) श्री साईभक्त मोबाईल फोनव्दारे रुपये १०/- पासून रुपये १५०/- पर्यंत देणगी देऊ शकतील. अशी संगणक प्रणाली तयार करण्यात आली आहे.

(५) संस्थानला मिळणारी देणगी १००% प्राप्त होणार आहे. सदर कंपनी यातून कोणतीही वजावट करणार नाही. मात्र देणगी देणाऱ्या भक्ताला ही देणगी पाठविण्यासाठी कराव्या लागणाऱ्या SMS साठी रुपये ४/- आकारले जाणार आहेत.

(६) भक्तांकडून मोबाईल फोनव्दारे दिली जाणारी देणगी सदर कंपनीकडे जमा न होता, ती संबंधीत सर्व्हीस ऑपरेटरकडून पुढीलप्रमाणे संस्थानला थेट मिळणार आहे.

अ) रिकन्सीलेशनसाठी - १० दिवस

ब) बिलींगसाठी - १० दिवस

क) रक्कम प्राप्त होणेसाठी - ४५ दिवस

अशाप्रकारे श्री साईभक्ताने त्यांच्या मोबाईलवर संस्थानला पाठविलेली देणगी एकूण ६५ दिवसानंतर प्राप्त होण्याचे वेळापत्रक आहे.

(७) संस्थानला मिळालेली देणगी सुरक्षितरित्या प्राप्त व्हावी व त्यास हमी असावी म्हणून Theme Infracom Pvt. Ltd. ही कंपनी संस्थानला रुपये १० लाखाची बँक गॅरंटी देणार आहे.

(८) मोबाईल सर्व्हीस प्रोव्हाडरकडून देणगी रक्कम विहीत मुदतीत संस्थानला प्राप्त न झाल्यास ती रक्कम Theme Infracom Pvt. Ltd. संस्थानला स्वत: देण्याची हमी देत आहे.

(९) मोबाईल फोनवर ऑन लाईन देणगी सुविधा संस्थानमध्ये सर्व्हरवर दिसण्यासाठी संस्थानकडून त्यांच्या सर्व्हरला २ एमबीपीएस इंटरनेटची स्वतंत्र लाईन पुरवावी लागणार आहे, त्याचा मासिक खर्च संस्थानने करावयाचा आहे.

Theme Infracom Pvt. Ltd. कंपनीने संस्थानला मोबाईल फोनवर देणगी देण्याच्या सुविधांचे प्रात्यक्षिक दाखविले असून, ते सुरक्षित व पारदर्शी वाटते. सदर सेवा सुरु केल्यास, भक्तांना जलद देणगी देण्याच्या आधुनिक पध्दतीचा लाभ घेता येईल.

वरील विवेचनानुसार Theme Infracom Pvt. Ltd., Bangalore यांचेकडून मोबाईल फोनवर देणगी देण्याची सुविधा प्राप्त करुन घेण्यासाठी व त्यासाठीचे प्रात्यक्षित मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यासाठी, त्यांना समक्ष बोलाविण्यात आले होते. त्यांचीशी समक्ष चर्चा करण्यात आली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, Theme Infracom Pvt. Ltd., Bangalore यांनी संस्थानला राष्ट्रीयकृत बँक गॅरंटीची रक्कम रुपये १० लाखाऐवजी रुपये २५ लाख देण्यात यावी असे ठरले. याबाबत त्यांचेशी तीन वर्षांचा करारनामा करण्यात यावा व त्याप्रमाणे सदर सुविधा भक्तांना उपलब्ध करुन द्याव्यात, असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१५ सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी पूर्व लेखापरिक्षक व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून सक्षम संस्थेची नियुक्ती करणे बाबत.**

**निर्णय क्र.२६२.** **(अ)** संस्थानच्या कामकाजाच्या व्याप दिवसेंदिवस वाढत असून, त्याच बरोबर आर्थिक व्यवहारातही मोठ्याप्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारावर योग्य नियंत्रण रहावे. यासाठी लेखाशाखेकडून आदा करण्यात येणारे प्रत्येक देयक, आदा होण्यापूर्वी त्याचे पूर्व लेखापरीक्षकाकडून **(Pre-Auditor)** लेखापरिक्षण होणे गरजेचे असल्याने, तसेच आदा होण्यापूर्वी देयकांचे पूर्व लेखापरिक्षण **(Pre-Audit)** झ ाल्यास, नजर चूकीने होणा-या चूका व काही संभाव्य त्रुटी टाळणे सहज शक्य होईल. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखापरिक्षक स्वतः हजर राहणार असल्यामुळे वैधानिक लेखापरिक्षणासही त्याची मदत होऊन, वैधाकि लेखापरिक्षकांच्या आक्षेपांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल. तसेच होणारे सर्व आर्थिक व्यवहार हे अधिनियम-२००४ मधील तरतुदीप्रमाणे होतात की नाही हे पाहण्याचेही सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखापरिक्षकावर राहणार असल्याने आर्थिक व्यवहारावर योग्य नियंत्रण रहावे, यासाठी सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरीता शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे यांची एकत्रित रक्कम रुपये १.७५ लाख मात्र (सर्व खर्चासह), सेवाकरासह वार्षिक लेखापरिक्षण फी वर नियुक्ती करण्यात आली होती. त्यास अनुसरुन त्यांनी प्रत्यक्ष कामकाजास सुरुवातही केलेली आहे.

**(ब)** संस्थानमधील सर्व विभागाकडील आर्थिक कार्यपध्दती व लेख्यांचे अंतर्गत लेखापरिक्षण अशा एकूणच कामकाजासाठी, प्रशासनांतर्गत पुरेशा मनुष्यबळाअभावी, सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी बाहेरील दोन सक्षम संस्था (श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव व शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएटस्, चार्टर्ड अकौंटंटस्, पुणे) यांची सर्व खर्चासह एकत्रित रु.१ लाख मात्र प्रत्येकी, असे एकूण रुपये २ लाख मात्र या वार्षिक मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती.

तद्नंतर सन २००६-०७ या आर्थिक वर्षाकरीता उपरोक्त दोन संस्थांपैकी अंतर्गत लेखापरिक्षणाचे कामकाजासाठी श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव यांची एकत्रित रक्कम रु.१.७५ लाख मात्र, अधिक होणारा सेवाकर या वार्षिक फी वर, मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्र.७२१ दिनांक १६ सप्टेंबर, २००६ अन्वये नियुक्ती करण्यात आली होती.

उपरोक्तप्रमाणे परिच्छेद "अ"व "ब" मध्ये उल्लेखित, नियुक्त करण्यात आलेल्या बाहेरील दोन्ही संस्थांची, पूर्व लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी निश्चितच मदत झालेली आहे.

आता, सन २००६-०७ हे आर्थिक वर्ष संपत आले असून नवीन आर्थिक वर्ष सन २००७-०८ सुरु होत आहे. सदरील आर्थिक वर्षाच्या पूर्व-लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी मागील वर्षाप्रमाणे सक्षम संस्थेची नियुक्ती झाल्यास, सदरील संस्थेकडून वेळेत काम पूर्ण करुन घेणे सोईस्कर होईल. त्यासाठी मागील वर्षी पूर्व लेखापरिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेले, शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स,चार्टर्ड अकौंटंट्स, पुणे आणि अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आलेले,श्री.ए.जी.लोंगाणी,चार्टर्ड अकौंटंटस्,कोपरगांव या दोन्ही संस्थांना संस्थानच्या कार्यपध्दतीचा अनुभव आहे. तसेच, मागील वर्षी लेखापरिक्षणाच्या पूर्ण कालावधीमध्ये संस्थानमार्फत त्यांची राहण्याची विशेष व्यवस्था करण्याची आवश्यकता भासलेली नाही. पर्यायाने यामध्ये संस्थानचा निश्चितच आर्थिक फायदा झ ालेला असलेने, सन २००७-०८ या आर्थिक वर्षाकरीता, पूर्व लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी शास्त्री पुरोहित ॲण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौटंट्स, पुणे यांची आणि संस्थांनच्या सर्व विभागांसाठी अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजाकरीता श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव यांची नियुक्ती करण्यात यावी. त्याची पुनर्नियुक्ती केल्यामुळे सन २००६-०७ च्या वैधानिक लेखापरिक्षणाचा दोष-दुरुस्ती अहवाल करण्यासाठी त्यांची निश्चितच मदत होईल. अशाप्रकारे सलग तीन-चार वर्षे पूर्वानुभव असणाऱ्या सक्षम संस्थांकडून पूर्व लेखापरिक्षण व अंतर्गत लेखापरिक्षण करुन घेतल्यास त्यांचे चांगले-पारदर्शक परिणाम दिसून येतील, असे नम्र मत आहे.

तरी सन २००७-०८ या आर्थिक वर्षासाठी पूर्व लेखापरिक्षक म्हणून शास्त्री पुरोहित अॅण्ड असोसिएट्स, चार्टर्ड अकौटंट्स, पुणे यांची व अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून श्री.ए.जी.लोंगाणी, चार्टर्ड अकौंटंटस्, कोपरगांव यांची प्रत्येकी रक्कम रु.१.७५ लाख मात्र, असे दोन्ही संस्थांचे मिळून एकूण रक्कम रुपये ३.५० लाख मात्र (सर्व खर्चांसह), अधिक होणारा सेवाकर या लेखापरिक्षण फी वर नियुक्ती होणेसाठी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१६** **संस्थानकडे उपलब्ध असलेल्या शुध्द सोने-चांदी पासून भक्तांसाठी बनविणेत येणारे साईमुद्रा, नाणी/लॉकेटसचे दर ठरविणे बाबत.**

**निर्णय क्र.२६३.** श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे भक्तांकडून देणगीरुपाने सोने-चांदीचे अलंकार, वस्तू अर्पण केल्या जातात. तत्कालीन मा. विश्वस्त मंडळाचे दिनांक २१ जुलै, २००१ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ३३८ अन्वये देणगीव्दारे प्राप्त झालेले सोने-चांदी वस्तु अलंकार वितळविणेसाठी रिफायनरीत नेण्यात येत असत. शुध्दीकरणानंतरच्या ९९% शुध्द लगडीपासून वेळोवेळी आवश्यकते नुसार, मा. विश्वस्त मंडळाचे मान्यतेने, श्री साईंची प्रतिमा असलेली चांदीची (२० ग्रॅम), सोन्याची (प्रत्येकी २.५, ५,१० ग्रॅमची ) नाणी साईभक्तांना योग्य किंमतीत उपलब्ध करुन देण्यात येत होती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनूसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये देणगी रुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू अलंकारापैकी, जे अलंकार अत्यंत अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे असतील, असेच अलंकार व्यवस्थापनाकडे सदैव जतन करुन ठेवता इतर उर्वरीत सोने-चांदी वस्तूं अलंकार वस्तु वितळविण्यात यावेत व सदरचे कार्यपध्दतीस मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांची स्थायी मान्यता घेण्यात यावी. याकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला असून सदरचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे.

**(अ)** संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेले सोने-चांदी वस्तुअलंकार वितळवुन मिळणारे शुध्द सोने-चांदी नसल्यामुळे गेल्या काही दिवसांपासुन श्रीची प्रतिमा असलेली नाणी व पेंडंटस् विक्री बंद आहे. परंतु भक्तांची मागणी मोठयाप्रमाणात वाढत असल्यामुळे मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ चे सभेतील निर्णय क्रमांक १२७ अन्वये स्टेट बॅक ऑफ इंडिया, मुंबई यांचेकडे सुवर्णठेव योजनेअंतर्गत गुंतविण्यात आलेले सोने एकुण २४,८९१.०८० ग्रॅम त्यांचेकडून सोन्याच्या स्वरुपात स्विकारण्यात यावे व सदर सोने इंडिया गव्हर्नमेंट मिंट,मुंबई यांचेकडे जमा करुन त्यापासुन पूर्वीप्रमाणेच नाणी व पेंडंटस् तयार करण्यात येऊन भक्तांना त्याची बाजारभावाप्रमाणे विक्री करण्यात यावी असे ठरललेले आहे.

०१. उपरोक्त निर्णयाप्रमाणे नाणी व पेंडटस् तयार करणेकामी गव्हमेंट मिंट,मुंबई यांनी खालीलप्रमाणे दर कळविलेले आहेत.

| अ.नं. | तपशिल | | मजुरी दर |
|---|---|---|---|
| ०१ | सोन्याची नाणी | २.५ ग्रॅम | ८० /- |
| | | ५ ग्रॅम | १४०/- |
| | | १० ग्रॅम | २८०/- |
| ०२ | चांदीचे नाणे | २० ग्रॅम | ४२० /- |

वरील दराव्यतिरीक्त साचा (Dies) बनविणेसाठी प्रत्येकी रक्कम रुपये ५०,०००/-, सर्व्हीस टॅक्स १२.२४ टक्के, इतर खर्च (अनुषंगीक) वेगळा असे दर कळविलेले आहेत.

०२. यापुर्वी मे.नॅशनल रिफायनरी प्रा.लि.मुंबई यांचेकडून सन २००३-०४ या वर्षाअखेर उपरोक्तप्रमाणे नाणी तयार करुन घेण्यात येत होती. त्यासाठी पुर्वीच्याच आदेशातील मान्य दराने नाणी तयार करुन घेण्यात आलेली आहेत. त्या दरांचा तपशिल पुढील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | | मजुरीदर |
|---|---|---|---|
| ०१ | सोन्याची नाणी | २.५ ग्रॅम | ५५ /- |
| | | ५ ग्रॅम | ५०/- |
| | | १० ग्रॅम | ६०/- |
| ०२ | चांदीचे नाणे | २० ग्रॅम | १६ /- |

संस्थानने मान्य केलेल्या मुद्रांनूसार रिफायनरीने साचा (Dies) आकार न घेता नाणी पुरविलेली आहेत.

उपलब्ध असलेले सोने व शासनाची मंजुरीनतंर सोने-चांदी वितळवुन प्राप्त होणारे सोने-चांदी पासुन पुर्वीप्रमाणेच श्री बाबांची मुद्रा व श्रीचे पादुकाचे नाणी व पेंडंटस् बनविणेस तसेच नवीन मुद्रा बनविणेकामी इंडिया गर्व्हमेंट मिंट चे महाप्रबंधक श्री चौधरीसाहेब हे आजचे सभेपूढे उपस्थित होते.

त्यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी सोन्याची नाणी २.५ ग्रॅम ५ ग्रॅम १० ग्रॅम व चांदीच्या २० ग्रॅम वजन या सर्व साईजसाठी मजूरी दर रुपये १५०/- दर देण्याचे मान्य केले. तसेच प्रत्येक साच्यासाठी (DIES) रक्कम रुपये २५,०००/-(फक्त एकदाच) देण्याचे मान्य करण्यात आले. वरील दराने पूर्वीच्या मुद्रेप्रमाणेच नाणी व पेंडेन्टस् आवश्यकतेनुसार तयार करण्यात यावीत. भविष्यात

सुध्दा शुध्द सोने व चांदी प्राप्त झालेनंतर आवश्यकतेनुसार मिंटकडून नाणी व पेंडन्टस् तयार करुन घेण्यात यावेत.

संस्थानमार्फत मंगळसुत्राच्या वाट्या व हातातील अंगठ्या संस्थानमार्फत तयार करुन विक्रीस ठेवता येतील किंवा कसे याबाबत व्यवस्थापन समितीचे सभेपूढे प्रस्ताव सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१७** **सैनिक आरामगृहासाठी देण्यात आलेल्या जागेचे भाडे ठरविणे बाबत.**

**निर्णय क्र.२६४.** **(अ)**मेजर जनरल श्री. टी.के.कौल,जनरल ऑफिसर कमांडीग, महाराष्ट्र, गुजरात व गोवा क्षेत्र, हेडक्वॉर्टर कुलाबा, मुंबई यांनी दिनांक २१ मे, २००४ रोजीच्या पत्राने श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे सैनिक व त्यांचे कुंटूंबिय यांचे निवासासाठी आरामगृह (गेस्ट हाऊस) बांधण्याचे दृष्टीने संस्थानकडे जमिनीची / जागेची मागणी केली होती.

याबाबत मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजी झालेल्या सभेतल निर्णय क्रमांक १५४ खालीलप्रमाणे झालेला आहे व तो या प्रकरणात अंतिम आहे :

"०१. मौजे निमगांव को-हाळे येथील शेती महामंडळाची भूसंपादनाने घेण्यात येणारी गट नंबर ८७ व ८८ मधील पुर्वी संस्थानने देऊ केलेल्या जागेच्या ऐवजी त्याच गट नंबर मधील नकाशात दर्शाविल्याप्रमाणे जागेच्या साधारण १०० ते २०० मीटर अंतरावरील मिलटरी खात्यास हे ००-६०आर जागा देण्यात यावी.

०२. सदरची निवड झालेली जागा महाराष्ट्र शासनाच्या पुर्व परवानगीने ३० वर्षे मुदतीसाठी भाडेपट्टयाने देण्यात यावी. सदर ३० वर्षे कालावधी संपल्यानंतर त्यापुढील कालावधीसाठी परस्परांच्या संमतीने व सहमती झालेल्या अटीनुसार कराराचे नूतनीकरण करण्यात यावे.

०३. जागेचे वार्षिक भाडे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून ठरवून घेण्यात यावे अथवा हे भाडे ठरविण्याची वेगळी शासनमान्य कार्यपध्दती असलेस त्यापद्धतीने भाडे ठरवण्यात यावे. यासाठी करारनामा मसुदा संस्थानचे वकिलाकडून तयार करून घेण्यात यावा. याबाबत करारनाम्याचा स्टॅम्पडयुटी व रजिष्ट्रेशनचा सर्व खर्च मिलटरी खात्याकडून करण्यात यावा. "

**(ब)**उपरोक्त निर्णयाप्रमाणे मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी / बांधकाम / ५०२२ / २००६, दिनांक १५ एप्रिल, २००६ अन्वये मौजे निमगांव को-हाळे शिवारातील ६० आर जागा मिलटरी खात्याला देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठविण्यात आलेला होता.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील निर्णय क्रमांक सासंवि-२००५/६५०(८९)/ का.सोळा, दिनांक ०८ नोव्हेंबर, २००६ व शासन शुध्दीपत्रक क्रमांक सास्नवि-२००५/६५० (८९)/ का. सोळा, दिनांक २४ नोव्हेंबर, २००६ अन्वये मिलटरी गेस्ट हाऊसला ६० आर जागा देणेबाबत मंजुरी मिळालेली आहे.

**(क)**तसेच मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक १५४ मधील शर्ती व अटी मान्य आहेत किंवा कसे याबाबत मा.लेफ्टनंट कर्न, प्रोजेक्ट मॅनेजर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट ग्रुप हेडक्वॉर्टर आर्मी एअर डिफेन्स सेंटर, नाशिक रोड यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस/वशी/बांधकाम /भूसंपादन/४६७२/२००६, दिनांक ०७ एप्रिल, २००६ अन्वये विचारणा केलेली होती. त्यावर लेफ्टनंट कर्नल, प्रोजेक्ट मॅनेजमेंट ग्रुप यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक ४०३५१८/ शिर्डी/जन/७५/अ, दिनांक १० मे, २००६ निर्णय क्रमांक १५४ मधल अटी व शर्तीस मान्यता कळविलेली आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०४ मार्च, २००६ रोजीच्या निर्णय क्रमांक १५४ मधील, भाडे ठरविण्याबाबत झालेल्या निर्णयाबाबत मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना इकडील पत्र क्रमांक एसएसएस / वशी / बांधकाम / ९३६८ / २००६, दिनांक १५ जुलै, २००६ अन्वये उपरोक्त जागेचे भाडे ठरविणेबाबत विनंती केली होती. मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम, संगमनेर यांनी त्यांचेकडील पत्र पवशा/६९९५/०६, दिनांक २१ ऑगष्ट, २००६ अन्वये प्रश्नाधिन जमिनीचे भाडे रुपये ६९००/- (रुपये सहा हजार नऊशे मात्र) दरमहा स्थानिक कर वगळून ठरविलेबाबत भाडे प्रमाणपत्र दिलेले आहे. सदरचे भाडे मान्य आहे किंवा कसे याबाबत इकडील पत्र क्रमांक एसएसएस/बांधकाम/भूसंपादन/११८०७/२००६, दिनांक ०२ सप्टेंबर, २००६ अन्वये मा.लेफ्टनंट कर्नल, प्रोजेक्ट मॅनेजर, नाशिक रोड यांना विचारणा करणेत आलेली होती.

त्यावर जनरल ऑफिसर कमांडिंग, हेडक्वार्टर्स महाराष्ट्र, गुजराथ ॲण्ड गोवा एरिया, कुलाबा, मुंबई यांनी त्यांचे जावक क्रमांक ४०३५१८/शिर्डी/ए ५, दिनांक १९ फेब्रुवारी, २००७ अन्वये मा.अध्यक्षमहोदय. यांना उद्देशून पत्र दिलेले आहे, त्यामध्ये जागेचे भाडे कमी करण्याची विनंती केलेली आहे. या पत्रात खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे :

"सैनिक आरामगृह हे जवानांना व सेवानिवृत्त जवानाच्या कल्याणासाठी बांधण्यात येत आहे. या आरामगृहातून त्यांना नफा होणार नाही. त्यामुळे उपरोक्त जमिनीचे भाडे नाममात्र दरमहा रक्कम रुपये ५०१/- मात्र ठरविण्यात यावे. "

तरी मौजे निमगांव को-हाळे येथील गट नंबर ८७ व ८८ मधील ०० हेक्टर ६० आर ही जागा मिलटरी खात्यातील जवानांच्या व सेवानिवृत्त जवानांच्या कल्याणासाठी आरामगृह बांधणेसाठी उपयोगात येणार आहे. या आरामगृहापासून नफा मिळविणे हे मिलटरी खात्याचे उद्दीष्ट नाही. त्यामुळे मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर विभाग यांनी ठरविलेले भाडे दरमहा रक्कम रुपये ६,९००/- घेणेचे ऐवजी जनरल ऑफिसर कमांडिंग, हेडक्वॉर्टर, महाराष्ट्र, गुजराथ ॲण्ड गोवा एरिया, कुलाबा, मुंबई यांनी त्यांचे दिनांक १९ फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्रात नमुद केल्याप्रमाणे नाममात्र भाडे दरमहा रक्कम रुपये ५०१/- आकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. याबाबत कर्नल देशपांडे हे सैनिक अधिकारी आजचे सभेपूढे उपस्थित होते. त्यांचेशी चर्चा करणेत आली. सैनिक आरामगृह हे जवानांना व सेवानिवृत्त जवानांच्या कल्याणासाठी बांधण्यात येणार असल्याने त्यासाठी नाममात्र भाडे दरमहा रक्कम रुपये ५०१/- आकारण्यास मान्यता देण्यात आली, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१८ नवीन प्रसादालयासाठी बायोगॅस संयत्र उभारणेकामी आलेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.२६५.** केंद्र व राज्य शासन आपरंपारिक उर्जास्त्रोताव्दारे विद्युत, इंधन आदी उपलब्ध करुन घेणेबाबत मोठ - मोठी निवासी संकुले, स्वयंसेवी संस्था, रुग्णालये, हॉटेल्स आदी ठिकाणी संयंत्र उभारणेबाबत प्रोत्साहन देत आहे. यापैकीच एक बायोगॅस प्लॅन्ट ही यंत्रणा असून या यंत्रणेव्दारे बायोगॅसचे उत्पादन होऊन, त्याचा उपयोग प्रसादालयातील अन्न-धान्य शिजविणेसाठी होऊ शकतो.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे मा.व्यवस्थापन समितीचे विविध निर्णयान्वये श्री क्षेत्र शिर्डी येथे भेट देणाऱ्या हजारो साईभक्तांना प्रसाद भोजनाची सुविधा विनासायास व विनाविलंब मिळावी यादृष्टीने अंदाजे ५५०० भक्त एकाच वेळेस प्रसाद भोजन घेऊ शकतील, असे अद्ययावत प्रसादालय इमारतीचे बांधकाम सध्या सुरु करण्यात आलेले आहे.

या नियोजित प्रसादालय इमारतीत साईभक्तांसाठी प्रसाद भोजन सुविधा सुरु केल्यानंतर, प्रसादालयातील वाया जाणारे अन्न, खरकटे आदी पासून तसेच समाधी मंदिरातील हार-फुले आदी पदार्थापासून बायोगॅस तयार होऊ शकतो. या वाया जाणारे पदार्थापासून बायोगॅस प्लॅन्ट उभारणेबाबत श्रेयन्स एनर्जी प्रा.ली., जबलपूर (मध्यप्रदेश ) यांचेकडील रु. २०,२२,७९९.०० अधिक कर, विक्रीकर अतिरिक्त खर्चाचा मा. व्यवस्थापन समितीपुढे दि. ०६/०१/२००७ रोजी सविस्तर प्रकल्प अहवाल सादर केलेला होता.

दि. ०६/०१/२००७ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे बैठकीतील निर्णय क्र. २३ अन्वये सदरहू प्रकल्पासाठी येणारा अपेक्षित खर्चाचा विचार करता याकामी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन तांत्रिक व वाणिज्य प्रस्ताव या क्षेत्रातील नामांकित, अनुभवी संस्था अथवा कंपन्यांकडून प्रस्ताव मागविणेत यावेत असे ठरले आहे. त्यानुसार इच्छुक कंपन्या अथवा फर्म यांना प्रस्ताव सादर करणेसाठी, त्यांचे माहितीसाठी Instructions to Intending companies/ firms या नावाने सुचना संस्थानचे संकेत स्थळावर दि. ०५ मार्च २००७ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. तसेच सदर प्रस्ताव सादर करणेसाठी दि. ०५ मार्च २००७ रोजी वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. प्रस्ताव सादर करण्याची मूदत दि. १५/०३/२००७ अखेर पर्यंत ठेवण्यात आली होती.त्यानुसार वरील विषयांकित कामासाठी खालील तीन प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.

०१. मे. श्रेयन्स एनर्जी प्रा.लि.,जबलपूर

०२. सन टेक्नीक्स एनर्जी सिस्टीम्स प्रा.लि.बेंगलोर

०३. बायोमास रेसीड्युज,बंगलोर

वरीलप्रमाणे आलेल्या प्रस्तावाबाबत निर्णय होण्यासाठीचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

त्यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरहू प्रस्ताव महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण (MEDA) पुणे यांचेकडून तपासून घेऊन त्यांचे अभिप्राय घ्यावेत असे ठरले.(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.१९ संयुक्त घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पासाठी संस्थानतर्फे तांत्रिक सल्लागाराची फी अदा करणेसाठी शिर्डी नगरपंचायत व राहाता नगरपरिषद यांना केलेल्या विनंती बाबत.**

**निर्णय क्र.२६६.** मा.मुख्याधिकारी ,राहाता नगरपरिषद,राहाता यांनी त्यांचे कडील पत्र क्र वशी /०६/४६९/२००७ दिनांक ०८/०२/२००७ आन्वये साई संस्थान,शिर्डी नगरपंचायत व राहात नगर परिषद यांचे करिता संयुक्त घनकचरा विल्हेवाट प्रकल्प उभारणीसाठी तांत्रिक सल्लागार नेमणुकी बाबत दि. ०१.०२.२००७. रोजी शिर्डी येथे झालेल्या बैठकीत ठरल्याचे कळविले आहे. तसेच सदर पत्रात मा.मुख्याधिकारी ,राहाता नगरपरिषद यांनी खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

सदर प्रकल्प रुई येथे अथवा राहाता नगरपरिषद मालकीच्या जागेत दाहोपैकी जेथे उभारणी योग्य असेल त्याची पडताळणी घेणेकरिता व पुढिल कार्यवाही तांत्रिक सल्लागार नेमणे आवश्यक आहे .राहाता नगर परिषदेची नाजूक आर्थिक परिस्थिती लक्षात घेता सदर तांत्रिक सल्लागाराची फी देणे नगरपरिषदेला शक्य होणार नाही.तरी सदर नेमणुक व फी श्री साई संस्थान यांनी दयावी हि विनंती.

मुख्यधिकारी, शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांनी त्यांचे कडिल पत्र जा.क्र न.प. बांध- कावि५-१६१५ - २००७ दि.१२-०२-२००७.चे पत्राने खालील विनंती केलेली आहे.

०१)शिर्डी शहरात जमा होणारा घनकचरा स्थानिक नागरीक व साईभक्तांच्या आरोग्य दृष्टीने विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. या बाबत शासनाचा आग्रह आहे.

०२)या दृष्टीने घनकचरा संकलन वाहन व्यवस्था,प्रक्रिया व मुल्यक्षम उत्पादनासाठी शास्त्रोत पध्दतीने अभ्यास करणे आवश्यक आहे. त्या करिता यत्रंना विकसीत करणे गरजेचे आहे.

०३)यासाठी अनुभवी व तज्ञ संस्थेकडून प्रकल्प अहवाल करणे गरजेचे आहे.

०४)वरील कामासाठी प्रकल्प अहवाल करणेसाठी सल्लागार यांची नेमणूक करणे त्या साठी लागणाऱ्या खर्चा करण्याची आर्थिक क्षमता नगरपंचायतची नाही.यासाठी त्यांनी खालील प्रमाणे विनंती केलेली आहे.

अ) घनकचरा विल्हेवाट लावण्यासाठी प्रकल्प तयार करणेसाठी संस्थानने सल्लागार यांची नेमणूक करावी व त्यासाठी आवश्यक खर्च तो संस्थानने करावा.

वरील विनंतीनुसार शिर्डीनगर पंचायत मधील व राहाता नगरपरिषद व संस्थान मधील घनकचरा यांची विल्हेवाट लावणे बाबत करावयाच्या संकलन , वाहन व्यवस्था,प्रक्रिया व मुल्यक्षम उत्पादनासाठी शास्त्रोत पध्दतीने अभ्यास करणेसाठी संस्थानने सल्लागार नेमणे व फी आदा करणे अपेक्षित आहे. त्यासाठी सदर कामाचे स्वरुप व अपेक्षित खर्चाचा सविस्तर तपशिल शिर्डी नगरपंचायत व राहाता परिषद यांना तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी त्यांनी त्यासाठी शासनाकडून विविध योजनांचे माध्यमातून अनुदान प्राप्त करणेसाठी प्रयत्न करावा लागेल.या प्रकल्पासाठी लागणारी कंन्सलटेशन फी तसेच इतर पुरकमदत देणे बाबत. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ चे कलम २१ (२) अन्वये राज्य शासनाची पूर्व मान्यता घेणे आवश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,याकामी सर्वागिण अभ्यास करुन व सर्व्हेक्षण करुन प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी संस्थानतर्फे सल्लागाराची नेमणूक करण्यात यावी, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२०** **मौजे निमगांव कोऱ्हाळे ता.राहाता येथील गट नंबर १८३ क्षेत्र ५ हेक्टर ४० आर मध्ये साईभक्तांसाठी निवासस्थान उभारणे बाबत.**

**निर्णय क्र.२६७.** श्री क्षेत्र शिर्डी येथे प्रतिदिनी साधारणत: ३०-४० हजार साईभक्त भेट देऊन, श्री साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतात व आपली मनोकामना पूर्ण व्हावी म्हणून श्री साईंना साकडे घालतात. उत्सवकाळात तसेच उन्हाळी सुट्टया, दीपावली व नाताळाच्या सुट्टया, गुरुवार व रविवार तसेच या दिवसांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टया इत्यादी काळात श्री क्षेत्र शिर्डीस भेट देणाऱ्या साईभक्तांची संख्या सुमोर २ ते ३ लाखांपर्यन्त जाते. गर्दीच्या काळात साईभक्तांना निवासाची, प्रसाद भोजन व इतर मुलभूत सोयी-सुविधा विनासायास, विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात म्हणून मा. व्यवस्थापन समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनामार्फत आटोकाट प्रयत्न केले जातात.

सध्या संस्थानकडे भक्तांना निवासाची सुविधा उपलब्ध व्हावी यादृष्टीने विविध निवासस्थान इमारतींमध्ये ८१० खोल्या/हॉल्स व ४२५ लॉकर्स उपलब्ध आहेत. यामध्ये श्रीसाईबाबा भक्तनिवासस्थान, साईप्रसाद नं.०१ व ०२, धर्मशाळा आदि प्रमुख निवासस्थानांचा समावेश आहे. तसेच सध्या धर्मशाळा संकुलाजवळ २४० खोल्या असलेल्या व्दारावती या निवासस्थान इमारतीचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच संस्थानचे भक्तनिवास इमारतीलगत सर्व्हे नंबर १०७ व १०८ मध्ये संस्थानमार्फत उपलब्ध होणाऱ्या जागेत देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेमार्फत सुमारे १५ हजार साईभक्तांची निवासव्यवस्था होईल असे साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम करुन देण्यात येणार आहे. या प्रकल्पातून साईभक्तांची निवासव्यवस्था काही प्रमाणात उपलब्ध होणार आहे.

मात्र, गतवर्षी सन २००५-०६ मध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथे संस्थानमार्फत साजरे करण्यात येणारे श्रीरामनवमी उत्सव, श्रीगुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव या तिन्ही उत्सवाचे दिवशी,

वर्षाभरामध्ये शनिवार-रविवार या सुट्टयांना जोडून येणाऱ्या सरकारी सुट्टयांच्या दिवशी, एप्रिल-मे महिन्याचे उन्हाळी सुट्टयांमध्ये, दिपावली, नाताळ व नविन वर्षारंभीच्या सुट्टयांमध्ये श्री साईंच्या दर्शनासाठी साईभक्तांची मोठया प्रमाणावर गर्दी झाली. या उत्सवांच्या तसेच सुट्टीच्या कालावधीमध्ये श्री क्षेत्र शिर्डी येथे दररोज साधारणतः २ लाख साईभक्तांनी भेट दिली. अशा वेळेससंस्थानकडे उपलब्ध असलेल्या निवासव्यवस्थेबरोबरच स्थानिक गावातील निवासव्यवस्थासुध्दा अत्यंत तोकडी व अपुरी पडली. संस्थानमार्फत अशा गर्दीच्या वेळेस कापडी तंबू, मंडप आदि उभारुन, आवश्यक त्या ठिकाणी तात्पुरते प्रसाधनगृहे उभारुन तसेच फिरत्या प्रसाधनगृहांची व्यवस्था करुन भक्तांची निवासाची व्यवस्था करण्यात आली. वर्षभरामध्ये अशी व्यवस्था उभारणेसाठी प्रशासनाची मोठया प्रमाणावर धावपळ झाली व होत आहे. यासाठी साईभक्तांना जादा निवासाची व्यवस्था उपलब्ध करुन देणेसाठी निवासस्थाने उभारणे अत्यंत गरजेचे व आवश्यक आहे.

मौजे निमगांव कोऱ्हाळे, तालुका शिवारात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाची जमीन भूसंपादनाचे माध्यमातून घेतलेली आहे. या जमिनीपैकी गट नंबर ८० व ८५ मध्ये एकाच वेळेस ५५०० साईभक्त प्रसाद भोजनाचा लाभ घेऊ शकतील अशा नियोजित भव्य प्रसादालय इमारतीच्या, अंदाजे १८ कोटी रुपये खर्चाच्या बांधकाम प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. या नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम येत्या ०४ महिन्यात पूर्णत्वास जाईल अशी अपेक्षा आहे.

मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारातील गट नंबर १८३ मध्ये ०५ हेक्टर ४० आर (१३ एकर) इतके सलग क्षेत्र असलेली व मंदिरापासून सुमारे २.३ किलोमीटर अंतरावर जमीन / प्लॉट उपलब्ध आहे. या जमिनीमध्ये भक्तांच्या निवासव्यवस्थेसाठी आराखडा तयार करुन दोन टप्प्यात येथील जमिनीत निवासस्थान इमारतींचे बांधकाम करता येईल.

याकामी मा.व्यवस्थापन समितीची तत्वतः मान्यता मिळणेस, निवासस्थान इमारतीचे बांधकाम आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेसाठी आर्किटेक्ट नेमणूक करणेस व याकामी येणारे योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी चांगल्या नामांकित आर्किटेक्टकडून प्लॅन तयार करुन घ्यावा व तो व्यवस्थापन समितीपूढे विचारार्थ सादर करावा असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२१** **मौज शिर्डी येथील स.नं.५५ पैकी मधील (आरक्षण क्र.२५) क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जमीन विकसित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२६८** **(अ)** मा.अध्यक्ष महोदय, यांनी मौजे शिर्डी येथील क्रिडांगणासाठी आरक्षित असलेली जमीन विकसित करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच श्री साईसमर्थ कला-क्रिडा-सांस्कृतिक मंडळ, शिर्डी यांनी दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे पत्रान्वये शिर्डी येथे बहुउद्देशीय कला-क्रिडा संकुल उभारणेबाबत विनंती केलेली आहे. अशा प्रकारचे कला-क्रिडा संकुलाचे स्वरुप कसे असावे, त्याचा वापर व देखभाल कशाप्रकारे करता येईल याबाबत त्यांनी संदर्भीय पत्रात सविस्तर तपशील कळविलेला आहे. या पत्राचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे :

**नियोजित कला-क्रिडा संकुलाचे स्वरुप :**

०१. क्रिकेट,फुटबॉल, हॉकी तसेच लॉन टेनिस, बॅडमिंटन, बास्केट बॉल वगैरे क्रिडा प्रकारांचे राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय सामने आयोजित करता येईल अशा आकाराचे प्रशस्त क्रिडांगण व प्रेक्षकांची सुसज्ज बैठकव्यवस्था असावी.

०२.स्त्री व पुरुषांसाठी वेगवेगळी अद्यायवत व्यायामशाळा.

०३.खेळाडूंसाठी निवासव्यवस्था.

०४बंदिस्त व खुल्या स्वरुपाचे नाटय संकुल.

**नियोजित कला-क्रिडा संकुलाचा वापर :**

०१. जिल्हा पातळी ते राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरचे क्रिडा सामने आयोजित करता येतील.

०२. उत्सवातील व इतर वेळी करमणुकीच्या खुल्या व भव्य कार्यक्रमाचे आयोजन करता येईल.

०३. शिर्डी येथे प्रचंड प्रमाणावर भक्तांची गर्दी होते आणि संस्थानची उपलब्ध निवासव्यवस्था अपुरी पडते त्यावेळेस या क्रिडा संकुलाचा वापर साईभक्तांसाठी निवासव्यवस्था करता येईल.

०४. शिर्डी हे अनेकांचे श्रध्दास्थान आणि आकर्षण केंद्र आहे, त्यामुळे शिर्डी येथे विविध संस्था / संघटना कार्यक्रम आयोजित करण्यास उत्सुक असतात, मात्र जागेअभावी हे शक्य होत नाही. अशा प्रकारची क्रिडा संकुलाची उभारणी झाली तर राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरचे सामाजिक, शैक्षणिक मेळावे, अधिवेशने, मोठे विवाह सोहळे इत्यादी कार्यक्रम आयोजित करता येतील.

**नियोजित कला-क्रिडा संकुल उभारणी व देखभाल खर्चाची परिपुर्ती :**

०१. क्रिडा सामन्यांच्या आयोजनातून जाहिरातदार, पुरस्कर्त्यांकडून तसेच तिकीट विक्रीतून मोठा निधी उपलब्ध होऊ शकेल.

०२.	क्रिडा सामन्यांशिवाय आयोजित होणाऱ्या इतर अन्य कार्यक्रमांच्या आयोजकांकडून संकुल वापर आकार, स्वछता व देखभाल आकार मिळू शकेल.

०३.	क्रिडा सामने व इतर कार्यक्रमामुळे भाविकांच्या संख्येत निश्चित मोठया प्रमाणावर वाढ होईल व परिणामी संस्थानचे देणगी व इतर उपक्रमाचे उत्पन्न वाढण्यास मदत होईल.

उपरोक्त तपशील विचारात घेऊन शिर्डी येथे बहुउद्देशीय कला-क्रिडा संकुल उभारणेबाबत मा.व्यवस्थापन समितीने हा प्रकल्प हाती घ्यावा, अशी विनंती केलेली आहे.

तसेच क्रिडांगणासाठी आरक्षित असणारे सर्व्हे नंबर ५५ पैकी मधील क्षेत्र ०३ हेक्टर ३३ आर म्हणजेच जवळजवळ ८ एकर असून बऱ्याच मोठया प्रमाणात आहे. या क्षेत्रामध्ये विविध क्रिडा प्रकारांसाठी क्रिडांगणे व इतर अनुषंगिक सेवा-सुविधा निर्माण केल्यानंतर, उर्वरित क्षेत्राचा वापर गर्दीच्या वेळेस व आवश्यकतेनुसार वाहनतळ म्हणून ही करता येईल. हे क्षेत्र शिर्डी-पिंपळवाडी रस्त्यालगत असल्याने व या रस्त्यालगतच बहुतांशी मध्यम-उच्चस्तरीय हॉटेल्स आदि असल्याने या वाहनतळाचा उपयोग मोठया प्रमाणावर होऊ शकेल.

**(ब)**	शिर्डी विकास योजनेमध्ये मौजे शिर्डी गांवातील आरक्षण क्रमांक २५ मध्ये, सर्व्हे नंबर ५५ पैकी (सिटी सर्व्हे नंबर ८५९ ते ८६५) ०३ हेक्टर ३३ आर हे क्षेत्र क्रिडांगणासाठी आरक्षित केलेले आहे. विकास योजनेत आरक्षण क्रमांक २५ - क्रिडांगणाची विकसन यंत्रणा शिर्डी नगरपंचायत, शिर्डी अशी दर्शविण्यात आलेली आहे. उपरोक्त बहुउद्देशीय कला-क्रिडा संकुलासाठी सदरची आरक्षित क्रिडांगणाची जागा संस्थानने विकसित करणे उचित होईल. याकामी विकसन यंत्रणा म्हणून शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे ऐवजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करणेबाबत नगरपंचायतीला विनंती करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.	(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२२	मंदिर परिसरातील समकालीन साईभक्तांच्या नावाचा ग्रेनाईटचे बोर्ड देणगी बाबत.**

**निर्णय क्र.२६९.** सोलापुर येथील साईभक्त श्री आसिफ मेघजी यांनी यापूर्वी श्रद्धा सबुरी नावाचे ग्रेनाईट (प्लेटवर कोरीव सोनेरी अक्षरातील) बोर्ड देणगी दिलेले आहेत. मंदिर परिसरात बाबांचे समकालीन भक्तांच्या चार समाध्या आहेत. सदर समाध्यांवर समकालीन साईभक्तांच्या नावाचे साधे बोर्ड लावण्यात आलेले आहे. या समाध्यांसाठी नवीन ग्रेनाईटचे(ग्रेनाईट प्लेटवर सोनेरी कोरीव अक्षरात) बोर्ड देणगी देणे बाबत श्री आसिफ मेघजी यांनी कळविलेले आहे त्याचा तपशिल खालिल प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| 01 | साईभक्त अब्दुलबाबा समाधी<br>सन-१९५४<br>SAI BHAKTA ABDULBABA SAMADHI<br>1954 |
| 02 | श्री भाऊ महाराज कुंभार समाधी<br>सन-१९३८<br>SHRI BHAU MAHARAJ KUMBHAR SAMADHI<br>1938 |
| 03 | श्री नानावली समाधी<br>सन-१९१८<br>SHRI NANAVALI SAMADHI<br>1918 |
| 04 | श्री तात्या पाटील कोते समाधी<br>सन-१९४५<br>SHRI TATYA PATIL KOTE SAMADHI<br>1945 |

तरी वरिल प्रमाणे चारही समाध्यांचे ग्रेनाईटचे १५x९ मापाचे देणगी बोर्ड घेण्यास व चारही समाध्यांवर बसविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला.	(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२३	पंढरपूर येथे भक्तांचे सोयीसाठी धर्मशाळा उभारणेसाठी जागा खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२७०.** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १९ ऑगष्ट, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ५४६ खालीलप्रमाणे झालेला आहे :

".. .. तरी श्री क्षेत्र पंढरपूर, श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर, श्री क्षेत्र आळंदी व श्री क्षेत्र ओंकारेश्वर (मध्यप्रदेश), वणी इत्यादी ठिकाणी जागा उपलब्ध करवून, संस्थानमार्फत धर्मशाळा व श्री साईबाबा मंदिर बांधणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. "

श्री. दिलीप महादेव कोकाटे, राहणार पंढरपूर यांनी दिनांक ०३ मे, २००६ रोजी गट नंबर १८ मधील जागा विकत घेणेबाबत प्रस्ताव दिलेला आहे. त्यात त्यांनी त्यांची जमीन गुंठेवारीत बिनशेती झालेली आहे. तद्नुषंगाने मा.मुख्याधिकारी, नगर परिषद, पंढरपूर यांना माहिती कळविणेबाबत विनंती करण्यात आलेली होती.

मा.मुख्याधिकारी, नगर परिषद, पंढरपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक पंनप/नअ/११७१/०६, दिनांक ०७ ऑक्टोबर, २००६ ने गट नंबर १८ मध्ये गुंठेवारीमध्ये बिनशेती झालेल्या जमिनीची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.नं. | सर्व्हे नंबर | नियमत भूखंडाचे क्षेत्र | जमीन मालकांचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | १८/१ड/१ | १४९५ चौमी | कांचन दिलीप कोकाटे पुर्व बाजूस ०-२० आर |
| ०२ | १८/१ड/३ | ०८८० चौमी | प्रतिभा उमेश शिंदे ०-२० आर |
| ०३ | १८/१ड/४ | १२१० चौमी | दिलीप महादेव कोकाटे पश्चिम बाजूस ०-२१ आर |
| ०४ | १८/१ड/५ | ११९४ चौमी | शिवाजी साहेबराव गमे ०-१० आर |
| ०५ | १८/१इ/१ | ११४० चौमी | सौ.सुरेखा संजय कोकाटे पुर्व बाजूस ०-२० आर |
| ०६ | १८/१इ/२ | १३५६ चौमी | दिलीप महादेव कोकाटे पश्चिम बाजूस ०-२० आर |
| ०७ | १८/१इ/३ | १५३८ चौमी | महादेव रामचंद्र कोकाटे व उत्तम कोकाटे ०-२१ आर |
| ०८ | १८/१इ/४ | १७१५ चौमी | विजय उमेश दिशे पुर्व उत्तर कोपरा ०-२० आर |

मा. मुख्याधिकारी, पंढरपूर नगरपरिषद यांनी कळविल्याप्रमाणे ७/१२ चे उतारे संस्थानकडे आहेत.

त्यानुसार, वार रविवार दिनांक ०४ मार्च, २००७ रोजी मा.कार्यकारी अधिकारी, यांचे आदेशानुसार शाखा अभियंता, बांधकाम विभाग यांना पाठविण्यात आले होते. जागेच्या बाबतीत माहिती खालीलप्रमाणे आहे :

१. सदर जमीन पंढरपूर ते सांगोला या रस्त्यावर आहे.
२. श्री विठ्ठल मंदिरापासूनचे अंदाजे अंतर ०१ किलोमीटर आहे.
३. रेल्वे स्टेशनपासूनचे अंदाजे अंतर ०१ किलोमीटर आहे.
४. बसस्थानकापासूनचे अंदाजे अंतर ०१ किलोमीटर आहे.
५. पाण्याची व सांडपाण्याची व्यवस्था पंढरपूर नगरपरिषद, पंढरपूर यांची आहे.
६. वीजेची सुविधा आहे.
७. सदर जागेजवळच इतर काही राज्यांचे तसेच देवस्थानांचे भक्तनिवासस्थाने बांधण्यात आलेली आहेत अथवा जागा खरेदी करण्यात आलेल्य आहेत.

उपरोक्त जागा भक्तांच्या सोयी-सुविधेकरीता धर्मशाळा उभारणेकामी योग्य आहे. तरी याकामी मा.व्यवस्थापन समिती सदस्य मा. श्री. पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री. सुरेशराव गोरक्षनाथ वाबळे यांनी उपरोक्त विषयांकित जागेची पहाणी करुन, जागा खरेदीबाबत जमीनमालकांशी चर्चा-तथा-वाटाघाटी करुन जागा खरेदीबाबत निर्णय घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, पंढरपूर येथे भक्तांचे सोयीसाठी धर्मशाळा उभारणेकामी मा.विश्वस्त श्री.पांडुरंग गमाजी अभंग व श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी दिनांक ११.४.२००७ रोजी पंढरपूर येथे समक्ष जाऊन जागेची पहाणी करुन अहवाल सादर करावा व त्यानंतर याबाबत अंतिम निर्णय घेण्यात यावा,असें ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२४** **स.क्र.१६४ ले-आऊटमधील दक्षिणोत्तर रस्ता श्रीसाईबाबा संस्थानमार्फत विकसीत करणेबाबत.**

**निर्णय क्र.२७१.** सर्व्हे क्रमांक १६४ मधील दक्षिणोत्तर रस्ता हा शिर्डी नगरपंचायत हद्दीतील श्री.किशोर भाऊसाहेब गोंदकर यांचे क्षेत्रामध्ये असून तो विकसीत करणेबाबत त्यांनी पत्रान्वये संस्थानला विनंती केली आहे. सदरहू क्षेत्रामध्ये ले आऊटमधील ९.०० मी रुंद रस्ता आहे. परंतू श्री गोंदकर यांनी फक्त ६.० मी. रुंद रस्ता विकसीत करणेबाबत तसेच क्षेत्रालगत असलेल्या नाल्यावर पुल टाकणेबाबत कळविले आहे.

सदरचा रस्ता विकसीत करणेबाबत शिर्डी नगरपंचायत यांचा अभिप्राय मागविण्यात आला असून त्यांनी सदर रस्ता संस्थानमार्फत विकसीत करणेसाठी नगरपंचायतीची हरकत नसलेबाबत कळविले आहे. तसेच श्री रमेश गोंदकर, नगरसेवक, शिर्डी नगरपंचायत यांनी मा. अध्यक्ष सोा. साईबाबा संस्थान यांना रस्ता विकसीत करणेबाबत विनंती केली असून रस्ता विकसीत करणेसाठी प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे बैठकीत विचारार्थ सादर करणेबाबत अध्यक्ष महोदय यांनी सूचना केली असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, सर्व्हे क्रमांक १६४ मधील दक्षिणोत्तर रस्त्याची मा.अध्यक्ष, उपाध्यक्ष व विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग व सुरेश गोरक्षनाथ वाबळे यांनी समक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२५** **नविन प्रसादालय प्रकल्पाचे आर्किटेक्ट मे.शक्ती परमार ॲण्ड असोशिएटस मुंबई यांचे सर्व्हिस टॅक्स मागणीबाबत.**

**निर्णय क्र.२७२** मा.व्यवस्थापन समितीचे शिर्डी येथे झालेल्या दिनांक ०९.०७.२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२५३ अन्वये संस्थानचे निमगांव-कोऱ्हाळे गट नं.८०,८५ मधिल जागेत नविन प्रसादालय इमारत बांधकामासाठी आर्किटेक्ट म्हणून सेवा पुरविणेकामी मे.शक्ती परमार ॲण्ड असो., मुंबई यांचेशी झालेल्या चर्चेनुसार त्यांना सदरहू प्रकल्पासाठी २% फी व खर्चाची प्रतिपुर्ती देण्यात यावी, असे ठरले आहे.तथापी १२.२४% सर्व्हिस टॅक्ससह रक्कम आर्किटेक्ट यांना अदा करणे बाबत सदर निर्णयात ठरलेले नाही.

आर्किटेक्ट मे.शक्ती परमार यांनी आतापर्यंत सादर केलेल्या सर्व बिलांमध्ये १२.२४% सर्व्हिस टॅक्ससह मागणी केलेली आहे. परंतू आजअखेर त्यांना सर्व्हीस टॅक्स अदा करण्यात आलेला नाही. आता आर्किटेक्ट मे.शक्ती परमार यांनी त्यांचे दि. १२/१२/२००६ रोजीचे पत्रान्वये १२.२४% सर्व्हिस टॅक्स मिळणेस विनंती केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव दि. ०६/०१/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानमध्ये यापूर्वी अशा प्रकारचा सर्व्हिस टॅक्स आर्किटेक्ट यांना देण्यात आला किंवा कसे याबाबत सविस्तर माहिती घेऊन प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे सादर करण्यात यावा असे ठरले. याबाबत खालील प्रमाणे माहिती सादर करण्यात येत आहे.

सध्या संस्थानचे इतर बांधकाम प्रकल्पासाठी नेमण्यात आलेले आर्किटेक्टस् यांना देय होत असलेल्या रकमेवर १२.२४% सर्व्हिस टॅक्स अदा करण्यात येतो. केंद्र शासनाचे कायद्यानुसार बांधकाम प्रकल्पासाठी सेवा पुरविणारे आर्किटेक्ट यांना प्रचलित दरानुसार (सध्या १२.२४%) सर्व्हिस टॅक्स मालकाकडून वसूल करुन शासनाला भरणे आवश्यक आहे.

तसेच संस्थानचे मुख्य लेखाधिकारी यांनी त्यांचे दि. ०५/०१/२००७ चे अभिप्रायान्वये कळविले आहे की, संस्थान नियुक्त करसल्लागार श्री ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांचेशी याबाबत दूरध्वनीवरुन चर्चा केल्यानुसार सेवाकर १२.२४% हा शासकीय नियमानुसार असल्याने तो बिलामध्ये अंर्तभूत करुन देण्यास हरकत नाही, तथापी संस्थानने अदा केलेला सेवाकर आर्किटेक्ट यांनी शासनाकडे भरल्याच्या पोहोच संस्थानला सादर कराव्यात.

संस्थानचे नियोजीत प्रसादालय इमारत बांधकाम करणे कामाची मंजूर निविदा रक्कम रुपये १७,७७,९६,६४७.०० मात्र इतकी आहे. सदर रकमेच्या २% म्हणजेच रु.३५,५५,९३३.०० मात्र इतकी फि आर्किटेक्ट शक्ती परमार यांना देय होते. देय फि च्या १२.२४% सर्व्हीस टॅक्स रक्कम रु. ४,३५,२४६.०० मात्र इतका सर्व्हिस टॅक्स आर्किटेक्ट यांना देय होतो. तथापी भविष्यात बांधकामावर प्रत्यक्ष होणाऱ्या खर्चानुसार सदर रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे.

तरी आर्किटेक्ट मे.शक्ती परमार ॲण्ड असो.मुंबई यांना आजपर्यंत अदा केलेल्या फीवर तसेच या पुढे अदा करावयाच्या संपूर्ण फी वर वेळोवेळी प्रचलीत असलेल्या दरानुसार सर्व्हिस टॅक्सची रक्कम अदा करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो अमान्य करण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.२६** **सन २००७-२००८ प्रसादालय व कँटीन माल खरेदीकामी आलेल्या निविदा उघडणे व नमुने निवडणे बाबत.**

**निर्णय क्र.२७३.** सन २००७-०८ मध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी आवश्यक किराणा माल वार्षिक दराने खरेदीकामी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १७.०२.२००७ चे सभेतील निर्णय क्र.१५० अन्वये तत्वतः मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.२५-२६.०२.२००७ चे वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.२६.०२.२००७ ते दि.०७.०३.२००७ अखेर निविदा विक्री करणेत आलेली असून दि.०८.०३.२००६ अशी निविदा स्वीकारणेची अंतिम मुदत ठेवणेत आलेली आहे.

वरीलप्रमाणे निविदा २ लिफाफा पद्धतीने मागविणेत आलेल्या असून क्र.१ चे लिफाफ्यात मुळ निविदा व क्र.२ चे लिफाफ्यात बयाणा रकमेचा डी.डी.अथवा रोखीची भरणा पावती व इतर कागदपत्रांची तसेच स्वतंत्र पॅकींगमध्ये नमुन्यांची मागणी केलेली आहे. तरी दोन्ही निविदांचे लिफाफे आजचे सभेत समक्ष उघडणेत येवून मालाचे नमुने निवडणेत यावेत. निवडलेल्या नमुन्याधारकांना पुढील सभेत चर्चा तथा वाटाघाटीसाठी आमंत्रित करणेत येईल. दरम्यानचे काळात निविदाधारकांच्या बयाणा रक्कम तसेच कागदपत्रांची तपासणी करणेत येईल. मागणीनुसार बयाणा रक्कम तसेच कागदपत्रे नसल्यास त्यांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आमंत्रित करण्यात येणार नाही असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यानुसार प्राप्त झालेल्या खालील निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आल्या.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व गांव |
|---|---|
| ०१ | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव |
| ०२. | श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव ता.राहाता |
| ०३. | ऐश्वर्या इंडस्ट्रीज, कुंटलूर, हैद्राबाद |

| | |
|---|---|
| ०४. | कोठारी ब्रदर्स, कोपरगांव |
| ०५. | रितुजा ॲग्रो प्रॉडक्ट प्रोसेसिंग इंडस्ट्रीज, कोल्हापूर |
| ०६. | श्री गणेश ट्रेडर्स, नाशिकरोड |
| ०७. | सौरभ एंटरप्राईजेस, औरंगाबाद |
| ०८. | तिलोकचंद करमचंद ॲण्ड सन्स, उस्मानाबाद |
| ०९. | विजया मुद्रण, नागपूर |
| १०. | वनक्का ॲग्रो फुडस, टुनी, आंध्रप्रदेश |
| ११. | संतोष ट्रेडींग कंपनी, जळगांव |
| १२. | जयंत ट्रेडींग कंपनी, जळगांव |
| १३. | राहुल एंटरप्राईजेस, नाशिक |
| १४. | सिद्धार्थ कंटेनर्स, श्रीरामपूर |
| १५. | धरम एंटरप्राईजेस, नाशिक |
| १६. | रामनाथ जगन्नाथ आणि कंपनी, नाशिकरोड |
| १७. | हाय टेक वेंडींग, नाशिक |
| १८. | नारायण उदेराम वैश्य, नाशिक |
| १९. | संदीप ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| २०. | श्री सप्तश्रृंगी सप्लायर्स, नाशिक |
| २१. | जय भगवती ट्रेडींग कंपनी, नाशिक |
| २२. | कुणाल टी सेंटर, शिरडी |
| २३. | विक्रांत एजन्सी, अहमदनगर |
| २४. | गंगाजी इंडस्ट्रीज, धुळे |
| २५. | भाग्यलक्ष्मी कॅशीव इंडस्ट्रीज, वेटापालेम, आंध्रप्रदेश |
| २६. | जयहिंद किराणा स्टोअर्स, नाशिकरोड |
| २७. | पुखराज रामनिवास, जळगांव |
| २८. | हिरालाल चुनिलाल भराडीया ॲण्ड कंपनी, नांदेड |
| २९. | गोदावरी खोरे सहकारी दूध उत्पादक संघ लिमीटेड, सहजानंदनगर |
| ३०. | संगमनेर तालुका सह.दूध उत्पा. व प्रकिया संघ मर्या.,अमृतनगर ता. संगमनेर |
| ३१. | सिताराम ट्रेडींग कंपनी, जळगांव |
| ३२. | कैलाश ट्रेडींग कंपनी, नांदेड |
| ३३. | एस.के.ऑईल इंडस्ट्रीज, जळगाव |
| ३४. | महावीर एजन्सी, दैंडाईचा, धुळे |
| ३५. | डि.जे.ॲण्ड सन्स, पुणे |
| ३६. | अप्लाईड प्लॅस्टीक, मुंबई |
| ३७. | प्रितम राजकुमार शहा, पुणे |
| ३८. | अलंकार डिस्ट्रीब्युटर्स, संगमनेर |
| ३९. | महाविर एक्सहॅक्शन प्रा. लिमीटेड, अहमदनगर |
| ४०. | सरस प्लॅस्टीक्स, अहमदनगर |
| ४१. | किर्ती दाळ मिल्स लिमीटेड, लातुर |
| ४२. | दगडुराम पिरचंद एजन्सीज, श्रीरामपूर |
| ४३. | पराग मिल्क ॲण्ड मिल्क प्रॉडक्टस प्रा.लि.,अवसरी फाटा पो. मंचर |
| ४४. | अग्रवाल एजन्सीज, साकुरी |
| ४५. | कोठारी एजन्सीज, श्रीरामपूर |
| ४६. | श्रीजी कार्पोरेशन, जळगांव |
| ४७. | जय ट्रेडर्स, श्रीरामपूर |
| ४८. | राजेश फुडस प्रॉडक्टस, अहमदनगर |
| ४९. | नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर |
| ५०. | नरेंद्रकुमार संतोषकुमार, देवळाली प्रवरा |
| ५१. | संतोष ट्रेडर्स, देवळाली प्रवरा |
| ५२. | संगमनेर तालुका ॲग्रिकल्चर प्रोडयुस प्रोसेसिंग मार्केटींग को-ऑप सोसा. लि., संगमनेर |
| ५३. | विजय डेअरी, जळगांव |
| ५४. | एस.आर.थोरात मिल्क प्रॉडक्टस प्रा. लि., संगमनेर |
| ५५. | श्री गणेश ड्राय फ्रुटस, पुणे |
| ५६. | मार्सन (इंडीया) इंडस्ट्रीज, मुंबई |
| ५७. | सारो टेक्स केम, कल्याण |
| ५८. | डिलाईट फुडस प्रा.लिमीटेड, नवी मुंबई |
| ५९. | महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटीव्ह कन्झुमर्स फेडरेशन लिमीटेड, मुंबई |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी निविदेसोबत सादर केलेले प्रसादालय व कॅन्टीन मालाचे नमुने मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग,श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे, डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर,श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर व सौ.सुमित्रा कैलास कोते यांचे उपसमितीने निवडावेत व निवडण्यात आलेल्या नमुनाधारक निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे बोलविण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक खरेदी विभाग)

**विषय नं.२७** **पुस्तके/फोटोचे छपाई व श्री साई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी तयार करुन घेणे बाबत.**

**निर्णय क्र.२७४.** पुस्तके/फोटो छपाई व व्ही.सी.डी यांचा साठा भांडार विभागात सध्या स्थितीत अल्प प्रमाणात साधारणतः २ ते ७ महिने पुरेल एवढाच शिल्लक आहे. तसेच मा. व्यवस्थापन समितीचे दि.१९.०८.२००६ चे सभेतील विषय नं.२७ निर्णय ७०५ नुसार आदेश क्र.२९३९ दि.०६.११.२००६ अन्वये पारित करण्यात आलेल्या आदेशानुसार प्रकाशने विभागाअंतर्गत बुकस्टॉलवर पुस्तके/फोटोंचे कमीत कमी २५ प्रती व त्यापेक्षा जास्त प्रती खरेदीदारास यात साईभक्त, साईमंदिरे, स्थानिक दुकानदार यांना विक्री किंमतीवर १५% सवलतीचे दराने विक्री कार्यवाही चालू असल्याने त्यामुळे विक्रीचा खप वाढला असल्याने खालीलपुस्तके/फोटो छपाई करून घेणे तसेच त्यासोबत श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीसीडी चा आजमितीस उपलब्ध साठाही सहा ते सात महिने पुरेल एवढाच शिल्लक असल्याने श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्हीसीडी (२ सीडीचा १संच) निर्मिती करणे आवश्यक असल्याने तत्संबंधीत तपशिल खाली "अ", "ब" व "क" प्रमाणे-

**अ) <u>पुस्तके छपाई -</u>**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साई सच्चरित(पोथी ) | मराठी | १६.०६.२००४ | ५५.०० | ६०,००० | ६०.०० | ३६,००,०००/- |
| ०२ | साईसत्‌चरित्र | इंग्रजी | ०६.०६.२००२ | १५.२० | १,२५,००० | २५.०० | ३१,२५,०००/- |
| ०३ | साईसत्‌चरित्र | गुजराथी | १२.०९.२००६ | ३०.९० | ६०,००० | ३५.०० | २१,००,०००/- |
| ०४ | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती | मराठी | २५.०१.२००५ | १.६८ | १,००,००० | ०२.०० | २,००,०००/- |
| ०५ | श्री साई स्तवन मंजरी व श्री साई सुमनांजली | मराठी | ०६.०२.२००२ | १.५३ | १,००,००० | ०२.०० | २,००,०००/- |
| ०६ | श्री साई स्तवन मंजरी | गुजराथी | २८.०६.२००४ | १.८४ | १०,००० | ०१.९० | १९,०००/- |
| ०७ | अर्वाचीन भक्त व संत लीलामृत यातील श्री साईबाबांचे ४ था अध्याय | मराठी | १४.०१.२००३ | १.५६ | ५,००० | ०१.९० | ९,५००/- |
| ०८ | दैनंदिन साईबोध | मराठी | १६.०९.२००४ | ५८.२५ | ५,००० | ६०.०० | ३,००,०००/- |
| ०९ | श्री सद्‌गुरु साईनाथ सगुणोपासना मराठी आरतीचा हिंदी अनुवाद | हिंदी | १२.०९.२००२ | ६.४५ | २५,००० | ७.०० | १,७५,०००/- |
| १० | श्री साई सच्चरित्र सार (हिंदी दोहावली) | हिंदी | ०९.११.२००५ | ६२.०० | ५,००० | ७०.०० | ३,५०,०००/- |
| ११ | श्री साईनाथ भजनमाला | हिंदी | ०३.०८.१९९९ | १५.०० | ५००० | १५.०० | ७५,०००/- |
| १२ | श्री साईंचे सत्य चरित्र | मराठी | ०५.०२.२००५ | ६०.०० | १०००० | ६०.०० | ६,००,०००/- |
| | | | | | | **एकूण रु.** | **१०७,५३,५००/-** |

**ब) <u>फोटो छपाई-</u>**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | दगडावर बसलेले बाबा फोटो काळा/पांढरा | १४"x २०" | १२.०९.२००२ | ०१.९९ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०२ | भिंतीलगत उभे असलेले बाबा काळा/पांढरा | १४"x २०" | २५.०४.२००५ | २.०३ | १,००,००० | २.०० | २,००,०००/- |
| ०३ | श्री साईबाबा मुर्ती फोटो चार रंगात | १४"x २०" | ०६.०२.२००२ | १.९९ | २,००,००० | २.२५ | ४,५०,०००/- |
| ०४ | द्वारकामाईत बसलेले का. हा. लावलेले बाबा चार रंगात | १४"x २०" | १२.०९.२००२ | १.९९ | २,००,००० | २.२५ | ४,५०,०००/- |
| | | | | | | **एकूण रूपये** | **१३,००,०००** |

**क) श्री साईबाबा मंदिरातील आरती मंत्रोच्चार व्ही.सी.डी तयार करणेबाबत-**

| अ.नं | निर्मिती तपशिल | मागिल निर्मिती केल्याची तारीख | मागिल निर्मिती दर | निर्मिती संख्या | निर्मिती दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार व्ही.सी.डी.(२ सीडीचा १ संच) | ०४.१०.२००६ | २२.७८ | ५०,००० संच | २५.०० | १२,५०,०००/- |
| | | | | | **एकूण रु.** | **१२,५०,०००/-** |

उपरोक्त "अ " "ब" व "क" नुसार नमुद केलेप्रमाणेः-

१) "अ " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण १२ पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये - **१०७,५३,५००/-**

२) "ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ४ प्रकारचे फोटो छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये - १३,००,०००/-

३) "क " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण १ व्ही.सी.डी. निर्मितीकामी अपेक्षित खर्च रूपये - १२,५०,०००/-

एकूण रूपये - १३३,०३,५००/-

वरील तपशिलाप्रमाणे "अ ", "ब" व "क" मिळूण अंदाजे रूपये - १३३,०३,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी, तेहतीस लाख, तीन हजार, पाचशे) मात्र खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे खर्च हा पुस्तके/फोटो छपाईसाठी सन २००६-२००७ मंजूर बजेट तरतूद रूपये-१५०,००,०००/- मधून व ऑडिओ कॅसेट/सी.डी. निर्मितीकामी मंजूर बजेट तरतूद रूपये-३०,००,०००/- मधून करता येईल.

तरी वरील "अ ","ब" यात दर्शविलेप्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई ही मा.व्यवस्थापन समितीचे समंत निर्णयानुसार निवडक प्रेसधारकांकडून पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस व "क" प्रमाणे व्ही.सी.डी. निर्मितीसाठी मुंबई/पुणे येथील नामांकित सी.डी. निर्मात्यांकडून कोटेशन्स मागविणेस तसेच याकामी अंदाजे एकूण १३३,०३,५००/- (अक्षरी रुपये एक कोटी, तेहतीस लाख, तीन हजार, पाचशे) मात्रचे अपेक्षित खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२८ श्रीसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ कॅसेट/सी.डी व शिर्डी दर्शन व्ही.सी.डी तयार करणेकामाचे कोटेशन उघडून निर्णय घेणे बाबत.**

**निर्णय क्र.२७५.** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी. द्वारा खालील दर्शविल्या तपशिलाप्रमाणे "श्रींसाई मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडीओ कॅसेट सी.डी व शिर्डी दर्शन व्हीसीडीची निर्मिती करणेस व तत्संबंधीत निर्मितीसाठी रुपये ८,४५,०००/- मात्रचे अपेक्षित खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.११.२००६ रोजीचे सभेतील विषय नं.५२ निर्णय क्र.९२५ नुसार मान्यता देण्यात आली आहे.

| अ.नं | निर्मिती तपशिल | निर्मिती संख्या | निर्मिती दर | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा आरती ऑडिओ कॅसेट (४ कॅसेटचा संच) | ५,००० संच | ४४.०० | २,२०,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा मंदिरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सी.डी. (२ सी.डीचा संच) | ५,००० संच | २५.०० | १,२५,०००/- |
| ०३ | शिर्डी दर्शन व्हीसीडी | २५,००० नग | २०.०० | ५,००,०००/- |
| | | | **एकूण रु.** | **८,४५,०००/-** |

उपरोक्त प्रमाणे ऑडीओ कॅसेट/सी.डी. व शिर्डी दर्शन व्हीसीडी निर्मितीसाठी मुंबई/पुणे येथील खालील नामांकित सी.डी.निर्मात्यांना जा.न.एसएसएस/वशी/प्रकाशने/२८३८/२००७दि.२४.०२.२००७ अन्वये कोटेशन्स पाठविण्यात आली आहे. सदरचे कोटेशन्स भरून ते दि.१५.०३.२००७ अखेर दाखल करण्याविषयी कळविण्यात आले आहे.

| Sr.No | Name | Sr.No | Name |
|---|---|---|---|
| 01 | A.C.M.Enterprises, Mumbai. | 02 | MIM PRODUCTIONS,Pune |
| 03 | Sony Music Entertainment (India) Pvt.Ltd.,Mumbai | 04 | Sagarika Acoustronics PVT.LTD Navi Mumbai |
| 05 | VANDANA ELECTRONICS, Mumbai | 06 | KRCD INDIA PVT LTD,MUMBAI- |
| 07 | AFTAB ELECTRONICS PVT LTD, Mumbai | 08 | MELEI MEDIA,Mumbai |
| 09 | Datacops Technologies,Pune. | 10 | Hariram Gobindram Pvt.Ltd.,Mumbai |
| 11 | Jet Speed Audio Pvt. Ltdm, Mumbai. | 12 | Mudraa Tapes,& Record,Mumbai. |
| 13 | Sanket Electroplast ,Mumbai | 14 | Chirag Enterpreses, Mumbai |

वरीलप्रमाणे सी.डी. निर्मात्यांपैकी मुदतीत खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नाव |
|---|---|
| ०१ | MELEI MEDIA,Mumbai |
| ०२ | VANDANA ELECTRONICS,Mumbai |
| ०३ | Hariram Gobindram Pvt.Ltd.,Mumbai (Flora Electronics Pvt .Ltd.,Mumbai) |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे समक्ष उघडण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | कोटेशन सादरकर्त्याचे नाव | श्रीसाईबाबा आरती ऑडिओ कॅसेट (४ ॅ सेटचा संच) दर प्रती रुपये | श्रीसाईबाबा मंदीरातील आरत्या व मंत्रोच्चार ऑडिओ सीडी (२ सीडीचा संच) दर प्रती रुपये | शिर्डी दर्शन व्हीसीडी दर प्रती रुपये |
|---|---|---|---|---|
| | | मागणी-,5000 संच | मागणी-5,000 संच | मागणी 25,000 नग |
| ०१ | MELEI MEDIA,Mumbai | 43.68 | 22.78 | 15.18 |
| ०२ | VANDANA ELECTRONICS,Mumbai | 44.20 | 22.88 | 15.28 |
| ०३ | Hariram Gobindram Pvt.Ltd., Mumbai (Flora Electronics Pvt .Ltd., Mumbai) | 49.00 | 25.00 | 17.00 |

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त साईमंदिरातील आरत्या , मंत्रोच्चार ऑडिओ कॅसेट/ सीडी व शिर्डी दर्शन व्हीसीडी तयार करणेकामी MELEI MEDIA,Mumbai यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**विषय नं.२९ श्रीसमाधी मंदीरात नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये भिंतीवरील स्प्लिट टाईप ए.सी. बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.२७६** समाधी मंदिराचे नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये ०४ नग टॉवर ए.सी.यंत्रणा बसविणेत आलेली आहे. याबाबत मंदिर विभागाने त्याचे दि.२४-११-२००६ चे टिपणीअन्वये पुढीलप्रमाणे कळविले आहे.

समाधी मंदीरातील नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये आरतीचे व दर्शनाचे वेळी साईभक्तांना उष्णतेचा त्रास जाणवत असल्याने ०४ नग टॉवर टाईप ए.सी. पूर्वी बसविण्यात आलेले आहेत. परंतू वापर चालू असताना यामध्ये खालीलप्रकारच्या त्रूटी आढळून आलेल्या आहेत.

०१) मदिरामधील कॅरीबॅग, कागद, धुळीचे कण व इतर कचरा या मशिनमध्ये अडकून अनेक वेळा यंत्रणा चोकअप होते व त्यामुळे यंत्रणा पुर्णपणे बंद पडते असे निर्दशनास आले आहे.

०२) वातानुकुलीत यंत्रणा जमिनीवर ठेवलेली असल्याने साईभक्तांना सदर ए.सी.मशीन हे हुंडीचा (दक्षिणापेटी) प्रकार वाटल्याने त्यामध्ये नाणी टाकल्याचे निदर्शनास आलेले आहे.

०३) सदर यंत्रणा जमिनीवर ठेवल्यामुळे जागेची अडचण होते.

याकरीता सदरच्या यंत्रणे ऐवजी भिंतीवर लावावयाचे ए.सी.बसविल्यास वरील अडचणी दूर होतील असे वाटते. व्होल्टास कंपनी लि., मुंबई येथील श्री.अजय देशमुख (सेल्स मॅनेजर) यांचे प्रतिनिधीने समक्ष पाहणी करुन याबाबतचा अहवाल व इस्टिमेट पाठविलेलेले आहे.

वरीलप्रमाणे मंदिर विभागाचे टिपणीतील कळविलेले सर्व दोष या यंत्रणेमध्ये येत आहे. सदर टिपणीतील क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे या ए.सी चे टॉवर युनिट हे भक्तांना दक्षिणा हुंडी वाटल्याने त्यांनी यात नोटा व नाणी टाकल्याने, अनेकवेळा सदर यंत्रणेची सर्व्हिसिंग करतांना नोटांमुळे व नाण्यांमुळे ए.सी.च्या कॉईल व ब्लोअरमध्ये चोकप होऊन अडकून फ्लो सिस्टीम बंद पडलेली आढळते. तसेच टॉवर युनिट जमिनीवर असल्याने फुलांच्या पाकळया, फुले, कागद अडकून बंद सिस्टिम पडते. तसेच रिमोट कंट्रोल शिवाय सदर यंत्रणा कार्यान्वित करणेसाठी ही यंत्रणा खर्चिक आहे. शिवाय या टॉवरटाईप ए.सीं.मुळे मंदिरातील जागाही अडकून पडते.

उपरोक्तप्रमाणे टॉवरटाईप ए.सी.यंत्रणेऐवजी मंदिराचे नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये भिंतीवर लावावयाचे ए.सी. बसविल्यास मे.व्होल्टास कंपनी लि., मुंबई या कंपनीचे अहवालानुसार भिंतीवरील ए.सी.ची भक्तांना अडचण होणार नाही. तसेच जागेचीही अडचण दूर होईल आणि वेळोवेळी करावी लागणारे मेन्टेनन्सची गरज पडणार नाही. सदर यंत्रणा ही विद्युत पुरवठा खंडीत होऊन पुर्ववत झाल्यावर रिमोटने चालू करण्याची गरज पडणार नाही. सबब व्होल्टास कंपनीचे अहवालानुसार उपरोक्तप्रमाणे यंत्रणेऐवजी सदर ठिकाणी प्रत्येकी २.५ टन क्षमतेचे याप्रमाणे ०६ नग स्प्लिट वॉल माऊंटेड ए.सी.बसविणे आवश्यक होईल. त्यामुळे भक्तांना होणारा त्रास कमी होईल व गर्दीचे वेळेस भक्तांना श्रीं चे दर्शन घेतेवेळी अतिरिक्त थंडावा जाणवेल तसेच येणा-या अडचणी दूर होतील. मंदिराचे गाभाऱ्यात भिंतीवरील नविन स्प्लिट ए.सी.बसविल्यानंतर त्याठिकाणी पूर्वी बसविलेले टॉवर टाईप ए.सी.युनिट हे तेथून काढून घेऊन इतरत्र गरजेप्रमाणे बसविण्यात येतील.

सदर २.५ टन प्रत्येकी क्षमतेच्या एकुण ०६ नग वॉल माऊंटेड ए.सी.साठी सोबतच्या व्होल्टास कंपनीचे अहवालातील कोटेशनप्रमाणे रुपये ३,२१,०००/- + १२.५ टक्के वॅट (रु. ४०,१२५ )+ इन्स्टालेशन चार्जेस रु. १२,०००.०० + पाइपिंग खर्च रु. रु.२४,३००.०० मिळून रु. ३,९७,४२५.०० तरी इतका अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्तप्रमाणे मंदिराचे नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये भिंतीवरील नविन स्प्लिट ए.सी.देणगी देणेसाठी एक साईभक्त श्री.गौड सी.एस.,मोईनाबाद, आंध्र प्रदेश हे इच्छुक असून या यंत्रणेसाठी लागणारा खर्च ते देणगी देणार आहेत.तरी साईभक्त श्री.गौड यांचेकडून मंदिराचे नंदी हॉल व गाभारा यामध्ये असलेल्या हॉलमध्ये लावण्यासाठी भिंतीवरील नविन स्प्लिट ए.सी. देणगी म्हणून स्विकारणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभाग प्रमुख/मंदिर विभागप्रमुख)

**विषय नं.३०** **नवीन प्रसादालयाकरीता स्टीम बॉयलर खरेदी बाबत.**

**निर्णय क्र.२७७.** नविन प्रसादालयासाठी मशिनरी व स्टेनलेस स्टील फर्निचर खरेदी करणे असल्याने पहाणीकामी दिनांक ३,४,५ जानेवारी,२००७ रोजी मा.विश्वस्त श्री.पांडुरंग गमाजी अभंग,श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे व श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव तसेच किचन कन्सलटंट प्रतिनिधी श्री.किरण मांजरेकर,प्रसादालय पर्यवेक्षक श्री.रामदास कोते, कनिष्ठ अभियंता,अमृत जगताप यांनी पुणे,कोल्हापुर व बेळगाव येथे वेगवेगळ्या मशिनरीचे उत्पादक यांचेशी समक्ष जाऊन चर्चा केली. त्या अनुषंगाने प्रसादालय बॉयलर खरेदी करणेकामी थरमॅक्स इंडिया प्रा.लि.,आकुर्डी,पुणे या बॉयलर उत्पादनात अग्रेसर असलेल्या कंपनीस त्यांचे प्रतिनिधी श्री.मनिष,चॅनेल मॅनेजर, श्री.मकरंद जोशी, हिट रिकव्हरी डिव्हीजन मॅनेजर, श्री.अशिष दाते, चॅनेल मॅनेजर यांचे समवेत सविस्तर चर्चा केली.

त्यानुसार थरमॅक्स कंपनी,पुणे यांचे प्रतिनिधींना व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चा करणेसाठी दिनांक ६.१.२००७ रोजी बोलविण्यात आले होते. त्यानुसार त्यांची व्यवस्थापन मंडळाच्या सभेत बॉयलर संदर्भात चर्चा झाली. त्यावेळेस त्यांनी बगॅस फायर बॉयलर व एल.पी.गॅस फायर बॉयलर यांचा तुलनात्मक तक्ता व होणारा फायदा यांचा तपशील दिला. प्रसादालयात सन १९९९ साली Rx-4 मॉडेलचा ४०० किलो प्रती तास स्टीम निर्मिती क्षमता असलेला गॅसवर चालणारा थरमॅक्स कंपनीचा बॉयलर व इतर लागणाऱ्या सलग्न ॲसेसरीसह रुपये ९,५४,७०८.५२ रकमेस खरेदी करण्यात आला होता. तेंव्हापासून आजपर्यंत सदर बॉयलर व्यवस्थित कार्यान्वीत असून थरमॅक्स कंपनीने नेमलेल्या अधिकृत सर्व्हिस डिलर मार्फत त्याची दर दोन महिन्यांनी पेड सर्व्हिसिंग करण्यात येते. सदर बॉयलरचा अनुभव चांगला आहे. संस्थानने नविन प्रसादालयासाठी नेमलेले किचन सल्लागार श्री.संजीव देशमुख यांनीही दिनांक २९.१२.२००६ च्या व दिनांक ५.२.२००७ च्या पत्रानुसार थ्ररमॅक्स कंपनीच्या एल.पी. गॅस फायर बॉयलर संदर्भात शिफारस केलेली आहे. तसेच एल.पी.गॅस फायर बॉयलर कसा फायद्याचा आहे याचा तुलनात्मक तक्ता दिलेला आहे. महत्वाचे म्हणजे इंधन खर्च कमी करण्यासाठी नविन प्रसादालयासाठी वाढीव क्षमतेची सोलर स्टीम कुकींग यंत्रणा कार्यान्वीत करणार असल्यामुळे कमी वेळ बॉयलर चालणार असून परिणामी इंधन खर्च कमी होणार आहे. बॉयलरसाठी बगॅस वापरुन इंधन खर्च कमी करणेऐवजी सोलर स्टीम वापरून इंधन खर्च कमी करणे फायद्याचे आहे. तसेच त्यामुळे पर्यावरणातील प्रदुषण कमी होण्यास मदत होईल. वाढीव क्षमतेचे नविन प्रसादालयासाठी NON-IBR एल.पी.गॅस फायर ८५० किलो प्रती तास स्टीम निर्मीती क्षमता असलेला थरमॅक्स कंपनीचा बॉयलर घ्यावा असे नम्र मत आहे.

बगॅस फायर बॉयलर कमीतकमी एक टन प्रती तास स्टीम निर्मिती क्षमतेचा असल्याने त्यास इंडियन बॉयलर कायद्यानुसार लागणारा आवश्यक तो स्टाफ उदा.बॉयलर अटेंडंट, फायरमन इत्यादी नियुक्त करावा लागेल. तसेच वर्षातून एकदा सदर बॉयलर, बॉयलर इन्सपेक्टर मार्फत तपासून तपासणी सर्टीफिकेट घ्यावे लागेल. त्याकरिता अंदाजे किमान दहा दिवस तरी बॉयलर बंद ठेवावा लागेल. इंधन म्हणून भुसा वेगवेगळ्या साखर कारखान्यामार्फत खरेदी करुन ट्रान्सपोर्ट मार्फत आणून बॉयलरसाठी आवश्यक तो साठा ठेवावा लागेल. बगॅस (भूसा) साठी स्वतंत्र डेपो करुन आवश्यक ती आग प्रतिबंधक उपाय योजना उभारावी लागेल.

सध्या प्रसाद भोजन बनविण्याची प्रक्रिया सकाळी ७.०० वाजता सुरू होऊन सर्व प्रसाद सकाळी १०.०० वाजेपर्यंत पुर्ण होतो. मात्र बगॅसवर चालणारा बॉयलर घेतल्यास बॉयलर पहाटे ४ वाजता सुरु करावा लागेल. जेणेकरुन सकाळी ७.०० वाजता लागणारा स्टीम प्रेशर तयार होईल. चिमणीतून निघणाऱ्या धुरामुळ प्रदुषण सुद्धा होणार आहे. या सर्व बाबींचा विचार होणे आवश्यक वाटते.

नविन प्रसादासाठी किचन इक्वीपमेंट खरेदी करण्यासाठी दिनांक ६.१.२००७ रोजीच्या व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेली असून या मंजूरीमध्ये बॉयलरचा समावेश आहे.

उपरोक्त टिपणीतील नमूद बाबींचा, तसेच प्रसादालय विभागाकडील स्टाफ यांचा अनुभव विचारात घेऊन बगॅसवर चालणाऱ्या बॉयलर ऐवजी गॅसवर चालणाऱ्या प्रती तास ८५० किलो स्टीम

निर्मिती क्षमतेचा थरमॅक्स कंपनीचा बॉयलर खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय)

**विषय नं.३१ पालखी सेवेकरी मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.२७८.** श्रींचे रथाची व पालखीची मिरवणूक गुरुवारी, स्थानिक उत्सव व तीन प्रमुख उत्सवाचे वेळी असते. प्रत्येक गुरुवारी समाधी मंदिर ते चावडी व परत समाधी मंदिर आणि उत्सवाचे वेळी गावातून मिरवणूक असते. मिरवणूकीमध्ये पालखी/रथ धरणारे ४ सेवेकरी, १ अब्दागिरीधारक, ०१ मृदुंगधारक, ०१ सनईवादक,, ०२ शिंगवादक,०२ ताशावादक, ०२ डफवादक, ०२ बत्तीधारक असे एकूण १५ सेवेकरी आहेत हे अनेक वर्षापासुन श्रींची सेवा करतात.

यापूर्वी त्यांना दरमहा रुपये २५/- प्रमाणे मानधन दिले जात होते. दिनांक ३०-३१/०१/१९९९ चे व्यवस्थापन मंडळाचे सभेत निर्णय क्र. ३३ अन्वये दरमहा रुपये २००/- प्रमाणे मानधन देण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे आजतागायत दरमहा रुपये २००/- प्रमाणे मानधन देण्यात येते. सदरचे मानधन हे सेवेचा मोबदला म्हणून दिले जाते. त्याचा संस्थान कर्मचारी म्हणून इतर कोणताही सहभाग नाही.

सन १९९९ पासून सदरचे मानधन रुपये २००/- प्रमाणेच दिले जाते. त्यात कुठलीही वाढ केलेली नाही. आता पालखी सेवेकऱ्यांनी मानधन वाढवून मिळणेबाबत विनंती केली आहे. याबाबत त्यांना प्रति महा रुपये ५०/- मासिक वाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर)

**विषय नं.३२ उदी पुड्या तयार करणेकामी प्लास्टीक रोल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.२७९.** समाधी मंदिरात दररोज भक्तांना/सन्माननीय अतिथींना देणेकामी उदी पुड्या वाटण्यात येतात. प्लॉस्टिकच्या लहान पुड्यांमध्ये हाताने उदी भरतांना कमी अधिक होते. तेव्हा उदी मशिनव्दारे व्यवस्थीत प्रमाणात व चांगल्या पॅकिंगमध्ये उदी पॅकींग करुन साईभक्तांना वाटण्यात येते.

सन २००५ मध्ये दिनांक १३.३.२००५ चे व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.१३३ अन्वये एका महिन्याकरीता ५० किलो याप्रमाणे १२ महिन्यांकरीता एकूण ६०० किलो अंदाजे प्रति किलो रुपये २५०/- प्रमाणे खरेदी करण्यास मान्यता मिळालेली होती. त्यानुसार कोटेशन मागवून चांगल्या प्रतिचे प्लॉस्टिक रोल माहे एप्रिल २००६ ते मार्च २००७ या कालावधीसाठी मे.दिप एन्टरप्रायजेस, मालाड वेस्ट, मुंबई यांचेकडून प्रति किलो रुपये २१०/- प्रमाणे खरेदी करण्यात आले याकामी एकूण रुपये १,२६,०००/- खर्च झालेला आहे.

दिवसेंदिवस साईभक्तांची गर्दी वाढत असल्याने उदी पॅकेटचा पुरवठा जादा प्रमाणात करावा लागतो. मंदिर विभागाकडे सध्या ४ नग उदी पॅकींग मशिन्स आहे. गर्दीच्या काळाता प्लॉस्टिकचा तुटवडा भासु नये याकरीता एक महिन्यासाठी ८० किलो याप्रमाणे १२ महिन्यासाठी ९६० किलो रोल प्रति किलो अंदाजे रुपये २५०.०० याप्रमाणे २,४०,०००/- खर्च अपेक्षित आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे प्लॉस्टिक रोल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,४०,०००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर)

**विषय नं.३३ वैद्यकीय अभियांत्रिकी प्रवेश परिक्षा (MH-CET) वर्ग सुरु करणे बाबत.**

**निर्णय क्र.२८०.** श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सन २००७-२००८ मध्ये इयत्ता १२ विज्ञान शाखेच्या वर्गात ७५ विद्यार्थी आहे. या विद्यार्थ्यांना आरोग्य विज्ञान,अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शाखांसाठी सामाईक प्रवेश परिक्षेचे (MHT CET) वर्ग सुविधा उपलब्ध करुन देता येईल.

एस.एस.जी.एम कॉलेज कोपरगांव या महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शाखांसाठी सामाईक प्रवेश परिक्षेचे (MHT CET) वर्ग घेण्यात येतात. या महाविद्यालयात या वर्गासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रुपये ६०००/- फी आकारली जाते. या फीचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात येतो.

०१. विद्यार्थ्यांना स्टडी मटेरियल, स्टेशनरी (प्रश्नपत्रिका,उत्तरपत्रिका) पुरिवणे.

०२. इतर महाविद्यालयातील प्राध्यापकांना तज्ञ मार्गदर्शक म्हणून आमंत्रित करुन मानधन (रु.५००/- अधिक प्रवास दैनिक भत्ता) देणे.

०३. महाविद्यालयातील विषय शिक्षकांना चाळीस रुपये प्रती तासाप्रमाणे या अतिरिक्त कामाचा मेहेनताना देणे.

वरील प्रमाणेच, आपले श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालय, शिर्डी या ठिकाणी आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी व औषधनिर्माणशास्त्र शाखांसाठी सामाईक प्रवेश परिक्षेचे (MHT-CET) वर्ग सुरु करता येतील.

या परिक्षेला बसण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून, याकामी खालीलप्रमाणे फी आकारणी करता येईल.

०१. वर्षभरासाठी Physics, Chemistry, Biology, Maths

या चार विषयांसाठी एकूण शुल्क रु. ३०००/-

०२. क्रॅशकोर्स (दोन महिन्यांचा) Physics, Chemistry, Biology, Maths या चार विषयांसाठी रु. २०००/-

या जमा झालेल्या फी चा वरीलप्रमाणे विनियोग करता येईल.

MHT-CET या परिक्षेला बसण्यास इच्छुक असणाऱ्या विद्यार्थ्यांकडून वरील प्रमाणे शुल्क आकारणी करुन MHT-CET वर्ग सुरु करता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच कोपरगाव येथे रयत शिक्षण संस्थेमार्फत MHT-CET हा अभ्यासक्रम उत्कृष्टपणे शिकविण्यात येतो, हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी त्यांचेही मार्गदर्शन घेण्यात यावे,असें ठरलें. (कार्यवाही-मुख्याध्यापिका, कन्या विद्या मंदीर)

**विषय नं.३४ मालवाहतुकीकरीता वाहन खरेदी करणे बाबत.**

**निर्णय क्र.२८१.** दि.१५/०५/२००६ पासून साईबाबा हॉस्पिटल सुरू झालेले आहे. दि.१०/०२/२००७ चे टिपणीने हॉस्पिटल मध्ये दिवसेंदिवस रूग्णांची संख्या वाढत असलेने हॉस्पिटलचे कपडे दररोज लॉड्रीत धुणेकरीता घेऊन यावे लागतात. तसेच मेडीकल स्टोअरचे पार्सल आणने, मेडिसीन वाहने या कामी सकाळी ०९.३० ते ०६.३० या वेळेत एक वाहन चालक व एक वाहन पुर्ण वेळ मिळावे म्हणून कळविले आहे.

वाहन विभागाकडे ०३ महिंद्रा मॅक्स, ०१ बोलेरो कॅम्पर, ०१ टाटा४०७ टेम्पो, ०१ टाटा७०९ टेम्पो व ०१ ट्रॅक्टर अशी एकूण ०७ मालवाहतूक वाहने आहेत. त्यांचा वापर खालील प्रमाणे होत आहे.

**१) महिंद्रा मॅक्स (एमएच-१७/के-९९१०)-** या गाडीचा वापर ०६ ते १४ व १४ ते २२ अशा दोन शिफ्ट मध्ये पुर्ण वेळ कॅन्टीन विभागाकडे होत आहे.

**२) महिंद्रा मॅक्स (एमएच-१७/टी-७१११)-** या गाडीचा वापर ०६ ते १४ व १४ ते २२ अशा दोन शिफ्ट मध्ये पुर्ण वेळ प्रसादालय विभागाकडे होत आहे.

**३) महिंद्रा मॅक्स (एमएच-१७/टी-७११२)-** या गाडीचा वापर ०९.३० ते १८.३० (जनरल) या शिफ्ट मध्ये पुर्ण वेळ प्रसादालय विभागाकडे होत आहे.

**४) बोलेरो कॅम्पर(एमएच-१७/के-९९०९)**या गाडीचा वापर विविध विभागाचे मागणीनुसार केला जातो.

**५) टाटा४०७(एमएच-१७/सी-७३८१)-** या गाडीचा वापर विविध विभागाचे मागणीनुसार केला जातो.

**६) टाटा ७०९ टेम्पो (एमएच-१७/के-५५०१)-**या गाडीचा वापर विविध विभागाचे मागणी नुसार केला जातो. तसेच दर सोमवार व गुरूवार प्रसादालय विभागाचा भाजीपाला आणणे कामी केला जातो

**७) ट्रॅक्टर (एमएच-१७/एच-२८४)-** या ट्रॅक्टरचा वापर बगीचा विभागाचे शेती कामा करीता तसेच इतर विभागाकडे मागणीनुसार मालवाहतूकी करीता होत आहे.

वरील वाहनापैकी एक वाहन रुग्णालयाकरीता कायम स्वरूपी दिल्यास कामात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे कायम स्वरूपी वाहन देता येणार नाही. हॉस्पिटल करीता त्यांचे मागणीनुसार एक टाटा४०७ टेम्पो (मालवाहतूक) वाहन खरेदी करावे लागेल. सदर वाहन साईनाथ हॉस्पिटल व साईबाबा हॉस्पिटल करीता वापरणेत येईल. या कामी अंदाजे रक्कम रू.६,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षीत असून सदर वाहन टाटा कंपनीचे अधिकृत डिलर्स कडून कोटेशन्स मागवून खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित केल्याप्रमाणे मालवाहतूक वाहन खरेदी न करता आवश्यकतेनुसार भाडोत्री लावण्यात यावे, असें ठरलें. (कार्यवाही-वाहन विभाग प्रमुख)

**विषय नं.३५ आय.टी.आय.चे प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणासाठी नवीन ट्रॅक्टर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८२.** श्रीसाईबाबा औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात ट्रॅक्टर मेकॅनीक या व्यवसायाचा फोर्ड ट्रॅक्टर एम.जी.एम. ६८६६ हा सन १९८४ साली संस्थानने औ- केंद्रातील ट्रॅक्टर मेकॅनीक या व्यवसायासाठी खरेदी केला होता. सदरील ट्रॅक्टर हा दोन्ही तुकडयाचं पात्यक्षिकासाठी बहुतांश कालावधी खोललेल्या स्थितीत असल्याने तो रस्त्यावर चालविला जात नाही.

सन २००५-०६ या वर्षात इंश्युरन्स कंपनीने घसारा वगळता या ट्रॅक्टरची किंमत रु. ४५,०००/- इतकी ग्राहय धरली आहे. सदरचे फोर्ड ट्रॅक्टर आर.टी.ओ. दप्तरी नॉन युज असा केल्यास येथुन पुढे इंश्युरन्स भरण्याची आवश्यकता पडणार नाही. सध्या संस्थेच्या ट्रॅक्टर मॅकॅनीक ट्रेडसाठी शासनाने जारी केलेल्या अभ्यासक्रम पुस्तीकेनुसार ट्रॅक्टरची गिअर बॉक्स असेंब्ली, रिअर अक्सेल असेंब्ली, स्टेअरिंग गिअर बॉक्स असेंब्ली व सर्व्हिसेबल इंजिनची प्रत्येकीची कमतरता आहे. सदर ट्रॅक्टर नॉन युज करुन या असेंब्लीची प्रत्येकी एकची कमतरता भरुन काढता येईल. तसेच त्या व्यतिरिक्त क्लच असेंब्ली, डिफ्रेन्सीयल असेंब्ली इत्यादीचे प्रात्यक्षित प्रशिक्षणार्थ्यांना व्यवस्थीत व सुटसुटीत करता येईल व डिसमेंडटल केलेले वेगवेगळे पार्टस् डेडस्टॉकला घेता येईल त्याच्या किंमती आर.टी.ओ. किंवा लायसन्स इन्शुरन्स सर्व्हेअर ॲण्ड लॉस ॲसेस अशा सक्षम प्राधिकारी किंवा एजन्सी कडून ठरवून घेता येतील. तसेच सध्या डेडस्टॉकला असलेला सदरील ट्रॅक्टर हा डेडस्टॉक वरुन कमी करता येईल.

अभ्यास पुस्तीकेनुसार मेकॅ. ट्रॅक्टर या व्यवसायास ०३ ट्रॅक्टर्सची आवश्यकता आहे. आपणाकडे Escort, Fort व Swarj हे ट्रॅक्टर उपलब्ध आहेत. यापैकी फोर्ड ट्रॅक्टर हा नॉनयुज करुन संपुर्ण

Dismental करुन त्याचे वेगवेगळी असेंब्ली करुन त्यावर प्रशिक्षणार्थ्यांना व्यवस्थित प्रात्यक्षिक देता येईल.

फोर्ड ट्रॅक्टर नॉनयुज केल्यावर त्या जागी सध्या बाजारात पॉवर स्टेरींग, हॅड्रोलिक व ऑईल थस्ट ब्रेक डिजीटल पॉवर मिटर, डिझेल सेव्हर व कॉन्स्टन्ट मेश/ सिंकोमेश गिअर बॉक्स इत्यादी आधुनिक टेक्नोलॉजी असलेला एच.एम.टी., जॉन डिअर सॉमे किंवा मेशी फर्ग्युसन या पैकी कोणत्याही एका कंपनीचा नवा ट्रॅक्टर खरेदी करता येईल तसेच सदरील ट्रॅक्टर खरेदीकामी अंदाजे रक्कम रु.५,००,०००/- खर्च अपेक्षित आहे. सदरील ट्रॅक्टर खरेदी विभागामार्फत प्रचलीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेत येईल.

तरी एच.एम.टी., जॉन डिअर सॉमे किंवा मेशी फर्ग्युसन या पैकी एका कंपनीचा आधुनिक ट्रॅक्टर खरेदी करणेस व येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. ५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होत.

यावर सविस्तर चर्चा होऊन, विद्यार्थ्याचे प्रशिक्षणासाठी संस्थानचे वाहन विभागात असलेला जुना ट्रॅक्टर आय.टी.आय विभागाकडे देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय/वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.३६** **किटकनाशक (पेस्ट कंट्रोल) फवारणीबाबत.**

**निर्णय क्र.२८३** शिर्डी येथे श्री साईंचे दर्शनासाठी येणाऱ्या साईभक्तांचे निवासासाठी असलेल्या संस्थानचे सर्व विभागांकडील निवासस्थाने,श्री साईनाथ रुग्णालय,या इमारतींमध्ये किटकनाशक (पेस्ट कंट्रोल) फवारणी करण्याचे कामासाठी निविदा मागणी करुन मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे वाटाघाटी / चर्चेअंती एक वर्षांचे कालावधीसाठी मे.एम.वॉल्श, मुंबई यांना खालील अटी-शर्तीवर काम देण्यात आले होते.

**(०१)** किटकनाशक फवारणीचा कालावधी **दि.०१/०४/२००६ ते दि.३१/०३/२००७** अखेर एक वर्षाचे कालावधीसाठी राहील.

**(०२)** किटकनाशक फवारणीसाठी लागणारी सर्व औषधे,पंप वगैरे साहित्य तसेच मजूर याचा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

**(०३)** किटकनाशक फवारणीसाठी लागणाऱ्या सर्व मंजुरांचा जाणे-येणे,चहापाणी,नाष्टा, जेवण व निवास इत्यादींचा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

**(०४)** किटकनाशके फवारणीचे कामासाठी कामांस घेतलेल्या मजुरांना कोणत्याही प्रकारची विषबाधा अथवा त्रास झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारावर राहील. त्याचबरोबर या कामासाठी घेतलेल्या कामगारांचे पगार,प्रा.फंड इत्यादी सर्व कायदेशीर बाबींची जबाबदारी कंत्राटदारावर राहील.

**(०५)** संस्थान अधिकारी / कर्मचाऱ्यांचे समक्ष फवारणीचे काम करावे लागेल. किटकनाशक फवारणी नंतर त्याचा परिणाम दिसून न आल्यास अथवा फवारणी करुनही किटकांचे अस्तित्व रद्य न झाल्यास, कंत्राटदारास पुन्हा स्वखर्चाने तक्रार निवारण होईपर्यंत फवारणी करुन द्यावी लागेल. त्यासाठी **३००४२९** चौरसफुट एरियासाठी कंत्राटदारास **रु.७,८३,६४३/-** एवढी रक्कम मोबदला म्हणून देण्यात येईल व या रक्कमेवर **५** टक्के प्रमाणे **रु.३९,१८२/-** एवढी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून कंत्राटदाराने बिनव्याजी संस्थानकडे ठेवावी लागेल.

**(०६)** कंत्राट कालावधीचे वर्षामध्ये प्रति दोन महिन्यास एक फवारणी याप्रमाणे **६** फवारण्या करणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील व त्यासाठी प्रति फवारणीनंतर मंजूर रक्कमेच्या **१०** टक्के बील कंत्राटदारास आदा करता येईल व उर्वरीत शिल्लक रहाणारी सर्व रक्कम मुदतीअखेर कंत्राटदारास आदा करण्यात येईल.

उपरोक्त अटी-शर्तीनुसार मे.एम.वॉल्श,मुंबई यांना किटकनाशक फवारणीचे काम देण्यात आलेले असून,ते विनातक्रार काम करीत असून,त्यांच्या कामाची प्रतवारी चांगली आहे. त्यांच्या ठेकेदारीची मुदत **दि.३१/०३/२००७** अखेर संपुष्टात येत आहे. त्यामुळे **दि.०१/०४/ २००७ ते दि.३१/०३/२००८** अखेर एक वर्षांचे कालावधीसाठी किटकनाशक फवारणीसाठी ठेकेदार नेमणुक करावी लागेल. किटकनाशके फवारणी करण्यासाठी खालीलप्रमाणे खोल्या व हॉल असून त्याचे क्षेत्रफळ खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

| अ.नं. | इमारतीचे नांव. | खोल्या. | हॉल. | एकूण क्षेत्रफळ. चौरसफुट. |
|---|---|---|---|---|
| (अ) | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग. | ५०९. | १५. | १,७३,२६८. |
| (ब) | चौकशी व निवासस्थान विभाग. | | | |
| | १) साईप्रसाद नं.१. | ८१. | -- | २४,५७०. |
| | २) साईप्रसाद नं.२. | ७८. | -- | २०,२५७. |
| | ३) समर्पण. | ०२. | -- | ४९०. |
| | ४) साईनाथ छाया. | ०१. | -- | १३४८. |
| | ५) साईनिवास अतिथीगृह. | २४. | ०२. | १४,२२५. |
| | ६) साईउद्यान.(लॉकर्ससह) | ३६. | १२. | २४,२७५. |
| | ७) शांतिनिकेतन. | १४. | -- | २,५६९. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (क) | धर्मशाळा विभाग. | ४४. | ०३. | १६,६२१. |
| (ड) | साईनाथ रुग्णालय. | ४४. | ०५. | २१,४५९. |
| (इ) | साईबाबा रुग्णालय. | १४९. | ३०. | ८७,४००. |
| एकुण.... | | ९८२. | ६७. | ३,८६,४८२. |

उपरोक्त इमारतींमध्ये दि.०१/०४/२००७ ते दि.३१/०३/२००८ अखेर एक वर्षे कालावधीसाठी किटकनाशक फवारणी करणेसाठी ठेकेदारांची नियुक्ती करावयाची आहे.

मे.एम.वॉल्श,मुंबई यांचे वर्षभरातील काम समाधानकारक आहे. मे.एम.वॉल्श यांना मागील वर्षी किटकनाशके फवारणीसाठी देण्यात आलेल्या कामाचा वार्षिक प्रति चौरसफुटास रु.२.६१ दर येतो. दि.०१/०४/२००७ पासून त्यांना १ वर्षासाठी मुदतवाढ द्यावयाची झाल्यास वर टिपणीत नमूद केलेल्या एकूण ३,८६,४८२ चौरस फुट क्षेत्रफळास किटकनाशके फवारणीसाठी वार्षिक रुपये.१०,०८,१०५/- एवढा खर्च येईल.

तरी दि.०१/०४/२००७ पासुन पुढील १ वर्षे कालावधीसाठी किटकनाशके (पेस्ट कंट्रोल) फवारणीसाठी मे.एम.वॉल्श यांना आहे त्या अटी-शर्तीवर मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,भक्तनिवासस्थान/अधिक्षक,चौकशी व निवासस्थान/धर्मशाळा प्रमुख)

**विषय नं.३७ भंगार अनावश्यक वस्तूंची लिलावाने विक्री करणेकामी तारीख निश्चित करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८४.** व्यवस्थापन समितीच्या दि.२७/१२/२००४ च्या सभेत "संस्थानचे विविध विभागातून दप्तर विभागाकडे जमा झालेल्या निरुपयोगी वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी प्रस्तावीत केलेप्रमाणे वस्तूचे वेगवेगळे लॉट करुन मा. विश्वस्त समिती सदस्य व अधिकारी समिती यांचेकडून अपेक्षित विक्री किंमत निश्चित करण्यात यावी. त्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेसाठी पाठविण्यात यावा, मान्यतेनंतर प्रशासनाने निश्चित तारीख निश्चित करुन लिलावाबाबत वर्तमान पत्रात जाहीरात देण्यात यावी. लिलावात उपस्थित राहणेबाबत सर्व विश्वस्तांना कळविण्यात यावे." असा निर्णय क्रं.१६१ झालेला आहे.

जून-२००३ नंतर जमा झालेल्या विविध निरुपयोगी / टाकाऊ साहित्य जाहीर लिलावाने विक्री करणेस मान्यता मिळणेकामी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला.
त्यावर जा.क्रं.सासंवि-२००५/३८९/(११६)/सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.०३/०१/२००६ नुसार "संस्थानकडे सन २००४-०५ या वर्षात जमा असलेल्या पत्रा सोबतच्या विवरण पत्रात नमूद केलेल्या (मौल्यवान नसलेल्या) वस्तू संस्थानची विहीत कार्यपध्दती तसेच या पत्रा सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेली कार्यपध्दती यांचा योग्य मिलाफ घालून पूर्व सूचना घेऊन जाहीर लिलावाव्दारे विक्री करण्यास" शासनाने मान्यता दिलेली आहे.

"व्यवस्थापन समितीचे दि.२९-०१-२००५ चे सभेतील निर्णय क्रं.२(३) अन्वये ठरलेनुसार उपरोक्त स्क्रॅपचे लॉट तयार करुन त्याचे प्रकार, शक्य असेल तेथे वजन त्याची घसारा वजा जाता किंमत सध्याचे स्क्रॅपचे बाजार भाव याबाबी विचारात घेता डेडस्टॉक वस्तू व इतर स्क्रॅप मटेरियल वस्तूंची जाहीर लिलावाने विक्री करणेकामी लॉटच्या अपेक्षित विक्री किंमत निश्चित करणेसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीकडून दि.१७/९/२००६ रोजी अपेक्षित विक्री किंमत निश्चित करण्यात यावी." त्यानुसार दि.१७/०९/२००६ रोजी मा.स्थानिक विश्वस्त समिती सदस्य व अधिकारी यांचे समितीकडून सदस्यांनी समक्ष पहाणी केली. त्यांनी दिलेल्या निर्देशानुसार लिलावाच्या वस्तूचे सुधारीत लॉट करण्यात आले. शक्य असणाऱ्या वस्तूचे उदा.

**अ)** ताबे, पितळ, अल्यूमिनीयम, लोखंड, स्टेनलेस स्टील, प्लॅस्टिक,फायबर,पी.व्ही.सी.मटेरियल, ॲक्रलिक, रबर, सिन्टैक्स टाक्या, पी.व्ही.सी. कॅबीन, कापड या वस्तूंचे वजन करण्यात आले. संस्थानकडील मंजूर असलेल्या कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दर विचारात घेता अंदाजे राखीव किंमत ठरविण्यात आल्या.

**ब)** इलेक्ट्रीक/इलेक्ट्रॉनिक्स/गोदरेज टायपराटर,तसेच इतर सामान, नादूरुस्त मशिनरी, फर्नीचर (स्टील चेअर, रिव्हॉल्वींग लोखंडी खूर्ची, स्टुल ) उर्वरित रुग्णालय साहित्य, सोलर वॉटर हिटींग सिस्टीम, सागवानी दारे, खिडक्या वगैरे लाकडी सामान,चैनपुली,इलेक्ट्रीक गिझर या वस्तूमध्ये वेगवेगळे धातू वगैरे असल्याने त्यांचे स्वतंत्र लॉट करण्यात येऊन किंमती निश्चित करण्यात आल्या आहेत.

'अ' मध्ये नमूद केलेल्या वस्तूच्या राखीव किंमती इतकी रक्कम न मिळाल्यास सदरच्या वस्तू चालू कोटेशनच्या वार्षिक उच्चतम दराने विक्री करता येतील. जेणे करुन अशा वस्तू विनाकारण पडून राहणार नाहीत. तसेच त्यांची किंमतही वसूल होईल. असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भंगार अनावश्यक वस्तूंची लिलावाने विक्री मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात करणेत यावी. याकामी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,दप्तर विभाग)

**विषय नं.३८ TREND MICRO ANTI VIRUS सॉफ्टवेअरचे पुढील तीन वर्षासाठी नुतनीकरण करणे बाबत**

**निर्णय क्र.२८५.** संस्थानमधील कार्यालयीन कामकाजाचे बहुतेक करुन संगणकीकरण करण्यात आले आहे. संगणकीकरण कार्यक्रमांतर्गत संस्थानमध्ये सध्या १२५ संगणक नेटवर्कींगच्या साहाय्याने जोडलेले आहेत. या संगणकावर रोखीचे व्यवहार होणारे सर्व देणगी काऊंटर, मध्यवर्ती रुम बुकींग सुविधा, प्रसादालय तिकीट विक्री, कॅन्टीन तिकीट विक्री, चेक/डीडी, मनीऑर्डर, कापडकोठी, पुस्तक विक्री, लेखाशाखेची संगणक प्रणाली, आवक-जावक विभाग, यासोबत सर्व कार्यालयातील संगणकासाठी मराठी आयएसएम फॉन्टची कार्यप्रणाली इ. जोडलेली आहे. अंतर्गत दूरध्वनी व्यवस्थाही याच नेटवर्कमध्ये जोडण्यात आलेली आहे. हे सर्व सुरळीत चालण्यासाठी व माहिती साठवणूक होण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हर रुममध्ये डाटाबेस सर्व्हर, डोमेन सर्व्हर, बॅकअप सर्व्हर, आएसएम सर्व्हर, डेमो सर्व्हर व वेबसाईट सर्व्हर असे एकूण सहा सर्व्हर बसविण्यात आले आहेत.

नेटवर्कमध्ये चालू असणाऱ्या संगणक प्रणालीला संगणक व्हायरसचा प्रादूर्भाव होऊ नये, साठविण्यात आलेली माहिती सुरक्षित रहावी, नेटवर्क पूर्ण क्षमतेने सतत कार्यान्वीत रहावे यासाठी मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक १८/१२/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्रमांक ७६७ प्रमाणे TREND MICRO ANTI VIRUS चे ५१ युजरसाठी चालणारे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आलेले आहे. हे सॉफ्टवेअर नेटवरुन सतत अपडेट करावे लागते. याची मुदत मार्च, २००७ अखेर संपत असल्याने, हे सॉफ्टवेअर पुढील कालावधीसाठी नुतनिकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

TREND MICRO ANTI VIRUS च्या भारतामधील अधिकृत एजन्सीकडे चौकशी केली असता, ही प्रणाली पुढील तीन वर्षासाठी नुतनिकरण करण्यासाठी त्यांनी पुढीलप्रमाणे खर्च कळविलेला आहे.

| अ.नं. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| ०१ | ५१ युझरचे तीन वर्षासाठी नुतनिकरण (रुपये ३३१५ x ५१ युझर) | १,६९,०००/- (कर अतिरिक्त) |
| ०२ | Damage Cleaner System (रुपये १५५४ x ५१ युझर) | ७९,२५४/- (कर अतिरिक्त) |
| | एकूण- | २,४८,२५४/- (कर अतिरिक्त) |

नेटवर्कमध्ये व्हायरस जाऊन संगणक प्रणाली नादुरुस्त होऊ नये, महत्वाची माहिती खराब होऊ नये व नवीन नवीन नेटवरुन येणाऱ्या व्हायरसला आळा घालण्यासाठी सध्या TREND MICRO ANTI VIRUS हीच प्रणाली यशस्वी होत असल्याने, आपण पुढील तीन वर्षासाठी या प्रणालीचे नुतनिकरण करणे अत्यंत आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे, TREND MICRO ANTI VIRUS या सॉफ्टवेअरचे पुढील तीन वर्षासाठी नुतनिकरण करण्यास व त्यावर येणारा अंदाजीत खर्च रुपये २,४८,२५४/- (कर अतिरिक्त) यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.३९ संस्थानच्या नुतनीकृत वेबसाईटवर सुरक्षिततेचे प्रमाणपत्र घेणे बाबत.**

**निर्णय क्र.२८६.** मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक २५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ९२९ नुसार संस्थान **www.shrisaibabasansthan.org** या अधिकृत वेबसाईटवर श्री साईभक्तांना विविध सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सदर सुविधा उपलब्ध करुन घेणेसाठी नामांकित कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येवून, नूतनीकरणाचे काम लवकरच सुरु होत आहे. नूतनीकृत वेबसाईटवर श्री साईभक्तांना विविध सेवा उपलब्ध करुन त्या सेवेसाठी काही आकार घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे वेबसाईटवर ई-डोनेशनही सुरु होत असल्याने, श्री साईभक्ताच्या व वेबसाईटच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही आवश्यक प्रमाणपत्रे वेबसाईटवर घेणे अत्यंत आवश्यक आहे.

०१. Versign Global Server-GSID – श्री साईभक्तांनी संस्थानच्या वेबसाईटवरील पेमेंट गेटवेवर डेबीट अथवा क्रेडीट कार्डव्दारे दिलेली रक्कम, त्यांच्या कार्डचा नंबर व त्यांचा पासवर्ड इ. इतरांना समजू नये, ते सुरक्षित रहावे यासाठी या प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. बहुतांशी व्यवहार हे प्रमाणपत्र पाहूनच करण्याची प्रथा नेटवर व्यवहार करणारांमध्ये प्रचलीत आहे.

०२. iWatchdog – हे प्रमाणपत्र वेबसाईटवर असल्यास, लहान मुले किंवा कुटुंबामध्ये बसून सर्व सदस्य आनंदाने वेबसाईटवरील आनंद घेवू शकतात. या प्रमाणपत्रामुळे नको असलेल्या व अश्लील साईट उघडण्यास मज्जाव केला जातो. त्यामुळे हे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे.

०३. Hackersafe – हे प्रमाणपत्र वेबसाईटवर असल्यामुळे आपली अधिकृत साईट इतर कोणीही हॅक करुन शकत नाही. संस्थानच्या वेबसाईटवर अधिकृत माहिती व सर्व प्रकाशने असल्याने, त्यामध्ये विद्रोही प्रवृत्तीचे लोक वेबसाईटवर मारा करुन मुळ माहितीमध्ये काही बदल करु शकत नाही. पर्यायाने आपली माहिती व वेबसाईट सुरक्षित राहते.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे वेबसाईटवर टाकणे आवश्यक असल्याने, त्यांची अधिकृत वितरकांकडून माहिती घेतली असता, त्यांनी पुढीलप्रमाणे त्यांचे दर कळविले आहेत.

| Sr.No. | Certification Details | Price Per Year (apporx.) |
|---|---|---|
| 01. | Versign Global Server-GSID | Rs.42,000/- + Taxes |
| 02. | iWatchdog | Rs.15,000/- + Taxes |
| 03. | Hackersafe | Rs.75,000/- + Taxes |
| 04. | Other essential Certificate | Rs.50,000/- + Taxes |
| 05. | Implementation Charges as above | Rs.18,000/- + Taxes |
| **Total** | | **Rs. 2,00,000/- + Taxes** |

तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे, वेबसाईटवर प्रमाणपत्र घेण्यासाठी अंदाजे रुपये २,००,०००/- + टॅक्स खर्चाची आवश्यकता आहे. अशी प्रमाणपत्र घेण्याबाबत संस्थानच्या वेबसाईटचे अधिकृत तज्ञ सल्लागार श्री. अे. आर. नाडकर्णी यांचे मार्गदर्शन घेण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे, संस्थानच्या अधिकृत वेबसाईटवर प्रमाणपत्रे घेण्यास व त्यावर येणारा अंदाजीत खर्च रुपये २,००,०००/- + कर यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी.विभाग प्रमुख)

**विषय नं.४०** **गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना साईगंगा मिनरल वॉटरची विक्री करणेकामी श्री साईबाबा भक्तनिवासस्थान येथील दिलेल्या गाळयास मुदतवाढ देणे बाबत.**

**निर्णय क्र.२८७. १)** संस्थानने खालील तपशिलाप्रमाणे गाळा साईभक्तांचे व संस्थााचे सोयीच्या दृष्टीने अकरा महिने मुदतीचे कालावधी करिता गुरुकृपा सेल्स, कोपरगांव, जिल्हा अहमदनगर यांना वापरांसाठी दिलेला आहे.

| अ.नं | इमारतीचे नांव | गाळा धारकाचे नांव | वापरासाठी घेण्यात येणारी दरमहा फी | वापर | पूर्वीचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईबाबा भक्तनिवासस्थान डी विंग कडील गाळा नं ०८ | गुरुकृपा सेल्स, कोपरगांव | दरमहा रुपये २०००/- | साईगंगा मिनरल वॉटर | १०-१२-२००५ ते ०९-११-२००६ |

उपरोक्त प्रमाणे गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन कपांऊड, साई कॉर्नर, कोपरगांव , जिल्हा अहमदनगर यांची दिाांक ०९-११-२००६ रोजी मुदत संपत असल्याो मुदतवाढ मिळणेबाबत त्यांचा प्रस्ताव इकडील कार्यालयास दि. १८/०१/२००७ रोजी प्राप्त झालेला आहे. त्यात त्यांनी " श्री साईबाबा संस्थानने आम्हांला श्री साईबाबा भक्तनिवासस्थान ( ५०० रुम्स ) कडील एक गाळा डिसेंबर २००५ पासून भाडेतत्वावर कराराने दिलेला होता आम्ही मागील वर्षाचे संपूर्ण भाडे आदा केलेले आहे.

आपणांस आम्ही विनंती करतो की, वरीलप्रमाणे करारनाम्याचे पुढील वर्षासाठी नूतनीकरण करण्यात यावे. तसेच शक्य असेल तर करारनाम्याचे नुतनीकरण ५ वर्षाच्या कालावधीसाठी करण्यात यावे. सहकार्याबद्यल आभारी आहोत " असे म्हटलेले आहे.

साईभक्तांना व संस्थानला उपरोक्त गाळयाचा होणारा उपयोग लक्षात घेता, गुरुकृपा सेल्स, हॉटेल स्पॅन कपांऊड, साई कॉर्नर, कोपरगांव , जिल्हा अहमदनगर यांना दिनांक १०/११/२००६ रोजी पासून ते दिनांक ०९/१०/२००७ अखेर ११ महिने कालावधी करिता डिपॉझीट रुपये १०,०००/- (दहा हजार), मागील मासिक परवाना फी रुपये २०००/- मध्ये १० % वाढ करुन दरमहा रक्कम रुपये २,२००/- मात्र आकारून व तसेच दरमहा मिटर रिडीग प्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीस अनुसरून लिव्ह ॲड लायसेंन्सी तत्वावर गाळयास मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळेस संस्थानचे भक्तनिवासस्थान इमारतीत शिल्लक असलेल्या गाळ्यांबाबत चर्चा होऊन सदरहू गाळे जाहीर लिलावाने Leave and Licence तत्वावर देण्यात यावे असे ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४१** **श्री.वसंत महादू गोंदकर यांचा तडजोडीबाबत अर्ज**

**निर्णय क्र.२८८.** श्री.वसंत महादू गोंदकर यांनी रे.मु. नं ३४/९३ हा दावा १) महाराष्ट्र शासन २) उपविभागीयअधिकारी परिसर अभियांत्रिकी ,बांधकाम विभाग कोपरगांव व ३) श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांचे विरुध्द केला होता सुरवातीस महाराष्ट्र शासनास प्रतिवादी केले होते नंतर संस्थानला प्रतिवादी पणात सामील केले.

सदरचा दावा खालीलप्रमाणे होता

प्रतिवादी यांनी वादीचे जमिन गट नं १२६ क्षेत्र १ हेक्टर ९३ आर आकार८ रुपये यांसी चतु: सिमा

पूर्व - १३५, दक्षिण- १२४,१२५, पश्चिम- १२१, उत्तर - १२७, १३२

या जमिनीत अतिक्रमण करु नये, गेट पाडू नये, तसेच उत्तरेकडील पडीत क्षेत्रात अतिक्रमण करु नये तसेच या क्षेत्रात कोणत्याही प्रकारची वहिवाट करु नये, रस्ता करु नये अगर वादीना त्यांचे जमिनीत शांततामय कब्जे वहिवाटीस कोणत्याही प्रकारची हिल्ला हरकत करु नये म्हणून त्यांचे विरुध्द निरंतर ताकीदीचा मनाई हुकूम व्हावा. तसेच प्रतिवादी नं ०३ ( श्री साईबाबा संस्थान ) यांनी वादीचे वर वर्णन केलेल्या व उत्तरेकडील पडीत क्षेत्रात अतिक्रमण करु नये व त्या क्षेत्रात कोणत्या प्रकारची वहिवाट करु नये, रस्ता करु नये व वादीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हिल्ला हरकत करु नये म्हणून त्यांचे विरुध्द निरंतरीचे ताकीदीचा मनाई हुकूम व्हावा.

तसेच प्रतिवादी यांनी जे तीन गेट वादीचे जमिनीतून वहिवाट करण्यासाठी व रस्ता पाडण्यासाठी टाकलेले आहेत ते तीनही गेट बंद करून घ्यावे म्हणून प्रतिवादी नं ०१ ते ०३ विरुध्द मॅन्डेटरी मनाई व्हावी.

वरील वादीचे मागणीचे विरुध्द श्री साईबाबा संस्थानने ता. ०५/०७/२००२ रोजी कैफियत दाखल केली असून कैफियत प्रमाणे सर्व मुद्ये नाकारले आहेत श्री. गोंदकर यांचे जमिनीचे उत्तरेस चर व चराचे उत्तरेस बग्गी रोड आहे. ही गोष्ट खरी आहे. परंतु बग्गी रोडचे उत्तरेस वादीची जागा आहे हे संस्थानला मान्य नाही अशा आशयाची कैफियत संस्थानने दाखल केलेली आहे.

वादीने ते शाबीत करावे . वादीने त्याचे जमिनीची मोजणी करुन घेतली नाही संस्थानने कोणताही नविन रस्ता केला नाही. बग्गी रोड हा वहिवाटीचा जूना रस्ता आहे. गेटसच्या दक्षिणेस सार्वजनिक रस्ता आहे. गेटच्या वापरामुळे वादीचे हद्यीत कोणतेही अतिक्रमण झालेले नाही. असे संस्थानचे म्हणणे आहे.

प्रस्तुत प्रकरणी दिनांक ३०/११/२००६ रोजी वादीचे बाजूने निकाल झाला असून - निकालपत्रात प्रतिवादी नं ०१ ते ०३ यांनी वादीचे गट नं १२६ चतु: सिमेत दर्शविल्याप्रमाणे जमिनीचे शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये. असा मनाई हुकूम दिला आहे तसेच प्रतिवादी नं ०१ ते ०३ यांनी कंपाऊाड वॉल लगत असलेले तीनही गेट ४० दिवसाचे आंत बंद करावेत असेही म्हटलेले आहे.

कोर्टाचे रे.मु.नं ३४/९३ चे निकालाचे विरुध्द असि डिस्ट्रीक्ट जज्ज कोपरगांव यांचे कोर्टात संस्थानने अपील दाखल केले असून त्या अपिलाचा नंबर सि.अ.नं. १४७ /०६ असा आहे त्या अपिलात असि डिस्ट्रीक्ट जज्ज यांनी खालच्या कोर्टाच्या निकालाचे अंमलबजावणीस तूर्त जैसे थे हुकूम दिला आहे. अपिलाची पुढील तारीख दिनांक ०९/०४/२००७ ही दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकारणी तडजोडीने काही मार्ग निघतो का असे मा. कोर्टाने प्रकरणी सूचित केले आहे त्यास अनुसरून श्री गोंदकर यांना चर्चास व प्रस्ताव सादर करणेस संस्थानतर्फे विनंती करणेत आली होती त्याबाबत त्यांनी दिनांक ०३.०३.२००७ चे अर्जात "मी माझ्या जमिनीबाब मे सि.ज सिनीअर डिव्हीजन कोर्टात दावा मु. ३४/९३ दाखल केला होता. त्यादाव्याचा निकाल माझ्या बाजूने झाला असून त्या निाकला विरोधात साई संस्थानने अपील केले आहे मे. कोर्टाने संस्थानला आपासत तडजोड करून विचार विनिमय करण्याचे सांगितले होते तरी आम्ही कोर्टाच्या म्हणण्यानुसार तडजोड करण्यास तयार आहोत पंरतु आमचे जागेच्या मोबदल्यात साई संस्थानने त्यांची सिटी स.नं २० मधील ३ खण जागा आम्हास दिल्यांस आम्ही तडजोड करण्यास तयार राहू " असा अर्ज केला आहे.

श्री वसंत महादू गोंदकर यांचा ता ०३/०३/२००७ चा अर्ज आम्ही तडजोड करु पण सि.स.नं २० मधील ३ खण जागा आम्हांस दिली पाहिजे असा प्रस्ताव आहे. सि.स.नं २० मधील ३ खण जागा श्री. तुकाराम शंकरराव गोंदकर व त्यांचे बंधू श्री. दत्तात्रय गोंदकर वगैरे यांनी संस्थानला दान दिली आहे.

श्री. वसंत महादू गोंदकर यांनी यापूर्वी पर्यायी तडजोडीचा अर्ज दिला होता. गेटजवळील जागा वापरण्यास देणेस ते तयार आहेत परंतु राहिलेले क्षेत्रात संस्थानने अतिक्रमण करु नये अशा आशयाचा सदरचा प्रस्ताव होता. परंतु आता सिटी सर्व्हे नं २० पैकी जागेची त्यांची मागणी आहे मा. ज्युनिअर डिव्हिजन कोर्टाचा निकाल त्यांचे बाजूने आहे करिता त्यांचे अपेक्षा वाढलेल्या दिसतात.

श्री. वसंत महादू गोंदकर यांनी त्यांची कपांऊड लगत जागा आहे असे गृहीत धरून त्याबदल्यात सि.स.नं २० मधील ३ खण जागा मागितलेली आहे मुळात श्री. वसंत महादू गोंदकर यांची कपांऊड लगत जागा आहे किंवा नाही त्यांची जागा असल्यास ती किती आहे किंवा नाही त्यांची जागा असल्यास ती किती आहे हे पहाणे जरुरीचे आहे अपिलामध्ये प्रकरण न्यायप्रविष्ट आहे शिवाय त्यांना त्याबदल्यात ३ खण जागा दयावयाची असल्यास त्यांना शासनाची पूर्व मान्यता घ्यावी लागणार आहे.

पाणीपुरवठा योजनेचे जवळ रस्त्यासाठीचे जागेचे मोबदल्यांत मंदीराजवळचे किंमती जागा देणे. तसेच मुळ मालकांनी दान केलेली व परत त्यांची मुळ मालकाचीही मागणी असतांना अन्य व्यक्तीस जागा देणे संयुक्तिक ठरणार नाही असे मत आहे सिटी सर्व्हे नं २० ( श्री वसंत गोंदकर ) यांना जागेचे प्रस्तावाऐवजी श्री गोंदकर संस्थानचे कनकुरी येथील नव्याने विकत घेतलेले गट नं.

२३५ पैकी त्यांचे क्षेत्राइतकी क्षेत्राची मागणी करत असल्यास शासन परवानगीने जागेचे अदलाबदल करता येईल. अर्थात तत्पूर्वी श्री. गोंदकर यांचेकडून मोजणी करुन दाव्यातील व अपिलांतील वादग्रस्त क्षेत्र त्यांचेच आहे याची खात्री होणे आवश्यक आहे अशा प्रकारचा संस्थानला प्रस्ताव श्री वंसत गोंदकर यांचकड मांडता येईल त्याचप्रमाणे संस्थानला पाणीपुरवठा योजनेसाठीचे ये-जा साठी अन्य पर्यायी व्यवस्था करता येइल काय याबाबत पहाणी करून तशी पर्यायी व्यवस्था होत असल्यास श्री गोंदकर यांचा प्रस्तावाचा विचार अमान्य करता येईल. संस्थानने प्रकरणी मा. जिल्हा न्यायालयात अपील दाखल केले आहे त्याबाबतचा निकाल झाल्यानंतरही तडजोडीची यथायोग्य भूमिका घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री वसंत महादू गोंदकर यांची तडजोडीबाबत विनंती अमान्य करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी )

**विषय नं.४२ श्रीसाई संस्थान नोकरांची सहकारी पतपेढी लि,शिर्डी यांना स्नानगृह मुदतवाढीचा ठेका देणेबाबत.**

**निर्णय क्र.२८९.** साईभक्तांचे सोयीसाठी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी यांचेमार्फत खालील ठिकाणी स्नानगृहे ठेकेदारी पध्दतीने चालविली जातात

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| ०१. | साई प्रसाद नं ०१ व साईप्रसाद नं ०२ |
| ०२. | साईउद्यान |
| ०३. | जनरल स्नानगृह पिंपळवाडी रोडलगत |

मा.व्यवस्थापन मंडळाचे दि २२/०३/१९९८ चे सभेतील निर्णय क्रमांक ४२ अन्वये पतपेढीस पूर्वीचेच शर्ती व अटीवर हे स्नानगृह चालविण्याचे तीन वर्षाचे कालावधीसाठीचे ( दिनांक ०१/०४/१९९८ ते दिनांक ३१/०३/२००१ ) कंत्राट प्रत्येक वर्षा अखेर घसारा रकमेत १० टक्के वाढ करुन देण्यात आले होते. या ठेक्याची मुदत संपल्याने श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि., शिर्डी यांना त्यांचे दि.०१/०३/२००१चे पत्रास अनुसरुन व मा.व्यवस्थापन समितीचे दि.१-०३/०४/२००१ सभेतील निर्णय क्रमांक १७७ यांस अनुसरून त्यांना दिनांक ०१/०४/२००१ ते दिनांक ३१/०३/२००४ अखेर याप्रमाणे तीन वर्षाचे कालावधीसाठी स्नानगृह चालविणेस प्रत्येक वर्षी गतवर्षीच्या घसारा रकमेत १० टक्के वाढ करुन देणेत आले होते.

तदनंतर श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी यांना त्यांचे दि ०५/०३/२००४ चे पत्रास अनुसरुन व मा. व्यवस्थापन समितीचे दि. २९-३१/०३/२००४ सभेतील निर्णय क्रमांक १४९ यांस अनुसरून त्यांना दिनांक ०१/०४/२००४ ते दि ३१/०३/२००७ पर्यत दरमहा रक्कम रुपये ४०००/- (एकत्रित) प्रमाणे लायसेन्सी फी आकारुन पूर्वीच्याच अटी व शर्तीस अधीन राहून मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याची मुदत दिनांक ३१/०३/२००७ रोजी संपत आहे.

आता श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लिमिटेड, शिर्डी, ता.राहाता यांचे दिनांक २६/०२/२००७ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असून संस्था संस्थानचे मान्यतेने संस्थान परिसरात चालवित असलेल्या साईप्रसाद नं ०१ व ०२, साईउद्यान व जनरल स्नानगृह व्यवसायाची तीन वर्षाची मुदत दिनांक ३१/०३/२००७ रोजी पूर्ण होत आहे. तरी सदर व्यवसाय संस्थेस पुढील पाच वर्षाकरिता चालविण्यास परवानगी मिळावी ही विनंती असे म्हटलेले आहे.

साईभक्तांना सदर सुविधेचा होणारा उपयोग लक्षात घेता, श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि., शिर्डी,यांचे मागील दरमहा रक्कम रुपये ४०००/- (एकत्रित ) यामध्ये १० % वाढ करून म्हणजे दरमहा मासिक लायसेन्सी रक्कम रुपये ४,४००/- मात्र (एकत्रित) प्रमाणे आकारुन लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर गाळयास मुदतवाढ दिनांक ०१/०४/२००७ रोजी पासून ते दिनांक ३१/०३/२०१० अखेर तीन वर्षाचे कालावधीकरिता पुन्हा मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को ऑप सोसायटी लि.,शिर्डी यांना लायसेन्स फीचे रक्मेत १०% वाढ करुन तूर्त एक वर्षासाठी तात्पूरती मुदतवाढ देण्यात यावी व दरम्यानचे काळात साईभक्तांना गरम पाणी उपलब्ध करुन देणेसाठी सोलर सिस्टम बसविणेकामी प्रस्ताव तयार करण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-विधी अधिकारी/विद्युत विभाग प्रमुख/बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.४३ राहाता नगरपरिषदेसाठी विविध विकास कामांसाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२९०.** अध्यक्षा,राहाता नगरपरिषद राहाता यांनी दि.१७/०१/२००७ चे पत्रान्वये च्राहाता नगर परिषद ही दि.१२/११/१९८७ रोजी स्थापना झालेली असून उत्पन्नाची साधने मर्यादित आहे. त्यामुळे नागरीकांना

नागरी सुविधा पुरविणे नगरपरिषदेला शक्य होत नाही. याकरीता नगरपरिषद हद्दीमध्ये खालील विकासाचे कामे करावयाचे आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | राहाता शहर मिरवणुक मार्ग कॉंक्रिटीकरण करणे | ४०.०० लाख रुपये |
| २ | मायंबा मदिरासमोर कॉंक्रिटीकरण करणे | १५.०० लाख रुपये |
| ३ | राहाता ते पुणतांबा रोड डांबरीकरण करणे. | २५.०० लाख रुपये |
| ४ | राहाता ते पिंपळवाडी रोड डांबरीकरण करणे. | २०.०० लाख रुपये |
| ५ | राहाता ते रांजनगांव रोड डांबरीकरण करणे. | २५.०० लाख रुपये |
| ६ | राहाता ते अस्तगांव रोड डांबरीकरण करणे. | १५.०० लाख रुपये |
| ७ | राहाता ते पिंपळस रोड डांबरीकरण करणे. | १०.०० लाख रुपये |
| ८ | लोकरुचीनगर,गांधीनगर,अंतर्गत रक्ते डांबरीकरण करणे. | २०.०० लाख रुपये |
| ९ | राहाता नगरपरिषद कार्यालयात फर्निचर तयार करणे. | २५.०० लाख रुपये |
| | अक्षरी- रुपये दोन कोटी मात्र. | २००.०० लाख रुपये |

तरी श्रीसाईबाबा संस्थानमार्फत **रु.२ कोटी** आर्थिक मदत मिळावी, असे कळविले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याचवेळेस अध्यक्ष कोपरगाव नगरपरिषद, कोपरगाव यांनी त्यांचे दिनांक २७.३.२००७ चे पत्रान्वये कोपरगाव पाणीपुरवठा योजनेअंतर्गत येसगाव ते कोपरगाव ७ कि.मी.लांबीची नविन पाईप लाईन तसेच नविन जलशुद्धीकरण केंद्र उभारणेकामी एकूण किंमत रुपये ४,७८,३४,५७८.०० रकमेपैकी लोकवर्गणीची १०% रक्कम रुपये ४७,८३,४५८.०० नगरपरिषदेची आर्थिक परिस्थिती अत्यंत खराब असल्याने सदर रक्कम भरणेकामी अनुदान मिळणेबाबत विनंती केली आहे.

तसेच सरपंच, ग्रुप ग्रामपंचायत पुणतांबा-रस्तापूर ता.राहाता यांनी त्यांचे दिनांक ३१.०३.२००७ चे पत्रान्वये वाड्या व वस्त्यांवर पाणीपुरवठा करणेकामी एकूण रुपये १,७६,००,०००/- खर्च अपेक्षित असून १०% लोकवर्गणीपैकी काही रक्कम ग्रामपंचायतीने शासनाकडे भरलेली असून उर्वरित रक्कम रुपये ११,०२,७५३/- लोकवर्गणी भरणेस विनंती केली आहे.

त्याचप्रमाणे नगराध्यक्षा, राहाता नगरपरिषद, राहाता यांनी त्यांचे दि.३०.३.२००७ चे पत्रान्वये पाणीपुरवठा योजनेसाठी एकूण ९५० लाख खर्चाचे १०% लोकवर्गणीपैकी रु.१७.५०लाख लोकवर्गणी भरलेली आहे. उर्वरित रु.७७.५० लाख लोकवर्गणी भरणेकामी विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, राहाता नगरपरिषद हद्दीतील राहाता शहर मिरवणुक मार्ग कॉंक्रिटीकरण करणेकामी रुपये ४० लाख आर्थिक मदत देण्यात यावी, तसेच राहाता नगरपरिषद, कोपरगाव नगरपरिषद व ग्रुप ग्रामपंचायत पुणतांबा-रस्तापुर यांना पाणी पुरवठ्यासाठी लोकवर्गणीची रक्कम भरणेकामी अनुदान देण्यात यावे, याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/प्रशासन शाखा,वशी-०३)

**विषय नं.४४ चैतन्य संत सेवा मंडळ,तासगांव जि.सांगली यांना मंदिर बांधकामासाठी आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२९१.** सदरहू विषयाबाबत छाननी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.४५ अमेय पालक संघटना,ठाणे व क्षितीज मतिमंद मुलांची शाळा डोंबीवली यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९२.** सदरहू विषयाबाबत छाननी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.४६ श्री विठ्ठल रुख्मिणी मंदिर ट्रस्ट,शिर्डी यांना मंदिराचे अपूर्ण बांधकाम व इतर कामास आर्थिक मदत देणे बाबत.**

**निर्णय क्र.२९३.** सदरहू विषयाबाबत छाननी समितीमध्ये निर्णय घेण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०३)

**विषय नं.४७ बुलढाणा अर्बन को-ऑप क्रेडीट सेवा सोसायटी मर्यादित बुलढाणा यांना भक्तनिवाससाठी संस्थेस जागा उपलब्ध करुन देणेबाबत.**

**निर्णय क्र.२९४.** मा.अध्यक्ष, बुलडाणा अर्बन को-ऑप. क्रेडीट सेवा सोसायटी मर्या.,बुलडाणा यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक मुख्यालय/प्रशा.वि./शिर्डी/भ.नि.जागा.ख.प./२९१६/०६-०७, दिनांक ०६ फेब्रुवारी,२००७ भक्तनिवासासाठी संस्थेस जागा मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.४८ विविध संस्थांनी मागणी केलेल्या शिध्याबाबत.**

**निर्णय क्र.२९५** (अ) खालील समितीने मा.अध्यक्ष महोदय, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | रामदास महाराज, श्री संत कैकाडी महाराज, भारतीय एकीची सहस्त्रकोटी नामाची झोपडी, श्री क्षेत्र | दि.१९/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर पंढरपूर ते देहू दिंडी यात्रा सोहळा | रु. ५०,०००/- पर्यंत शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

| | | | |
|---|---|---|---|
| | पंढरपूर-४१३३०४ (अर्ज दि.१९/०२/२००७) | कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | |

तरी रामदास महाराज, श्री संत कैकाडी महाराज, भारतीय एकीची सहस्त्रकोटी नामाची झोपडी, श्री क्षेत्र पंढरपूर यांना दि.१९/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर पंढरपूर ते देहू दिंडी यात्रा सोहळा कार्यक्रम होणार असून दिंडी यात्रा सोहळयासाठी रु. २५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(ब)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | राहाता तालुका माऊली ग्रामीण विकास सेवाभावी संस्था-एकरुखे व समस्त ग्रामस्थ, मौजे-एकरुखे, गणेशनगर,ता.राहाता, जि.अ. नगर, (अर्ज दि.२६/०२/२००७) | दि.२७/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर तुकाराम बीजेनिमित्त अखंड हरिनात सप्ताह व ग्रंथराज तुकाराम महाराज संगित गाथा पारायण सोहळा कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |
| ०२. | सौ.लक्ष्मी रामनाथ माळी, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, कान्हेगांव, ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर (अर्ज दि.२८/०२/२००७) | दि.२६/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर अखंड हरिनात सप्ताह व ग्रंथराज तुकाराम महाराज संगित गाथा पारायण सोहळा (५० वा सुवर्ण महोत्सवी) कार्यक्रमाचे महाप्रसादा-साठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी राहाता तालुका माऊली ग्रामीण विकास सेवाभावी संस्था-एकरुखे व समस्त ग्रामस्थ, मौजे-एकरुखे, गणेशनगर,ता.राहाता,जि.अ.नगर,यांना दि.२७/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज तुकाराम महाराज संगित गाथा पारायण सोहळयासाठी रु. २५,०००/- व सौ.लक्ष्मी रामनाथ माळी, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, कान्हेगांव, ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर यांना दि.२६/०२/०७ ते दि.०६/०३/२००७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज तुकाराम महाराज संगित गाथा पारायण सोहळयासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(क)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री दिलीप लक्ष्मण पाटील, श्री विठ्ठल मंदीर संस्थान, येवले, मोठे महादेव मंदीराजवळ, मु.पो.ता. येवले,जि.नाशिक, (अर्ज दि.०४/०३/२००७) | संत दासगणू महाराज प्रतिष्ठाण गोरटे,जि.नांदेड यांचेवतीने दि.०५/०३/०७ ते दि.०७/०३/२००७ अखेर तुकाराम बीज कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी श्री दिलीप लक्ष्मण पाटील, श्री विठ्ठल मंदीर संस्थान,येवले, मोठे महादेव मंदीराजवळ, मु.पो.ता. येवले,जि.नाशिक,,यांना दि.०५/०३/०७ ते दि.०७/०३/२००७ अखेर तुकाराम बीज सोहळयासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(ड)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा ग्रंथालय संघ, राहुरी, द्वारा-जिजामाता ग्रंथालय, सातभाई गल्ली, चांदखनवली बाबा जवळ, राहुरी-४१३ ७०५,जि.अ.नगर (अर्ज दि.१५/०३/२००७) | नाशिक विभागीय ग्रंथालय संघाचे अधिवेशन (दि.१८/०३/२००७ रविवार) आलेल्या प्रतिनिधींना शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. |

तरी अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा ग्रंथालय संघ, राहुरी, द्वारा-जिजामाता ग्रंथालय, सातभाई गल्ली, चांदखनवली बाबा जवळ, राहुरी-४१३ ७०५,जि.अहमदनगर यांना दि.१८/०३/०७ रविवार रोजी होणा-या नासिक विभागीय ग्रंथालय अधिवेशन कार्यक्रमासाठी रु. ५,०००/- पर्यंतच्या वस्तू

शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

**(इ)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्षसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी व आमदारसाहेब यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अर्जूनराव विष्णु पा.चौधरी, चेअरमन झोटींगबाबा सह.दूध व्याव.संस्था, व ग्रामस्त नांदुर्खी-बु.II ता. राहाता, जि.अहमदनगर (अर्ज दि.१६/०३/२००७) | नांदुर्खी गांवाची जत्रा, त्यात काशि-पाणी मिरवणूक व श्री झोटींगबाबा देवास स्नान व हरिकिर्तनाचा धार्मिक कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | रु.२५,०००/- पर्यंत शिधा देणे बाबत मा. विखे पाटील यांचे आर.ओ.चे पत्र. |
| ०२. | अध्यक्ष, श्री हरिहर केशव गोविंद संस्थान बन ट्रस्ट, बेलापूर खूर्द, ता.श्रीरामपूर,जि.अहमदनगर (अर्ज दि.०१/०३/२००७) | देवांचा वाढदिवसानिमित्त दि.१७/०३ ते दि.२४/०३/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | श्री वाकचौरे शिधा देण्यात यावा असा मा. अध्यक्ष यांचा शेरा. |
| ०३. | समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ, चिकणी खामगांव नं.२, ता.नेवासा, जि.अहमदनगर मो.नं.९४२१५९३६२२/-३३०१२५ (अर्ज दि.नाही) | दि.२१/०३ ते दि.२८/०३/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | श्री वाकचौरे शिधा मंजूर करण्यात यावा असा मा. अध्यक्ष यांचा श्री अभंग, विश्वस्त यांचे पत्रावर शेरा. |

तरी अ.नं. ०१ व ०२ मधील श्री अर्जूनराव विष्णु पा.चौधरी, चेअरमन झोटींगबाबा सह.दूध व्याव.संस्था, व ग्रामस्त नांदुर्खी-बु.II ता. राहाता, जि.अ.नगर यांना नांदुर्खी गांवाची जत्रा, त्यात काशि-पाणी मिरवणूक व श्री झोटींगबाबा देवास स्नान व हरिकिर्तनाचा (२३/०३ ते २५/०३/०७) धार्मिक कार्यक्रमासाठी व अध्यक्ष, श्री हरिहर केशव गोविंद संस्थान बन ट्रस्ट, बेलापूर खूर्द, ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर यांना देवांचा वाढदिवसानिमित्त दि.१७/०३ ते दि.२४/०३/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी रु. २५,०००/- पर्यंत व अ.नं. ३ मधील सरपंच, ग्रामपंचयत कार्यालय, खामगांव, समस्त ग्रामस्थ व भजनी मंडळ, चिकणी खामगांव नं.२, ता.नेवासा, जि.अहमदनगर यांना दि.२१/०३ ते दि.२८/०३/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी रु.२५,०००/- पर्यंतची शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- प्रशासन शाखा वशी- ०५)

**विषय नं.४९** **श्री.सुधाकर जोशी,आय.ए.एस.(सेवानिवृत्त) यांचेकडे बांधकाम व भांडार खरेदी नियमावली, कर्मचारी सेवानियम व अधिकारी/कर्मचारी आकृतीबंधाची कामे सोपविणे बाबत.**

**निर्णय क्र. २९६.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०७/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.३६९ अन्वये (०१) अधिनियम दुरुस्ती (०२) नियमावली दुरुस्ती (०३) सभाकामकाज नियमावली (०४) सल्लागार समिती नियमावली (०५) छाननी समिती नियमावली (०६) भक्तमंडळ सभा विनियम (०७) भक्तमंडळ सदस्यत्वाच्या अटी/शर्ती (०८) बांधकाम व भांडार खरेदी नियमावली (०९) कर्मचारी सेवानियम (१०) अधिकारी/कर्मचारी आकृतिबंध.

यापैकी अ.नं.०१ ते ०७ ही पहिल्या टप्यात तर अ.नं. ०८ ते १० ही कामे दुसऱ्या टप्प्यात श्री सुधाकर जोशी यांचेकडून करुन घ्यावेत, असा पारीत झालेला आहे.

यानंतर मा.व्यवस्थापन समितीची सभा दि.०६/०८/२००५ चे सभेतील निर्णय क्र.३९८ "अधिनियम २००४ नूसार मा.व्यवस्थापन समितीचे कामकाज सुरु होऊन,एक वर्षे पूर्ण झाले असून नियमानुसार विनियम दुरुस्तीकरणेसाठी फक्त एकच वर्षाचा कालावधी उरला असल्याने व वेळेत दुरुस्तीकरीता पाठविणे आवश्यक असल्याने टप्पा क्र.०१ ची कामे श्री सुधाकर जोशी यांचेकडे सोपविण्यात यावी, तसेच टप्पा क्र.२ ची कामे श्री जाधव साहेब निवृत्त कामगार,औरंगाबाद यांचेकडे सोपविण्यात यावी,ही कामे ती महिन्यात पुर्ण करुन मा.व्यवस्थापन समितीस सादर करणेबाबत कळविण्यात यावे, श्री जाधव यांची फी ठरविण्याचे अधिकार मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना प्रदान करण्यात आलेले आहेत ",असा पारीत झालेला आहे.

यांस अनुसरुन श्री बाळासाहेब जाधव,सेवानिवृत्त असि.लेबर कमिशनर,प्रिंपी चिंचवड,पुणे यांना इकडील जा.क्र.एसएसएस/वशी-०१/४५०५/२००६ दि.०३/०४/२००६ अन्वये संस्थान कर्मचारी आकृतिबंध, ऐच्छिक सेवानिवृत्ती व कर्मचाऱ्यांच्या पाल्यांचा शैक्षणिक फी परतावा इत्यादीबाबत नियमावली तयार करुन देण्याची विनंती करण्यात आली होती.याकामी त्यांना दिनांक ०८/०२/२००६ रोजी पुणे येथे समक्ष कागदपत्रे देण्यात आलेली असून दि.२५/०२/२००६ रोजी त्यांचे शिरडी भेटीत

त्यांना सर्व विभागात नेऊन कामाची प्रत्यक्षात माहिती देण्यात आली व दि. १४/०३/२००६ रोजी कोल्हापूर येथे समक्ष जाऊन कागदपत्रे देऊन संपर्क साधण्यात आलेला आहे.

तथापी त्यानंतर त्यांचे वयोमान, याकामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग नाही, व वैयक्तिक अडचणीमुळे सदर कामकाज पुर्ण करणे, त्यांना शक्य होणार नाही, असे त्यांनी सांगितलेआहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सुरुवातीच्या दिनांक १८/०७/२००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र. ३६९ " दोन्ही टप्यातील कामे श्री.सुधाकर जोशी,पुणे यांचेकडे सोपवावी " असा असल्याने उपरोक्त परिस्थिती विचारात घेता टप्पा क्र.२ मधील कर्मचारी सेवा नियम व अधिकारी आकृतिबंध ही कामे श्री सुधाकर जोशी यांचेकडे सोपविता येईल, आवश्यक ती कागदपत्रे संबंधीत विभागाकडून त्यांना पुरविण्यात येतील,याकामी त्यांना योग्य ते मानधन द्यावे लागेल. सदरचे मानधन मा.अध्यक्ष महोदय, यांनी ठरविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- प्रशासकिय अधिकारी, माहितीचा अधिकार/ दप्तर विभाग प्रमुख)

**यानंतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा सुरु करण्यात आली.**

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०१ संस्थानला प्राप्त झालेल्या मौल्यवान खड्यांचे (Stones) मुल्यांकनाबाबत.**

**निर्णय क्र. २९७.** श्री साईभक्तांकडून देणगीरुपात स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार - वस्तूसह मौल्यवान खडे संस्थान व्यवस्थापनाकडे साठलेले होते. अशा साठलेल्या सर्व खडयांचे ( Stones )_ मुल्यांकन (Off Set Value) करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १४२ नुसार आयकर/अबकारी विभागाकडून मान्यता प्राप्त असलेले तज्ञ मुल्यांकांनकार नेमून किमान दोन सदस्यांचे उपस्थितीत मुल्यांकन (Off Set Value) करुन घेण्यात यावे, असा निर्णय झालेला होता. तसेच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक०४ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १० नूसार, याकामी मा. उपाध्यक्ष महोदय यांचे मार्गदर्शन घेऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा, असा निर्णय झालेला होता. वरील निर्णयानूसार सोने-चांदी - वस्तु अलंकाराचे टंच काढणे व खडयाचे मुल्यांकनासाठी (Off Set Value) शासकीय मान्यता प्राप्त संस्थाची यादी मागविण्यात / प्राप्त करुन घेण्यात आलेली होती. सदर यादीतुन मा.उपाध्यक्ष महोदय तसेच मा.विश्वस्त के.सी.पाण्डैय यांनी निवड यादी तयार केली, सदर यादीनूसार, मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने मे. हिरो कालरा जेम्स ज्वेलर्स, पुणे, एबी आडगांवकर, नासिक या शासनमान्य मुल्यांकनकाराची याकामी नेमणुक करण्यात आलेली आहे.

नेमणुक केलेले मुल्यांकनकार व संस्थान नियुक्त मुल्यकनकार मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांचे कडून दिनांक ०१ मार्च, २००७ ते ०३ मार्च, २००७ व दिनांक १० मार्च, २००७ ते १२ मार्च, २००७ अखेर संस्थानचे स्टॉंग रुम मध्ये सिलबंद पिशव्यात ठेवलेले खडे सर्वासमक्ष उघडण्यात येऊन त्यांचे वेगवेगळया मशिन्स मध्ये पाहणी / पडताळणी करुन एकमताने संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक, पुर्व लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक यांचे प्रतिनिधींचे उपस्थितीत मुल्यांकन करुन घेण्यात आले आहे. वरील प्रमाणे मुल्यांकनाच्या कालावधीत दिनांक १० व ११ मार्च, २००७ रोजी विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई येथील वरीष्ठ अधिका-यांनी त्यांचे शिर्डी भेटीत समक्ष येऊन कामकाजाची पाहणी करुन माहीती घेतली.

उपरोक्त शासनमान्य मुल्यांकनकाराकडून सन २००० ते मार्च,२००७ पर्यतच्या कालावधीत प्राप्त झालेले तथा संचित असलेले खडयांचे (Stones) मुल्यांकन करुन घेण्यात आलेले असून त्याचे एकुण मुल्य रुपये २३,२६,९४१/- मात्र इतके झालेले आहे. वरील खडयापैकी ज्यांचे मुल्य रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) मात्र व त्यापुढे आहे अशा सर्व खडयांच्या स्वंतत्र पिशव्या (पुड्या) करुन श्री दिनेश कालरा, मे. हिरो जेम्स ज्वेलरी, पुणे यांचे सहीने सिलंबद करण्यात येऊन त्यासह इतर सर्व मुल्यांकन केलेले खडे सर्वांसमक्ष सिलकरुन त्याच दिवशी स्ट्रॅाग रुममध्ये ठेवण्यात आले आहेत. तसेच रजिस्टर प्रमाणे मुल्यांकन केलेल्या खडयांच्या यादया तयार करण्यात आल्या आहेत. तरी याबाबत खालील मुद्यांवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**(अ)** मुल्यांकन केलेल्या सर्व मौल्यवान खडयांच्या (Stones) मुल्यांकित यादया सादर केलेल्या आहे सदरचे यादीप्रमाणे मुल्यांकन केलेल्या खडयांचे मुल्य संस्थानचे वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक, पुर्व लेखापरिक्षक यांचे सल्ल्याने संस्थानचे लेख्यावर घेण्यास तसेच सदरहु खडयांबाबत पुढील कार्यवाही करावी .

**(ब)** तसेच संस्थानने नियुक्त केलेले मुल्यांकनकार अनुक्रमे (१) श्री. दिनेश कालरा, पुणे (२) श्री. आडगावकर, नासिक (३) श्री.कमालकर खरोटे,मनमाड यांनी दि.१/३/२००७ ते ३/३/२००७ व १०/३/ २००७ ते १२/३/२००७ असे एकुण सहा दिवस मुल्यांकनाचे कामकाज केलेले आहे. संस्थान मध्ये हे

काम प्रथमच झाले आहे. याकामी मुल्यांकनकारांनी शिर्डी येथे येऊन सेवा दिलेल्या आहेत. त्यांना रक्कम रुपये १०,०००/- मात्र प्रत्येकी मानधन देण्यात यावे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, वरील "अ" व "ब" प्रमाणे कार्यवाहीस मान्यता देण्यात आली. तसेच मुल्यांकन केलेल्या खड्यांपैकी रक्कम रुपये १०,०००/- चे वरील खडे वगळता उर्वरित सर्व खडे वर्षनिहाय कापडकोठी मार्फत मुल्यांकनकाराने ठरविलेल्या किंमतीपेक्षा जास्त दराने विक्रीस व लिलावाव्दारे टप्प्याटप्याने भक्तांना उपलब्ध करुन द्यावेत असे ठरले. यापूढे सदर मुल्यांकनाची प्रक्रीया दरवर्षी नियमित करण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०२ सेंट्रल बँक ऑफ इंडिया,श्रीशिवाजीनगर राहूरी यांचेकडील गुंतवणूकीचे मुदतपूर्व रोखीकरणबाबत.**

**निर्णय क्र. २९८.** शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी रु.१८,२३,६०,८२०/- इतक्या मोठया प्रमाणात रक्कम आदा करावयाची असल्याने, व संस्थानच्या बचत खात्यात एवढया मोठयाप्रमाणात रक्कम शिल्लक नसल्याने संस्थानकडे असलेल्या काही मुदतठेवींचे रोखीकरण करण्यात येऊन सदरची रक्कम मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांना डी.डी./चेक ने आदा करण्यात आलेली आहे.

सेंट्रल बँक ऑफ इंडीया, श्रीशिवाजीनगर, राहूरी यांचेकडे दि.२६.९.२००६ रोजी पावती नंबर २६२२१२ प्रमाणे रक्कम रु.७५,२८,०१८/- द.सा.द.शे. ८.५० % या व्याजदराने तीन वर्षांसाठी गुंतविण्यात आली होती. मुदतीपूर्वी सदरची रक्कम मिळण्यासाठी बँकेला जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/४३०४/२००७ दि.१६.३.२००७ या पत्राने कळविण्यात आले होते. रक्कम गुंतवणूक करुन १७५ दिवस इतका कालावधी झाल्याने या कालावधीकरीता द.सा.द.शे. ७ % या दराने उपरोक्त रकमेवर २,५३,४२२/- इतके व्याज बँकेने दिलेले आहे. परंतु उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये बँकेने चुकून सदरच्या रकमेवरचे व्याज हे ५.५० % ऐवजी ७ % या दराने आदा करण्यात आले असल्याचे कळविलेले आहे. तरी जादा आदा करण्यात आलेली रक्कम रु. ५४,३०५/- परत करण्यात यावी अशी विनंती सदरच्या पत्रात त्यांनी केलेली आहे.

तरी सेंट्रल बँक ऑफ इंडीया, श्रीशिवाजीनगर,राहूरी यांचेकडून संस्थानला जादा मिळालेली रक्कम रु.५४,३०५/- संस्थानचे लेखापरिक्षक यांचे मान्यतेने त्यांना तात्काळ परत आदा करावी असे ठरले. तसेच मा.व्यवस्थापन समितीच्या दि.१७.२.२००७ रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे शिर्डी एकात्मिक रस्ते विकास योजना प्रकल्पांतर्गत भूसंपादन कार्यवाहीसाठी रक्कम आदा करण्यासाठी विविध बँकातील काही गुंतवणूकींचे मुदतपूर्व रोखीकरण करण्यात आलेले आहे. याचीही लेखापरिक्षकामार्फत तपासणी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होंता,त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०३. कर्मचारी जादा वैद्यकीय बीलाचा परतावा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. २९९.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ. नं. | कर्मचाऱ्यांचे नाव | रुग्णालयाचे नाव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. बाबर सुजय आनंदराव | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | २५८५.०० | २५८५.०० |
| २ | श्री. श्रावण माधव चौधरी | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | २३३७.०० | २३३७.०० |
| ३ | श्री. अशोक त्रिबंक वारुळे | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | ५९८१.०० | ५९८१.०० |
| ४ | सौ. कल्पना रघुनाथ मुसमाडे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | १२०८.०० | १२०८.०० |
| ५ | श्री. सतिश गंगाधर बकरे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ७१६३.०० | ७१६३.०० |
| ६ | श्री. अरूण गणपत जाधव | प्रवरा रुरल हॉस्पिटल, लोणी | ५०३.०० | ५०३.०० |
| ७ | डॉ. अ. म. केसरकर | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | १२८६.०० | १२८६.०० |
| ८ | डॉ. सौ.मृणालीनी संतोष गोंदकर | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ५६३४.०० | ५६३४.०० |
| ९ | सौ. रोहीणी वसंत जक्का | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ११७१.०० | ३५६.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | श्री. डी. के झुरंगे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | १२४५.०० | १२४५.०० |
| ११ | श्री. राजतिलक दत्तात्रय बागवे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ३१२२.०० | ३१२२.०० |
| १२ | श्री. भाऊसाहेब नानासाहेब वाणी | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ७६४.०० | ७६४.०० |
| १३ | सौ. गिता आप्पासो. शिंदे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | २९०९.०० | २९०९.०० |
| १४ | श्री. सुभाष नारायण गर्कल | डॉ. पटवर्धन हॉस्पिटल, बीड. | २७६३०.०० | २०७८४.०० |
| १५ | श्री. सुधांशु परशुराम लोकेगांवकर | श्री साईबाबा रुग्णालय, शिर्डी. | १२०७४.९३ | १२०७१.०० |
| १६ | डॉ. एस. बी. गोंदकर | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ४३१८.०० | ४३१८.०० |
| १७ | श्री मनोज निवृत्ती वैद्य | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | ५५२.०० | ५४३.०० |
| १८ | श्री. बाबासाहेब कारभारी गोंदकर | लाईफ लाईन हॉस्पिटल,नाशिक | १२५२१.०० | १२५१०.०० |
| १९ | सौ. डॉ. आशा श्रीराम पेंडसे | श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. | १९०४.०० | १९०४.०० |
| | | एकुण रक्कम - | | ८७२२३.०० |

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०४. ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे अपग्रेडेशन बाबत.**

**निर्णय क्र.३००.**श्री साईनाथ रुग्णालयात इ.एन.टी./ऑप्थॅल्मीक ऑपरेशन करण्यासाठी मे.कार्ल झैस,जर्मनी या कंपनीचे एक ऑपरेटींग मायक्रोस्कोप सन १९९८ साली खरेदी करण्यात आला होता. सदरचा मायक्रोस्कोप आतापर्यंत अत्यंत व्यवस्थित काम देत आहे. त्यामुळे कंपनीकडे सदर मायक्रोस्कोपचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रॅक्ट करण्यात आलेले नाही.

श्रीसाईनाथ रुग्णालयातील इ.एन.टी.सर्जन डॉ.कुलकर्णी यांनी त्यांचे पत्र क्र.६३०५ दि.१५/०३/२००७ अन्वये सदरच्या मायक्रोस्कोपला C.C.D.कॅमेरा व ॲक्सेसरीज बसवुन देण्याची मागणी केलेली आहे. त्यामुळे ऑपरेशन करताना प्रत्यक्ष टी.व्ही.मॉनीटरवर R.M.O. यांना व पेशंटचे नातेवाईक यांना प्रत्यक्षपणे ऑपरेशन पाहता येईल तसेच शस्त्रक्रिया करतेवेळी इमेज मोठी दिसत असल्यामुळे त्यांचे काम सोपे व अधिक चांगल्या प्रकारे करणे शक्य होईल तसेच ज्युनीअर डॉक्टरांना शस्त्रक्रिया शिकविण्याकरीता देखील उपयोग करता येईल.

सदरच्या अपग्रेडेशनसाठी मे.कार्ल झैस इंडिया प्रा.लि.मुंबई यांचेशी संपर्क साधुन कोटेशन मागविण्यात आले आहे ते खालीलप्रमाणे.

| SR.NO. | DESCRIPTION | QTY. | PRICE IN EURO |
|---|---|---|---|
| 01 | Beam Splitter 50 | 01 | 2000 |
| 02 | CCTV Camera Equipments:- | | |
| | 1)Video objective lens f=85mm/C mount | 01 | 1750 |
| | 2)Medilive 1 CCD Camera, C-mount, PAL | 01 | 2500 |
| | C.I.F. Mumbai | | 6250 |
| | Approximately 1 EURO=Rs.53/- | | |
| | Total Amount In Rs. | | 3,31,250/- |

वरीलप्रमाणे मे.कार्ल झैस इंडिया प्रा.लि.मुंबई यांचेकडुन सदरचे अपग्रेडेशन करुन घेणेसाठी अंदाजें रु.३,३१,२५०/- (अधिक कस्टम डयुटी, VAT इत्यादी) खर्च अपेक्षीत आहे. सदरची खरेदी करतेवेळी युरोची आंतरराष्ट्रीय दराप्रमाणे भारतीय रुपयांमध्ये जो दर असेल त्याप्रमाणे एकुण खर्चाची रक्कम बदलु शकते. तसेच सदरचे एकुण खर्चाच्या रकमेची कंपनीने आगउ मागणी केलेली आहे.

परंतु अशाप्रकारचे ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे वरीलप्रमाणे अपग्रेडेशन मे.ऑप्टो फाईन प्रा. लि. मिरज ही कंपनी देखील करुन देउ शकते व सदर कंपनीने या प्रकारचे अपग्रेडेशन यापुर्वी देखील केलेले आहे. अशाप्रकारचे अपग्रेडेशन करण्यासाठी कंपनीने त्यांचे पत्र क्र.OPTO/QTN/ १३५/ २००७ दि.१४/०३/२००७ अन्वये खालीलप्रमाणे कोटेशन पाठविले आहे.

| SR. | DESCRIPTION | PRICE IN RS. |
|---|---|---|
| 01 | Beam Spliter with Relay lens for F55 Zeiss OPMI-MDU-01Nos. | 48,500/- |
| 02 | Samsung CCD Camera(Digital CCD)-01 | 23,400/- |
| | Total | 71,900/- |
| | + 12.5% VAT | 8,987/- |
| | Total | 80,887/- |
| | + Installation & Commissioning Charges | 2,750/- |
| | Grand Total | 83,637/- |

वरीलप्रमाणे मे.ऑप्टो. फाईन प्रा.लि.मिरज यांचेकडुन ऑपरेटींग मायक्रोस्कोपच अपग्रेडेशन करुन घेणेस एकुण रु. ८३,६३७/- इतका खर्च अपेक्षित आहे. कंपनीने एकुण रकमेच्या १/३ रक्कम म्हणजे रु.२७,८७९/- इतक्या खर्चाची आगाउ मागणी केलेली आहे.

तरी वरील दोन्ही कंपन्यांनी ऑपरेटींग मायक्रोस्कोपच्या अपग्रेडेशनसाठी दिलेला खर्च पाहता मे.ऑप्टो फाईन प्रा.लि.मिरज यांचेकडुन सदरचे अपग्रडेशन करुन घ्यावे असे मत आहे.

तरी मे.ऑप्टो फाईन प्रा.लि.मिरज यांचेकडुन इ,एन,टी,/ऑप्थॅल्मीक ऑपरेटींग मायक्रोस्कोपचे अपग्रेडेशन करुन घेणेस व त्यासाठी येणा-या एकुण रु.८३,६३७/- च्या खर्चास आणि मे.ऑप्टो. फाईन प्रा.लि.मिरज यांना १/३ रक्कम म्हणजे रु.२७,८७९/- इतकी रक्कम आगाऊ पाठविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०५. महिला बचत गट,श्रीरामपूर यांचेकडील गरम मसाला व काजू पाकळी खरेदी खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३०१.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०४.०२.२००६ मधील निर्णय क्र.११६ नुसार प्रसादालयासाठी आवश्यक असणारा कच्चा मसाला खरेदीसाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात आलेल्या निविदा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडणेत आलेल्या होत्या तसेच नमुने निवडणेत आलेले होते. त्यानंतर संबंधित निविदाधारकांशी चर्चा होऊन मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२४.०४.२००६ मधील निर्णयानुसार संबंधितांना न्युनतम दराने पुरवठा आदेश देणेत आलेले असून मागणीप्रमाणे पुरवठा चालू आहे. प्रसादालय विभागामध्ये कच्चा मसाल्याचे योग्य ते प्रमाण वापरुन गरम मसाला करणेत येऊन आवश्यकतेनुसार वापरणेत येत आहे.

संस्थानचे अध्यक्ष महोदय यांनी त्यांचे क्र.१०३४/०६ दि.०१.०२.२००६, दि.१८.०३.२००६ व दि.१८.०८.२००६ चे पत्राने श्रीरामपूर येथील नेहरु महिला बचट गट हे शहरी रोजगार योजना राबवित असून त्यांचेकडील उत्पादने योग्य त्या नेहमीच्या दराप्रमाणे खरेदी करुन सहकार्य करणेबाबत कळविलेले आहे. त्यास अनुसरुन नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर यांनी अध्यक्षांचे पत्राचा संदर्भ देऊन रु.१३०/-प्रती किलो दराने मसाला खरेदी करणेची विनंती केलेली होती. तसेच समक्ष चर्चेमध्ये रु.१०/-सुट देऊन रु.१२०/-प्रती किलो दराने ५० किलो गरम मसाल्याचा त्यांनी पुरवठाही केलेला आहे. नेहरुनगर महिला बचट गट, श्रीरामपूर यांनी दि.२२.०३.२००६ चे पत्राने मसाला पदार्थाचे भाव वाढल्याचे कळवून रु.२५०/-प्रती किलो दराची मागणी केलेली होती. त्यानुसार रु.२५०/-प्रती किलो दराने आजअखेर खरेदी चालू आहे.

मा.अध्यक्ष यांनी त्यांचे दि.१८.०८.२००६ चे पत्राने त्यांचे मतदार संघामध्ये शहरी रोजगार योजने अंतर्गत श्रद्धा महिला बचट गट कार्यरत असून ते काजू पाकळीचे उत्पादन करीत असल्याने संस्थानमध्ये योग्य त्या नेहमीच्या दराप्रमाणे खरेदी करुन बचत गटाला सहकार्य करणेबाबत कळविलेले आहे. त्यास अनुसरुन श्रद्धा महिला बचत गट, श्रीरामपूर यांनी ४७.६०० किलो काजूचा पुरवठा केलेला आहे.

तरी नेहरुनगर महिला बचत गट, श्रीरामपूर व श्रद्धा महिला बचत गट, श्रीरामपूर यांचेकडून वेळोवेळी खरेदी करणेत आलेल्या गरम मसाला व काजू पाकळीचे खरेदीस व त्याकामी आलेल्या एकुण रु.१,३०,६७४/-चे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,खरेदी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०६. क्रॉम्पटन ग्रीव्हज मेक सिलींग फॅन व सीएफएल ट्यूब खरेदीकामी आलेले कोटेशन उघडून कोटशनसादरकर्त्यांशी चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.३०२.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०६.०१.२००७ निर्णय क्र.४४ संस्थान कर्मचाऱ्यांचे नविन स्टॉफ क्वार्टरसाठी आवश्यक असणारे २७० नग क्रॉम्प्टन ग्रीव्हज मेक सिलींग फॅन व फिलीप्स कंपनीच्या २७० नग सी.एफ.एल.टयुब्ज खरेदीस व त्याकामी येणारे रक्कम रु.३,८९,५००/-पर्यंतचे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार संस्थान जा.क्र.एसएसएस/वशी/खरेदी-विदयुत/ ३६५०/२००७ दि.०७.०३.२००७ अन्वये दि.१७.०३.२००६ अखेर दरपत्रके मागणी करणेत आलेली होती. मुदतीअंती खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव व गांव |
|---|---|
| ०१ | काशिको ट्रेडींग प्रा.लिमीटेड, कोपरगांव |
| ०२ | दिपक इलेक्ट्रिकल्स, कोपरगांव |
| ०३ | हिंदुस्थान टुल्स ॲण्ड इंजिनीअरींग कंपनी, मुंबई |
| ०४ | सुरेंद्रकुमार ॲण्ड कंपनी, संगमनेर |
| ०५ | आनंद डिस्ट्रीब्युटर्स, राहाता |
| ०६ | स्वदर्शन इलेक्ट्रिकल्स, नाशिक |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेली दरपत्रके आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन, कोटेशनसादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. उपस्थित सर्व कोटेशनसादरकर्त्यां एकत्रित बोलावून त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सूट देणार किंवा कसे याबाबत बंद पाकिटात लेखी पत्र देण्यास सांगण्यात आले. त्यानुसार त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं. | कोटेशन्ससादरकर्त्याचे नांव | सिलींग फॅन क्रॉम्प्टन ग्रीव्हीज मेक हायस्पीड मॉडेल ब्राऊन कलर १२०० एमएम मागणी-२७० नग | | सी.एफ.एल.ट्युब १८ वॅट, २३० व्होल्ट फिलीप्स मेक मागणी २७० नग | |
|---|---|---|---|---|---|
| | | कोटेशन्समधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर | कोटेशन्समधील दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
| ०१. | काशिको ट्रेडींग कार्पोरेशन, कोपरगांव | १२११.०० | ११५८.०० | १२७.०० | १२०.०० |
| ०२. | दिपक इलेक्ट्रीकल्स,कोपरगांव | १२००.०० | ११५८.०० | १४३.०० | १३८.०० |
| ०३ | हिंदूस्थान टूल्स,मुंबई | १३५०.०० | अनुपस्थित | १४८.५० | अनुपस्थित |
| ०४. | सुरेंद्रकुमार ॲण्ड कंपनी,संगमनेर | १३००.०० | अनुपस्थित | १२३.९० | अनुपस्थित |
| ०५. | आनंद डिस्ट्रीब्युटर्स,राहाता | १४५०.०० | १३७७.५० | १६०.०० | १५२.०० |
| ०६. | स्वदर्शन इलेक्ट्रीकल्स,नाशिक | १२९६.०० | १२१०.०० | १४२.०० | १३५.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,मे.काशिको ट्रेडींग कार्पोरेशन,कोपरगांव यांचेकडून सिलींग फॅन व सी.एफ.एल.ट्युब्स निम्नतम दराने खरेदीकामी पूरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०७. श्रीसाईबाबा समाधी मंदिरास व मंदिर परिसरास फुलांची सजावट करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०३.** सालाबादाप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी.तर्फे श्रीरामनवमी उत्सव सोमवार दि. २६-०३-२००७ ते बुधवार दि. २८-०३-२००७ अखेर ३ दिवस साजरा करण्यात येणार आहे. उत्सवानिर्मीत्त समाधी मंदिर,गुरुस्थान,चावडी ,व्दारकामाई या सर्व ठिकाणी फुलांची सजावट करावयाची आहे.या सजावटी मध्ये त्यात फुलांची तोरणे,बास्केट,बुके इ.चा वापर करण्यात येणार आहे. या सजावटीसाठी जरबेरा,ॲस्टर,कार्नेशन,झेंडू ,शेवती इत्यादी जातीची फुले वापरण्यात येणार आहे.

मंदिर परिसरातील चारही महाव्दारांना तसेच व शनी मंदिर,गणपती मंदिर व महादेव मंदिर यांच्या दरवाजांना तोरणे लावून सजावट करण्यात येणार आहे.याकामी सजावट करणारे कुशल कारागीर यांचेकडून कोटेशन मागवून फुलांची सजावट करावयाची आहे.

याकामी खालील प्रमाणे ०४ नग कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.न. | कोटेशन सादरकर्त्याचे नाव व पत्ता |
|---|---|
| ०१ | व्दारकामाई फ्लॉवर,शिर्डी |
| ०२ | श्री जयनारायण पुष्पकला भांडार,अहमदनगर |
| ०३ | साई फ्लॉवरडेकोरेटर्स, पुणे |
| ०४ | श्री शाम पांडुरंग भगत,मुंबई |

सदरची कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेले आहेत. त्याचा तपशिल खालील प्रमाणे

| अ.न. | नाव व पत्ता | दर |
|---|---|---|
| ०१ | व्दारकामाई फ्लॉवर,शिर्डी | रु.१,२३,९००/- |
| ०२ | श्री जयनारायण पुष्पकला भांडार,अहमदनगर | रु.१,७०,९००/- |
| ०३ | साई फ्लॉवर डेकोरेटर्स, पुणे | रु.१,२५,०००/- |
| ०४ | श्री शाम पांडुरंग भगत,मुंबई | रु.३,००,२५०/- |

उपरोंक्त प्रमाणे क्र ०१ चे व्दारकामाई फ्लॉवर,शिर्डी यांचे रु.१,२३,९००/- हे दर सर्वात न्यूनतम असल्याने सजावट करण्याचे काम त्यांच्या कडून करुन घेण्यात आलेले आहे.

तरी उपरोक्त प्रमाणे श्रीरामनवमी उत्सव २००७ साठी द्वाराकामाई फ्लॉवर,शिर्डी यांचेकडून करुन घेतलेल्या मंदिर व मंदिर परिसरातील फुलांची सजावटीस व याकामी आलेल्या रक्कम रु.१,२३,९००/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख/बगीचा विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०८.** **श्रीद्वारकामाई धुनीसाठी गोवरी खरेदीकामी सन २००७-०८ या वर्षाकरिता आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र. ३०४.** श्रीव्दारकामाई धुनीसाठी गोवऱ्या खरेदीचे वार्षिक प्रमाणे अंदाजे ७०,००० किलो इतके आहे. सन २००६-२००७ (एप्रिल ते मार्च ) या वर्षाकरीता श्री कुसुमताई लक्ष्मण ढवळे, साकरवाडी यांचेकडून प्रति किलो रुपये २.२५ प्रमाणे गोवऱ्या खरेदी करण्यात आलेल्या आहेत.

एप्रिल,२००७ ते मार्च २००८ या वर्षाच्या कालावधीसाठी अंदाजे ७०,००० किलो गोवऱ्या खरेदीकामी जा.नं. एसएसएस-वशी-मंदिर-३५०५-२००७ दिनांक ५.३.२००७ अन्वये पत्र पाठवून दिनांक १०.३.२००७ अखेर दरपत्रके मागविण्यात आलेली होती.

त्यानुसार खालीलप्रमाणे दरपत्रके प्राप्त झालेली आहेत.

| अ.नं. | कोटेशनसादरकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१. | श्रीमती कुसूमबाई ल.ढवळे,साकरवाडी |
| ०२. | श्रीमती जयश्री लक्ष्मण ढवळे,साकरवाडी |
| ०३. | श्री विजय पितांबर देवरे,मालेगाव |
| ०४. | श्री संतोष मोतीराम सुर्यवंशी,लुल्ले मालेगाव |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेले कोटेशन्स आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता कोटेशन्ससादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| **अ.नं.** | **कोटेशनसादरकर्त्याचे नांव** | **कोटेशनमधील दर प्रती किलो रुपये** |
|---|---|---|
| ०१. | श्रीमती कुसूमबाई ल.ढवळे,साकरवाडी | ३.५० |
| ०२. | श्रीमती जयश्री लक्ष्मण ढवळे,साकरवाडी | ३.७५ |
| ०३. | श्री विजय पितांबर देवरे,मालेगाव | २.५० |
| ०४. | श्री संतोष मोतीराम सुर्यवंशी,लुल्ले मालेगाव | २.७० |

यावर सविस्तर चर्चा होऊन,श्री.विजय पितांबर देवरे,मालेगाव यांचे निम्नतम दर स्वीकरणेत येऊन, त्यांना सन २००७-०८ या सालाकरिता द्वारकामाई धुनीसाठी लागणाऱ्या गोवऱ्या पुरवठा करणेकामी आदेश देण्यात यावा,असें ठरलें. (कार्यवाही-अधिक्षक,मंदीर/अधिक्षक,खरेदी विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ०९.** **कोपरगाव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे कामासाठी उपलब्ध करुन द्यावयाचा निधी वर्ग केलेबाबत मा.विश्वस्त यांचे आलेले पत्र**

**निर्णय क्र. ३०५.** **(अ)** कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचे दिनांक २० ऑक्टोबर,२००५ रोजीचे प्रस्तावानुसार, कोपरगांव शहरातील मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे खडीकरण व डांबरीकरण संस्थानाच्या निधीतून करणेबाबत मा.व्यवस्थापन समितीच्या विविध निर्णयानुसार मान्यता देण्यात आलेली आहे. त्यास अनुसरुन विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना निधी उपलब्ध करुन देणेबाबतच्या मा.व्यवस्थापन समितीच्या निर्णयास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आला होता.

विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००५/११३८/(२)/का.१६ दिनांक १३ एप्रिल, २००६ अन्वये कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे दुरुस्तीकरीता होणारा खर्च रक्कम रुपये १,१२,४९,५१०/- (अक्षरी रुपये एक कोटी बारा लाख एकोणपन्नास हजार पांचशे दहा मात्र) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था निधीतून करणेस व सदर रक्कम कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना अदा करण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

**(ब)** उपरोक्तप्रमाणे शासन निर्णयानुसार, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना मध्यवर्ती पालखी व गंगाजल कावडी मार्गाचे दुरुस्तीकरीता उपलब्ध करुन द्यावयाचा निधी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचेकडे टप्प्याटप्प्याने वर्ग करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ८५ अन्वये मान्यता मिळालेली आहे. त्यास अनुसरुन दिनांक १२ जानेवारी, २००७ रोजी पहिल्या टप्प्यात रक्कम रुपये ५० लाख मात्रचा निधी डिमांड ड्राफ्टव्दारे कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांचेकडेस वर्ग करण्यात आलेले आहेत.

**(क)** तद्नंतर, मा.विश्वस्त श्री.अशोकराव भि.खांबेकर यांनी दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजी मा.अध्यक्षसाो. यांना अग्रेषित केलेल्या पत्रानुसार, " कोपरगांव नगरपरिषदेकडे वर्ग केलेला पन्नास लाखाचा निधी परत मागवून घ्यावा व रस्त्याचे काम विश्वस्त मंडळाचे नावलौकीकासाठी रस्ते विकास महामंडळाकडे सोपवावे "असे कळविले आहे.

मा.विश्वस्त श्री. खांबेकर यांचे पत्राचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे :

"कोपरगांव नगरपालिकेने या रस्त्याचे भूमिपूजन दि. १२.०१.२००७ रोजी केले त्यावेळी पन्नास लाख रुपयांचा निधी दिला. सदर निधी टेंडर नोटिस एजन्सी निश्चित केल्यानंतर देणे आवश्यक होते. आज एक महिना होऊन कार्यवाही झाली नाही. अजून एक महिन्यांपेक्षा जादा काळ लागणार असल्याने संस्थानचे व्याजाचे नुकसान झाले यास जबाबदार कोण ? विश्वस्त मंडळाचे सभेत कोणतीही चर्चा न होता आयत्या वेळी विषय घेण्यात आला. त्यात पन्नास लाख रुपयांची चर्चा करण्यात आली असे म्हटले, प्रत्यक्षात अशी चर्चा झाली नाही. हे निदर्शनास आणून देतो.

कोपरगांव नगरपालिकेकडे बांधकाम अभियंता नाही. गेल्या एक वर्षापासून कोणताही तांत्रिक कर्मचारी वर्ग नाही. एक ड्राफ्टसमनकडे अभियंत्याचे काम असताना बांधकाम विभाग कार्यक्षमतेने एवढया मोठया निधीचा वापर करुन शकणार नाही.

सदरचे काम उत्तम दर्जाचे होण्यासाठी नगरपालिकेकडे निधी देण्याऐवजी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी देण्याची शिफारस व्यवस्थापन समितीचे दिनांक १५.०५.२००६ चे सभेतील निर्णय क्र.३२३ नुसार ठरले. त्यानंतर अचानक हा निधी परत नगरपालिकेकडे देणेत यावा असे सांगितले, या संदर्भातील त्रुटी मा.मुख्यमंत्री यांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व हा निधी सार्वजनिक बांधकाम किंवा रस्ते विकास महामंडळाकडेच देण्यात यावा. मा. मुख्यमंत्री यांना भेटण्यापूर्वीच नगरपालिकेची मागणी दिनांक ०६.०१.२००७ चे सभेत आयत्या वेळेच्या विषयांत मान्य करण्यात आली हे चूकीचे आहे.

सदरचा निधी हा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे देण्यात यावा, शिर्डी व कोपरगांव नगरपंचायतीसाठी एकच नियम लागू करावा ही अपेक्षा.

श्रीसाईबाबांच्या भक्तांच्या श्रध्देने देण्यात येणारा पैसा सत्कारणी लागावा, यासाठी पन्नास लाखाचा निधी परत मागवून घ्यावा व रस्त्याचे काम विश्वस्तमंडळाचे नावलौकिकासाठी रस्ते विकास महामंडळाकडे सोपवावे अशी मागणी आहे. "

तसेच मा.विश्वस्त श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी त्यांचे उपरोक्त पत्रासोबत, कोपरगांव नगरपरिषदेच्या अकरा सदस्यांच्या सह्या असलेले, कोपरगांव शहर विकास आघाडी, कोपरगांव यांचे मा.मुख्याधिकारी, कोपरगांव नगरपरिषद, कोपरगांव यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक १० फेब्रुवारी, २००७ रोजीचे पत्राची व वर्तपत्रात प्रसिध्द झालेली विषयांकित रस्त्याची टेंडर नोटीस या जाहिरातीची छायांकित प्रत ही जोडलेली आहे.

उपरोक्तप्रमाणे मा.विश्वस्त श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांचे पत्र मा.व्यवस्थापन समितीचे माहितीस्तव-तथा-विचारार्थ सादर मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केले होते. सदरील विषय आजचे सभेपुढे चर्चेस येत असतांनाच, मा.विश्वस्त श्री.अशोकराव भि. खांबेकर यांनी उपरोक्त विषयांकित पत्र मागे घेत असल्याचे सभागृहात जाहीर केले, त्यामुळे सदरील विषय मागे घेण्यात आला. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं. १०. लाडू काऊंटर्ससाठी Awning shed उभारणेबाबत**

**निर्णय क्र. ३०६.** मंदिर परिसरात महाव्दाराजवळ लाडू काऊंटर सुरु करणेत आलेले आहे. याठिकाणी साईभक्तांचे उन, वारा, व पाऊस यापासून संरक्षण होणेकरीता २०'x१०' साईजचे Awning Shed उभारणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०६/०१/२००७ चे सभेत निर्णय क्र.०५ अन्वये निम्नतम दर असलेले ठेकेदार मे. मेकॅन्को इन्टरप्रायजेस, पुणे यांचे कोटेशन मंजूर करण्यात आलेले असून ठेकेदार यांनी काम पूर्ण केलेले आहे.

सुरवातीला चार लाडू कांऊन्टर चालू करण्यात आले होते. त्यामुळे त्यावेळेस २०'x१०' साईजचे Awining Shed घेण्यात आले होते. आता सदर ठिकाणी नव्याने आणखी लाडू कांऊन्टर सुरु करण्यात आलेले आहेत. असे एकूण ०९ लाडू कांउन्टर चालू करण्यात आले त्यामुळे वरिल पाच काऊन्टर्स वर २२'-०"x१०'-०" साईजचे Awing shed करणे आवश्यक आहे. याकामी दर मंजूर असलेले ठेकेदार मे.मेकॅन्को इंन्टरप्रायजेस, पुणे यांचेकडून सदरचे काम करुन घेतल्यास रुपये ३१,१७३.०० मात्र खर्च अपेक्षीत आहे.

तरी सदरचे काम ठेकेदार मे. मेकॅन्को इन्टरप्रायजेस,पुणे यांचेकडून करुन घेणेस व याकामी येणारे रुपये ३१,१७३.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ११.** **शिर्डी साई ट्रस्ट चेन्नई यांचेमार्फत विकसित करण्यात येणारे साईध्यान व साईविश्राम प्रकल्पासाठी जागा निश्चित करणे बाबत.**

**निर्णय क्र. ३०७. (अ)**शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे कार्यकारी विश्वस्त श्री.के.व्ही.रमणी यांनी मा.अध्यक्षसो. यांना अग्रेषित केलेल्या दिनांक १६ मार्च, २००७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

त्याचा थोडक्यात गोषवारा :

“आमचेमार्फत शिर्डी येथे बांधण्यात येणारे साईध्यान (ध्यान मंडप) व साईविश्राम (वृध्दाश्रम व अनाथालय) हे दोन प्रकल्प श्री साईबाबा संस्थान,शिर्डी यांचेकडून जागा उपलब्धतेअभावी प्रलंबित आहेत.

आम्हांला असे समजले आहे की, सध्याचे साई प्रसादालय माहे जून,२००७ मध्ये बांधून पूर्ण होत असलेल्या नवीन प्रसादालय इमारतीत स्थलांतरीत होत आहे. आमची विनंती आहे की, सध्याचे प्रसादालय ज्यावेळेस स्थलांतरीत होईल, त्यावेळेस या इमारतीच्या एकूण जमिनीपैकी अंदाजे २५ टक्के जमीन साई ध्यान (ध्यान मंडप) बांधणेसाठी द्यावी. आम्ही गेल्या कित्येक महिन्यांपासून जमिनीचे उपलब्धतेची वाट पाहत असून, शिर्डी येथे भेट देणाऱ्या साईभक्तांसाठी ध्यान मंडप बांधण्याची आमची इच्छा आहे.

तसेच आम्हांला असे समजले आहे की, संस्थानच्या मध्यवर्ती भांडारालगत असलेली जमिनीची भूसंपादन कार्यवाही शेवटच्या टप्प्यात आहेत. आमची विनंती आहे की, ०९ एकर असलेल्या या जमिनीपैकी ०६ एकर जमीन आम्हांला साईविश्राम (वृध्दाश्रम व अनाथालय) बांधण्यासाठी द्यावी.

आमची विनंती आहे की, जमिनीचे मोजमापासह उपलब्ध जमिनीचा नकाशा आदि माहिती पत्रासह पाठवावी, जेणेकरुन आम्हांस या प्रकल्पासाठी इमारतीचे आरेखन-रेखांकन लवकरात लवकर सुरु करता येईल.”

**(ब)** शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे कार्यकारी विश्वस्त श्री.के.व्ही.रमणी यांनी उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्यानुसार साईध्यान व साईविश्राम या प्रकल्पांसाठी जमिनीची मागणी केलेली आहे.

संस्थानमार्फत मौजे निमगांव कोऱ्हाळे शिवारात नियोजित प्रसादालय इमारतीचे बांधकाम वेगाने सुरु आहे. सदरील प्रसादालय इमारतीचे बांधकाम माहे जून,२००७ अखेर पूर्ण करण्याचे नियोजित आहे. मात्र सध्याचे प्रसादालय लगेचच तेथे स्थलांतरीत करता येईल किंवा कसे याबाबत परिस्थितीनुरुप निर्णय घ्यावा लागेल. तसेच सध्या प्रसादालयाच्या इमारतीच्या ठिकाणी काय करावे, याबाबत अजूनपर्यन्त मा.व्यवस्थापन समितीने निर्णय घेतलेला नाही. सदर जागा मंदिर परिसराचे जवळ मोक्याचे ठिकाणी आहे. त्यामुळे भविष्यात सदर जागेचा विकास कशा प्रकारे व कोणत्या प्रयोजनासाठी करावयाचा हे दूरगामी विचार करुन ठरविणे योग्य राहिल.

तसेच साईविश्राम प्रकल्पासाठी सध्या मध्यवर्ती भांडारालगत म्हणजेच आरक्षण क्रमांक ३९ (सर्व्हे नंबर १२४, १२५ व १२६ पैकी) मधील क्षेत्र हे संस्थानच्या विविध उपक्रमांसाठी आरक्षित आहे. सदर क्षेत्राची भूसंपादन कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. सदर आरक्षणाखालील भूखंडावर संस्थानचे विकास प्रकल्प उभारणेसाठी प्रथम संपूर्ण भूखंडाचा विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यामध्ये संस्थानचे ध्येयधोरणास अनुसरुन प्राधान्याने निर्माण करावयाच्या सोयी-सुविधांचा समावेश करावा लागेल. सदर भूखंड हा शिर्डी शहराचे मुख्य लोकवस्तीजवळ व नांदुर्खी रस्त्यालगत आहे.

उपरोक्त परिच्छेदांमध्ये नमूद केल्यानुसार, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे कार्यकारी विश्वस्त श्री. के. व्ही. रमणी यांनी साईध्यान (ध्यान मंडप) प्रकल्पासाठी सध्याचे प्रसादालयाची जागा व साईविश्राम (वृध्दाश्रम व अनाथालय) प्रकल्पासाठी आरक्षण क्रमांक ३९ (सर्व्हे नंबर १२४, १२५ व १२६ पैकी) मधील एकूण क्षेत्रापैकी ०६ एकर जागा निश्चित करणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी मा.व्यवस्थापन समितीचे विचारार्थ सादर केला होता.

या प्रस्तावावर साधकबाधक चर्चा होऊन, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई चे कार्यकारी विश्वस्त श्री.के.व्ही.रमणी यांचे उपरोक्त पत्रात केलेल्या विनंतीस अनुसरुन, साईविश्राम (वृध्दाश्रम व अनाथालय) प्रकल्पासाठी आरक्षण क्रमांक ३९ (सर्व्हे नंबर १२४, १२५ व १२६ पैकी) मधील भूसंपादनाव्दारे ताब्यात मिळणाऱ्या क्षेत्रापैकी ०३ एकर जमीन / जागा बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. तसेच साईध्यान (ध्यान मंडप) प्रकल्पासाठी सध्याचे प्रसादालय परिसरातील सर्व्हे क्र.३ मधील जागेपैकी १० आर (१००० चौरस मीटर) जागा बांधकामासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे मौज निमगाव-कोऱ्हाळे गट नं.८७,८८ मधील

संस्थान मालकीचे क्षेत्रापैकी हेक्टर १.०६ आर (अंदाजे २.६५ एकर) क्षेत्र साईआश्रम प्रकल्पाचे बांधकामासाठी जागा उपलब्ध करुन देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १२. श्रीसाईनाथ रुग्णालय व धर्मशाळा येथील सांडपाणी टाक्यांवर स्लॅब टाकणेकामी आलेल्या निविदांवर निर्णय होणे**

**निर्णय क्र. ३०८.** मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/११/२००६ चे सभेत निर्णय क्र. ८८८ अन्वये धर्मशाळा इमारतीचे आर्किटेक्ट निकम पाटील यांचेकडून प्लॅन व एस्टीमेंट तयार करुन वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार दि. ०२/०२/२००७ चे स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविणेत आल्या.

निविदा विक्री ही दि. ०२/०२/२००७ ते दि. ०७/०२/२००७ पर्यंत ठेवण्यात आली सदर मूदत खालील तिन ठेकेदारांनी निविदा विकत घेतल्या होत्या.

०१.मे. आर.आर.कन्स्ट्रक्शन, नाशिक

०२.इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव

०३.मे.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर

सिलंबद निविदा सादर करणेसाठी दि. ०९/०२/२००७ सायंकाळी ६.३० पर्यंत मूदत देण्यात आली होती. सदर मूदतीत फक्त इंजि.पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांची एकमेव सिलबंद निविदा विहीत मूदतीत प्राप्त झाली होती.

त्यानुसार दि. १७/०२/२००७ चे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत झालेल्या निर्णयानुसार यापुर्वी ज्या ठेकेदारांनी अशा स्वरुपाच्या कामाच्या निविदा घेतल्या आहेत. अशा किमान ०५ ठेकेदारांकडून निविदा मागविण्यास मान्यता देण्यात आली.

त्यानुसार जा.नं. ३१५७ दि. ०३/०३/२००७ चे पत्रान्वये १२ ठेकेदारांना पत्र देण्यात आले होते व निविदा विक्रीचा कालावधी दि. ०५/०८/२००७ ते दि. १३/०३/२००७ ठेवण्यात आला होता निविदा सादर करणेसाठी दि. १५/०३/२००७ सायं ६.३० वाजेपर्यंत मूदत ठेवण्यात आली होती. तसेच पुर्वीचे निविदा सादरकर्ते इंजि. पाटील योगेश सुरेश यांनी दि. १३/०३/२००७ चे पत्रान्वये कळविले की मी भरलेली पुर्वीची निविदाच ग्राहय धरण्यात यावी व मला त्यात कुठल्याही बदल करावयाचा नाही असे कळविले.

उपरोक्त १२ ठेकेदारांपैकी विहीत मूदतीत कोणीही निविदा विकत घेतली अथवा सादर केली नाही.अशाप्रकारे दोन वेळेस निविदा मागवूनही फक्त इंजि. पाटील योगेश सुरेश यांची एकच निविदा प्राप्त झाली त्यामुळे उपरोक्त निविदा सादर करणेसाठी दि. २३/०३/२००७ अखेर मूदतवाढ देणेस व उपरोक्त १२ ठेकेदार तसेच त्यांचेव्यतिरिक्त इतर इच्छुक स्थानिक शासकीय नोंदणीकृत ठेकेदारांकडून निविदा मागविणेसाठी दि.१७.०३.२००७ टिपणी अन्वये मंजुरी देण्यात आली होती.त्यानुसार खालिल दोन नवीन ठेकेदारांनी निविदा सादर केल्या आहेत.अशाप्रकारे उपरोक्त कामासाठी खालिल प्रमाणे एकूण ०३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव |
|---|---|
| ०१ | इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव |
| ०२ | मे.रोडे जी.सी. येवला |
| ०३ | मे. खैरनार योगेश ए. येवला. |

वरीलप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेपुढे उघडण्यात येऊन,निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता,चर्चा/वाटाघाटीअंती त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नाव | निविदेतील दर रुपये | चर्चा/वाटाघाटीअंती देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|---|
| ०१ | इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव | २० % अधिक | १९ % अधिक |
| ०२ | मे.रोडे जी.सी., येवला | २३ % अधिक | २२ % अधिक |
| ०३ | मे. खैरनार योगेश ए., येवला. | २५ % अधिक | २३ % अधिक |

यावर सविस्तर चर्चा होऊन, इंजि. पाटील योगेश सुरेश, कोपरगांव यांची निम्नतम दराची निविदा स्वीकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा,असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १३. झरिनद्वारा रुपांत्तरीत इंग्रजी श्रीसाई समर्थ सत्चरित संस्थानद्वारा प्रकाशित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ३०९.** डायरेक्टर साईप्रेस (इंडिया) प्रा.लि., नवीदिल्ली यांचे दि.०१.०७.२००६ चे पत्राद्वारे कळविलेनुसार त्यांनी श्री साईबाबांच्या आशिर्वादाने झरिनद्वारा इंग्रजीतून अनुवादीत श्री साई समर्थ सत्चरित पुस्तक प्रकाशित करु शकलो असलेबाबत कळवून, सदरचे पुस्तक संस्थानमार्फत प्रकाशित करणेबाबत प्रस्तुत केले असून, तत्संबंधीत प्रकाशनाचे सर्व हक्क ते संस्थानला देणेस तयार असलेबाबत कळविले आहे, प्रथम हे पुस्तक अध्याय रुपाने श्री साईलिलेतून प्रसिद्ध झाले आहे. सदर पुस्तकाचे प्रथम आवृत्तीचे हक्क श्रीमती झरिन तारापोरवाला यांनी संबंधीतांना विकून आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. याबाबत प्रकाशने विभाग पत्र जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/ ९९९५/२००६ दि.२७.०७.२००६ अन्वये त्यांचेकडून डायरेक्टर साई प्रेस इंडिया प्रा.लि., नवीदिल्ली व लेखक

झरिन तारापोरवाला या दोघांमध्ये झालेल्या ॲग्रीमेंटची कॉपी मागविण्यात येवून याप्रमाणे दोघांच्या स्वाक्षरीनिशी असलेली ॲग्रीमेंटची कॉपी त्यांनी प्रकाशने विभागात दाखल केली आहे. सदरचे ॲग्रीमेंट कॉपीत सदर विषयांकित पुस्तकातील ५३ वा अध्यायात गुरुदेव सिवनेसन स्वामिजी यांचे जीवनाविषयी परिपूर्ण माहितीचा समावेश केला आहे.तथापी सिवनेसन स्वामिजी यांची कारकिर्द ही साईसत् चरिताचे लेखक कै.गोविंद रघुनाथ दाभोळकर यांचे नंतरची आहे. तसेच सिवनेसन स्वामिजी हे बाबांचे सेवेकरी होते, त्यामुळे सदर पुस्तक संस्थान मार्फत प्रकाशित करण्याचे ठरल्यास सिवनेसन स्वामिजी यांच्या जीवनाविषयीची परिपूर्ण माहिती झरिनद्वारा रुपांतरीत इंग्रजी श्री साई समर्थ सत्चरित या पुस्तकाचे छपाईतून काढून घेणे गरजेचे आहे. याबाबत जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/२०५०/ २००७ दि.०९.०२.२००७ अन्वये मुळ साईचरित्राचा व सिवनेसन स्वामीचा काळ वेगळा असून, संस्थानद्वारा प्रकाशित होणे योग्य होणार नाही. असे कळविण्यात आले होते. तथापी याबाबत डायरेक्टर साईप्रेस इंडिया प्रा.लि., दिल्ली यानी त्यांचे डायरेक्टर साईप्रेस (इं) प्रा.लि.,नवीदिल्ली यांचे दि.२६.०२. २००७ चे पत्रात उपरोक्त पुस्तकात असलेला ५३ वा अध्यायानंतर सिवनेसन स्वामीजींची उल्लेखनीय तपशिलात्मक माहिती वगळण्यात येवून सदरचे पुस्तक प्रकाशित करणेबाबत सुचित केले आहे.

तसेच श्री साई समर्थ सत्चरित या झरिनद्वारा रुपांतरीत इंग्रजी भाषिक पुस्तकात सुरुवातीस प्रस्तावनेत पेज नं. ३ वर परिच्छेद अ.नं. १ ते ६ यात "गुरुदेव सिवनेसन स्वामीजी" बाबत माहिती प्रस्तुत केलेली आहे. तसेच ५३ अध्याय अवतारनीकेनंतर "गुरुदेव सिवनेसन स्वामीजी" यांचा स्वतंत्र तपशिलात्मक माहिती ही पान नं.७७१ ते ७७७ पर्यंत प्रसिद्ध करण्यात आली आहे. तेंव्हा सदरची माहिती ही उपरोक्त पुस्तकातून वगळण्यात येऊन तदनंतरच ते संस्थानद्वारा प्रकाशित करणे योग्य होईल.

उपरोक्त संदर्भीय पत्राद्वारे श्री साई समर्थ सत्चरित हे पुस्तक झरिनद्वारा कै. गोविंद रघुनाथ दाभोळकर लिखीत मुळ मराठी साईसत् चरिताचे शब्दांनी शब्दाचे इंग्रजीत रुपांतर करुन रुपांतरीत श्री साई समर्थ सत्चरिताची रचना केली आहे, असे प्रस्तुत केले आहे.

सध्या झरिनद्वारा साईनाथ सगुणोपासना हे संस्थान प्रकाशित इंग्रजी भाषिक पुस्तक भक्तांना उपलब्ध आहे.

श्री साई समर्थ सत्चरित हे इंग्रजी भाषिक पुस्तक हे साईबाबांचे जीवनावर आधारित व श्री साईबाबांची शिकवण यावर आधारित आहे. सध्या आपणाकडे सदर आशयाचे ६९ प्रकारचे पुस्तके भक्तांसाठी विक्रीस उपलब्ध आहे.

तरी डायरेक्टर, साई प्रेस (इंडिया) प्रा.लि., नवीदिल्ली यांचे द्वारा वरील संदर्भिय पत्रात नमुद केलेनुसार

झरिन द्वारा इंग्रजीत रुपांतरीत श्री साई समर्थ सत्चरित हे पुस्तक संस्थानद्वारा प्रकाशित करावे किंवा कसे तसेच प्रकाशित करावयाचे झाल्यास मुळ श्री साई सत्चरित मराठीत सिवनेसन स्वामीजींचा संबंध नाही, त्यामुळे उपरोक्त पुस्तकातून वरील दर्शविल्याप्रमाणे समाविष्ट असलेली गुरुदेव सिवेसन स्वामीजी यांची माहिती वगळून पुस्तक प्रकाशनाबाबत निर्णय होऊन, सदर पुस्तकाचे प्रथम प्रकाशन असल्याने ५,००० प्रती छपाई करुन घेणेस प्रती नग दर रु.६०/- या प्रमाणे एकूण अंदाजे रक्कम रुपये ३,००,०००/- चे अपेक्षित खर्चास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, याकामी तज्ञांचा सल्ला घेऊन प्रस्ताव फेरसादर करावा असे ठरले. (कार्यवाही-प्रकाशने प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १४. शिर्डी दर्शन व्हीसीडी पुनश्च तयार करुन घेणेबाबत.**

**निर्णय क्र. ३१०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी द्वारा निर्मित शिर्डी दर्शन व्हीसीडी २०,००० नग प्रती नग रु.१७/-याप्रमाणे तयार करणेकामाचा कार्यादेश जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/५२२७/२००६ दि.१०.०५.२००६ अन्वये मेलय मेडिया , मुंबई यांना देण्यात आला होता. उपरोक्त कार्यादेशानुसार संबंधीत सी.डी. निर्मात्याकडून सदर सी.डी. चे काम पूर्ण होऊन साईभक्तांना विक्री करण्यात आली आहे. तथापी सध्या शिर्डी दर्शन व्हिसीडी साठा संपला असल्याने याबाबत २५,००० नग शिर्डी दर्शन व्हिसीडी तयार करणेकामाचे कोटेशन्स दि.१५.०३.२००७ अखेर भरुन दाखल करणेबाबत कळविण्यात

येवून ते येत्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत उघडण्यास निर्णयार्थ टिपणी सादर केली आहे. या कार्यवाहीस कालावधी अपेक्षित असल्याने तत्पूर्वी तातडीने ५,००० नग पुनच्छ तयार करुन घेणे गरजेचे असल्याने याबाबत संबंधीत निर्मिती धारक मेलय मेडिया, मुंबई यांचेशी दुरध्वनीद्वारा चौकशी केली असता, त्यांनी त्यांचेकडील पाठविलेल्या दि.१४.०३.२००७ चे फॅक्स पत्राअन्वये मागिल निर्मिती पुरवठा आदेशातील असलेला प्रति नग दर रुपये १७/- याप्रमाणे निर्मिती करुन देण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे मेलय मेडिया, मुंबई यांना तातडीने शिर्डी दर्शन व्हीसीडी ५,००० नग तयार करुन घेणेकामी प्रती नग रु.१७/- प्रमाणे रुपये ८५,०००/- मात्र खर्चाचा आदेश देणेत आलेला आहे, त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १५. पाणी मापक यंत्र बसविणेबाबत**

**निर्णय क्र.३११.** शासन परिपत्रक क्रं..बिपापू १००१ (७१३/२००१) सिंव्य (धो), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दि.०७/०४/२००३ अन्वये, आपणास पाटबंधारे विभाग, नाशिक यांनी पाणी मापक यंत्र बसविणे बाबत कळविले होते. त्याप्रमाणे आपण सदरचे पाणी मापक यंत्र उत्पादक कंपनी चेतस कंट्रोल सिटीम प्रा.लि. पुणे यांचे सदरचे यंत्राबाबत दर पत्रक मागविले असता त्यांनी दर प्रकान्वये, अल्ट्रॉसोनिक ओपन चॅनल टाईप फ्लो मीटर पुरविणे बसविणे व चालू करुन देणे मॉडेल ULI-१००, ०१ नग किंमत अंदाजे रुपये १,८०,०००/- मात्र कळविले आहे.

सदर दरामध्ये सेल टॅक्स (व्हॅट) अंतर्भूत आहे मात्र मॅकेलिकल व इतर सुविधांचा अंतर्भाव नाही तसेच उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये नाशिक पाटबंधारे यांनी तातडीने सदरचे यंत्र बसविणे बाबत कळविले आहे.

वरील प्रमाणे यंत्र बसविणे झाल्यास त्यासाठी अंदाजे ५ फूट x ५ फूट आकाराचे रुम बनविणे आवश्यक आहे. सदरचे रुमसाठी अंदाजे खर्च रुपये ३५,०००/- मात्र येईल. म्हणजेच वॉटर फ्लो मीटर (पाणी मापक यंत्र) किंमत अंदाजे रुपये १,८०,०००/- मात्र व रुम बांधणी खर्च रुपये ३५००/-मात्र असा एकूण २,१५,०००/- मात्र खर्च येणार आहे.

तरी वरील प्रमाणे पाणी मापक यंत्र बसविणे व त्यासाठी येणारे अंदाजे रुपये २,१५,०००/- मात्रचे खर्चास मंजुरी मिळावी या करीता सदर विषय दि.०६/०१/२००७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीपुढे आयत्या वेळेचा विषय नं.०१ निर्णय क्रं.६९ /१३ अन्वये पाणी मापक यंत्र बसविणे बाबत विषय ठेवण्यात आला होता.या विषयावरील चर्चा पुढे ढकल्यात आली.

तथापी, कार्यकारी अभियंता नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचे (नोटिस) पत्रान्वये जा.क्रं..नापावि/ वसुली/२१६५/२००७ दि.०२/०३/२००७चे पत्रान्वये असे कळविले आहे की, नोटिस पत्र मिळाल्यापासून १५ दिवसाचे आत पाणी मापक यंत्र बसवून घ्यावे. याबाबत सध्य:स्थितीत या कार्यालयास अवगतअसलेल्या माहितीनुसार मे.चेतस कंट्रोल प्रा.लि.कोथरुड पुणे यांचेशी वा आय.एस.आय. प्रमाणित अन्य कोणत्याही उत्पादकांशी संपर्क साधुन त्यांचे कडिल पाणी मापक यंत्र योग्य असल्याची खात्री करुन आमचे संबंधीत क्षेत्रीय स्थानिक उपअभियंता यांचे मार्गदर्शनाखाली पाणी मापक यंत्र बसविण्याची कार्यवाही करावी.

अन्यथा त्यानंतर आपणास पुरविलेल्या पाण्याचे मोजमाप हे शासननियमानुसार मोजले जाईल व या मोजणी बाबत आपली कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही त्याप्रमाणे मंजुर कोटा आपणांस पुरविण्यात येईल असे समजण्यात येऊन त्याची करारनामातील शर्त क्रं.०८ प्रमाणे देयकाची आकारणी करण्यात येईल.

तसेच करारनामा भंग केला असे गृही धरण्यात येवून करारनामा शर्त क्रं.२५ प्रमाणे आपले संस्थेचा करानमा रद्य करण्यात येवुन पाणी पुरवठा खंडीत करण्यात येईल व त्या अनुषंगाने उदभवणा-या परिस्थितीची सर्वस्वी जबाबदारी ही केवळ आपले संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

तेंव्हा याबाबत आमचे क्षेत्रिय कार्यालयाशी संपर्क साधुन त्यांचे मार्गदर्शनाखाली ही नोटिस मिळाल्यापासून १५ दिवसात पाणी मापक यंत्र बसवून घेणेत यावे. असे सदरच्या नोटिसमध्ये त्यांनी कळविले आहे.

तरी वरील प्रमाणे पाणी मापक यंत्र बसविणे व त्यासाठी येणारे **अंदाजे रुपये २,१५,०००/-** मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १६. पिण्याचे पाण्याचे पाईपलाईनबाबत.**

**निर्णय क्र. ३१२.** पाणी पुरवठा विभागामार्फत सन २००० मध्ये प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. त्यानंतर सदरची पाईपलाईन बदली करणेबाबत प्रथमतः सर्व्हे करणेसाठी प्रस्ताव ठेवणेत यावा असे निर्देश देण्यात आले. यावर दिनांक २१-२२/०२/२००४ रोजी तात्कालीन मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं.३२, निर्णय क्रं. ७३ अन्वये सविस्तर चर्चा होवून कनकुरी तलाव ते ५०० रुम (नविन भक्तनिवासस्थान) अशी ३०० mm व्यासाची नविन पाईपलाईन टाकणेकामी सर्व्हे करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ३,००,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली. याकामी महाराष्ट्र शासन तज्ञ सल्लागार श्री रोटकर यांचा सल्ला घेवून हे काम करणा-या त्यांनी सुचविलेल्या विश्वासार्ह एजन्सीजकडून या पाईपलाईनचे सर्व्हे करणेकामी कोटेशन्स मागविण्यात यावे असे ठरले. त्यानंतर दिनांक २९-३०/०५/२००४ चे मा.व्यवस्थापन मंडळाचे सभेत विषय नं. ४७, निर्णय क्रं.२५५ अन्वये आलेल्या कोटेशन्स बाबत श्री रोटकर यांचे मार्गदर्शन घेवून त्यानुसार दिनांक ०७/०५/२००४ चे मा. व्यवस्थापन मंडळाचे सभेपुढे श्री रोटकर यांनी दिलेल्या लेखी अभिप्रायाचे बंद पाकिट उघडण्यात आले. त्यात त्यांनी सुचविलेल्या अभिप्रायानुसार में. सिंडिकेट सर्व्हिसेस,नाशिक यांना सदरचे काम देणेस व याकामी येणारे रक्कम रुपये ६२,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सिंडिकेट सर्व्हिसेस नाशिक यांनी सदर पाईपलाईन सर्व्हेचे काम पुर्ण केले व या योजनेच्या ढोबळ खर्चाचा अंदाज देण्यात आला. वरील खर्चाचा तपशिल श्री बी.व्ही. रोटकर यांचे अवलोकनार्थ पाठविण्यात आला असता, त्यावर त्यांचा अभिप्राय घेवून एकुण रक्कम रुपये २,०२,०४,२३५/- मात्रचे एस्टिमेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून प्रमाणित करून घेण्यात यावे व याकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात याव्यात असे मा. व्य.मंडळाचे दि. २७/१२/२००४ चे सभेत विषय नं. ३१,निर्णय क्रं. १५८ अन्वये चर्चा होवून ठरले. उपरोक्त ठरावानुसार सदरचे इस्टिमेट महाराष्ट्र जीवन प्राधिकरण संगमनेर विभाग कार्यालयाकडून तपासून घेण्यात येवून त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या में. सिंडिकेट सर्व्हिसेस नाशिक यांचेकडून करून घेवून तज्ञ सल्लागार श्री बी.व्ही.रोटकर, नागपूर यांचेकडून तपासून घेतल्या. त्याप्रमाणे दिनांक १८/०९/२००५ चे मा.व्य.समितीचे सभेत विषय नं. ३०, निर्णय क्रं. ५०६ अन्वये सदर पाईपलाईन सर्व्हे करण्याचे काम पुर्ण झाल्यानंतर निविदा फॉर्म तयार करून पुढील कामे ०१) वर्तमान पत्रात जाहिरात देणे.(जाहिरात खर्च संस्थानचा).०२) निविदा मागविणे. ०३) आलेल्या निविदांची पडताळणी करणे. ०४) पाईपलाईन टाकणेसाठी योग्य त्या एजन्सीजची निवड करणे. ०५) पाईपलाईनचे काम पुर्ण होईपर्यंत (साधारणः १२० दिवस) दैनंदिन पर्यवेक्षण करणे. इ. कामे सिंडिकेट सर्व्हिसेस, नाशिक यांना सदर कामांसाठी सुपरव्हिजन चार्जेस म्हणून रूपये १,२०,०००/- व अधिक सर्व्हिस टॅक्स चे खर्चास मान्यता देण्यात आली. त्यानुसार सदरचे काम करणेसाठी वर्तमान पत्रात जाहिरात देवून टेंडरची विक्री करण्यात आली. त्यानुसार ०६ टेंडरची विक्री होवून त्यानुसार रूपये ५,०००/- प्रती टेंडर प्रमाणे स्विकारण्यात आलेली होती. त्यानुसार सर्व्हे करण्याचे काम आलेल्या निविदानुसार सिंडिकेट सर्व्हिसेस, नाशिक यांना देण्यात आलेले होते व त्या प्रमाणे कामही पुर्ण करण्यात आलेले होते. मात्र सध्याचे मा. व्यवस्थापन समिती समोर काम पुर्ण करणेबाबत दि. २७/०४/२००६ चे उपसमिती सभेपुढे विषय नं.०८, निर्णय क्रं.३१८ अन्वये सदरचे काम न राबविण्याचा निर्णय झाल्याने काम तुर्त स्थगित आहे.

परंतू दैनिक सार्वमत मध्ये दिनांक ०८/०३/२००७ रोजी झालेल्या जाहीर निवेदनाप्रमाणे अ.नं.०२ मध्ये नमुद केलेप्रमाणे कोपरगांव अहमदनगर राज्यमार्ग क्रं.१० (कोपरगांव, शिर्डी, राहाता, बाभळेश्वर,कोल्हार,राहूरी, शिंगवे,देहरे,विळदघाट,अहमदनगर कि.मी.७८/२०० ते १७५/५३०.) सदर रस्त्याचे लांबीतील मजबुतीकरण व चौपदरीकरण करण्याचे काम शासनाने हाती घेतलेले आहे. तेव्हा या रस्त्यालगतच्या प्रांगणात ज्यांनी-ज्यांनी दुरध्वनी केबल्स व खांब, जलपुरवठा वा जलनिस्सारण वाहीन्या, विद्युत खांब इ. टाकलेल्या असतील तर सदर वाहिन्या सुरक्षित स्थळी हलविणेची व्यवस्था ज्याने-त्याने स्वखर्चाने करावयाची आहे. अन्यथा काम पुर्ण झालेनंतर सदरच्या वाहिन्यांचे मेन्टेनंससाठी भविष्यात रस्ता खोदाई करण्यास परवानगी मिळणार नाही. असे जाहीर निवेदन देण्यात आलेले आहे. सदर रस्त्यालगतचे प्रांगणात ५०० रुमपर्यंत आपली ३०० mm व्यासाची जलवाहीनी आलेली आहे. तसेच नगर-मनमाड रोड ते ओहर हेड टँक कनकुरी रोड पर्यंत तिच पाईपलाईन गेलेली आहे. सदर पाईपलाईन ही साधारणः १९८८ सालापासून आजपर्यंत चालू आहे. मात्र नगर-मनमाड रोडचे खाली ही पाईपलाईन गेलेली असून तिचे मेन्टेनंस करणे शक्य नाही. शिवाय कनकुरी रोडचे रूंदीकरण होत असल्याने तेथील पाईपलाईन ही रोडखाली जाणार आहे. तिचेही मेंन्टेनंस करणे भविष्यात शक्य नाही.

परंतु वरील प्रमाणे आलेल्या जाहिरातीनुसार सदरची पाईप लाईन नविन टाकणे अत्यावश्यक असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १७.** **कनिष्ठ महाविद्यालयाचे बेंच तयार करणेकामी आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी देणे बाबत**

**निर्णय क्र. ३१३.** श्रीसाईबाबा औद्यागिक प्रशिक्षण केंद्राने कनिष्ठ महाविद्यालयाकरीता आवश्यक असलेले १२५ बेंच मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ४.२.२००६ चे सभेतील निर्णय क्र.७४अन्वये तयार करुन कनिष्ठ महाविद्यालयाचे ताब्यात दिनांक २८.११.२००६ रोजी देण्यात आलेले आहेत.

उपरोक्तपैकी १२० बेंच तयार करण्यासाठी आवश्यक असणारे कन्झ्युमेबल मटेरिअल खरेदीकामी व्यवस्थापन समितीचे सभेत रक्कम रुपये २,५०,०००/- चे खर्चास मान्यता दिलेली आहे.दरपत्रके मागविणे तसेच पुरवठा आदेश देण्याच्या कालावधीमध्ये काही मटेरिअलचे दर हे वाढलेले असल्याने प्रत्यक्षात १२० बेंचेसकरीता एकूण रक्कम रुपये २,८४,८४२/- खर्च आलेला आहे. म्हणजेच मंजूर रकमेपेक्षा रुपये ३४,८४२/- जादा खर्च आलेला असून त्यास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १८. शिर्डी महोत्सव-२००६ करिता आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ३१४.** दि. २५/११/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरलेनुसार शुक्रवार, दि. २९/१२/२००६ ते शनिवार, दि. ३१/१२/२००६ अखेर तीन दिवस **शिर्डी महोत्सव-२००६** शिर्डी येथे साईनगर मैदानावर आयोजित करण्यात आला होता. त्यात झालेल्या खर्चाचा तपशील-

| अ.नं. | तपशील | बजेट तरतूद | बिलाची एकूण रक्कम |
|---|---|---|---|
| ०१. | स्टेज, ड्रेसींग रुम व ५०० खुर्च्यासह बैठक व्यवस्था | ००,२०,०००/- | |
| | श्री किरण तरटे, तरटे मंडप डेकोरेटर्स, साकुरी, राहाता | | ००,१२,०००/- |
| ०२. | जाहिरात, कापडी बॅनर्स व बोर्ड | ००,१५,०००/- | |
| | हेमंत आर्टस्, शिर्डी | | ००,१९,०२०/- |
| ०३. | कलाकार मानधन व प्रवास खर्च | ०१,५०,०००/- | |
| | मंदिर विभाग -कलाकार मानधन व प्रवास खर्च | | ०८,०२,९०६/- |
| ०४. | कलाकार निवास व्यवस्था | ००,४५,०००/- | |
| | हॉटेल सन एन सँड | | ००,२७,९१५/- |
| ०५. | व्ही.डी.ओ शुटींग व फोटोग्राफी | ००,२०,०००/- | |
| | श्रीरंग फोटो स्टुडीओ, शिर्डी | | ००,००,६२५/- |
| | व्ही.डी.ओ.चित्रीकरण | | ००,०२,५००/- |
| ०६. | इतर किरकोळ खर्च | ००,२०,०००/- | |
| | मंदिर विभाग - कंत्राटी कामगार खर्च | | ००,०४,८६०/- |
| | मंदिर विभाग - कलाकार शॉल सत्कार | | ००,०५,९६४/- |
| | बगीचा विभाग- फ्लावर डेकोरेशन | | ०१,२५,०००/- |
| | विद्युत विभाग - मटेरियल व लाईट व्यवस्था खर्च | | ००,२८,३९२/- |
| | एकूण अंदाजित अपेक्षित खर्च | ०२,७०,०००/- | १०,२९,१८२/- |

दि.२५/११/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत आयत्या वेळेचा विषय नं.२१, व निर्णय क्र.९६२ अन्वये शिर्डी महोत्सव-२००६ साठी एकूण खर्च रु. २,७०,०००/- इतका मंजूर करण्यात आलेला आहे. अ.नं.०३ कलाकार मानधन व प्रवास खर्च यासाठी प्रथमतः ३ कलाकारांना प्रत्येकी अंदाजीत रु.५०,०००/- प्रमाणे रु. ०१,५०,०००/- इतके मंजूर करण्यात आले होते. तथापि प्रत्यक्षात ८ गायक कलाकारांना साईभजन संध्या गाणेसाठी संधी देण्यात आली होती. त्यात प्रभंजन मराठे, नितीन मुकेश, सच्चिदानंद अप्पा, वैशाली सामंत, पुनम खन्ना, पार्वती खान, व संध्या देशमुख इं.चा सहभाग होता. त्यांचे एकूण मानधन रु. ०८,०२,९०६/- इतके झालेले आहे. तसेच इतर किरकोळ खर्चात मा.अध्यक्ष यांचे सुचनेनुसार ऐनवेळी संपूर्ण मंदिराला फ्लावर डेकोरेशन करण्यात आले, त्याचा खर्च रु.१,२५,०००/- इतका झालेला आहे. त्यामुळे प्रत्यक्षात एकूण रु. १०,२९,१८२/- (अक्षरी रु. दहा लाख एकोणतीस हजार एकशे ब्याऐशी मात्र) इतका खर्च झालेला आहे. तरी रु. ७,५९,१८२/- (अक्षरी रु. सात लाख एकोणसाठ हजार एकशे ब्याऐशी मात्र) चे जादा झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. १९. साईभक्त संमेलन-२००७ करिता आलेल्या जादा खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३१५.** उपरोक्त विषयास अनुसरुन दि. १९/०६/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत ठरलेनुसार शनिवार, दि. १३/०१/२००७ ते सोमवार, दि. १५/०१/२००७ अखेर तीन दिवस नाशिक येथे इदगाह

मैदानावर साईभक्त संमेलन - २००७ आयोजित करण्यात आले होते. त्यात झालेल्या खर्चाचा तपशील-

| अ.नं. | तपशील | बजेट तरतूद | बिलाची एकूण रक्कम | जादा खर्च झालेली रक्कम. |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्टेज, मंडप, फुलांचे डेकोरेशन, विद्युत रोषणाई, प्रसाद वाटप इ. | १५,००,०००.०० | ११,४५,४९८.०० | ००.०० |
| ०२. | प्रचार, प्रसार, होर्डींग्ज, पत्रके, हँडबील्स,पेपर जाहिरात, केबल जाहिरात, थेट प्रक्षेपण इ. | ०५,००,०००.०० | ०६,६३,१७७.०० | ०१,६३,१७७.०० |
| ०३. | सन्माननीय व्यक्ती सत्कार, कलाकार किर्तनकार, प्रवचनकार मानधन इ. | ०७,००,०००.०० | ११,३३,६०३.०० | ०४,३३,६०३.०० |
| ०४. | वहातुक, कर्मचारी मुक्काम, नाष्टा, जेवण इ. | ०३,००,०००.०० | ०४,७६,८४४.०० | ०१,७६,८४४.०० |
| | एकूण अपेक्षीत अदाजित खर्च | ३०,००,०००.०० | ३४,१९,१२२.०० | ०४,१९,१२२.०० |

दि.२५/११/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत साईभक्त संमेलन - २००७ साठी रु. ३०,००,०००/- इतका खर्च मंजूर करण्यात आलेला आहे. मूळ अंदाजपत्रकात निमंत्रित कलाकार-निवास व भोजन व्यवस्था, मंदिराची प्रतिकृती, डॉक्युमेंटरी फिल्म, बलून जाहिरात तसेच मराठी बाणा कार्यक्रमाचे मानधन यांचा समावेश गृहित धरलेला नव्हता यामुळे साईभक्त संमेलनासाठी मंजूर रकमेपेक्षा रु. ३४,१९,१२२/- इतका खर्च झालेला असून रु. ०४,१९,१२२/- (अक्षरी रु चार लाख एकोणीस हजार एकशे बावीस मात्र) इतका अतिरिक्त खर्च झालेला आहे. तरी सदरच्या जादा झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २०. विविध संस्थांनी मागणी केलेल्या शिध्याबाबत.**

**निर्णय क्र. ३१६. (अ)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारी, यांना श्रीसाईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे ः

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री दादू राक्षे, सचिव,कोपरगांव तालुका बॉडी बिल्डींग असोसिएशन, ता.कोपरगांव जि.अहमदनगर (अर्ज दि.२४/०३/२००७) | बॉडी बिल्डींग स्पर्धा, दि.०२/०४/०७ रोजी हनुमान जयंती निमित्त महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | रु.१५,०००/- पर्यंत शिधा देणे बाबत श्री खांबेकर यांचे पत्र. |
| ०२. | ह.भ.प. भिमराज महाराज जाधव, संयोजक, श्री हनुमान जयंती व नवचंडीयज्ञ उत्सव समिती, लक्ष्मीनगर, कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.२०/०३/२००७) | हनुमान जयंती निमित्त नवचंडी यज्ञ-दि.३१/०३ ते दि.०७/०४/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुळसीराम कथा इ. सोहळ्याचे कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | रु.२५,०००/- पर्यंत शिधा देणे बाबत श्री खांबेकर यांचे पत्र. |
| ०३. | सेक्रेटरी, साईसेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळा, शिर्डी साकुरी शिव रस्ता, आसणे वस्ती मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, (अर्ज दि.२६/०३/२००७) | दि.३१/३ ते दि.०२/०४/२००७ अखेर श्री सप्तश्रृंगीच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व होम हवन व धार्मिक पुजाविधी कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज | सौ.सु.कै.कोते, विश्वस्त यांची शिफारस |
| ०४. | श्री सुनिल सिताराम भावसार, संयोजक, प.पू.संत श्री स्वामी लखणगिरीजी महाराज समाधी मंदिर जिर्णोध्दार व पुण्यतिथी सोहळा समिती, मु.पो.श्री क्षेत्र कांचनवाडी, कोकमठाण, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर (अर्ज दि.२१/०३/२००७) | प.पू.संत श्री स्वामी लखणगिरीजी महाराज प्रथम पुण्यतिथी सोहळा निमित्त दि.२९/०३ ते दि.५/४/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज | रु.२५,०००/- पर्यंत शिधा देणे बाबत श्री खांबेकर यांचे पत्र. |

तरी अ.नं. ०१ व ०२ मधील श्री दादू राक्षे, सचिव,कोपरगांव तालुका बॉडी बिल्डींग असोसिएशन, ता.कोपरगांव जि.अहमदनगर यांना बॉडी बिल्डींग स्पर्धा, दि.०२/०४/०७ रोजी हनुमान जयंती निमित्त महाप्रसादासाठी रु.१५,०००/- व ह.भ.प.भिमराज महाराज जाधव,संयोजक, श्री हनुमान

जयंती व नवचंडीयज्ञ उत्सव समिती,लक्ष्मीनगर, कोपरगांव, जि.अहमदनगर यांना हनुमान जयंती निमित्त नवचंडी यज्ञ- दि.३१/०३ ते दि.०७/०४/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह व भव्य तुळसीराम कथा इ. सोहळ्याचे कार्यक्रमासाठी रु. २५,०००/- पर्यंत व **अ.नं. ३** सेक्रेटरी, साईसेवा निवासी मतिमंद मुला-मुलींची शाळा, शिर्डी साकुरी शिव रस्ता, आसणे वस्ती मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगर, दि.३१/३ ते दि.०२/०४/२००७ अखेर श्री सप्तश्रृंगीच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व होम हवन व धार्मिक पुजाविधी कार्यक्रमासाठी रु. १५,०००/- पर्यंतची तसेच अ.नं.०४ मधील श्री सुनिल सिताराम भावसार, संयोजक, प.पू.संत श्री स्वामी लखणगिरीजी महाराज समाधी मंदिर जिर्णोध्दार व पुण्यतिथी सोहळा समिती, मु.पो.श्री क्षेत्र कांचनवाडी, कोकमठाण, ता.कोपरगांव, जि.अहमदनगर यांना प.पू.संत श्री स्वामी लखणगिरीजी महाराज प्रथम पुण्यतिथी सोहळा निमित्त दि.२९/०३ ते दि.५/४/०७ अखेर श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे कार्यक्रमासाठी रु. २५,०००/- पर्यंतची शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(ब)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदीर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमंगांव(शिर्डी) पो.लक्ष्मीवाडी, ता.राहाता,जि.अहमदनगर (अर्ज दि.२८/०३/२००७) | संत ज्ञानेश्वर महाराज व श्री साईबाबांचे मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त दि.१६/४ ते दि.२३/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह, तुलसी रामायणकथा प्रवचन श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी व श्री साईचरित्र पारायण सोहळ्याचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | सौ.सुमित्रा कै कोते पाटील, विश्वस्त यांचे शिधा देणेबाबत शिफारस पत्र. |

तरी अध्यक्ष, श्री संत ज्ञानेश्वर महाराज मंदीर व श्री साईबाबा वारकरी शिक्षण संस्था, निमंगांव(शिर्डी) पो.लक्ष्मीवाडी, ता.राहाता,जि.अहमदनगर यांना संत ज्ञानेश्वर महाराज व श्री साईबाबांचे मुर्ती प्राणप्रतिष्ठा वर्धापन दिनानिमित्त दि.१६/४ ते दि.२३/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह, तुलसी रामायणकथा प्रवचन श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी व श्री साईचरित्र पारायण सोहळ्याचे महाप्रसादाचे कार्यक्रमासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(क)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, व मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री विजय भानुदास रोहम, समस्त ग्रामस्थ कारवाडी, (कोकमठाण) ता.कोपरगांव,जि.अहमदनगर (अर्ज दि.२९/०३/२००७) | दि.२७/३ ते दि.३/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व श्री ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | |
| ०२. | ह.भ.प.कु.गितामाई धसाळ, अध्यक्ष,श्री गुरु गोरक्षनाथ संस्थान व अध्यात्मिक विकास बहुउद्देशीय संस्था, श्री क्षेत्र तांदुळवाडी, ता.राहुरी,जि.अहमदनगर (अर्ज दि.३०/०३/२००७) | श्री क्षेत्र तांदुळवाडी येथे दि.२५/०३ ते दि.२/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताहचे महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत.. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा. श्री सुरेश वाबळे विश्वस्त, यांचे शिफारस पत्र. |

तरी अ.नं. ०१ मधील श्री विजय भानुदास रोहम, समस्त ग्रामस्थ कारवाडी, (कोकमठाण) ता.कोपरगांव,जि.अहमदनगर यांना दि.२७/३ ते दि.३/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताह व श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे महा-प्रसादासाठी कार्यक्रमासाठी रु.१५,०००/- व अ.नं.०२ मधील ह.भ.प.कु.गितामाई धसाळ, अध्यक्ष,श्री गुरु गोरक्षनाथ संस्थान व अध्यात्मिक विकास बहुउद्देशीय संस्था, श्री क्षेत्र तांदुळवाडी, ता.राहुरी,जि.अहमदनगर यांना श्री क्षेत्र तांदुळवाडी येथे दि.२५/०३ ते दि.२/४/०७ अखेर अखंड हरिनाम सप्ताहचे महाप्रसादासाठी रु.१५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(ड)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | श्री अर्जुनराव मल्हारी बोरुडे, सरपंच,ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर, (अर्ज दि.३०/०३/२००७) | दि.२५/३ ते दि.२/४/०७ अखेर श्री संत कैकाडी महाराज यांचे जन्मशताब्दी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | डॉ.भाऊसाहेब दांगडे, निवासी उपजिल्हाधिकारी यांचे शिफारस पत्र. |

तरी श्री अर्जुनराव मल्हारी बोरुडे, सरपंच,ग्रामपंचायत कार्यालय, मांडवगण, ता.श्रीगोंदा, जि.अहमदनगर, यांना दि.२५/३ ते दि.२/४/०७ अखेर श्री संत कैकाडी महाराज यांचे जन्मशताब्दी निमित्त अखंड हरिनाम सप्ताहाचे महा-प्रसादासाठी कार्यक्रमासाठी रु.१५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(इ)** खाली दर्शविलेल्या समितीने मा.कार्यकारी अधिकारीसाहेब, व मा.अध्यक्षसाो.श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | सेक्रेटरी, अँजल ग्रुप, कोपरगांव ता.कोपरगांव,जि.अहमदनगर (अर्ज दि.२९/०३/२००७) | हनुमान जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महा-प्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.श्री.अशोक खांबेकर, विश्वस्त यांचे शिफारस पत्र. |
| ०२. | सौ.संगिता धनंजय निकाळे, नगराध्यक्षा, राहाता नगरपरिषद राहाता, ता.राहाता,जि.अहमदनगर (अर्ज दि.३१/०३/२००७) | चैत्र पौर्णिमानिमित्त असलेल्या विरभद्र महाराज व मायंबा (नवनाथ महाराज)यांचे यात्रेच्या महाप्रसादासाठी शिधास्वरुपात मदत. | शिधास्वरुपात मदत मिळणेबाबत अर्ज. | मा.आमदार श्री राधाकृष्ण ए विखे पाटील, विश्वस्त, यांचे शिफारस पत्र. |

तरी अ.नं. ०१ मधील सेक्रेटरी, अँजल ग्रुप, कोपरगांव ता.कोपरगांव,जि.अहमदनगर यांना हनुमान जयंतीनिमित्त आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमाचे महाप्रसादासाठी कार्यक्रमासाठी रु.१०,०००/- व अ.नं.०२ मधील सौ.संगिता धनंजय निकाळे, नगराध्यक्षा, राहाता नगरपरिषद राहाता, ता.राहाता,जि.अहमदनगर यांना चैत्र पौर्णिमा निमित्त असलेल्या विरभद्र महाराज व मायंबा(नवनाथ महाराज)यांचे यात्रेच्या महाप्रसादासाठी रु.२५,०००/- पर्यंतच्या वस्तू शिधास्वरुपात मदत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

**(ई)** श्री.रावसाहेब मु. गोंदकर, प.पु.गोळवलकर गुरुजी जन्मशताब्दी समारोह समिती, ता. राहाता, जि. अहमदनगर यांचे दि.२४/११/२००६ रोजीचे पत्राने प.पु.गोळवलकर गुरुजी जमशताब्दी समारोह समितीच्या वतीने या गुरुजीच्या दि.१७/१२/२००६ रोजीच्या जमशताब्दीनिमित्त संपूर्ण भारतात अनेक लहान मोठे कार्यक्रम होत असतात.

त्याचप्रमाणे राहाता तालुक्याचे वतीने संत संमेला भक्त मेळावा, शिर्डी येथे दि.१७/१२/२००६ रोजी आयोजित करण्याचे ठरविले असून त्यासाठी संस्थानकडून ५० x २० चा स्टेज, नगर-मनमाड हायवे कमान - २ नग, स्वागत कक्ष कमान - १ नग, संमेलनासाठी साईनगर मैदान, विद्युत व्यवस्था, तसेच ५,००० जणांना महाप्रसादासाठी शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत सहकार्य मिळावे, अशी विनंती केलेली आहे.

संस्थानकडून सदरच्या संमेलनास साईनगर मैदान, बांधकाम विभागाकडून ५० x २० चे स्टेज उभारणी, विद्युत व्यवस्था - नियमानुसार दर आकारुन करता येईल. तथापि नगर-मामाड हायवे कमान - २ नग, स्वागत कक्ष कमान - १ नग, हे संबंधीतांनी स्वतःचे खर्चाने उभारणेबाबत संबंधीतांना कळविता येईल. तसेच दि.१७/१२/२००६ रोजी येणा-या संत व भक्तांना भोजनासाठी शिधा मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

श्री रावसाहेब मु. गोंदकर, प.पु.गोळवलकर गुरुजी जमशताब्दी समारोह समिती, ता. राहाता, जि. अहमदनगर यांना राहाता तालुक्याचे वतीने दि. १७/१२/२००६ रोजीचे संत संमेला भक्त मेळाव्यासाठी आलेल्या संत-भक्तांना महाप्रसादासाठी रु. २५,०००/- पर्यंतची शिधास्वरुपात मदत देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासन शाखा,वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २१. राष्ट्रीय पेरुसंवाद व कृषिप्रदर्शन-०७ मंडप बील आदा होणेबाबत.**

**निर्णय क्र. ३१७.** उपरोक्त विषयास अनुसरुन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) व श्री विनायक दंडवते, संयोजन नॅशनल सिम्पोसियम ऑन गावा, मु.पो.साकुरी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांचे संयुक्त

विद्यमाने " राष्ट्रीय पेरुसंवाद व कृषीप्रदर्शन २००७ दिनांक १७/०२/२००७ ते १९/०२/२००७ अखेर.... तीन दिवस नविन भक्त निवासाचे मैदानावर आयोजित करण्यात आला होता.

सदरचा कार्यक्रम पुर्वी माहे जानेवारी २००७ मध्ये आयोजित करण्यात आला होता तथापि काही अपरिहार्य कारणास्तव कार्यक्रम पुढे ढकलण्यात आला होता. तत्पुर्वी सदरचे कार्यक्रमाचे मंडप, स्टेज, कमानी, खुर्च्या, स्टॉल साऊंड सिस्टीम, लाईट इ.कामी कोटेशन मागविण्यात आली होती. सदरची कोटेशन्स मा.कार्यकारी अधिकारी यांचे समक्ष दि. २१/१२/२००६ रोजी उघडण्यात आली होती. त्यावेळी कोटेशनधारकांनाही बोलावणेत आले होते.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नांव व पत्ता | तपशील | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१. | शर्मा डेकोरेटर्स, मेन रोड, वैजापूर | मंडप, स्टेज, कमानी साऊंड सिस्टीम, स्टॉल, लाईट इ. | ०६,९३,०००/- | |
| ०२. | सावता मंडप डेकोरेटर्स, राहाता | वरिलप्रमाणे | ०५,६१,३००/- | |
| ०३. | बी.एस.कातूरे, मंडप डेकोरेटर्स, पूणे | वरिलप्रमाणे | ०८,२२,०००/- | **रु.०५,४१,०००/-** |

त्यातील सर्वात न्युनतम दराचे कोटेशन श्री एकनाथ भिमराज गाडेकर, राहाता यांचे होते. तथापि त्यावेळी आलेल्या कोटेशनधारकापैकी श्री बी.एस.कातुरे, पूणे यांना विचारणा केली असता, सदरचे काम ते रु. ५,४१,०००/- (अक्षरी रु.पाच लाख एक्केचाळीस हजार मात्र) मध्ये तयार असल्याचे त्यांनी लेखी दिले होते. त्यानुसार त्यांना खालीलप्रमाणे उभारणी करणेकामी तोंडी आदेश देण्यात आले होते.

सभा मंडप - २०० x ३०० मॅंटींगसह, साऊंड सिस्टिम, व्यासपीठ- ३० x ४० , उंची ५ फुट

बैठक व्यवस्था - ०१) खुर्ची संख्या - ४,५००, ०२) फॅन व्यवस्था - ३ नग, ०३) सोफा - २० नग, ०४) व्हि.आय.पी. खुर्ची - ९ + १, ०५) सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्टेज आणि पडदे,

प्रवेशद्वार :- दोन मुख्य कमान, कृषी प्रदर्शन द्वार, स्टॉल्स :- ०१) २५० स्टॉल्स - १० x १२ आकाराचे ०२) प्रत्येक स्टॉलगणिक १ - टेबल, २ - खुर्ची सुविधा, ०३) विद्युत पुरवठा, ०४) नोंदणी कक्ष व्यवस्था

०५) पॅसेजसाठी मॅटींग व्यवस्था

त्यानुसार श्री बी.एस.कातुरे, पूणे यांनी खालीलप्रमाणे काम केलेले आहे.-

सभा मंडप - २०० x ३०० मॅंटींगसह, साऊंड सिस्टिम, व्यासपीठ- ३० x ४० , उंची ५ फुट

बैठक व्यवस्था - ०१) खुर्ची संख्या - २,०००, ०२) सोफा - २० नग,

प्रवेशद्वार :- दोन मुख्य कमान, कृषी प्रदर्शन द्वार, स्टॉल्स :- ०१) १३५ स्टॉल्स - १० x १२ आकाराचे

०१) प्रत्येक स्टॉलगणिक १ - टेबल, २ - खुर्ची, १-ट्युब लाईट, १-पॉईट इ. सुविधा, मेन मांडवात पंखे, ट्युबलाईट, स्पिकर जॉब, पी.ए.टाईप, पार्कींग स्पीकर व्यवस्था इ. ट्रान्सपोर्ट सर्व्हिस इ. कामे केलेली आहेत.

ह्या सर्व कामाचे श्री बी.एस.कातूरे , पुणे यांनी कोटेशनप्रमाणे ठरलेनुसार रु. ५,४१,०००/- ( रु. पाच लाख एक्केचाळीस हजार मात्र) चे बील दिलेले आहे. व त्यावर सर्व्हीस टॅक्स शेकडा १२.२४ प्रमाणे आकारण्यात येईल असे म्हटले आहे.

सदरचे बीलाबाबत मुख्य अभियंता यांना विचारणा केली असता, त्यांचे जोडलेल्या अहवालानुसार श्री.बी.एस.कातूरे, पूणे यांना रु. ४,२४,८१९/- (अक्षरी रु. चार लाख चोवीस हजार आठशे एकोणावीस मात्र) चे बील अदा करणेस हरकत नाही. असे म्हटले आहे.

त्यानुसार श्री.बी.एस.कातूरे, पूणे यांना रु. ४,२४,८१९/- (अक्षरी रु. चार लाख चोवीस हजार आठशे एकोणावीस मात्र) चे बील लेखाशाखामार्फत आदा करण्यात आलेले असून,त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २२. सामुदायिक विवाह सोहळयास मदत मिळणेबाबत श्री.द.की.मापारी सचिव,स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, राळेगण सिद्धी,जि.अहमदनगर यांचे पत्राबाबत.**

**निर्णय क्र.३१८.** श्री .द.कि.मापारी, सचिव, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, मु.पो.राळेगण सिध्दी, जि.अहमदनगर यांनी दि.०९/०३/२००७ रोजीचे पत्रात सन २००६ पासून संस्थेचे अध्यक्ष श्री अणा हजारे यांना मिळालेल्या पुरस्कारांच्या रकमांचा संस्थेने निधी तयार केला असून सदर निधीच्या व्याजातून विविध जाती धर्मातील विवाहांचे आयोजन एकत्रितरित्या करीत असतो. दि.२९/०४/२००७ रोजी विविध जातीतील सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केलेला आहे. आपणाशी दुरध्वनीद्वार झालेल्या चर्चेनुसार विवाह सोहळयासाठी श्री साईबाबा संस्थानमार्फत आर्थिक मदत करण्यात यावी अशी नम्र विनंती केलेली आहे.

यापुर्वी संस्थानमार्फत शिर्डीमधील सामुदायिक विवाह सोहळ्याचे कार्यक्रमास रु.२५,०००/- पर्यंत हरबरा डाळ व साखर अशी वस्तुरुपाने मदत केलेली आहे. तद्नंतर मागिलवर्षापासून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) , साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार, दि.२३/०५/२००६ रोजी शिर्डी येथे सर्व धर्मीय सामुदायीक विवाह सोहळा आयोजीत करण्याचे दि.०१/०४/२००६ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील आयत्या वेळचा विषय क्र. २५, निर्णय क्र. २५१ ने मंजूर करण्यात आलेला आहे, सदरचे सामुदायीक विवाह सोहळयासाठी जागा, मंडप, वधूवरांना पोषाख, सनई-चौघडा-वाजंत्री इ.चा खर्च साई सिध्दी चॅरिटेबल ट्रस्ट, शिर्डी, व दत्त धार्मिक एवं परमार्थिक ट्रस्ट, इंदोर यांनी व मणि-मंगळसुत्र व इतर खर्च संस्थानमार्फत करण्यात आलेला आहे. यापुर्वी इतर सामुदायिक विवाहसोहळयास संस्थानमार्फत आर्थिक वा शिधास्वरुपात मदत केलेली नाही. तथापि एक विशेष बाब म्हणून स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, मु.पो.राळेगण सिध्दी, जि.अहमदनगर यांना रु. ५०,०००/- पर्यंतचा शिधा देणेस हरकत नाही.

तथापि याबाबत धोरणात्मक निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत होणे आवश्यक आहे, कारण अशाप्रकारे एका सामुदायिक विवाह सोहळ्यास मदत केल्यास इतर ठिकाणाहुनही सामुदायिक विवाह सोहळयासाठी मदतीबाबत विचारणा होईल, त्यावेळी त्यांना नकार देता येणार नाही.

तथापि प्रस्तावित प्रकरण " ग्रॅन्ड इन एड " स्वरुपाचे आहे. विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ चे कलम १७(२)(ण)(अध्यादेशान्वये सुधारित)मधील तरतुदीन्वये मानवजातीचे कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल यानुसार अनुदान देण्याची तरतुद आहे.

तसेच सर्व धर्मिय सामुदायिक सोहळयाचा उद्देश व रोख रकमेऐवजी शिधा स्वरुपातील मागणी हे मुद्दे विचारात घेता विषेश बाब म्हणून या प्रस्तावाचा विचार होणेस हरकत नाही. असे नम्र मत आहे.

तथापि एक विशेष बाब म्हणून स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, मु.पो.राळेगण सिध्दी, जि.अहमदनगर मार्फत होणा-या दि.२९/०४/२००७ रोजी होणा-या सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळ्यातील व-हाडी मंडळींना भांडार विभागातून रु.५०,०००/- वा रु.१,०००,००/- पर्यंतचा शिधा वस्तुरुपाने मदत संस्थानमार्फत देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,एक विशेष बाब म्हणून स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, मु.पो. राळेगण सिध्दी, जि.अहमदनगर मार्फत होणा-या दि.२९/०४/२००७ रोजी होणा-या सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळयासाठी रुपये ५० हजार पर्यंत शिधा स्वरुपात वस्तूरुपाने मदत देण्यात यावी, असें ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २३. सुरत येथे पादुका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलन भरविणे बाबत**

**निर्णय क्र. ३१९.** श्री अजय बोगावाला, साईभक्त, सुरत यांचे दि. २७/०३/२००७ रोजीचे पत्रान्वये सुरत व गुजरात येथील भक्तांसाठी सुरत येथे श्री साईबाबांचे चांदीच्या पादुका सर्व साई भक्तांना दर्शनाचा लाभ मिळवून देण्याच्या हेतूने साई भक्त संमेलन भरवून तेथे पादुका नेण्याचा मानस आहे. सुरत येथे साईबाबांच्या भक्तांची व देणगीदारांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने ह्या कार्यक्रमास साईभक्तांचा मोठ्या प्रमाणावर उस्फुर्तपणे सहभाग मिळेल. ज्याप्रमाणे नाशिक येथे पादुका दर्शनासाठी नेल्या होत्या त्याप्रमाणे संस्थानमार्फत नेण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केलेली आहे. तसेच या संमेलनामध्ये सुरत येथे होणारा सर्व खर्च आवश्यक त्या सर्व सुविधा, जेवण्याची व राहण्याची व्यवस्था सुरत येथील साईभक्त करण्यास तयार आहेत. सुरत येथे श्री साईबाबा संस्थानला कोणताही खर्च करावा लागणार नाही. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या मा.व्यवस्थापन समितीमध्ये पादूका सुरत येथे नेण्याचा निर्णय घेतल्यानंतर मे महिन्याच्या दुस-या - तिस-या आठवड्यात आपल्या संम्मतीने कार्यक्रमाची रुपरेषा व तारखा ठरविण्यात येतील. तरी सदर प्रस्तावास मान्यता मिळावी, ही विनंती. असे कळविले आहे.

साईभक्त संमेलन कार्यक्रम हा अधिनियम २००४, १७(ड) मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार मध्ये नमुद केलेप्रमाणे - श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल. या नुसार घेता येईल. त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

उपरोक्तचे पत्रातील मुद्यानुसार तसेच श्री अजय बोगावाला, साईभक्त, सुरत, यांचे अर्जानुसार संस्थानला सुरत येथे कोणत्याही प्रकारचा खर्च येणार नसून संपूर्ण खर्च तेथील साईभक्त करणार आहेत. येथून पादुका बरोबर जे कर्मचारी जातील त्यांचे निवास व भोजनाची व्यवस्था सुरत येथील

साईभक्त करणार आहेत. तसेच सुरत व गुजरात राज्यातील साईभक्तांची अत्यंत उत्कट इच्छा दिसत असून त्यांनी सुचविलेनुसार मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता मिळालेस त्यानुसार संबंधीतांना तसा पत्रव्यवहार करता येईल व त्यानंतर माहे मे च्या दुस-या वा तिस-या आठवडयात तारीख निश्‍चित करुन कार्यक्रमाची रुपरेषा आखता येईल,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सुरत येथे पादूका दर्शन सोहळा व साईभक्त संमेलन तुर्त भरविण्यात येऊ नये असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २४. पोष्ट खर्चासाठी फ्रँकींग मशिनमध्ये रक्कम भरणेबाबत.**

**निर्णय क्र.३२०.** संस्थानचे जावक विभागाकडील दैनंदिन टपाल/उदीप्रसाद पाकिटे/उत्सव निमंत्रण पत्रिका इ. पाठविणेकामी एस.कॉम.व्हॅसलर कंपनीचे फ्रँकिंग मशिन सन १९९७ रोजी रुपये-२,९०,७००/- रक्कमेस खरेदी करण्यात आले असून, ते संस्थानचे प्रशासन शाखा वशी-११ (जावक विभाग) मध्ये कार्यान्वित आहेत.

सदर मशिनवर संस्थानचे दैंनदिन टपाल, देणगी दिलेल्या भक्तांना उदीप्रसाद, आश्रय दाते व आजीव सभासद यांना श्रींचे उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद पाकिटे पोष्टामार्फत पाठविणेकामी फ्रँकिंग करुन पाठविले जाते.सदर फ्रँकिंग मशिनमध्ये उपरोक्त कामासाठी पोष्ट ऑफीसमार्फत वेळोवेळी रक्कम भरावी लागत आहे.

पूर्वी उपरोक्त फ्रँकिंग मशिनमध्ये शिरडी पोष्टामार्फत संस्थानचे सेव्हिंग खात्यातून मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने विड्रॉल स्लीप भरुन साधारण वेळोवेळी रुपये- ५,००,०००/- (अक्षरी रुपये- पांच लाख ) भरण्यात येत होते. परंतू आता संस्थानने शिरडी पोष्ट ऑफीस येथील सेव्हिंग खाते बंद केल्यामुळे सदर रक्कम मा.सब पोष्ट मास्तर,कोपरगांव यांचे नांवे चेकने शिरडी पोष्ट ऑफीस मार्फत कोपरगांव येथे पाठवून,बँकेत जमा झाल्यानंतर ती रक्कम शिरडी पोष्ट ऑफीसमार्फत संस्थानचे फ्रँकिंग मशिनमध्ये भरण्यात येते. सदरची रक्कम दरमहा सरासरी रुपये- ४,००,००० ते ५,००,०००/- (अक्षरी रुपये - चार लाख ते पांच लाख ) पर्यंत भरण्यात येत आहे.

**दि.०१/०४/२००६ ते दि.२३/०३/२००७ अखेर**

**दैनदिन टपाल/उदीप्रसाद /उत्सव निमत्रंण पत्रिका व मनिऑर्डर पाकिटे पोष्टेजकरीता झालेला खर्च**

| अ.नं. | महिना | दैनदिन टपाल खर्च | उदीप्रसाद/मनिऑर्डर | उत्सव निमंत्रण पत्रिका | एकुण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | एप्रिल-०६ | १६,०४४ | ५,८०,७१५ | --- | ५,९६,७५९ |
| ०२ | मे-०६ | ३४,१३५ | १,८५,५०५ | --- | २,१९,६४० |
| ०३ | जून-०६ | ४०,४५७ | ८१,३३० | ४,३७,४६५ | ५,५९,२५२ |
| ०४ | जूलै-०६ | ३३,५७४ | ६,६९,२६५ | --- | ७,०२,८३९ |
| ०५ | ऑगष्ट-०६ | १९,५७८ | २,२५,७४७ | --- | २,४५,३२५ |
| ०६ | सप्टेंबर-०६ | ३३,३०५ | ४७,६७५ | ४,४६,५४० | ५,२७,५२० |
| ०७ | ऑक्टो.-०६ | ३०,६२२ | ३,१७,३८७ | | ३,४८,००९ |
| ०८ | नोव्हेंबर-०६ | २७,२७९ | ६,०८,८०५ | --- | ६,३६,०८४ |
| ०९ | डिसेंबर-०६ | २६,७०६ | ८९,९३० | --- | १,१६,६३६ |
| १० | जानेवारी-०७ | ४६,९२१ | १,३५,८३१ | --- | १,८२,७५२ |
| ११ | फेब्रुवारी-०७ | ३५,२९५ | १,०४,४३० | --- | १,३९,७२५ |
| १२ | मार्च-०७ | ४७,३८४ | १,५३,६९२ | ४,७०,०७९ | ६,७१,१५५ |
| | | **३,९१,३००** | **३२,००,३१२** | **१३,५४,०८४** | **४९,४५,६९६** |

०१) दि.०१ एप्रिल -२००६ ते दि.२३ मार्च -२००७ अखेर एकुण वार्षिक पोष्टेज खर्च -४९,४५,६९६/-
०२) दरमहा दैनंदिन टपाल/उदीप्रसाद/मनिऑर्डर पाकिटे व उत्सव निमंत्रण पोष्टेज खर्च -४,१२,१४१/-
आता सध्या सदर मशिनमध्ये रुपये- ४,००,०००/- (अक्षरी रुपये- चार लाख ) मात्र इतकी रक्कम भरण्यात येत आहे.सदर रक्कम भरणेकामी लेखाशाखा येथील प्रिऑडीटर यांना मा.व्यवस्थापन समितीच्या ठरावाची आवश्यकता आहे.

तरी फ्रँकिंग मशिनमध्ये पोष्टेजसाठी आवश्यकतेनूसार वेळोवेळी रक्कम रुपये-४,००,०००/- (अक्षरी रुपये- चार लाख) इतकी रक्कम भरणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-११)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २५. दिल्ली येथे साईभक्त संमेलन घेणेकामी तारीख निश्‍चित करणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२१.** शनिवार, दिनांक १६/०९/२००६ रोजी शिरडी येथे पार पडलेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मुंबई, नाशिक, दिल्ली इ. ठिकाणी श्रीसाईभक्त संमेलन आयोजित करावेत असा ठराव विषय नं. ०१-०३ व

निर्णय क्र. ६७४ अन्वये सम्मत करण्यात आलेला आहे. सदरचा साईभक्त संमेलन कार्यक्रम हा अधिनियम २००४, १७ (ड) मध्ये समितीचे कर्तव्य व अधिकार मध्ये नमुद केलेप्रमाणे - श्री साईबाबांच्या भक्तांमध्ये बंधुभाव, एकता, श्रध्दा आणि समता या भावना वाढीस लावणारे उपक्रम अथवा कार्यक्रम आयोजित करील किंवा हाती घेईल, या नुसार घेता येईल. त्यास शासनाच्या मान्यतेची आवश्यकता नाही.

उपरोक्त ठरावानुसार मा. कॅप्टन वासुदेवा, विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना दिल्ली येथील साईभक्त संमेलनाची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार माहे मार्च २००७ मध्ये ३०/०३/२००७ रोजी एक दिवस साइभक्त संमेलन तालकातोरा स्टेडीयम, दिल्ली येथे आयोजित करण्याचा विचार मांडला असून त्याचवेळेस तेथे संस्थानच्या नविन जनसंपर्क कार्यालयाचेही उद्घाटन करण्याचा मानस होता. त्यानुसार दि. ०६/०१/२००७ रोजीचे शिर्डी येथील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.१०९ अन्वये दि.३०/०३/२००७ रोजी दिल्ली येथे साईभक्त संमेलन घेणेस व नियोजनकामी येणा-या अंदाजीत रु. ३५,३५,०००/-(अक्षरी रु.पस्तीस लाख पस्तीस हजार मात्र)चे खर्चास मान्यता देणेत आलेली आहे. तसेच ह्याच सभेत निर्णय क्र.१०० अन्वये सदर कामाचे पुर्वतयारीसाठी म्हणून रु.६०,०००/- (अक्षरी रु.साठ हजार मात्र) मा. कॅप्टन वासुदेवा यांना ॲडव्हान्स म्हणून चेक वा रोख रक्कम देणेसही मान्यता देणेत आलेली आहे.

तथापि श्री रामनवमी उत्सव सोमवार, दि.२६/०३/२००७ ते दि. २८/०३/२००७ अखेर असलेने तसेच काही अपरिहार्य कारणास्तव सदरचे साईभक्त संमेलन पुढे ढकलण्यात आले असून ती तारीख निश्चित करणे आवश्यक आहे, म्हणजे त्यानुसार पूर्वतयारी करणे सोपे जाईल,असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,दिल्ली येथे साईभक्त संमेलन तुर्त घेण्यात येऊ नये असें ठरलें.

(कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी-०५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २६. शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना साफसफाईचे कामासाठी १५ कंत्राटी सफाई कामगार देणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२२.** शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचे दि.२०.३.२००७ चे पत्रान्वये त्यांचे कार्यालयास दि.२२/२/२००७ पासून आपलेकडील टेंडर वरील सफाई कामगार पुरविलेले आहेत. त्याबद्दल हार्दीक अभिनंदन केले आहे.

संस्थानने सफाई कामगार दिल्यामुळे शिर्डी शहर साफसफाई करणेस चांगल्या पध्दतीने हातभार लागलेला असून,शहर स्वच्छ होण्यास चांगली मदत होत आहे. तसेच काही भागात साफसफाई साठी कर्मचारी अपूरे पडत असल्याने संस्थानकडून कायमस्परुपी १५ टेंडर वरील सफाई कामगार मिळणेस विनंती केली आहे.

तरी सदर मागणी प्रमाणे १५ कंत्राटी अकुशल कर्मचारी एक वर्षाचे कालावधी करीता पुरविणेकामी खालील प्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

१५ कंत्राटी अकुशल कर्मचा-यांचे वेतनावर होणारा खर्च-

| | |
|---|---|
| प्रतिदिन प्रति कर्मचारी दर रु. | १२३.६१ |
| प्रॉव्हिडंट फंड १३.६१% | १६.८२ |
| सर्व्हिस चार्ज ०.७५% | ००.९२ |
| प्रति दिन प्रति कर्मचारी रु. | १४१.३५ |
| | x १५ कर्मचारी |
| | --------- |
| | २१२०.२५ |
| | x ३६५ |
| | ---------- |
| | ७७३८९१.२५ |
| १०%एक वर्षात होणारी अपेक्षीत वाढ | + ७७३८९.१२ |
| | ------------ |
| | ८५१२८०.३७ |

तरी उपरोक्त प्रमाणे शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना १५ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरवावयाचे असल्यास या १५ कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनापोटी एक वर्षाचे कालावधी करीता अंदाजे ८,५१,२८०.३७/- पर्यत खर्च अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, तो मान्य करण्यात आला. (कार्यवाही-स्वच्छता विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २७. संस्थानला अकुशल,कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी निविदा सादर केलेल्या कंत्राटदारांशी/ ठेकेदारांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणे बाबत**

**निर्णय क्र. ३२३.** संस्थानला कंत्राटी पध्दतीने अकुशल, कुशल कामगार पुरविणेसाठी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि., पुणे व मे.क्रिस्टल ट्रेड कॉम प्रा.लि., मुंबई यांची लेबर कॉन्ट्रॅक्टर म्हणून तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि., मुंबई यांची सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर म्हणून दि.०१-०३-२००६ पासून ते दि.२८-०२-२००७ अखेर या कालावधीसाठी नेमणूक करणेत आलेली आहे. सदर लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कराराची/ठेकेदारीची मुदत दि.२८-०२-२००७ अखेर संपुष्ठात आल्यानंतर त्यांचे कराराची/ठेकेदारीची मुदत आहे त्याच अटी व शर्तीवर दि.०१-०३-२००७ पासून ते दि.३०-०४-२००७ अखेर पर्यंत वाढविणेत आलेली आहे. संबंधीत लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची/ कराराची वाढीव मुदत दि.३०-०४-२००७ अखेर संपुष्ठात येत आहे.

त्यामुळे पुढील १ वर्षाचे कालावधीसाठी संस्थानला लागणारे अकुशल,कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांची/ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमान पत्रातून जाहीरात प्रसिध्दीस देऊन, सिलबंद निविदा मागविणेत आल्या होत्या. सिलबंद निविदा फॉर्मस् विक्रीची मुदत दि.१८-०१-२००७ पासून ते दि.३०-०१-२००७ पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.३१-०१-२००७ रोजी सायंकाळी ५-०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन संस्थानला लागणारे अकुशल, कुशल कामगार व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पध्दतीने पुरविणेकामी मान्यताप्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून एकूण ३८ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. पैकी श्री.सिताराम बापू वैद्य या ठेकेदाराने त्यांची निविदा रद्द केलेली आहे. सदर ३७ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७-०२-२००७ रोजीचे सभेपुढे उघडणेत येऊन, त्याबाबत तुलनात्मक तक्ता तयार करणेत आलेला आहे. तो खालीलप्रमाणे ः

| अ. नं. | निविदाधारकाचे नांव व पत्ता | प्रतिदिनी दर (रुपये ) संरक्षण अधिकारी | प्रतिदिनी दर (रुपये ) सुरक्षा पर्यवेक्षक | प्रतिदिनी दर(रुपये ) सशस्त्र सुरक्षा रक्षक | प्रतिदिनी दर (रुपये ) सुरक्षा गार्ड | प्रतिदिनी दर (रुपये ) | | प्रॉव्हीडंड फंड, सर्व्हीस चार्जेस व सर्व्हीस टॅक्स मागणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अकुशल कामगार | कुशल कामगार | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (१०) |
| ०१ | मे.ज्वाला सिक्युरिटी फोर्स,५८४,नवनक्षा लष्करी बाग रोड,स्वास्तीक स्कुल समोर नागपूर-४४० ०१७ | २६६.०० | १६६.००. | २३२.०० | १६२.०० | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-४%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०२ | मे.सिध्दार्थ सिक्युरिटी ॲन्ड डिटेक्टीव्ह फोर्स, ७७/६१६,रोड नं १ पोष्ट ऑफीस जवळ ,मोतीलाल नगर नं.०१, गोरेगांव (वेस्ट ) मुंबई-४०० १०४ | १४०.०० | १२१.९४ | १३०.०० | ११८.०० | -- | -- | अ)पी.एफ-१६.०७ रुपये<br>ब) सर्व्हीस चार्जेस-१.२५ रुपये<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०३ | मे.एक्स सर्व्हीसमन मल्टीपल सर्व्हीसेस ॲन्ड कन्सलटंस्, ६,मीनी कमर्शियल कॉम्पलेक्स महाराष्ट्र हौसिंग बोर्डे, त्रिदलनगर जवळ येरवडा, पुणे-४११ ००६ | १८४.४९ | १५९.५३ | १८३.१८व १६३.५६ एक्स सर्व्हीसमन/ सिव्हीलीयन | १५४.५१ | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०४ | मे.टॉप अँगल सिक्युरिटीज् ॲन्ड डिटेक्टीव्हज प्रा.लि., २/४,अंजनी कॉप्लेक्स ऑफ अंधेरी कुर्ला रोड,गुरुनानाक पेट्रोल पंप समोर,अंधेरी (ईस्ट ) मुंबई-४०० ०९९ | १९३.०० | १४०.०० | १८६.०० | १२०.०० | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-०.०५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०५ | मे.फ्लॅश सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हीस,९५/१७१८,समता नगर, कांदिवली ( ईस्ट )मुंबई-०१ | ११९.७९ | ११२.७९ | ११९.७९ | १०८.७९ | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-१ % एकूण बिलाचे रक्कमेवर<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०६ | मे.ड्रॅगॉन सर्व्हीसेस, शॉप नं.१६,शिवशक्ती सोसायटी,इंदिरा नगर,जे.पी.रोड मधुबन कॉलनी समोर , अंधेरी (वेस्ट ),मुंबई-४०० ० ५३ | १९३.०० | ११५.०० | १७०.०० | ९०.०० | -- | -- | अ) पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस-१.२५% मंन्थली बिलावर<br>क)सर्व्हीस टॅक्स १२.२४% मंन्थली बिलावर<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०७ | मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. ६, अंजलीना को- | २००.०० | १२२.०० | १९५.०० | ११८.०९ | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-०.०५% |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऑप.हौसिंग सोसायटी, बाजीप्रभू देशपांडे मार्ग, विलेपार्ले (वेस्ट ) मुंबई- ४०० ०५६ | | | | | | | क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०८ | मे.शेरपा सिक्युरिटी सर्व्हीसेस,<br>४,परेरावाडी,१५,खार रोड,<br>खार (वेस्ट ), मुंबई-४०० ०५२ | २५०.०० | २१६.०० | २५०.०० | १८३.०० | -- | -- | अ)पी.एफ-४६.७५ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ८ %<br>क)सर्व्हीस टॅक्स १२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ०९ | मे.कृष्णा सिक्युरिटी सर्व्हीसेस,<br>बिल्डींग नं.३२०/१७,पंतनगर,<br>सिध्दीविनायक को-ऑप.हौसिंग सोसायटी,हिंगवाला लेन,<br>घाटकोपर (ईस्ट )मुंबई-४०० ०७५ | १५८.२८ | ११६.०० | २३३.०० | १०१.०० | -- | -- | अ)पी.एफ- १३.६१ %<br>मान्य<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ३ %<br>क) सर्व्हीस टॅक्स१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १० | मे.फ्लड लाईट सिक्युरिटी सर्व्हीसेस,<br>१०३, वसुंधरा नेती गार्डन,<br>महंम्मदवाडी, हडपसर पुणे-२८. | २३३.०० | १८८.०० | १६९.०० | १३७.०० | -- | -- | अ)पी.एफ- १३.६१% होय.<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ५ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| ११ | प्रखर सिक्युरिटी ॲन्ड अलाइड सर्व्हीसेस,१,एम.जी.रोड, अब्बास चेंबर्स ४ था मजला,कॅफे महानाज समोर पुणे-४११ ००१. | १९२.०० | १७०.०० | २१९.०० | १५९.०० | -- | -- | अ)पी.एफ- १३.६१% होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ५ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १२ | मे.स्पार्क ऑल सिक्युरिटी ॲन्ड अलाईड सर्व्हीसेस प्रा.लि.,<br>३०८,स्टर्लींग सेंटर, अरोरा टॉवर्स समोर, एम.जी. रोड, कॅम्प<br>पुणे-४११ ००१ , | १४५.०० | १२१.९४ | १८४.५५ | ११८.०९ | -- | -- | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस-०.०५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १३ | मे.शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि.<br>सिसा हाऊस,समीर कॉम्लेक्स,<br>आरएस ७१,नवसर्जन सोसायटी,पंदेसरा,<br>सुरत-३९४२२१, | १६०.०० | १३०.०० | १५०.०० | १२४.०० | -- | -- | अ)पी.एफ- १३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस- २ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १४ | मे.ईगल हंटर सोलुशन्स लि.,प्रेम सन्स कम्पौऊंड, ईगल -हाऊस,गुंफा रोड,पहिला माळा<br>जोगेश्वरी (पु )<br>**मुंबई-४०० ०६०.** | २९६.१९ | २५५.५० | ४३०.६५ | २३९.२७ | -- | -- | अ)पी.एफ- --<br>ब) सर्व्हीस चार्जेस- १० %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १५ | मे.एस.डी.बी.सिसको (इंडीया) लिमिटेड,<br>पार्वती संकुल, एन.आय.बी.एम. साळुंके विहार, लिंक रोड,<br>कोंढवा खुर्द,<br>**पुणे-४११ ०४८** | ३८९.०० | १३९.०० | १२१.०० | ११८.०० | -- | -- | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस- १५ %<br>एकूण बिलावर...<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>+ शिक्षण कर -२ %<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १६ | मे.ईगल आय एन्टरप्राईज,<br>१ला मजला,नचिकेत,प्लाझा<br>मोरारजी र्कल,जी.आय.डी. सी., **वापी-३९६१९५** | १३०.०० | १२२.०० | १८६.०० | ११८.०० | -- | -- | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-१०.१० %<br>क)सर्व्हीस टॅक्स १२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १७ | मेडिएटर्स ॲन्ड अजंटा सिक्युरिटी प्रा.लि.,<br>प्लॉट नं.१५,टाऊन सेंटर,<br>एस.टी.बसस्टँड समोर,<br>सिडको, औरंगाबाद- ४३१ ००३ | २४९.८५ | २२०.६० | २४४.०० | १६७.८५ | -- | -- | अ)पी.एफ- १३.६१% होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ---<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>(संपूर्ण बिलाचे रक्कमेवर)<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी** |
| १८ | मे.टायगर सिक्युरिटी सर्व्हीसेस,<br>प्लॉट नं.९२,युनियन कंम्पौउंड<br>विजयनगर,एम.एम.रोड,<br>अंधेरी (ईस्ट ),<br>**मुंबई- ४०० ०५९** | १७५.०० | १६०.०० | १६०.०० | १५५.०० | १५०.०० | १५५.०० | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ५ %<br>पुर्ण बिलावर...<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| १९ | मे.बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं.) लिमिटेड,<br>२ व ३ सिल्व्हर व्हॅली को-ऑप.सोसायटी,नेहरु नगर समोर<br>नासिक-पुणे रोड ,<br>**नासिक- ४२२ १०१** | १४०.०० | १२१.९३ | १४०.०० | ११८.०८ | ११८.०८ | १२५.७८ | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-०.५० %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २० | अविसागर लेबर सप्लायर्स,<br>(श्री.भिवानंद लहु काळे) | १७५.०० | १७५.०० | १५०.०० | १३५.०० | १३५.०२ | १४३.१९ | अ)पी.एफ- १३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस-२.४० % |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मु.पो.शिरडी** ता.राहाता | | | | | | | क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २१ | मे.प्रशांत औद्योगिक कामगार अँन्ड सुरक्षा रक्षक सहकारी संस्था मर्यादित, २२१८,शरद सोसायटी, पी.सी.एन.टी.डी.. सेक्टर २७-अे, निगडी**, पुणे-४११ ०४४** | १३०.०० | १२१.९४ | १२५.०० | ११८.०९ | ११८.०९ | १२५.७६ | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ०.२५ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २२ | जयभवानी एंटरप्राईजेस, महात्मा फुले नगर,,मोहन नगर, पोलीस चौकी जवळ चिंचवड, **पुणे-४११ ०१९.** | १३०.०० | १२१.९४ | १२५.०० | ११८.०९ | ११८.०९ | १२५.७६ | अ)पी.एफ-१३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ०.०५ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २३ | बी.व्ही.जी.इंडिया लि.,<br>१०,देविका हाईटस्,<br>शिवाजीनगर,<br>**पुणे-४११ ००५** | २४०.०० | २१०.०० | २००.०० | किमान वेतन कायद्या-नुसार १२३.६१ | किमान वेतन कायद्या-नुसार १२३.६१ | किमान वेतन कायद्या-नुसार १३१.३० | अ)पी.एफ- १३.६१% मान्य<br>ब) सर्व्हीस चार्जेस-०.७५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २४ | सोल्जर्स इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सीज,<br>वडनेर दुमाळा,आरती सेंटर्स जवळ, देवळाली,<br>**नासिक** | २४०.८६ | २१४.१० | २६७.६२ | १६९.६८ | १६४.३३ | १७५.०४ | अ)पी.एफ-१३.६१% मान्य<br>ब) सर्व्हीस चार्जेस- वेतनामध्ये समाविष्ठ आहे.<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २५ | मे.गार्डीयन फॅसिलीटीज मॅनेजमेंट (नागपुर ) प्रा.लि.,<br>बिल्डींग १० जी/२०१-२०२ दुसरा मजला,मंगलमुर्ती कॉप्लेक्स, मानखुर्द-घाटकोपर लिंक रोड,मानखुर्द (प)<br>**मुंबई ४०० ०४३** | १८१.०० | १७५.०० | ३२२.०० | १६९.०० | १६९.०० | १८१.०० | अ)पी.एफ- --<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ४ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २६ | बिसेफ,<br>सर्वे नं.४३, शॉप नं.१६, बिल्डींग-सी, चंदननगर,<br>नगर-पुणे रोड,**पुणे-४११ ०१४** | ३००.०० | २००.०० | २००.०० | १८०.०० | १७५.०० | २००.०० | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस- १२.५ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २७ | मे.महात्मा फुले मल्टी सर्व्हीसेस, जेव्हीजे,कृषी सारथी कॉलनी, बसमत रोड,<br>**परभणी-४३१ ४०१** | २४८.८९ | १४८.८९ | १८९.८९ | ११८.८९ | ११८.८९ | १२३.८८ | अ)पी.एफ-१३.६१% होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ०.५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २८ | बेस्ट सर्व्हीसेस,<br>घोले बिल्डींग,घोले रोड,<br>राणी लक्ष्मीबाई चौक,<br>शिवाजीनगर<br>**पुणे-४११ ००५** | ३५०.०० | २०१.०० | ३३५.०० | १४८.०० | १४८.०० | २०१.०० | अ)पी.एफ- १३.६१ %<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ७.५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| २९ | व्हिज सिक्युरिटी फोर्स प्रा.लि.,<br>७, शिव-संकल्प, संभाजी पथ, विष्णुनगर, नवपाडा,<br>**ठाणे (प )-४०० ६०२** | १९०.०० | २८५.०० | २९०.०० | १९०.०० | १९०.०० | २८५.०० | अ)पी.एफ- १३.६१ % होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ----<br>(फक्त साईसेवा)<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) सुरक्षा कर्मचारी व अकुशल/ कुशल कामगार** |
| ३० | मे.अेव्हीकॉन अेव्हीएशन कन्सल्टींग सर्व्हीसेस प्रा.लि., शॉप नं.१, सोळंकी हाऊस, ४ था रस्ता, खार (वेस्ट ),<br>**मुंबई- ४०० ०५२** | --- | --- | --- | --- | १९१.६६ | २०२.७६ | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस- --<br>क) सर्व्हीस टॅक्स- १२.२४%<br>शासन नियमाप्रमाणे<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३१ | प्रतिक सर्व्हीसेस, (श्री.बाळासाहेब किसन साबळे) सौरभ अपार्टमेंट, सातमाऊलीचौक, श्रमिक नगर, सातपुर, **नासिक-४२२ ००७,** | --- | --- | --- | --- | १२१.०० | १२७.५० | अ)पी.एफ. १३.६१% होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस- १.५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३२ | श्रीकृष्ण एन्टरप्राईजेस,<br>जी-३,सर्वे नं.८४ /१६५/ १२३/ | --- | --- | --- | --- | ११८.०९ | १२५.७८ | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १२४,उत्तम सोसायटी,शास्त्री-नगर,<br>कोथरुड,<br>**पुणे-४११ ०२९** | | | | | | | ०.७५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३३ | श्री.महेंद्र मोहनीराज गंधे,<br>मनिषा,सुयोग गृहनिर्माण<br>मंडळ,प्रोफेसर कॉलनी<br>जवळसावेडी, **अहमदनगर** | --- | --- | --- | --- | किमान<br>वेतन<br>दरानुसार<br>१२३.६१ | किमान<br>वेतन<br>दरानुसार<br>१३१.३० | अ)पी.एफ- --<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ३ %<br>क) सर्व्हीस टॅक्स- संस्थानने द्यावयाचा आहे.<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३४ | श्री साई एन्टरप्राईजेस,<br>न्यु.पुष्पांजली हौसिंग<br>सोसायटी,आरएच-५२,जी<br>ब्लॉक,एम.आय.डी.सी., चिंचवड,<br>**पुणे-४११ ०१९** | --- | --- | --- | --- | १३३.४६ | १३७.३१ | अ)पी.एफ- ---<br>ब) सर्व्हीस चार्जेस-<br>०.७५%<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३५ | मे.रिलायंन्स एन्टरप्रायजेस,<br>१०,एनपीएस लाईन,ईस्ट स्ट्रिट,<br>कार्पोरेशन बँक समोर,कॅम्प **पुणे-४११ ००१** | --- | --- | --- | --- | १२२.०० | १४०.०० | अ)पी.एफ- १३.६१%<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ६ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |
| ३६ | ओम साई सर्व्हीसेस,<br>एफ-१/१८,एन-४, सिडको<br>**औरंगाबाद-४३१ ००५** | --- | --- | --- | --- | १३९.४० | -- | अ)पी.एफ- १३.६१% होय<br>ब) सर्व्हीस चार्जेस-<br>पगाराचे- १ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल कामगार** |
| ३७ | मे.साई सर्व्हीसेस,<br>(श्री.उदय माधवराव देशमुख)<br>लक्ष्मीकुंज, जुने कोर्टा जवळ, सिन्नर<br>**मु.पो.ता.सिन्नर जि.नाशिक ४२२ १०३** | --- | --- | --- | --- | ११८.०० | १२६.०० | अ)पी.एफ- १३.६१%<br>ब) सर्व्हीस चार्जेस- ७ %<br>क) सर्व्हीस टॅक्स-१२.२४%<br>**(अ) अकुशल/ कुशल कामगार** |

उपरोक्त प्रमाणे उपस्थित निविदासादरकर्त्यांना त्यांचे निविदेतील दरासंदर्भात चर्चा/ वाटाघाटी करणेकामी सभागृहात एकत्रित बोलावून घेऊन, सभेचे सुरुवातीस उपस्थित सर्व कंत्राटदारांना मा.अध्यक्ष महोदयांनी किमान वेतनाचे दर, भविष्य निर्वाह निधी, सर्व्हिस टॅक्स, कामगार नुकसान भरपाई, बोनस, सानुग्रह अनुदान, रजा व पगारी सुट्टया, ग्रुप इन्शुरन्स, घरभाडे भत्ता, उपदान, आयकर, टि.डी.एस., ई.एस.आय.सी. इत्यादी उत्तरदायीत्वाची जाणीव करुन दिली. कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन दराने देय वेतन (मुंबई कार्यालयातील सुरक्षा गार्ड व अकुशल कंत्राटी कामगारांना बॉम्बे शॉप ॲण्ड कमर्शियल इस्टॅब्लीशमेंट झोन नं. १ प्रमाणे व इतर कंत्राटी कामगारांना झोन नं.३ प्रमाणे देय असलेले किमान वेतन दर) प्राव्हीडंड फंडापोटी मालकाचा हिस्सा त्यावरील प्रशासकिय चार्जेससह अंशदान @ १३.६१% व सर्व्हिस टॅक्स @१२.२४% या कारणासाठीची रक्कम लेबर व सिक्युरिटी कंत्राटदाराला संस्थानकडून देण्यात येईल. कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हिश्श्याची प्रॉ.फंड वर्गणीची रक्कम @१२.००% संबंधीत कॉन्ट्रॅक्टर्सचे बिलातून कपात करुन तसेच कंत्राटदारास संस्थानकडून दिली जाणारी प्रॉ.फंड मालकाचा हिस्सा प्रशासकिय चार्जेससह @१३.६०% असा दोनही कारणांसाठीची प्रॉ.फंड अंशदान एकूण रकमेचा स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेचा डी.डी./ चेक संबंधीत कंत्राटदारास पी.एफ. चलन भरणेकामी देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर सर्व कायदेशीर उत्तरदायीत्वाची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल. अशा रितीने कंत्राटदार म्हणून आपल्यावरील संभाव्य संपूर्ण कायदेशीर आर्थिक बोजा लक्षात घेऊनच त्यांनी विविध प्रकारचे कंत्राटी सुरक्षा कर्मचारी, अकुशल/ कुशल कामगार, अधिकारी यांच्या संबंधिचे आपले अंतिम वेतनदर, सर्व्हिस चार्जे इत्यादी तसेच, त्यांनी देऊ केलेल्या दरात आणखी सुट देणार किंवा कसे ? याबाबत माहिती लेखी स्वरुपात बंद पाकिटात देणे यावेत, असे त्यांना सांगणेत आले. त्यांनी वाटाघाटीचे वेळी देऊ केलेले सुधारित दर (बंद पाकिट) मा.श्री जयंत मुरलीधर ससाणे,अध्यक्ष, मा.श्री शंकरराव गेणूजी कोल्हे, उपाध्यक्ष व मा.श्री राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील,मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग यांचे उपसमितीचे सभेपूढे उघडण्यात येऊन अंतिम निर्णय घेण्यात यावा. तसेच पूर्वी ठरलेप्रमाणे सन २००० पूर्वीचे उर्वरित पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित नेमणूका देणेसंदर्भात निर्णय घेणेकामी या उपसमितीची सभा बोलाविण्यात यावी असे ठरले.

त्याचप्रमाणे सध्याचे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीची /कराराची वाढीव मुदत दिनांक ३०.४.२००७ अखेर संपुष्टात येत आहे. नवीन लेबर व सिक्युरिटी कॉट्रॅक्टर्स यांचे सुधारित दराचे बंद पाकिट उघडून तक्ता तयार करुन त्याबाबत निर्णय घेणे इत्यादी नेमणूक प्रकियेत आणखी एक महिन्याचा कालावधी लागणार आहे. म्हणून कामाची गैरसोय होऊ नये याकरीता सध्याच्या मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.पुणे व मे.क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि.पूणे यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या त्याचप्रमाणे मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी प्रा.लि. मुंबई व मे.शिवा इंडस्ट्रीयल सिक्युरिटी

एजन्सी (गुजरात) प्रा.लि.मुंबई यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांचे ठेकेदारीस/करारास सध्याचेच कंत्राटासबंधातील करारातील अटी व शर्तीस अधिन राहून दिनांक ०१/०५/२००७ पासून एक महिना मुदतवाढ देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २८. धर्मशाळा इमारतीचे मागील बाजूस सोलींग करुन पेव्हींग ब्लॉक बसविणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२४.** संस्थानचे धर्मशाळा (२०० रुम) विभागाचे बिल्डींग नं. ०१ व ०२ चे पाठीमागे संडासचे टाक्यांवर स्लॅब टाकणेकामी निविदा प्रक्रिया चालू असून प्राप्त झालेल्या निविदा मा.व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करण्यात आल्या आहेत. तसेच दोन्ही इमारतीचे पाठीमागील बाजूस घुशी व उंदीर यांचा मोठ्या प्रमाणात त्रास होत असून त्यांनी जागोजागी बिळे केलेले आहेत. सदर दोन्ही इमारतीचे मागील बाजुस सोलींग करुन मिळावे असे धर्मशाळा विभागाने दि. ०८/०३/२००७ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये कळविले आहे.

सदरहू कामाबाबत साईटवर समक्ष पाहाणी करण्यात आली आहे. त्यानुसार साईटवर सोलींग करुन पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे. त्याकरीता प्राथमिक ढोबळ अंदाजानुसार रु. ९.०० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे. त्यापैकी नगर-मनमाड रस्ता कामाचे संस्थानकडे शिल्लक असलेले पेव्हींग ब्लॉक्स उपरोक्त कामासाठी वापरता येतील. संस्थानचे आर्किटेक्ट निकम पाटील ॲण्ड असो श्रीरामपूर यांचेकडून सदर कामाचे प्लॅन एस्टीमेट तयार करुन वर्तमानपत्रातील जाहिरातीव्दारे निविदा मागविण्यात व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. २९. शिर्डी येथे हेलीकॉप्टर सेवा सुरु करणेसाठी जगसन एअरलाईन्स लि.,नवी दिल्ली यांचेबरोबर करारनामा करणेसाठी मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२५** अ) दि.२५/११/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील नि.क्र.८९६ अन्वये एकावेळेस ३ ते ४ हेलीकॉप्टर उतरु शकतील असे हेलीपॅड संस्थानतर्फे बांधण्याचे प्रस्तावित आहे. त्यापैकी एक हेलीपॅड जगसन एअरलाईन्स यांना वापरासाठी देता येईल,याकामी चर्चेसाठी त्यांचे प्रतिनिधीस बोलविण्यात यावे असे ठरले.

ब) दि.०६/०१/२००७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील नि. क्र.८२ अन्वये जगसन एअरलाईन्स लि; नवी दिल्ली यांना तूर्त श्री साईबाबा भक्तनिवास जवळील तात्पुरते हेलीपॅड दुरुस्त करुन देणेस व संस्थानचे भक्तनिवास इमारतीत तळमजल्यावरील हॉल्समध्ये प्रवासी भक्तांसाठी प्रतिक्षा हॉल, तिकीट बुकींगरुम व इतर अनुषंगिक सेवा सुविधा उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. याकामी अंदाजे रु. २.०० लक्ष इतका खर्च अपेक्षीत होता. त्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर ठरावामध्ये स.नं.१९५ पै. मध्ये कायमस्वरुपी हेलीपॅड तयार करण्यासाठी खर्चाचे प्लॅन व एस्टीमेट मे. निकम पाटील ॲण्ड असो., श्रीरामपूर यांचेकडून तयार करुन घेण्यात यावे व वर्तमान पत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात याव्या असे ठरले. तथापी त्यानंतर श्री साईबाबा भक्तनिवास जवळील जागेत श्री के.व्ही.रमनी यांचेमार्फत साईआश्रम प्रकल्पाचे बांधकाम होणार असल्याने त्याठीकाणी तात्पुरत्या स्वरुपात करावयाच्या हेलीपॅडचे काम रदद करण्यात आले.गट नं. १९५ मध्ये कायमस्वरुपी हेलीपॅड बांधकामासाठी दि.१३/०२/२००७ रोजीचे स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिद्ध करुन निविदा मागविण्यात आल्या होत्या. दि.१७/०२/२००७ चे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत प्राप्त झ ाालेल्या दोन निविदा उघडून श्री.बी.एम.कुऱ्हाडे, मढी यांनी निम्नतम दराची निविदा स्वीकारुन त्यांना काम देण्यात आले. दि. ०५/०३/२००७ रोजी जा.नं. एसएसएसटी/वशी-बांध/३४८४/२००७ अन्वये ठेकेदार श्री. बी.एम. कुऱ्हाडे यांना कार्यादेश देण्यात आला. ठेकेदार यांनी कामास सुरुवात केलेली आहे व काम प्रगतीपथावर आहे.

क) जगसन एअरलाईन्स यांनी आज दि. २७/०३/२००७ रोजी करावयाच्या करारनाम्याचा मसुदा दिलेला आहे. त्यात खालील बाबींचा स्पष्ट निर्देश होणे आवश्यक असून त्याप्रमाणे व्यवस्थापन समितीचा निर्णय होणे आवश्यक आहे.

०१) सदर हेलीपॅड वापरासाठी संस्थानने कुठलेही शुल्क आकारु नये असे जगसन एअर लाईन्स यांनी प्रस्तावित केलेले आहे. तरी हेलीपॅड वापरासाठी भाडे ठरविणेबाबत अथवा विनाशुल्क वापर करणेसाठी अनुमती द्यावयाची असल्यास त्यासाठी मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी आवश्यक आहे.

०२) हेलीपॅडची देखभाल संस्थानतर्फे करण्यात यावी असे जगसन एअरलाईन्स यांनी प्रस्तावित केले आहे. त्यास मंजुरी असावी.

०३) करारनाम्यात संस्थानने वीज, पाणी व टेलीफोन इ. ची सुविधा करणे आवश्यक आहे असे म्हटले आहे. सदर सुविधा देतांना त्याबाबत करावा लागणारा खर्च संस्थानने करावयाचा ठरल्यास मा.व्यवस्थापन समितीची मंजुरी आवश्यक राहील.

०४) करारनाम्यात अट क्र. १० मध्ये हेलीकॅप्टरनी येणाऱ्या प्रवाशांना दर्शनाची सुविधा प्राधान्याने देणेबाबत नमूद केलेले आहे. याप्रमाणे सुविधा द्यावयाची असल्यास त्यासाठी मा. व्यवस्थापन समितीची मंजुरी आवश्यक आहे.

०५) सदर करारनामा दोन वर्षाचे कालावधीसाठी करण्यात यावा व त्यानंतर उभय पक्षांचे संमतीने त्याचे नूतनीकरण करावे असे मसुदा करारनाम्यात नमूद केले आहे. तथापी सध्या फक्त ३१ डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत सुमारे नऊ महीन्यांचे कालावधीसाठी सदर करारनामा करावा, असे नम्र मत आहे. त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

०६) वरीलप्रमाणे अटी व शर्तीबाबत निर्णय झालेनंतर त्यानुसार सदर करारनामा संस्थानचे वकील यांचेकडून तपासून अंतिम करता येईल.

याप्रमाणे प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन जगसन एअरलाईन्स लिमिटेड, नवी दिल्ली यांचेशी करावयाच्या करारनाम्यात खालील अटी व शर्तींचा समावेश करणेस मान्यता देणेत आली.

०१. मौजे निमगांव कोऱ्हाळे गट नं. १९५ मधिल संस्थान मालकीच्या जागेत तयार करण्यात येत असलेले हेलीपॅड जगसन एअरलाईन्स यांचे वापरासाठी विनामुल्य उपलब्ध करण्यात यावे.

०२. हेलीपॅडचे ठिकाणी संस्थानतर्फे विद्युत व पाणी पूरवठ्याची सोय करण्यात यावी. त्याचे वापराचा आकार जगसन एअरलाईन्स यांनी अदा करावा.

०३. हेलीपॅडचे सुरक्षेची जबाबदारी जगसन एअरलाईन्स यांची राहील. तथापी जगसन एअरलाईन्स यांनी सदर हेलीपॅडचा वापर फक्त साईभक्तांचे सोयीसुविधेसाठी विहीत सेवेसाठीच करावा व त्यासाठी सदर हेलीपॅडची देखभाल व स्वच्छता राखावी.

०४. अतिमहत्वाचे व्यक्तींचे शिर्डी भेटीसाठी तसेच आपत्कालीन परिस्थितीत संस्थानला सदर हेलीपॅडचा वापर प्राधान्याने करण्याचा हक्क राहील.

०५. सदर सेवेसाठी प्रवाशांना आकारावयाचे भाडे जगसन एअरलाईन्स यांनी ठरवावे. तथापी त्याबाबत वेळोवेळी संस्थानला पूर्वकल्पना द्यावी.

०६. सदर हेलीकॉप्टर सेवेदरम्यान संस्थानचे मालमत्तेस काही हानी पोहोचल्यास अथवा प्रवाशी आणि कर्मचाऱ्यांपैकी कुणास इजा अथवा जिवीत हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी जगसन एअरलाईन्स यांचेवर राहील.

०७. सदर हेलीकॉप्टर सेवेव्दारे शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना संस्थानचे प्रचलीत नियमानुसार प्राधान्याने दर्शन सुविधा देण्यात यावी.

०८. सदरहू करारनामा बारा महीन्यांचे आगाऊ नोटीसीद्वारे रद्द करण्याची मुभा दोनही पक्षास असावी.

०९. सुरुवातीला सदर करारनामा एक वर्षाचे मूदतीसाठी करण्यात यावा. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झालेनंतर त्याचे पुढील चार वर्षापर्यंतचे कालावधीसाठी नूतनीकरण करण्यात यावे.

याप्रमाणे अटी व शर्तीचा समावेश करुन संस्थानतर्फे जगसन एअरलाईन्स लिमिटेड, नवी दिल्ली यांचेशी करारनामा करणेसाठी मंजुरी देणेत आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३०. उन्हाळी मंडपाचे कोटेशन उघडणेबाबत.**

**निर्णय क्र. ३२६.** सदरहू विषयावर उप समितीचे सभेत निर्णय घ्यावा असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३१. श्री.पी.राधाकृष्णन, वरिष्ठ लिपिक,मुंबई कार्यालय यांना अॅन्जोप्लास्टी चे उपचारासाठी अॅडव्हान्स देणेबाबत.**

**निर्णय क्र.३२७.** मुंबई कार्यालयातील वरिष्ठ लिपीक श्री. पी. राधाकृष्णन यांच्या छातीत अचानक दुखत असल्यामुळे त्यांना दिनांक १९/०२/२००७ रोजी प्रमीला हॉस्पिटल, कळवा येथे दाखल करण्यात आले होते. प्राथमिक तपासणीत तेथील तज्ञ डॉक्टरांना श्री. पी. राधाकृष्णन यांना हृदयविकाराचा त्रास असल्याचे समजले व त्वरीत त्यांना ICCU विभागात दाखल करुन घेतले व हृदयविकारासंबंधी सर्व प्राथमिक तपासण्या करुन २ दिवसानंतर ICCU विभागातून सर्वसाधारण विभागात ठेवून दिनांक २३/०२/२००७ रोजी घरी विश्रांती

घेण्यास सांगितले. त्याप्रमाणे श्री.पी.राधाकृष्णन यांनी विश्रांती घेऊन संबंधित डॉक्टरांच्या सल्यानुसार दि.१७/०३/२००७ रोजी ते कामावर हजर झाले.

श्री पी. राधाकृष्णन यांना दिनांक १८/०३/२००७ रोजी पुन्हा छातीत दुखायला लागले म्हणून डॉक्टरांचा सल्ला घेतला असता त्यांनी त्वरीत ॲन्जीओग्राफी करण्यास सांगितले संस्थानचे मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब जे बॉम्बे हॉस्पिटलशी संबंधीत आहेत त्यांच्याशी या बाबत चर्चा केली असता त्यांनी श्री पी. राधाकृष्णन यांना दिनांक १८/०३/२००७ रोजी बॉम्बे हॉस्पिटल येथे दाखल करुन घेतले. बॉम्बे हॉस्पिटलमध्ये प्राथमिक तपासण्या करुन ॲन्जीओग्राफी केली असता श्री राधाकृष्णन यांना २ ब्लॉकेज असल्याचे निदर्शनास आले म्हणून मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी साहेब यांच्या सल्यानुसार व देखरेखीखाली एका ब्लॉकेजची ॲन्जीओप्लास्टि दिनांक २७/०३/२००७ रोजी करण्यात आली त्यासाठी सोबतच्या बॉम्बे हॉस्पिटलकडील दि.२८/०३/२००७ च्या बीलाप्रमाणे रु.१,७७,५८६/- खर्च झालेला आहे. सदरचे बील अदा झाल्यावर श्री पी. राधाकृष्णन यांना हृदयविकाराबाबत असलेल्या दुसऱ्या ब्लॅाकेजची ॲन्जीओप्लास्टि करण्यात येणार आहे

श्री पी. राधाकृष्णन यांना आतापर्यंत झालेल्या खर्चाचे एकूण बील रु.१,७७,५८६/- चे सादर केले असून सदर रक्कम मिळणे बाबत श्री पी. राधाकृष्णन यांनी दि.२८/०३/२००७ चे अर्जान्वये विनंती केली आहे. बॉम्बे हॉस्पिटल हे संस्थानचे मान्य यादीत आहे तरी श्री पी. राधाकृष्णन यांना रु.१,७७,५८६/- मात्र आगाऊ रक्कम बॉम्बे हॉस्पिटलचे नावाने देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता,त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षीका)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३२. कांकरीया ॲण्ड असोसिएटस्, अहमदनगर (आर्किटेक्ट किरण क. कांकरीया) यांची आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत.. ..**

**निर्णय क्र.३२८.(अ)** कांकरीया ॲण्ड असोसिएटस्, अहमदनगर (आर्किटेक्ट किरण क.कांकरीया) यांनी त्यांचे दिनांक ३० मार्च, २००७ रोजीचे पत्रान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी या संस्थेच्या आर्किटेक्ट पॅनेलवर काम करण्याची संधी द्यावी, म्हणून विनंती केलेली आहे.

आर्किटेक्ट किरण क.कांकरीया, अहमदनगर यांनी त्यांचे पत्रात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :

" कांकरीया ॲण्ड असोसिएटस् ही आर्किटेक्टरल फर्म असून, गेल्या २३ वर्षापासून या आर्किटेक्ट क्षेत्रात आर्किटेक्ट, प्लॅनर्स आणि इंटेरिअर डिझायनर म्हणून काम करीत आहे. फर्ममध्ये मोठया प्रमाणावर आर्किटेक्ट सहकारी सभासद असून, ते विविध नव-नवीन प्रकारे आर्किटेक्ट क्षेत्रात प्रकल्प राबवित आहेत.

मी साईभक्त असून, माझे वडिल कै.के.एच.काकरे हे संस्थानचे काही वर्ष प्रशासक होते. संस्थानचे प्रकल्प साईभक्त म्हणून साकारु.

तरी कृपया संस्थानचे आर्किटेक्ट पॅनेलवर आर्किटेक्ट म्हणून नेमणूक करावी, अशी विनंती त्यांनी केली आहे.

तसेच, यापत्रावर मा.अध्यक्ष महोदय यांनी "नेमणूक करावी" म्हणून अभिप्राय-वजा-शेरा दिलेला आहे.

आर्किटेक्ट किरण क. कांकरीया यांनी त्यांचे पत्रासोबत, त्यांचे वैयक्तिक माहितीचे परिशिष्ट जोडलेले आहे. त्यामध्ये त्यांचे शिक्षण बी.आर्किटेक्ट, एफ.आय.आय.अे. झालेले आहे. तसेच त्यांनी विविध प्रसिध्द संस्थांचे आर्किटेक्ट म्हणून काम केलेले आहे. या संस्थांमध्ये लोकमत भवन, आनंदऋषी हॉस्पीटल, तपोभूमी, पत्रकार भवन आदिंचा समावेश आहे. तसेच विविध शैक्षणिक, वैद्यकिय, वाणिज्य संस्थांचे आर्किटेक्ट म्हणून काम पाहिलेले आहे.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमूद केल्यानुसार, आर्किटेक्ट किरण क. कांकरीया (कांकरीया ॲण्ड असोसिएटस, अहमदनगर) यांची संस्थानचे आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाह-बांधकाम विभाग प्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३३. महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, महाराष्ट राज्य यांना सल्लागार नियुक्तीचे पत्र देण्यास व एकूण फी पैकी रुपये १ लाख रक्कम आदा करणे बाबत.**

**निर्णय क्र.३२९.** नवीन प्रसादालयाकरीता सौर उर्जा यंत्रणा खरेदी व उभारणीकामी निविदा फॉर्म बनविणे, कॉन्ट्रॅक्टरची निवड करणेकामी सल्ला देणे तसेच यंत्रणा उभारणीचे काम दर्जेदार व योग्य पध्दतीने होत आहे किंवा नाही याची वेळोवेळी पहाणी व तपासणी करणे. त्याचप्रमाणे उपरोक्त यंत्रणा उभारणीनंतर भारत सरकारकडून अनुदान प्राप्त होणेसाठी कागदपत्र पुर्तता व पाठपुरावाकरणेसाठी मदत करणे, साईप्रसाद नं.२ इमारतीवरील जुनी सोलर स्टीम कुकींग यंत्रणा नविन प्रसादालय इमारतीवर शिफ्ट करुन पुन्हा उभारणी करणेकामी महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे या महाराष्ट्र सरकारचा अंगीकृत विभाग

यांना मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ चे सभेतील निर्णय क्र. २१५ अन्वये सल्लागार म्हणून नियुक्तीस मान्यता मिळालेली आहे.

मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१७.०२.२००७ चे सभेतील निर्णय क्र. २१५ नुसार महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे यांनी सल्लागार म्हणून कळविलेली १० टक्के रक्कम जास्त वाटत असल्याने फीची रक्कम कमी करणेकामी जा.नं.एसएसएस/वशी-प्रसाद/ २६०२/०७, दि.२०.०२.०७ चे पत्राद्वारे विनंती करण्यात आलेली होती.

उपरोक्त विनंतीपत्रानुसार महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे यांनी सल्लागार म्हणून सौर उर्जा यंत्रणा उभारणीकामी एकूण प्रोजेक्ट रकमेच्या १० टक्के ऐवजी ३ टक्के इतकी फी मध्ये काम करण्यात तयार असलेबाबत REN/ SSCS/ SAI / ०६-०७/ १२६८, दि.०३.०३.०७ चे पत्राद्वारे कळविलेले आहे. मात्र सदर रक्कम खालील पध्दतीने मिळावी असे नमूद केलेले आहे.

- Rs 1 lakh along will work order for consultancy services specified above.
- balance amount will be released as follows:
- 25% after submission of tender document by MEDA to Shri Saibaba Sansthan Trust Shirdi.
- 25% after placement of work order on selected manufacturer by Shri Saibaba Sansthan Trust Shirdi.
- 25% after inspection of material and submission of report by MEDA to Shri Saibaba Sansthan Trust Shirdi.
- 25% after submission of commissioning by MEDA to Shri Saibaba Sansthan Trust Shirdi.

महाराष्ट्र एनर्जी डेव्हलपमेंट एजन्सी, पुणे यांना सल्लागार नियुक्तीचे पत्र देणेस व उपरोक्तप्रमाणे फीची रक्कम अदा करताना प्रथम त्यांचे मागणीप्रमाणे रु.१ लाख आदा करणेस मान्यता देणेचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही- अधिक्षक, प्रसादालय विभाग).

**आयत्या वेळेचा**

**विषय नं. ३४. रेफरन्स निमगांव -कोऱ्हाळे येथील ४५ हेक्टर ६४ आर बाबत.**

**निर्णय क्र.३३०.** १) श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडी यांनी मौजे निमगांव को-हाळे येथील ४५ हेक्टर ६४ आर जागा भू संपादीत केली आहे.

उपरोक्त जागेचा निवाडा रक्कम रुपये १०,१५,८४,८७०-०० अक्षरी रुपये दहा कोटी पंधरा लाख चौ-यांसी हजार आठशे सत्तर संस्थानने दिनांक ३१/०८/२०५ रोजीचे निवाडयांस अनुसरून अदा केली आहे.

२) उपरोक्त निवाडा रक्कम रुपये १०,१५,८४,८७० -०० मध्ये अतिरिक्त घटकाची रक्कम रुपये १,९६,८९,९५० /- एक कोटी सहयान्नव लाख एकोणनव्वद हजार नऊशे पन्नास मात्र चा समावेश आहे. प्रस्तुतची रक्कम संस्थानला मान्य नाही करिता संस्थानने सब डिव्हीजनल ऑफीसर, श्रीरामपूर, यांचेकडे रेफरन्स अर्ज **(निवाडयास आवाहन)** दाखल केलेला आहे व खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे.

On & above grounds, Applicant respectfully prays that :

A) A reference be made to either Civil Judge Senior Division, Kopargaon or Additional District Judge, Kopargaon who has been duly empowered to consider the propriety & legality of the said award of 31/8/2005

B) The Valuation determined by opponent No. 2 by this award to set aside & a fare & proper valuation of the said acquired property be made by deducting the amount of Rs. 1,96,89,950/- & the consequent amount of 3 % by way of establishment charges determined by Opponent No. 2.

C) The actual possession of the encroached are of H.O. 85. be directed tobe immediately given to the Applicant & the entire land described in Schedule I be declared to have been vested in Applicant free from all encumbrances.

D) The Cost of this reference be awarded to applicant from the opponents .

E) Any other relief just & equitable in the circumstances of the case be allowed to the Applicant.

F) If necessary, the Applicant may be allowed to amend this reference if the circumstances so required.

**For which the applicant as in duty bound shall ever pray.**

अतिरिक्त घटकाची रक्कम संस्थान मान्य केलेले नाही याचे कारण LAND ACQUSITION ACT कलम 23 1A प्रमाणे भू संपादित जागेचे भूसंपादन करतांना सेक्शन ४ ते जागेचा ताबा बाबतचे ( कार्यवाही बाबत ) दिनांक पावेतो किंवा निवाडा कार्यवाही बाबतचे तारखेबाबत यांत जी तारीख अगोदरची असेल त्या तारखेपावेतो १२ % व्याजाची आकारणी मोबदला जमीन मालकांस देणे आवश्यक आहे सदरची तरतुद खालीलप्रमाणे आहे.

**Section** 23 (1A) In addition to the market value of the land, as above provided, the Court shall in every case award an amount calculated at the rate of twelve per centum per annum on such market value for the period commencing on and from the date of the publication of the notification under **section 4**, **sub-section** (1 ) in respect of such land to the date of the award of the Collector or the date of taking possession of the land, whichever is earlier ;

**Explanation -** In computing the period referred to in this sub-section any period or periods during which the proceedings for the acquisition of the land were held up on account of any stay or injunction by the order of any Court shall be excluded ]

उपरोक्त बाबीचा विचार **(अवार्ड)** निवाडयामध्ये न केलेमुळे भू संपादन कायदा कलम ४ चे नोटिफिकेशन दिनांक १९/१२/२००२ ते ३१/०८/२००५ चे अवार्ड पावेतो २ वर्षे ८ महिने १९ दिवसांचे व्याज १२ % प्रमाणे एकूण रुपये १,९६,८९९,५०/- मात्रचे आकारणी करणेत आली. सदर व्याज फक्त कलम ४ चे तारीख ते ताबा तारखेपावेतो दिनांक २२/०१/२००३ पावेतो आकारणे जरुरीचे होते परंतु ते अवार्ड तारखेपर्यंत आकारणेत आले अशा आशयाचा वकील सल्ला प्राप्त झालेमुळे संस्थानकडून अवार्ड व अतिरिक्त घटकाचे रकमेच्या आवाहन करुन लॅन्ड रेफरन्स दाखल करण्यात आला.

उपरोक्तप्रमाणे दि २२/०१/२००३ चा ताबा शेती महामंडळाकडून संस्थानला उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी यांचे समक्ष मिळाला आहे त्यानंतर अवार्ड प्राप्त झालेनंतर रेफरन्स दाखल झालेनंतर दि १०/०१/२००६ रोजी संस्थानला ४५ हेक्टर ४३ आर जागेचा ताबा उपविभागीय अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेला आहे

उपरोक्त लॅन्ड रेफरन्स दाखल दि २६/१०/२००५ रोजी दाखल करणेत आलेनंतर त्यामधील मा. उपविभागीय अधिकारी यांचेशी झालेले चर्चास अनुसरून त्यामधील पान नं ३ व ४ वरील काही मजकुर वगळणेबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचे दि ०१/०४/२००६ चे ठरावानुसार ठरले. त्याबाबतची कार्यवाही मा. कोर्टात करणेचे दृष्टीने तयारी असतांना लॅन्ड रेफरन्स सोबतचे स्टॅम्प सबडिव्हीजनल ऑफीसर यांचेकडून संस्थानकडे पाठविणेत आले ते पुनश्चः त्यांचेकडे पाठविले नंतर आता त्यांनी मुळ रेफरन्स अर्ज व स्टॅम्प रुपये १,२८,५००/- मात्रचा इकडेस पाठविले असून मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावाप्रमाणे फेरप्रस्ताव पाठवावा म्हणजे त्यावर पुढील कार्यवाही करता येईल असे दिनांक ०८/०३/२००७ चे पत्रात विनंती केलेली आहे. दिनांक ३०/०३/२००७ चे श्रीरामपूर येथे उपविभागीय अधिकारी यांचे समवेत संस्थान प्रतिनिधी व श्री.जे.के.गोंदकर, ॲडव्होकेट झालेली चर्चा मध्ये प्रस्तुत रेफरन्स कोर्टामध्ये पाठविणेस मा. उपविभागीय अधिकारी यांना विनंती करणेत आली मात्र प्रकरणी सविस्तर चर्चा मा. कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर दि ३१/०३/२००७ रोजी करणार असल्याचे मा.उपविभागीय अधिकारी यांनी सूचित करुन त्याप्रमाणे दिनांक ३१/०३/२००७ रोजी शिर्डी येथे चर्चा झाली. त्यामध्ये रेफरन्स अर्जातील केवळ पॅरेग्राफ न वगळता संपूर्ण रेफरन्स अर्ज मागे घेणेबाबत सूचित केले आहे. संस्थान व शेती महामंडळ दोन्हीही संस्था असल्यामुळे मोबदला रक्कम शेती महामंडळास प्राप्त झाली आहे याबाबतचाही विचार होणे आवश्यक आहे असेही त्यांनी सूचित केले आहे.

मा.उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक ०८/०३/२००७ रोजीचे पत्राने प्रकरणी फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावास अनुसरुन दाखल करणेस लेखी विनंती केली आहे. मात्र दिनांक ३१/०३/२००७ समक्ष चर्चेत फेरप्रस्ताव ऐवजी रेफरन्स पूर्णतः परत घेणेबाबत सब डिव्हीजनल ऑफीसर ,श्रीरामपूर यांनी विनंती वजा चर्चा केलेली आहे.

तरी खालील बाबींवर निर्णय होणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

**१)**मा. उपविभागीय अधिकारी यांनी दिनांक ३१/०३/२००७ रोजी चर्चेमध्ये सूचित केलेप्रमाणे संपूर्ण रेफरन्स अर्ज WITH DRAW परत घेणेबाबत म्हणजेच रक्कम

रुपये १,९६,८९,९५०-०० वजावट करुन भू- संपादीत जागेचे योग्य मूल्यांकन करणेबाबतचे रेफरन्स अर्जातील, संस्थानने केलेल्या मागण्या सोडून देणेबाबत - सदर रेफरन्स रद्य करणे, रेफरन्स मागे घेणे अथवा न घेणेबाबत विचारार्थ सादर त्याप्रमाणे रेफरन्स मागे घेतलेस स्टॅम्प फीचा खर्च संस्थानला सोसणे क्रमप्राप्त आहे.

**किंवा**

२) मात्र उपविभागीय अधिकारी यांनी दि २६/१०/२००५ चा रेफरन्स अर्ज मा. कोर्टात न पाठवता संस्थानकडे फेरप्रस्ताव पाठविणेबाबत ता. ०८/०३/२००७ रोजीचे पत्रान कळविले आहे. त्याबाबत उच्च न्यायालयाचे वकीलांचा सल्ला घेऊन त्यांचे मार्गदर्शनाप्रमाणे पुढील कायदेशीर कार्यवाही करता येईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, दिनांक ३१.०८.२००५ चे भूसंपादन निवाड्याबाबत व दिनांक २३.०१.२००३ चे मिळकतीचे ताब्याबाबत तसेच दिनांक १०.०१.२००६ चे भूसंपादन कायदा कलम १६ प्रमाणे जमीन मिळकतीच्या ताब्याबाबत बैठकीमध्ये सविस्तर चर्चा होऊन भूसंपादन अधिकारी यांनी सूचीत केल्याप्रमाणे भूसंपादन अधिकारी यांचेकडे दाखल करण्यात आलेले प्रकरण, रेफरन्स अर्ज मागे घेण्यात यावा सदरचे प्रकरण रद्द करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३५. शिर्डी विकास आराखडयांतील आरक्षण क्रमांक ४० धर्मशाळा आरक्षणातून वगळणेबाबत**

**निर्णय क्र.३३१.**१) शिर्डी विकास आराखडयांत आरक्षण क्रमांक ४० क्षेत्र १ हेक्टर ५१ आर धर्मशाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आली असून त्याची विकसन यंत्रणा समुचित प्राधिकरण श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था आहे. आरक्षित क्षेत्रामध्ये शिर्डी येथील सर्व्हे नं १४८ पैकी १४९ पैकी व १५० पैकी १ हेक्टर ५१ आर साधारणतः खालीलप्रमाणे समाविष्ट आहे.

| अ.नं. | तपशिल | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|
| १) | सर्व्हे नंबर १४८ | ८८०० | संस्थानने विकत घेतलेले सर्व्हे नं १४८ हेक्टर ३ आर मधील |
| २) | सर्व्हे नंबर १४९ | ५६०० | |
| ३) | सर्व्हे नंबर १५० | ०७६० | |
| **एकूण क्षेत्र स्क्वे.मी ( १ हेक्टर ५१ आर ६० चौ.मी. )** | | १५१६० | |

२) संस्थानकडून उपरोक्त क्षेत्रापैकी सर्व्हे नंबर १४८ मधील क्षेत्र खरेदीखताने विकत घेतले असल्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक १८-१९/०८/२००१ चे ठरावास अनुसरून उव्रश्रत जमिनीचे ६३६० ( ५६०० + ७६० ) चे भू संपादनाचा प्रस्ताव दिनांक १८/१०/२००१ ने पाठविणेत आला होता. दिनांक २४/०१/२००२ , दि २४/०१/२००३ ने पूर्ततासाठी सदर प्रस्ताव पुनश्चः परत आलेला आहे.

मात्र सर्व्हे नं १४८ मध्ये संस्थानने धर्मशाळेसाठी बांधलेली असल्यामुळे उर्वरित जागा आरक्षणातून वगळावी अशी विनंती श्री. देवराम बन्सी कोते यांनी १९/११/२००३ व तत्कालीन नगराध्यक्ष श्री कैलास बापू कोते यांनी दिनांक २९/०४/२००४ संस्थानला कळविलेवरून आरक्षण क्रमांक ४० मधील धर्मशाळेसाठी आरक्षित असलेल्या १४९ व १५० मधील पूर्वी बरेच वर्षापासून घरासाठी वापरांत असलेले क्षेत्र मोजणी करुन भू संपादनातून वगळणेस मा. व्यवस्थापन मंडळाचा दिनांक २०/०६/२००४ चा ठराव झालेला आहे. सदर ठराव शिर्डी नगरपालिकेस माहितीसाठी पाठवला आहे. त्यावरुन आरक्षण क्रमांक ४० मधील सर्व्हे क्रमांक १४९, १५० मधील क्षेत्र वगळणे व ते रहिवासी विभागात समाविष्ट करणेची कार्यवाही नगरपंचायती मार्फत सुरु झालेली आहे मात्र संस्थानने दि २७/०८/२००५ चे पत्राने त्यास हरकत घेतली. सदरचा फेरबदल प्रस्तांवास संस्थानची ना हरकत मिळणेस नगर पंचायतीकडून दि १९/१२/००५ नुसार मागणी करणेत आलेनंतर मा. व्यवस्थापन मंडळाचे ठरावांस अनुसरून प्रकरणी हरकत नसल्याचे दि २८/०२/२००६ चे पत्राने संस्थानने कळविलेले आहे.

त्याबाबत नगरपंचायत शिर्डी यांनी दि १६/०६/२००६ चे पत्राने सर्व्हे नं १४९, १५० चे क्षेत्र भू संपादनातून वगळणेस मान्यता देण्यात आली त्याऐवजी सदर क्षेत्र आरक्षणातून करणेस मान्यता देणेत आली असल्याचे त्यांना कळविणेस विनंती केली आहे. तसेच संस्थानने प्रकरणी भू संपादनाचा प्रस्ताव पाठवला होता त्याची कार्यवाही चालू आहे किंवा नाही. मा. जिल्हाधिकारी यांचेकडून भूंसपादनाचा आदेश पारीत झाले होते का ? अशी माहिती विचारलेली आहे.

मा. व्यवस्थापन मंडळाचे दिनांक २०/०६/२००४ चे ठरावाप्रमाणे आरक्षण क्रमांक ४० मधील पूर्वी बरेच वर्षापासून घरांसाठी वापरात असलेले क्षेत्र त्याची मोजणी करून ते भू सपांदनातून वगळणेस मान्यता आहे. आरक्षण क्रमांक ४० मधील सर्व्हे नं १४९ ची

मोजणी केली असता त्या ठिकाणी घरे आहेत करिता ते आरक्षणातून वगळणेस हरकत नाही सदर घराचे क्षेत्राचे भूसंपादन ( ठरावाचा वा नकाशाचा विचार करता ) संस्थान करणार नाही म्हणजेच सदर क्षेत्र सर्व्हे नं १४९ चे आरक्षणातून वगळणेस संस्थानची ना हरकत नगरपंचायतीस त्यांचे विनंतीस अनुसरून कळविता येईल. नगरपंचायतीस त्याप्रमाणे नाहरकत कळविता येईल.

आरक्षण क्रमांक ४० चा प्रस्ताव संस्थानने पाठवला होता तो काही त्रुटींची पूर्तता करणेस परत आला आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी स्तरावर सेक्शन ५२ चा आदेश पारीत नाही असेही नगरपंचायतीस कळविता येईल.

आरक्षण क्रमांक ४० पैकी सर्व्हे नं १४८ मध्ये संस्थानने धर्मशाळा बांधली आहे सर्व्हे नं १४९ मध्ये घरे आहेत उर्वरित सर्व्हे नं १५० चे क्षेत्र अति अल्प साधारणत : ७ आर आहे आरक्षणातून वगळण्यास सर्व्हे नं १५० चे अत्यल्प क्षेत्र धर्मशाळासाठी सोयीचे ठरत नाही. करिता सदरचे क्षेत्रही आरक्षणातून वगळणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३६ श्री साईबाबा हॉस्पीटलकडील वैद्यकीय अधिकारी यांच्या नेमणूकीबाबत.**

**निर्णय क्र.३३२** श्रीसाईबाबा हॉस्पीटल व श्री साईनाथ हॉस्पीटकडे वैद्यकिय अधिकारी पूर्ण वेळ/ऑनररी/व्हिजीटींग तसेच आर.एम.ओ/ सी.एम.ओ या पदावर नोकरी मिळणेबाबत खालील प्रमाणे उमेदवारांनी अर्जाद्वारे विनंती केली होती.

उपरोक्त अर्जाबाबत,मा.डॉ.तिवारी विश्वस्त साो.तसेच वैद्यकीय संचालक श्री साईबाबा हॉस्पीटल यांचे दि.१८/१२/२००६ रोजीचे अभिप्राय व मंजूर टिपणीस अनुसरुन,संबंधीत उमेदवारांच्या मा.सचिव विधी व न्याय विभाग यांचेकडे श्री साईबाबा हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी / कर्मचारी यांचेबाबत पद व वेतनश्रेणी निहाय मान्यतेसाठी पाठविण्यात आलेल्या आकृतीबंधास मंजूरीचे अधीन राहून,खालीलप्रमाणे नेमणूका करण्यात आलेल्या आहेत. त्यास कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| | वैद्यकीय अधिकारी | शैक्षणिक पात्रता | नेमणूक आदेश नंबर व हॉस्पीटलचे नांव | दिलेले पदनांम व एकत्रीत मानधन / वेतन |
|---|---|---|---|---|
| ०१.. | डॉ. राजेंद्र गजानन चव्हाण, पुणे | डी. एम. न्युरो रेडीओलॉजिस्ट | जा.नं.एसएसएस/वशी-०१/८५/०७ दि. ०२/०१/२००७ श्री साईबाबा हॉस्पीटल | ऑनररी न्यूरो- रेडीओलॉजिस्ट |
| ०२. | डॉ. अनिल जी. बेंद्रे अहमदनगर | एम.बी.बी.एस डि.जी.ओ | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५७३/०७ दि. ११/०१/२००७ श्री साईबाबा हॉस्पीटल | ऑनररी लॅप्रोस्कोपीक सर्जन |
| ०३. | डॉ.जयंत नरहर करभासे , मुंबई | एम.एस. एम.सी.एच | जा.नं.एसएसएस/वशी-०१/२५५८/०७ दि.१७/०२/०७ श्री साईबाबा हॉस्पीटल | व्हिजीटींग कार्डीओथोरॅसिस सर्ज |
| ४. | डॉ.देवयानी रा. बधे श्रीरामपूर | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३१६२/०७ दि.२८/०२/०७श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (आर.एम.ओ मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०५. | डॉ.एन कोनेरु यु.एस.अे. | एम.बी.बी.एस. एसएसएलसी | जा.नं.एसएसएस/वशी-०१/३६६१/०७ दि.०६/०३/०७ श्री साईबाबा हॉस्पीटल | ॲनेस्थेसिस्ट(वर्षातून एक महिना विनामोबदला सेवा) |
| ०६. | डॉ. विक्रम अशोक फडोळ ,नाशिक | एम.बी.बी.एस. | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४२८६/०७ दि.१६/०३/०७ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (सी.एम.ओ. मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०७. | डॉ.अमोल ए.बळी मलकापूर | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-१/४२८७/०७ दि.१६/०३/२००७ श्री साईबाबा हॉस्पीटल | मेडीकल ऑफीसर (सी.एम..ओ. मा.वेतन रु.१७,०००/- |
| ०८. | डॉ.निलेश डी. जेजूरकर,नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/४१२५/०७ दि.१३/०३/२००७ श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ मा. वेतन रु. १७,०००/- |
| ०९. | डॉ.वंदना के. सांगळे नाशिक | एम.बी.बी.एस | जा.नं.एसएसएस/वशी-०१/५०८८/०७ दि.२९/०३/२००७श्री. साईबाबा हॉस्पीटल | वैद्यकिय अधिकारी(आर.एम.ओ मा. वेतन रु. १७,०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३७ गुरुस्थान मंदिर व पुरातन निंबवृक्षाबाबत**

**निर्णय क्र.३३३** श्री क्षेत्र शिर्डी येथील श्री गुरुस्थान मंदिरातील पवित्र निंबवृक्षाच्या बुंध्याच्या / खोडाच्या लगतच्या श्री च्या पादुकांकरीता सिमेंटचे बांधकाम असलेले छोटेशे मंदिर बांधण्यात आलेले आहे. या गुरुस्थान मंदिरालगतच असलेल्या निंबवृक्षाच्या नैसर्गिक वाढीमुळे या छोटया मंदिराच्या एका खांबास तडा गेल्याचे आढळून आले आहे. छोटया मंदिराचे वरुन पुन्हा मध्यम आकाराच्या सिमेंटचे बांधकाम असलेल्या मंदिराची उभारणी करण्यात आलेली आहे. सदरील मंदिराच्या छताच्या मधून फांद्या जाण्यासाठी छिद्र (मोकळी जागा) ठेवण्यात आलेली आहे. छताचे छिद्र लहान आकाराचे असल्यामुळे फांद्यांच्या वाढीस अडथळा निर्माण होत आहे.

तसेच मंदिरावरील कौलारु छत उन-पावासापासून साईभक्तांना संरक्षण मिळण्यास अपुरे पडते याबाबत व्यवस्थापन मंडळाचे दि.१६/११/२००२ चे सभेत छताचा आकार वाढविणे व त्याच्या नूतनीकरणाबाबत विषय ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होवून आर्किटेक्ट श्री.बॉबी विजयकर व पुरातन वास्तु तज्ञ डॉ.श्री.गोरक्षकर यांनी स्थानिक विश्वस्तांच्या उपस्थितीत पहाणी करुन तयार केलेला कच्चा आराखडा आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड कापरे यांना दाखवून त्याबाबत त्यांचे मत घेणेचे ठरले होते. त्यानुसार आर्किटेक्ट मे.माथुर ॲण्ड कापरे यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिला आहे.

" निंबवृक्षाच्या वाढीमुळे गुरुस्थान मंदिराचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे. त्याकरीता सध्याचे गुरुस्थान मंदिर व त्याच्या आतील छोटे मंदिर काढणे आवश्यक आहे. पवित्र निंबाचे झाडास साईभक्तांना हात लावता येणार नाही तशा अंतरावर ग्रील मध्ये झाडाच्या बाजुंनी स्ट्रक्चर उभारण्यात यावे. निंबवृक्षाचे बाजूने सध्या असलेली जाळी काढून घेण्यात यावी. सध्या असलेला फोटो व मूर्ती नवीन म्युझियम हॉलमध्ये ठेवण्यात यावे. निंबवृक्षाचे बाजूने दर्शनरांगेसाठी स्टेनलेस स्टीलचे रेलिंग बसवावे. यासाठी रुपये १.८ लाख खर्च अपेक्षित आहे."

त्यावर मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.१२-१३/०७/२००३ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३१५ अन्वये चर्चा होवून आर्किटेक्ट यांनी दिलेल्या प्रस्तावानुसार गुरुस्थान मंदिराचे आर.सी.सी. मंदिर व आतील छोटे मंदिर काढणे, पवित्र निंबवृक्षाचे झाडास साईभक्तांना हात लावता येणार नाही तशा अंतरावर ग्रीलमध्ये झाडाचे बाजूने स्ट्रक्चर उभारणे, सध्या असलेली जाळी काढून घेणे, सध्या असलेली मूर्ती म्यझियम हॉलमध्ये ठेवणे, मात्र फोटो व श्री महादेवाची पिंड गुरुस्थान मंदिरातच ठेवणे, निंबवृक्षाचे बाजूने दर्शनरांगेकरीता स्टेनलेस स्टिलचे रेलिंग बसविणे, तसेच समक्ष पहाणीमध्ये ठरलेप्रमाणे सध्या असलेल्या कौलारु छताचे बाहेरील बाजूस भिंत बांधणे. या तपशीलानुसार सुधारीत खर्चाचे प्लॅन व एस्टिमेट मागविणेस मान्यता देण्यात आली.

तत्कालिन मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.२९-३१/०३/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१२९ अन्वये वर्तमानपत्रात जाहिरात देवून मंदिर परिसरातील इतर कामा बरोबरच गुरुस्थान मंदिराचे कामाची मे.विश ऑन ॲण्ड असो., यांची निम्नतम दराची निविदा स्विकारण्यात आली होती. त्यानुसार ठेकेदार यांना कार्यादेश देण्यात आला होता. मात्र मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/११/२००४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९९ अन्वये गुरुस्थान मंदिराचे काम स्थगित ठेवण्याचे ठरविण्यात आले आहे.

याबाबत आर्किटेक्ट बॉबी विजयकर, मुंबई यांना पुन्हा पहाणी करुन प्लॅन सादर करणेस विनंती करण्यात आली होती. त्यानुसार त्यांनी दि.३१/१०/२००६ रोजी समक्ष पहाणी करुन सविस्तर प्रस्ताव व ले-आउट प्लॅन सादर केला आहे.

आर्किटेक्ट यांनी दि.२५/१०/२००६ रोजीचे प्रस्तावात खालीलप्रमाणे बाबी सुचविल्या आहेत.

०१. निंबवृक्षाशी धार्मिक भावना निगडीत असल्याने त्यास कोणत्याही प्रकारची बाधा पोहचणार नाही.

०२. साईभक्तांना गुरुस्थान पादुकांचे दर्शन विनासायास होणारे असल्याने, गर्दीचे नियंत्रण करण्याचा प्रश्नच उद्‌भवणार नाही. त्यामुळे याठिकाणचे मनुष्यबळ दुसऱ्या कामासाठी वापरता येईल.

०३. ज्या साईभक्तांना पादुकांना हस्तस्पर्श करुन दर्शन घ्यावयाचे आहे. त्यांना फक्त पायरी चढून दर्शन घेता येईल.

०४. श्री च्या पादुंकांची स्थापना निंबवृक्षाजवळ नविन हिरव्या रंगाचे संगमरवर फरशीचा चौथरा बांधून त्यावर करण्यात येईल.

०५. गुरुस्थानच्या चौथऱ्यावर योग्य अशी सोय करुन श्रीच्या पादुकांना चांदीची छत्री बसविता येईल.

०६. गुरुस्थानच्या कॉलम्समध्ये रेलींग करुन साईभक्तांच्या दर्शनाची सोय करता येऊ शकेल.

०७. गुरुस्थानचे आतील असलेले बांधकाम करुन घ्यावे लागेल.

उपरोक्तप्रमाणे आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर व यापूर्वी तत्कालीन व्यवस्थापन मंडळाचे झालेल्या निर्णयाबाबत पुन्हा मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय घेण्यात यावा अशी उपसमितीने केलेली शिफारस मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५ नोव्हेंबर, २००६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ८७५ (३१) अन्वये मान्य करण्यात आली आहे तसेच दिनांक १७ फेब्रुवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १२९ अन्वये ही फॉरेस्ट रिसर्च इन्टिटयूट, डेहराडुन ( उत्तरांचल ) येथील शास्त्रज्ञ डॉ . सुभाष नारीयाल व डॉ. एन.एस.के हरिष यांनी खालील प्रमाणे उपाय सुचविले आहे.

०१) गुरुस्थान निंबा शेजारील बसविलेली फर्शी व कॉक्रीटीकरण कमीत कमी एक फुट अंतरापर्यंत तातडीने काढुन टाकावे व खोडाजवळील माती मोकळी करुन पाणी देता येईल असे करावे.

०२) फरशी व कॉक्रीट काढते वेळेस झाडांचे मुळे व साल यांचे नुकसान होणार नाही याची काळजी घ्यावी.

०३) झाडाला नियमित पाणी देणेसाठी ठिबक सिंचन किंवा मातीचे गाडगे ठेवावे.

०४) गुरुस्थान मंदिराचे छत झाडांपासुन कमीत कमी एक फुट अंतर सोडून असावे झाडाला लावलेली लोखंडी जाळी काढून घ्यावी.

तसेच झाडाच्या बाजुने दोन मिटर अंतरापर्यंत कॉक्रीट तोडने फरशी काढणे याकामी अर्किटेक्ट यांचे कडून आराखडा व खर्चाचा प्रस्ताव घेणे यावर सविस्तर चर्चा होऊन निंबवृक्षाचे जतन व संगोपन करणेसाठी योग्य ती कार्यवाही करणेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे.

यावर चर्चा होऊन यापूर्वी झालेल्या मा.व्यवस्थापन मंडळाचे निर्णयाप्रमाणे व डॉ.गोरक्षकर यांचे मार्गदर्शनाखाली सध्या असलेले गुरुस्थानचे आर.सी.सी.बांधकामाचे छोटे व मोठया आकाराचे मंदिर काढून घेण्यात यावे. तसेच त्यावरील कौलारु छत असलेले एम.एस. स्ट्रक्चरमधील छतही काढून घेण्यात यावे या कामी डॉ.गोरक्षकर यांचे मार्गदर्शनाखाली अर्किटेक्ट राहुल चेंबूरकर, मुंबई यांचे कडुन प्लॅन व एस्टीमेट तयार करुन घेण्यात यावे. सदरचे काम अत्यंत महत्वाचे तसेच गर्दीच्या ठिकाणचे असल्यामुळे व मर्यादित वेळेत पूर्ण करावयाचे असल्यामुळे सदरचे काम नियोजित प्रसादालय प्रकल्पाचे बांधकाम ठेकेदार आयव्हीआरसीएल प्रा.लि. पुणे या कंपनीमार्फत करुन घेण्यात यावे. या कामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.३८** **नवीन प्रसादालयासाठी इम्पोर्टेड इक्वीपमेंट खरेदीकामी पुरवठाधारकांना सादर केलेले सुधारित दरपत्रके उघडणे बाबत.**

**निर्णय क्र.३३४** दिनांक ३१.०३.२००७ रोजी सकाळी १०.०० वाजता शिर्डी येथे झालेल्या प्रसादालय उपसमितीत ठरलेनुसार इम्पोर्टेड इक्वीपमेंट खरेदीकामी पुरवठाधारकांनी देऊ केलेल्या खालील पुरवठाधारकांची सुधारित दरपत्रके आजचे सभेत उघडण्यात आली.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नांव |
|---|---|
| ०१ | एलएल इक्वीपमेंटस्,मुंबई |
| ०२ | राईट इक्वीपमेंटस्, प्रा.लि.,नवीदिल्ली |
| ०३ | कांचन वाणिज्य,प्रा.लि., कलकत्ता |
| ०४ | वॅंग प्रोफेशनल, नवी दिल्ली |

उपरोक्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला तो खालीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | एलएल इक्वीपमेंटस्,मुंबई | राईट इक्वीपमेंटस्, प्रा.लि.,नवीदिल्ली | कांचन वाणिज्य,प्रा.लि., कलकत्ता | वॅंग प्रोफेशनल, नवी दिल्ली |
|---|---|---|---|---|---|
| ०१. | डिश वॉशर्स | ५४,००,०००.०० (गॅस ऑपरेट) | ६५,४८,८२४.०० (स्टिम ऑपरेट) | -- | ७८,९२,५२८.०० |
| ०२. | व्ही.जी प्रोसेसर | -- | १६,५७,८१८.०० | ११,८१,९१९.४० | ११,५६,३००.०० |
| ०३. | ओनियन पिलर | -- | १०,०४,४१६.०० | १०,०१,२२४.०० | ४,७८,४००.०० |
| ०४. | गार्लिक पिलर | -- | ३,५३,३४७.०० | ३,७५,८२९.४०.०० | १,८७,०००.०० |
| ०५. | व्हीजी वॉशर | -- | ९,५५,६७२.०० | ९,८०,३३५.०० | ९,७४,५००.०० |
| ०६. | ग्रेन वॉशर | -- | १९,११,३४४.०० | १९,६०,६७१.०० | १९,४९,०००.०० |
| ०७. | बॅटर मिक्सर | -- | १०,२६,२२४.०० | १०,७४,०२९.८० | ६,२०,३००.०० |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी बंद पाकिटात दिलेल्या उपरोक्त दरात आणखी काही सुट देणार याबाबत विचारणा केली असता त्यानी खालीलप्रमाणे सुट देऊ केली.

| अ.नं. | निविदासादकर्त्याचे नांव | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेली सुट |
|---|---|---|
| ०१ | एलएल इक्वीपमेंटस्,मुंबई | --- |
| ०२ | राईट इक्वीपमेंटस्, प्रा.लि.,नवीदिल्ली | एकूण रक्कमेवर 2% सुट |
| ०३ | कांचन वाणिज्य,प्रा.लि., कलकत्ता | निविदेमध्ये देऊ केलेल्या किंमतीवर 3% सुट |
| ०४ | वॅंग प्रोफेशनल, नवी दिल्ली | सुट नाही |

उपरोक्त पुरवठादारांनी देऊ केलेले दर व मशिनरीची तपशिलवार महिती घेणेकामी किचन कन्सलटंट, श्री संजीव देशमुख यांनी समक्ष आजचे सभेत उपस्थित होते. त्यांनी पुरवठाधारकानी देऊ केलेल्या मशिनरी व किंमतीबाबत व्यवस्थापन समितीस मार्गदर्शन केले.

पुरवठाधारकांनी समक्ष चर्चेअंती देऊ केलेल्या विशेष सुटीनुसार देऊ केलेले सुधारित दर खालीलप्रमाणे-

| **अ. नं** | **मशिनरीचे नांव व इतर तपशिल** | **एलएल इक्वीपमेंटस्, मुंबई** | **राईट इक्वीपमेंटस् प्रा.लि. , नवी दिल्ली** | **कांचन वाणिज्य प्रा.लि., कलकत्ता** | **वॅंग प्रोफेशनल , नवी दिल्ली** |
|---|---|---|---|---|---|
| १. | Conveyor Dish Washer Capacity ३२०० Plates (१२x१२ in s.s.) per hour २ Nos. | Make Eagor Made in Spain ४५,३९,२४०.०० | Company Hobart Made in Germany ६५,४८,८०४.७१ | --- | Electrical Operated Make - Electrolux Made in Itali ५७,४५,४७०.०० Vat ०७,१८,१८३.७५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मुळ दरपत्रकानूसार किंमत | | | | ६४,६३,६५३.७५<br>Steam Operated<br>७८,९२,५२८.०० |
| | सुट वजा जाता १०% | ४०,८५,३१६.०० | सुट नाही | --- | २% (E.O.)<br>६३,३४,३८०.०० |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास<br>Euro ३२,९९१.०० x ५८ =<br>इतर खर्च | १९,१३,४७८.००<br>६०,०००.००<br>१९,७३,४७८.०० | ३४,३०० Euro<br>x २<br>६८,६०० Euro<br>x ५८<br>३९,७८,८००.०० | --- | ३२,८५० Euro<br>x २<br>६५,७०० Euro<br>x ५८<br>३८,१०,६००.०० |
| | **अंतिम किंमत** | **२७,००,०००.००**<br>**मात्र गॅस आपरेटेड** | **सुट २ %**<br>**६४,१७,८२८.६१** | --- | **७८,९२,५२८.००** |
| २. | Vegetable Prosessor Capacity-२,४०० kg per hour २ Nos.<br><br>मुळ दरपत्रकानुसार किंमत | --- | १४,२१,६००.००<br>Vat<br>०१,७७,७००.००<br>Inst. ३३,८७६.७३<br>Tran.<br>२४,६३६.३३<br>१६,५७,८१३.०० | १७,४६,३२२.०० | with blade<br>६,४८,६७४.००<br>+ ८१,०८४.२५<br>७,२९,७५८.२५<br>without blade<br>३,५६,६९४.००<br>+ ४४,५८६.००<br>४,०१,२८०.७५ |
| | सुट वजा जाता | --- | **सुट नाही** | सुट १०%<br>१५,७१,६९०.००<br>११,८१,९१४.४०<br>३% ३५,४५७.५८<br>११,४६,४६१.८२ | सुट ३ %<br>with blade ६,२९,२१३.७८<br>+ ७८,६५१.५२<br>७,०७,८६५.५०<br>without blade ३,४५,९९३.१८<br>+ ४३,२४९.१४<br>३,८९,२४२.३२ |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास | --- | **Hobart Make**<br>**Euro १०६०३ x २ =**<br>**२१,२०६.००**<br>x ५८<br>१२,२९,९४८.०० | Nilma make<br>Euro ८,३८०.००<br>x ०२<br>१६,७६०.००<br>x ५८<br>९,७२,०८०.०० | with blade १०,५००<br>Euro<br>x ५८<br>६,०९,११६.००<br>without blade ३६९५ x २ =<br>७३९०<br>x ५८<br>४,२८,६२०.०० |
| | **अंतीम किंमत २ %** | --- | **१६,२४,६६१.६४** | **११,४६,४६१.८२** | **११,५६,३००.००** |
| ३. | Onion Peller Capacity ०५ kg per ३ Minute ०१ Nogs.<br><br>मुळदरपत्रकानूसार किंमत | --- | ८,६१,३००.००<br>vat १,०७,६६२.५०<br>Inst. २०,५२४.७८<br>Tran.<br>१४,९२६.३३<br>१०,०४,४१३.०० | १४,६८,३९०.०० | with bladde<br>२,८२,३९४.००<br>Vate<br>३५,२९९.२५<br>३,१७,६९३.२५<br>without blade २,४६०८२.००<br>Vat ३०,७६०.२५<br>२,७६,८४२.२५ |
| | सुट वजा जाता किंमत | --- | No Discount | १०% १३,२१,५११.०० | ३% with blade<br>२,७३,९२२.१८.००<br>without blade<br>२,३८,६९९.५४ |
| | संस्थानचे नावें आयात केल्यास | --- | ४७६० x २ = ९५२०<br>Euro<br>x ५८<br>५,५२,१६०.०० | ७३५० x२ =१४,७००<br>Euro x५८<br>८,५२,६००.०० | with blade २०९५ x २ =<br>४१९०<br>x ५८<br>२,४३,०२०.०० |
| | **अंतीम किंमत** | --- | १०,०४,४१३.००<br>२ % सुट २०,०८८.३२<br>**९,८४,३२७.६८** | १०,०१,२२४.००<br>२% सुट ३०,०३६.७२<br>**९,७१,१८७.२८** | **with blade ४,७८,४००.००** |
| ४. | Garlic Peeler Capacity ०५ kg per ३ Minute ०१ Nogs.<br>मुळ दरपत्रकानूसार किंमत | --- | ३,०३,०००.००<br>Vat ३४,८७५.००<br>inst. ७,२२०.४९<br>Tran. ५,२५०.००<br>३,५३,३४६.४८ | ५,४१,८१९.०० | १,४१,१९७.००<br>१७,६४९.६३<br>Vat १८,६४९.६३<br>१,५८,८४६.६३ |
| | सुट वजा जाता किंमत | --- | | १०% ४,८७,६३७.१० | ३% १,३६,९६१.०९<br>**Vat 17,120.14** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | No Discount | | १,५४,०८१.२३ |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास | --- | Euro ३८५३ x ५८<br>= २,२३,४७४.०० | Euro ५३१५ x ५८<br>= ३,०८,२७०.०० | Blade filter table<br>१४४५+१९५+३२०=१९६० Euro<br>x ५८<br>१,१३,६८०.०० |
| | **अंतीम किंमत** | --- | **३,५३,३४७.००**<br>**२ % ७,०६६.९४**<br>3,46,280.06 | **३,७५,८२९.४०**<br>**२ % ११,२७४.८८**<br>**३,६४,५५४.४२** | **१,८७,०००.००** |
| ५. | Talting Type Vegetable Washer Capacity-kgs per ३ to ५ minute ०१ nos.<br>मुळदरपत्रकानुसार किंमत | --- | ८,१९,५००.००<br>Vat १,०२,४३७.५०<br>Inst. १९,५२८.६९<br>Tran. १४,२०१.९४<br>**९,५५,६६८.१३** | १४,६८,१०९.०० | ८,४१,९५९.००<br>Vat १,०५,२४४.८८<br>९,४७,२०३.८८ |
| | सुट वजा जाता किंमत | --- | **No Discount** | १०% ३,२१,२९८.१० | ३% ८,१६,७००.२३<br>Vat १,०२,०८७.५०<br>९,१८,७८७.७३ |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास | --- | **९४७० Euro**<br>x ५८<br>५,४९,२६०.०० | **१४६४० Euro**<br>x ५८<br>८,४९,१२०.०० | **9299 Euro**<br>x ५८<br>५,३९,३४२.०० |
| | **अंतीम किंमत** | --- | **९,५५,६७२.००**<br>**२ % १९,११३.४४**<br>९,३६,५५८.५६ | **९,८०,३३५.००**<br>**३ % २९,४१०.०५**<br>९,५०,९२४.९५ | **९,७४,५००.००** |
| ६. | Talting Type Grain Washer Capacity- ७० kgs per ३ to ५ minute ०२ nos.<br>मुळदरपत्रकानुसार किंमत | --- | १६,३९,०००.००<br>Vat २,०४,८७५.००<br>Inst. ३९,०५७.३७<br>Tran. २८,४०३.८७<br>१९,११,३३६.२४ | **29,36,218.00** | १६,८३,९१८,००<br>Vat २,१०,४८९.७५<br>१८,९४,४०७.७५ |
| | सुट वजा जाता किंमत | --- | **No Discount** | १०% २६,४२,५९६.२० | ३% १६,३३,४००.४६<br>Vat २,०४,१७५.०६<br>१८,३७,५७५.५२ |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास | --- | **९४७० x२ = १८९४० Euro**<br>x ५८<br>१०,९८,५२०.०० | **१४,६४० Euro**<br>x २<br>२९,२८०.०० Euro<br>x ५८<br>१६,९८,२४०.०० | **9299 x2 = 1898 Euro**<br>x ५८<br>१०,७८,६८४.०० |
| | **अंतीम किंमत** | --- | **१९,११,३४४.००**<br>**२ % ३८,२२६.८८**<br>18,73,117.12 | **19,60,671.00**<br>**3% 58,820.13**<br>19,01,850.87 | **१९,४९,०००.००** |
| ७. | Batter Mixer/ Homogeniser Capacity-५०० Lit.-०२ nogs.<br>मुळ दरपत्रकानुसार किंमत | --- | ८,८०,०००.००<br>Vat १,१०,०००.००<br>Inst. २०,९७०.४०<br>Tran. ५,२५०.४०<br>१०,२६,२२०.८० | १५,७५,७०२.०० | ५,१६,००८.०० |
| | सुट वजा जाता किंमत | --- | **No Discount** | १०% १४,१८,१३१.८० | ३% ५,००,५२७.७६ |
| | संस्थानचे नांवे आयात केल्यास | --- | **४७९२ Euro**<br>**x ५८**<br>**= २,७७,९३६.००** | **७,४०० Euro**<br>**x ५८**<br>**= ४,२९,२००.००** | **५४८४ Euro**<br>x ५८<br>३,१८,०७२.०० |
| | अंतीम किंमत | --- | **१०,२६,२२४.००**<br>**२ %**<br>**२०,५२४.४८**<br>10,05,699.52 | **१०,७४,०२९.८०**<br>**२ %**<br>**३२,२२०.८९**<br>**१०,४१,८०८.९१** | **६,२०,३००.००** |

वरील तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करुन व श्री संजीव देशमुख,किचन कन्सलटंट यांचे शिफारसीनुसार सर्व यंत्रांची दुरुस्ती व देखभालीचे सोयीसाठी वरीलप्रमाणे अ.नं. ०१ ते ०७ करीता मे.राईट इक्वीपमेंट प्रा.लि.नवी दिल्ली यांचे दर मान्य करण्यात यावे असे ठरले.

परंतू उपरोक्त इक्वीपमेंट थेट संस्थानचे नावावर आयात केल्यास किती खर्च कमी होईल व कस्टम ड्युटीतून सुट मिळणेसाठी श्री शिरगुळकर टॅक्स कन्सल्टंट,मुंबई यांचेशी प्रसादालय उपसमितीने चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,प्रसादालय विभाग)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.३९** **श्री.सिताराम चंद्रभान वाखुरे, कंत्राटी सल्लागार यांचे मुदतवाढी बाबत.**

**निर्णय क्र.३३५** श्री सिताराम चंद्रभान वाखुरे यांची जा.नं.एसएसएस/वशी-०१ /१०५५०/२००५ दि. २३/०१/२००५ चे आदेशाने विधी विभागाकडे ''कंसलटंट '' या पदावर कंत्राटी पध्दतीाने रुपये- ७,०००- (अक्षरी रुपये- सात हजार ) मात्र इतक्या एकत्रित मानधनावर सहा महिने कालावधीसाठी नेमणुक करण्यात आलेली आहे. त्यांची सदर कंत्राटी पध्दतीचे कालावधीची मुदत संपुष्टात आले नंतर मा.व्यवस्थापन समितीचे मायतेने पुन्हा जा.नं.एसएसएस/वशी-०१/७३०२/२००६ दि. ०३/०६/२००६ चे आदेशाने दिनांक २१/०४/२००६ पासून पुढे ६ महिने कालावधीसाठी ( दि.२०/१०/२००६ पर्यंत ) वाढविण्यात आलेली आहे. त्यांची सदर कंत्राटी पध्दतीचे कालावधीची मुदत संपुष्टात आले नंतर मा.व्यवस्थापन समितीचे मायतेने पुन्हा जा.नं.एसएसएस/वशी-०१/१५२६२/२००६ दि. ०२/११/२००६ चे आदेशाने दि.२१/१०/२००६ पासून पुढे ६ महिने कालावधीसाठी (दि.२०/०४/२००७ पर्यंत ) वाढविण्यात आलेली आहे.या कालावधीत त्यांना संस्थान कायम कर्मचारी यांची मुळ व दुय्यम सेवा पुस्तके नोंद घेणे विषयीची कामे दिलेली आहे. त्यांची सदर कंत्राटी पध्दतीचे कालावधीची मुदत दि.२०/०४/२००७ अखेर संपुष्टात आलेली आहे.

यास अनुसरुन दि. २०/०३/२००७ रोजीचे अर्जाने श्री सिताराम चं.वाखुरे यांनी दि.२० मार्च २००७ रोजीच्या अर्जात माझी कंत्राटी पध्दतीचे कालावधीची मुदत दिनांक २०/०४/२००७ रोजी संपुष्टात आलेली असून पुढील कालावधीसाठी वाढविण्यात यावी, असे नमूद केले आहे.

श्री सिताराम चं.वाखुरे यांना दि.१४/१०/२००६ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील

निर्णय क्र.८३४ अन्वये माहितीचा अधिकार बाबतची कामे व संस्थान कायम कर्मचारी यांची मुळ व दुय्यम सेवा पुस्तकात सध्याच्या कालावधीतील नोंदी घेणे विषयाची कामे देता येईल, असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन श्री.सिताराम चंद्रभान वाखुरे,कंत्राटी सल्लागार यांना पुर्वीचेच शर्ती व अटींवर पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात यावी,असें ठरलें.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.४०** **मौजे शिर्डी येथील सर्व्हे नंबर १०८ पैकी (साईगोपी असोसिएटस् व साईगोपी रिसॉर्टस् प्रा.लि.) यांचे ०३ हे ७८ आर १७ चौमी जमिनीबाबत.**

**निर्णय क्र.३३६** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५ अन्वये मा.उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस सुरु असणारे खालील जमिनीबाबतचे भूसंपादन प्रकरण रद्द करण्यात येऊन/वगळणेत येऊन सदरील जमीन प्रति आर रक्कम रुपये २,९७,०००/- मात्र या दराने खरेदी करणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

मे. साईगोपी असोसिएटस् /मे.साईगोपी रिसोर्टस् प्रा.लि. यांचे विश्वस्त व संचालक ०१. श्री. किशोर मोटूमल बच्छाणी व ०२. श्री.शिवकुमार मोटूमल बच्छाणी

| अ.नं. | जुना सर्व्हे नंबर | नवा सर्व्हे नंबर | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी |
|---|---|---|---|
| ०१ | १०८/१/१ | १०८/१ | ००-९४-८५ |
| ०२ | १०८/१/२ | १०८/४ | ००-५५-३२ |
| ०३ | १०८/१/३ | १०८/५ | ०१-१२-००<br>००-०२-०० पोटखराबा |
| | | | ०१-१४-०० |
| ०४ | १०८/१/४ | १०८/६ | ०१-१२-००<br>००-०२-०० पोटखराबा |
| | | | ०१-१४-०० |
| | | **एकुण** | **०३-७८-१७** |

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार, भूसंपादनाचे प्रकरण रद्द करणेसाठी / वगळणेबाबत व सदरील जमीन खरेदी करण्यास परवानगी मिळणेकामी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर व मा.उपविभागीय

अधिकारी, श्रीरामपूर भाग, श्रीरामपूर यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेकामी कामगार तलाठी, शिर्डी यांचेकडून उपरोक्त तक्त्यातील सर्व्हे नंबर १०८/१/१ ते १०८/१/४ या जमिनीचे ७/१२ उतारे दिनांक २२ फेब्रुवारी, २००७ रोजी उपलब्ध करवून घेण्यात आले. सदरील ७/१२ उतारे पाहिले असता त्यात खालीलप्रमाणे बदल झालेला आढळून आला (कामगार तलाठी, शिर्डी यांच्याकडून दिनांक २६ ऑक्टोबर, २००६ रोजी, उपरोक्त जमिनीचे उतारे आणण्यात आले होते, त्यामध्ये व पुर्वीच्या उताऱ्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झालेला नव्हता.) :

| अ.नं. | जमीनमालकाचे नांव | जुना सर्व्हे नंबर (नवा सर्व्हे नंबर) | क्षेत्र हेक्टर-आर-चौमी | ७/१२ उताऱ्यात झालेला बदल |
|---|---|---|---|---|
| ०१ | मे. साईगोपी असोसिएटस्, मुंबई चे विश्वस्त श्री. शिवकुमार मोरुमल बच्छानी व श्री. किशोर मोरुमल बच्छानी | १०८/१/१ **(१०८/१)** | ००-९४-८५ | बदल नाही. |
| ०२ | मे. साईगोपी असोसिएटस्, मुंबई चे विश्वस्त श्री. शिवकुमार मोरुमल बच्छानी व श्री. किशोर मोरुमल बच्छानी | १०८/१/२ (१०८/४) | ००-५५-३२ | बदल नाही. |
| ०३ | मे. साईगोपी असोसिएटस्, मुंबई चे विश्वस्त श्री. शिवकुमार मोरुमल बच्छानी व श्री. किशोर मोरुमल बच्छानी | १०८/१/४ **(१०८/६)** **(१०८/६/१)** | ००-१८-३७ | क्षेत्रामध्ये बदल झालेला आहे. |
| ०४ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | १०८/१/४ **(१०८/६/२)** | ००-००-२६६८.७० | मालकी हक्कात बदल झाला, खुल्या जागेखालील क्षेत्र |
| ०५ | शिर्डी नगरपंचायत, शिर्डी | १०८/१/४ **(१०८/६/३)** | ००-००-६८९४.२० | मालकी हक्कात बदल झाला, रस्त्याखालील क्षेत्र |
| ०४ | मे.साई गोपी रिसोर्टस् प्रा.लि., मुंबई चे संचालक श्री. शिवकुमार मोरुमल बच्छानी व श्री. किशोर मोरुमल बच्छानी | १०८/१/३ **(१०८/५)** | ०१-१२-००<br>००-०२-०० पोख<br>०१-१४-०० | बदल नाही. |
| | **एकुण** | | **०३-७८-१७** | |

७/१२ चे उता-यात इतर हक्कात श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांचे शैक्षणिक उपक्रमासाठीच्या सार्वजनिक कारणासाठी संपादनाखाली जमीन असा शेरा असतांना व भूसंपादनाचे प्रकरण सुरु असतांना देखील, सदरचा बदल मा.तहसिलदार, राहाता यांचेकडील आदेश क्रमांक कावि/जमीन/७५१/२००६, दिनांक १२ जुलै,२००६ नुसार झालेले आहेत, असे फेरफार क्रमांक १७९०६ वरुन दिसून आले.

सदरचे क्षेत्रात श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकरीता साईआश्रम निवासस्थान प्रकल्प (सुमारे १५ हजार साईभक्तांची निवासव्यवस्था होऊ शकेल असे) देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी हे शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे माध्यमातून उभारणेबाबत प्रस्तावित आहे. या प्रकल्पासाठी संस्थानने जागा उपलब्ध करुन द्यावयाची आहे , त्यामुळे सदरची जमीन खरेदी घेणे संस्थानने प्रस्तावित केले होते व त्यानुसार सदरील जमिनीचे भूसंपादन प्रकरण रद्द करणेबाबत / वगळणेबाबत कार्यवाही इकडील कार्यालयामार्फत सुरु करण्यात आली होती. या संपूर्ण क्षेत्रासह सध्या संस्थान मालकीचे असलेल्या सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील काही क्षेत्र तसेच सर्व्हे नंबर १०७ पैकी मधील श्री.कोते व इतर खातेदार यांच्या क्षेत्र मिळून सदर प्रकल्पासाठी देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे मार्गदर्शनाने आर्किटेक्ट यांनी सुधारीत ले-आऊट तयार केला आहे. त्यामुळे यापुर्वी मंजूर करण्यात आलेल्या ले-आऊट मध्ये बदल करावा लागणार आहे. त्यामुळे सर्व्हे नंबर १०८ पैकी उपरोक्त सर्व क्षेत्र संस्थानचे ताब्यात येणे आवश्यक आहे.

त्यामुळे शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी बिनशेती रेखांकनानुसार उपरोक्त जमिनीपैकी नवीन सर्व्हे नंबर १०८/६/२ क्षेत्र २६६८.७० चौरस मीटरला खुल्या जागेखालील क्षेत्र व नवीन सर्व्हे नंबर १०८/६/३ क्षेत्र ६८९७.२० चौरस मीटर रस्त्याखालील क्षेत्र या जमिनीस मालकी हक्काचे नांव लावलेले आहे, ते कमी करुन सर्व क्षेत्र पुर्वीप्रमाणेच करणे आवश्यक आहे. याबाबत संस्थान वकिलांचा दिनांक २४ फेब्रुवारी, २००७ रोजी अभिप्राय घेण्यात आला असून त्यांनी ही फेरफार क्रमांक १७९०६ अन्वये शिर्डी नगरपंचायत अशी झालेली नोंद कमी होणे खरेदीखताच्या दृष्टीने उचित आहे, असा अभिप्राय दिलेला आहे. तसेस साईगोपी असोसिएटस्, मुंबई यांनी त्यांचेकडील दिनांक ०२ मार्च, २००७ व दिनांक २४ मार्च, २००७ रोजी शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी सर्व्हे नंबर १०८/१/४ या क्षेत्रास लागलेले शिर्डी नगरपंचायतीचे नांव कमी करणेबाबत मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना कळविलेले आहे.

यादृष्टीने मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचेकडेस दिनांक २४ फेब्रुवारी, २००७ व दिनांक १३ मार्च, २००७ रोजी उपरोक्त सर्व्हे नंबर १०८/१/४ (नवीन सर्व्हे नंबर १०८/६) चे ७/१२ उताऱ्यास झालेली शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांची नोंद कमी करणेबाबत लेखी पत्र देण्यात आलेले आहे.

मा.कार्यकारी अधिकारी यांनी सर्व्हे नंबर १०८/१/४ पैकी क्षेत्रास शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे नांव कमी करणेबाबत करण्यात आलेल्या पत्रव्यवहार व इतर अनुषंगिक कार्यवाहीस कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी करावे लागणारे योग्य आवश्यक कार्यवाहीचे अधिकार मा. अध्यक्ष व कार्यकारी अधिकारी यांना प्रदान करण्यात आले.

तसेच सर्व्हे नंबर १०८/१/१ ते सर्व्हे नंबर १०८/१/४ या ०३ हेक्टर ७८ आर १७ चौमी क्षेत्रापैकी ज्या क्षेत्रास शिर्डी नगरपंचायत, शिर्डीचे नांव लागलेले आहे ते नांव कमी करण्यासाठी कदाचित बिनशेती रेखांकन रद्द होण्याची शक्यता आहे. सदरील जमिनीचे बिनशेती रेखांकन रद्द झाल्यास सदरील जमीन शेत जमीन म्हणून खरेदी करावी लागेल व जमीन खरेदी केल्यानंतर पुन्हा नवीन बांधकाम रेखांकनानुसार सदरील जमीन बिनशेती करुन घ्यावी लागेल, असे मा.कार्यकारी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिले. यावर सविस्तर चर्चा होऊन, सदरील जमीन बिनशेती अथवा शेतजमीन म्हणून दिनांक ०६ जानेवारी, २००७ रोजीचे सभेत ठरल्याप्रमाणे, रुपये २,९७,०००/- मात्र प्रति आर या दराने खरेदी करण्यात यावी. सदरील जमीन खरेदीसाठी खरेदीखत, वकील फी व इतर अनुषंगिक व योग्य त्या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४१. आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद शिर्डी येथे भरविणेबाबत...**

**निर्णय क्र.३३७.** शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद भरविणेच्या कामकाजाविषयी चर्चा करण्यासाठी श्री. अे. आर. नाडकर्णी व त्यांचे सहकारी यांना व्यवस्थापन समितीपूढे बोलविण्यात आले होते. त्यांच्याशी पुढील मुद्यांवर सविस्तर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आला आहे.

०१. परिषदेस उपस्थित राहणाऱ्या विविध देवस्थानांच्या प्रतिनिधींची निवासाची व्यवस्था होणेसाठी हॉटेल सन् अॅन्ड सॅन् येथे कमीत कमी ८० खोल्या आरक्षित करण्यात याव्यात.त्याचप्रमाणे प्रेस मिडीयाचे प्रतिनिधींना निवासासाठी हॉटेल श्रध्दा पार्क इन येथे २० खोल्यांचे आरक्षण करावे.

०२. आंतरराष्ट्रीय परिषद नविन प्रसादालय येथील मोठ्या हॉलमध्ये भरविण्यात यावी. नविन प्रसादालयाचे काम बांधकाम विभागाने परिषद भरविण्यापूर्वी पूर्ण करुन तेथे प्रशस्त हॉल तयार करावेत. तेथील स्टेजची, पार्कींग व रस्त्याचे काम परिषदेपूर्वी पूर्ण होईल, असे नियोजन करावे.

०३. मंदिर परिषद पूर्वीच्या नियोजीत तारखेप्रमाणे दिनांक २८-२९ एप्रिल, २००७ रोजी घेण्यात येणार होती. परंतु, काही अपरिहार्य कारणामुळे ही परिषद दिनांक ०२ मे, २००७ रोजी एक दिवसासाठी घेण्यात येऊन दिनांक ०३ मे, २००७ रोजी ज्या प्रतिनिधींना साईट सिन पाहण्याची इच्छा आहे त्यांना त्याप्रकारे वाहनांची उपलब्धता करुन द्यावी. मंदिर परिषदेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा. मुख्यमंत्री श्री विलासरावजी देशमुख साो. यांना आमंत्रित करावे.

०४. श्री नाडकर्णी यांची आंतरराष्ट्रीय देवस्थान परिषद भरविण्याचे कामकाजासाठी नेमणूक करण्यात आली आहे. परिषदेसाठी जास्तीत जास्त मंदिरांना आर्मंत्रित करण्याचे काम त्यांची व त्यांच्या प्रतिनिधींनी करावयाचे आहे. परिषदेसाठी बोलविण्यात येणारे स्पिकर्स मा. अध्यक्ष साो. व मा. विश्वस्त आमदार श्री राधाकृष्ण विखे पा. यांच्याशी चर्चा करुन निश्चित करुन त्यांना निमंत्रण द्यावयाचे आहे.

०५. श्री नाडकर्णी व त्यांच्या प्रतिनिधींनी निमंत्रण पत्रिका, स्टेजचे डेकोरेशन, प्रतिनिधींना द्यावयाचे किट ( मोठी बॅग, पेन, रायटींग पॅड, श्रीबाबांचा फोटो, पेन्सील, निमंत्रण पत्रिका इ.) हे मा. अध्यक्ष साो. व मा. विश्वस्त आमदार श्री राधाकृष्ण विखे पा. साो. यांच्याशी चर्चा करुन ते खरेदी करणे, निमंत्रण पत्रिकेची छपाई करणे, सांस्कृतीक कार्यक्रम आयोजीत करणे इ. कामे संस्थानच्या मुंबई कार्यालयातून करावयाचे आहेत. त्यासाठी येणाऱ्या अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

०६. देवस्थान परिषदेसाठी आमंत्रित करण्यात आलेल्या विविध देवस्थानच्या प्रतिनिधींना परिषदेची तारीख बदलल्याने विमानाची व रेल्वेची तिकीटे रद्द करावी लागणार आहेत. त्यांना परिषदेस हजर राहता यावे यासाठी आवश्यकतेप्रमाणे विमानाचे किंवा रेल्वेचे भाडे देण्यात यावे.

०७. परिषदेची पूर्ण व्हिडीओ शुटींग करणे, परिषदेसाठी मोठ्या प्रमाणात प्रसिध्दी देणे यासाठी श्रीहरी कोहली यांनी सुचविल्याप्रमाणे संस्कार टिव्ही चॅनलला परवानगी देण्यात आली.

०८. परिषदेसाठी हजर राहण्यासाठी बरेचशे प्रतिनिधी मुंबई येथे येणार आहेत. तेथून त्यांना शिर्डी येथे आणण्यासाठी वाहनाची व्यवस्था संस्थानने करावयाचे ठरले. त्याचप्रमाणे मुंबई येथे त्यांना काही काळ विश्रांती घेण्यासाठी चांगल्या हॉटेलमध्ये आवश्यकतेप्रमाणे खोल्या आरक्षित करण्यात याव्यात, असे ठरविण्यात आले.

०९. परिषदेची तारीख बदलल्याने जास्तीत जास्त मंदिरांना संपर्क साधता यावा यासाठी आणखी एक टेलिकॉलरची १ एप्रिल, २००७ पासून रुपये १०,०००/- मानधनावर तात्पुरती नेमणूक करण्यासाठी श्री नाडकर्णी यांना परवानगी देण्यात आली.

१०. परिषदेचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर झालेल्या कामकाजाबाबतची व्हिडीओ सीडी तयार करणे, सोविनियर तयार करणे ते पोष्टाने परिषदेस हजर राहणाऱ्या प्रतिनिधींना पाठविणे इ. कामकाज श्री

नाडकर्णी व त्यांच्या सहकाऱ्यांनी करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना आवश्यकतेप्रमाणे पूर्वी ठरल्याप्रमाणे मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-आय.टी. विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.४२** **समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी इत्यादी मंदिरांचे नावाचे बोर्ड तयार करणे बाबत**

**निर्णय क्र.३३८** मा.विश्वस्त उर्मिला प्र.जाधव यांनी अशी सुचना मांडली की, शिर्डी येथे साईभक्त आल्यानंतर त्यास समाधी मंदिर, व्दारकामाई, चावडी या मंदिराबाबत माहिती व ते कोठे आहे याबाबत माहिती होण्यासाठी नगर-मनमाड रस्त्यावर न्युऑन साईन बोर्ड अथवा १ फुट उंचीचे अक्षरे असलेले पितळी ओतीव अक्षराचे बोर्ड लावण्यात यावेत. या बोर्डबरोबरच नवीन प्रसादालयासाठी बोर्ड बनविण्यात यावेत. याकामी कोटेशन्स मागविण्यात यावेत, यासाठी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

वरील निर्णय क्र.२४८ ते ३३८ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरित/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी

स्वाक्षरित/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समिती,शिर्डी